आज

मी तुमच्यासाठी तुमचा धर्म

परिपूर्ण केला

आणि तुमच्यावर माझा अनुगृह पूर्ण केला

तुमच्यासाठी धर्म म्हणून

इस्लामची निवड केली

(कुरआन, ५:३)

हे शक्तिशाली अल्लाह!
माझा निर्माता, स्वामी आणि पोशिंदा,
माझ्या कृतींवर नजर ठेवणारा,
मी विनंती करतो, याचना करतो, तुझी मदत मागतो,
माझ्या या नम्रतापूर्वक प्रयत्नांचा स्वीकार कर.
या पुस्तकाच्या वाचकांना मार्गदर्शनाचा प्रकाश दे.
अंतिम निवाड्याच्या दिवशी
जेव्हा तुझ्या कृपा आणि दयेशिवाय
काहीएक कमी येणार नाही,
त्या दिवशी मला क्षमा कर.
माझी मदत कर.

आमीन!

# इस्लाम

## सर्वांसाठी

सय्यद हामिद मोहसिन

अनुवाद

सय्यद इफ्तिखार अहमद

SALAAM Centre

सलाम सेंटर

शांतता आणि बंधुभावाचा पुरस्कार करते

www.islamforyou.in www.salaamcentre.in

ISLAM SARVAN SATHI (Marathi)
ISLAM FOR ALL (English)

Copyright © 2015 SYED HAMID MOHSIN

ISBN: 978-81-928089-5-6

All rights reserved. No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, including photocopy, recording, or any information storage and retrieval system, without permission in writing from the author, except for the situation below which is permitted.

**For Reprinting :** Reprinting or reproducing this book on the condition that absolutely no change, addition, or omission is introduced is permitted free of charge. To make high quality reprints, you may contact the author / Salaam Centre to obtain free copies of the soft copy or printing files of this book.

The Web Site of This Book:

This e-book is available on the web world wide at:

www.islamforyou.in - www.salaamcentre.in

1st Edition : June 2015 - Quantity : 5000
No. of pages : 232
Price: Rs. 250/-

Printed at Thomson Printers India Ltd

Published by:

SALAAM CENTRE
# 65, Ist main, S.R.K. Garden, Jayanagar East, Bangalore - 560 041
Branch #5, Rich homes, Rochmond road, Bangalore - 560 025

Contact: +91 99011 29956 / +91 99451 77477 / 080 - 2663 9007
Email: salaamcentrebangalore@gmail.com

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | इस्लाम | १ |
| २. | एकेश्वर | ५ |
| ✭ | अल्लाह : या नावाचा अर्थच प्रेम आहे | १२ |
| ✭ | तौहीद | १५ |
| ✭ | माणसाच्या जीवनावर तौहीदचा प्रभाव | १८ |
| ३. | रिसालत (प्रेषित्व) | २१ |
| ४. | देवदूत | २७ |
| ५. | जीवन मृत्यूनंतरचे | ३१ |
| ✭ | श्रद्धा ठेवावी की ठेवू नये | ३५ |
| ६. | अवतरलेले ग्रंथ | ४१ |
| ✭ | पवित्र कुरआन, ईश्वराचं शक्तिशाली संबोधन | ४३ |
| ✭ | पवित्र कुरआनचा प्रभाव | ५४ |
| ✭ | अवतरण, दैवी संचारण | ५५ |
| ✭ | पवित्र कुरआनचं संग्रहण | ५६ |
| ✭ | सीरत (प्रेषितांचं चरित्र) | ५८ |
| ✭ | हदीस (प्रेषितांची वचनं) | ५९ |
| ✭ | सुन्नह | ६१ |
| ७. | श्रद्धा कृतीत आणणे | ६३ |
| ✭ | इस्लामचे पाच स्तंभ | ६५ |
| ✭ | शहादा म्हणजे श्रद्धेची घोषणा | ६६ |
| ✭ | धार्मिक विधी आणि इस्लामसमर्पित जीवन | ६८ |

| | | |
|---|---|---|
| ✯ | मस्जिद | ६९ |
| ✯ | संपूर्ण धरती मस्जिद आहे | ७१ |
| ✯ | अजान (नमाजसाठी बोलावणं) | ७२ |
| ✯ | वजू (विधीपूर्वक तोंड, हात-पाय धुणे) | ७४ |
| ✯ | सलाह - प्रार्थना (नमाज) | ७७ |
| ✯ | नमाजची (प्रार्थनेची) कृती | ८० |
| ✯ | नमाजची वैशिष्ट्ये | ८७ |
| ✯ | रमजान आणि रोजे (उपवास) | ८९ |
| ✯ | जकात | ९३ |
| ✯ | जकातचे दूरगामी परिणाम | ९४ |
| ✯ | हज्ज यात्रा | ९७ |
| ✯ | विश्वव्यापी बंधुभाव | १०० |
| ८. | इस्लामच्या मूलभूत संकल्पना | १०३ |
| ✯ | जीवनाची संकल्पना | १०५ |
| ✯ | पापाची संकल्पना | १०७ |
| ✯ | तौबा - पश्चात्तापाची संकल्पना | १०९ |
| ✯ | ईमान - श्रद्धेची संकल्पना | १११ |
| ✯ | निसर्गाची संकल्पना | ११३ |
| ✯ | खलीफा - विश्वस्ताची संकल्पना | ११५ |
| ✯ | सदाचाराची संकल्पना | ११७ |
| ✯ | इ’तेदाल - मध्यममार्गाची संकल्पना | ११८ |
| ✯ | सेवेची संकल्पना | १२० |
| ✯ | स्वातंत्र्याची संकल्पना | १२३ |
| ✯ | समतेची संकल्पना | १२५ |
| ✯ | बंधुभावाची संकल्पना | १२७ |
| ✯ | न्यायाची संकल्पना | १२८ |
| ✯ | इल्म - ज्ञानाची संकल्पना | १३० |
| ✯ | शांततेची संकल्पना | १३१ |
| ✯ | नैतिकतेची संकल्पना | १३२ |

| | | |
|---|---|---|
| ✯ | जिहादची संकल्पना | १३६ |
| ✯ | शरिआह - इस्लामी कायद्याची संकल्पना | १३७ |
| ✯ | शरिआहचा उद्देश | १३८ |
| ✯ | फिकह - इस्लामी कायदेशास्त्राची संकल्पना | १३९ |
| ✯ | इज्तिहाद - बदलाचं मूलभूत तत्त्व | १४० |
| ✯ | शूरा - सल्लामसलतीची संकल्पना | १४१ |
| ✯ | विहित आणि निषिद्ध, कायदेशीर आणि बेकायदेशीरची संकल्पना | १४२ |
| ९. | दैनंदिन जीवनात इस्लामचं आचरण | १४५ |
| ✯ | इस्लाममधील पारिवारिक जीवन | १४५ |
| ✯ | माता-पित्यासाठीची कर्तव्यं | १४६ |
| ✯ | स्त्रिया | १४९ |
| ✯ | पिता | १५६ |
| ✯ | मुलंबाळं | १५७ |
| ✯ | बुजुर्ग लोक | १५९ |
| ✯ | नातेवाईक | १६० |
| १०. | इस्लाममधील समाजजीवन | १६१ |
| ✯ | शेजारी | १६१ |
| ✯ | गरीब / आजारी माणसं | १६४ |
| ✯ | गुलाम / सेवक / अपंग | १६५ |
| ✯ | अनाथ | १६७ |
| ✯ | दया सर्व निर्मितीसाठी | १६९ |
| ✯ | पशु-पक्ष्यांशी व्यवहार | १७० |
| ✯ | हरित पृथ्वी | १७४ |
| ✯ | हरित पट्टे | १७५ |
| ✯ | निसर्गदत्त साधनसंपत्ती | १७६ |
| ११. | व्यक्तिगत जीवन | १७९ |
| ✯ | व्यक्तित्वाचा विकास, नैतिक अस्तित्व | १७९ |
| ✯ | स्वत:चं बलिदान, स्मितहास्य - दानासारखं, सामाजिक न्याय | १८२ |

| | | |
|---|---|---|
| ✯ | दानधर्म आणि मानवतावाद, भेटणं आणि अभिवादन करणं | १८४ |
| ✯ | सभ्यपणा आणि शिष्टाचार | १८५ |
| ✯ | विनयशीलता आणि श्रद्धा, ईश्वराला चांगुलपणा आवडतो, कृपा | १८५ |
| ✯ | खरं प्रेम, सहयोग, आभारप्रदर्शन | १८६ |
| ✯ | प्रामाणिकपणा, सचोटी, विश्वसनियता | १८८ |
| ✯ | सुसंस्कृत संभाषण, व्यापारिक व्यवहार | १८९ |
| ✯ | स्वच्छता श्रद्धेचा अर्धा भाग आहे, बंधुभाव | १९० |
| ✯ | अत्याचारपीडितांशी मैत्री ठेवा, शिक्षण आणि ज्ञान | १९१ |
| ✯ | आचार आणि वर्तन, प्रतिकार, शंका आणि संशय | १९३ |
| ✯ | खोटं बोलणं, चुकीच्या कल्पना पाप आहेत | १९४ |
| ✯ | उघड-उघड गुन्हा, उधळपट्टी | १९६ |
| ✯ | उद्धटपणा, आकांक्षा, मत्सर, टोमणा देणं | १९६ |
| ✯ | आवश्यक वस्तूंची साठेबाजी, वाममार्गानं कमवलेली धनसंपत्ती | १९८ |
| ✯ | फसवणूक आणि लबाडी, कुकृत्ये आणि भ्रष्टाचार, लोभ | १९९ |
| ✯ | भ्रष्टाचार, मद्यपान आणि जुगार | २०१ |
| ✯ | रिबा म्हणजेच व्याज अथवा व्याजाची पद्धत | २०३ |
| ✯ | दारिद्र्याचं भय आणि गर्भपात | २०५ |
| ✯ | वंशवाद | २०७ |
| १२. | जीवनाचे काही ठळक पैलू | २११ |
| ✯ | अन्न-पाणी | २११ |
| ✯ | मद्यार्कयुक्त पेय हराम आहेत | २१२ |
| ✯ | वस्त्र-पोषाख | २१४ |
| ✯ | सण-त्योहार, ईदुल-फित्र, ईदुल-अजहा | २१५ |
| ✯ | सलातल जुमा (शुक्रवारची नमाज) | २१६ |
| ✯ | मुस्लिम जगत | २१७ |
| | समारोप | २२० |
| | आभार | २२१ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | २२२ |

# प्रेषित मुहम्मद आणि त्यांच्या अनुयायांच्या नावाचा उच्चार करण्याचे शिष्टाचार

''सल्लल्लाहु अलैहि वसल्लम'' म्हणजे ''त्यांना अल्लाहची शांतता आणि कृपा लाभो.''

जेव्हा जेव्हा प्रेषित मुहम्मद यांचं नाव घेतलं जाई तेव्हा सर्व मुस्लिमांनी त्यांच्यासाठी दरुद, प्रार्थना करणं अनिवार्य आहे. आणि यासाठी प्रेषितांच्या नावाचा उच्चार केल्यानंतर लगेच ''सल्लल्लाहु अलैहि वसल्लम'' (त्यांना अल्लाहची शांतता आणि कृपा लाभो) ही प्रार्थना केली जाते.

प्रेषितांसाठी अशा प्रार्थनेचा अर्थ इस्लामच्या या श्रद्धेस बळकटी देतो की मुहम्मद (स.) ईश्वर नसून एक मनुष्य आहेत. ते जरी सर्व मानवजातीसाठी मार्गदर्शक आणि अंतिम प्रेषित असले तरी त्यांनासुद्धा अल्लाहच्या दयेची आणि त्यांच्या कृपेची गरज आहे. यामुळे मुस्लिमांना याचा महाकाय आणि व्यापक संबंध म्हणजे प्रेषितांच्या वस्तुनिष्ट स्थितीचं स्मरण करून देणे होय. यामुळे मुस्लिमांना सावध करण्यात येतं की त्यांनी प्रेषितांना ईश्वराचं स्थान देता कामा नये किंवा ईश्वरासारखा दर्जा देऊ नये की त्यांना ईश्वराच्या जवळपासचं स्थान द्यावं. खरं पाहता इस्लामच्या एकेश्वरी तत्त्वाला यामुळे संरक्षण मिळते.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या अनुयायांबाबत ''रजि अल्लाहु अन्हु'' म्हणणे.

प्रेषितांच्या अनुयायांच्या नावांचा उच्चार करतेवेळी त्यांच्या सन्मानार्थ मुस्लिमांनी ''रजि अल्लाहु अन्हु'' (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) असे म्हणणे इष्ट आहे.

# १

# इस्लाम

या जगात प्रत्येक धर्माला, त्या धर्माचे संस्थापक किंवा ज्या जनसमुदायात आणि राष्ट्रामध्ये त्यांची स्थापना झालीय त्याचं नाव दिलं गेलंय. उदाहरणार्थ, ख्रिस्ती धर्माचं नाव, त्या धर्माचे प्रेषित येशू ख्रिस्तांच्या नावावरून दिलंय. बौद्ध धर्माची स्थापना गौतम बुद्धांच्या नावानं, जोरोस्टारिअनिज्म' (पारशी धर्म) धर्माचं नाव त्याचे संस्थापक जोरोस्टर आणि 'जुडाईज्म' (ज्यू लोकांचा धर्म) ज्यूडा म्हणजे ज्यूडिया. ज्या राष्ट्रात त्या धर्माची सुरूवात झाली होती त्यावरून दिलं गेलंय. इस्लाम वगळता इतर धर्मांबाबतदेखील ही वस्तुस्थिती आहे. इस्लाम असा एकमेव धर्म आहे ज्याचा संबंध कोणत्याही विशिष्ट मनुष्य अथवा जनसमूह किंवा कोणत्या विशिष्ट राष्ट्राशी नाही. इस्लामचा मूळ संस्थापक दुसरा कुणी नसून स्वयं ईश्वर आहे. इस्लामचे प्रथम प्रेषित आदम यांच्यापासून या धर्माची सुरूवात झाली.

'इस्लाम' हा अरबी भाषेतला शब्द असून याचा अर्थ 'समर्पण' म्हणजे अल्लाहच्या आदेशांना मान्य करणं आणि आज्ञाधारकता, म्हणजे अल्लाहच्या आदेशांचं पालन करणं होय. अल्लाहस समर्पित होून त्याच्या आदेशांचं पालन केल्यास शांतता लाभते. म्हणूनच इस्लामचा दुसरा अर्थ 'शांतता'देखील आहे.

ईश्वराच्या सदिच्छेला समर्पित होऊन त्यानं घालून दिलेल्या नियमांचं पालन केल्यास शांतता आणि सौहार्दाची सुरक्षा होते. यामुळे माणसाला

एकीकडे आपल्या आणि इतर माणसांदरम्यान तसेच दुसरीकडं मानवसमाज आणि ईश्वरामधील शांतता अबाधित ठेवण्यास मदत होते. यामुळे निसर्गाच्या घटकांमध्ये एकोपा निर्माण होतो. आपण सभोवताली पाहिल्यास असं आढळून येतं की प्रत्येक वस्तू- सूर्य, चंद्र, तारे, महाकाय पर्वत आणि उदंड सागर ईश्वराच्या नियमांचं पालन करतात. यामध्ये आपणांस कोणताही अनाचार अथवा गोंधळ दिसत नाही. प्रत्येक घटक ठराविक स्थिती आहे. ईश्वरानं निर्मिलेल्या निसर्गव्यवस्थेत परिपूर्ण आणि अमूलाग्र सुव्यवस्था आपण पाहात आहोत. सूर्योदय पूर्वेकडूनच होतो आणि पश्चिमेला सूर्यास्त. यात कधीच अपवाद होत नाही. चंद्र आणि तारे रात्रीच्या वेळीच उदयास येतात. रात्र संपल्यावरच दिवस उजाडतो. ही प्रक्रिया अखंड चालू असते. वसंत ऋतुत फुलं बहरतात आणि झाडांना हिरवी पालवी फुटते. इस्लामनुसार जगातली प्रत्येक प्रक्रिया अथवा माणसाला वगळता प्रत्येक घटनेचं व्यवस्थापन ईश्वरानं घालून दिलेल्या नियमांप्रमाणं पार पडते. याचा अर्थ संपूर्ण भौतिक जग अल्लाहचं आज्ञाधारक आहे. त्याच्या नियमांना समर्पित आहे. याचाच दुसरा अर्थ असा की हे जग इस्लामच्या स्थितीत असून ते 'मुस्लिम' आहे. या भौतिक जगाची आपली स्वत:ची कसली इच्छा नाही. त्यास निर्माणकर्त्याच्या कायद्याचं किंवा इस्लामच्या नियमांचं पालन करावं लागतं. म्हणजेच आत्मसमर्पण करावं लागतं. आपल्या इच्छेनुसार किंवा ऐच्छिक मार्गक्रमण त्यास करायचं नाही.

प्रत्येक घटकास ठरवून दिलेली पद्धत आहे. तिचं उल्लंघन करण्याची त्यास मुभा नाही. निसर्गाच्या या घटकांमध्ये आपण कधी ईश्वराच्या नियमांचं उल्लंघन पाहिलंय काय? नाही, मुळीच नाही. का? कारण त्यांना ईश्वराच्या नियमांचंच पालन करायचंय. त्यांच्या स्वत:ची कोणती इच्छा नाही. म्हणूनच आम्ही या निसर्गामध्ये निरंतर शांतता व सुव्यवस्था पाहतो आणि अनुभवतो आहोत.

मानवजातीचं मात्र तसं नाही. ती निराळ्या प्रकारची आहे. ईश्वरानं आम्हाला ज्ञान, बुद्धिमत्ता आणि योग्य व अयोग्य काय ते निवडण्याची क्षमता दिलीय. एवढंच नव्हे तर आम्हाला विसर पडल्यास तो त्याची आठवण करून

देण्यासाठी सतत आपले प्रेषित आणि ग्रंथ पाठवून आमचं मार्गदर्शन करतो. मुहम्मद यांच्यापूर्वी जेवढे प्रेषित आले त्यावर एका मुस्लिमाची श्रद्धा असते. अल्लाहचे सर्व प्रेषित आणि त्याचे अनुयायी मुस्लिमच होते. त्यांचा धर्म इस्लाम होता अशी त्याची धारणा आहे. ईश्वरानं पाठवलेला एकमेव सत्यधर्म (पाहा पवित्र कुरआन- २:१२८, ३:७८-८५, १७:४२-४४, ३१:२२, ४२:१३) मुहम्मद हे अल्लाहचे अंतिम प्रेषित आहेत आणि पवित्र कुरआन मार्गदर्शनपर शेवटचा ग्रंथ होय.

ईश्वरानं आम्हाला त्याच्या आदेशांचं पालन करण्याची सक्ती केलेली नसून त्यानं आम्हाला पालन करण्याचं किंवा नाकारण्याचं स्वातंत्र्य दिलंय. का बरं? कारण त्याला आमची परीक्षा घ्यायचीय. या परीक्षेनंतर मोबदला आणि शिक्षा करण्यासाठी दिवस ठरलाय. हा न्याय-निवाड्याचा दिवस आहे. जे लोक या परीक्षेत यशस्वी ठरतील त्यांना स्वर्गामध्ये शाश्वत प्रसन्नता आणि शांतता लाभणार आहे. जे अपयशी ठरतील त्यांना नरकात यातनादायक शिक्षा भोगावी लागेल. आम्ही ईश्वराच्या आदेशांचं पालन करून त्याची उपासना करून या मोबदल्यास पात्र ठरू शकतो आणि शिक्षेपासून वाचू शकतो.

सर्वच माणसांना चांगल्या गोष्टींची आवड असते. वाईट गोष्टी त्यांना आवडत नसतात, हा मानवातला गुणधर्म होय. उदाहरणार्थ, आम्हा सर्वांना सत्यता आवडते आणि खोट्या गोष्टींचा तिटकारा असतो. एका खोटारड्या माणसाला त्यास खोटारडा म्हटल्याचं आवडत नाही. का बरं? कारण मनापासून आमहाला हे माहीत आहे की खोटं बोलणं वाईट आहे. अशाच प्रकारे दुसऱ्यांना मदतीचा हात देणं, दयेचा व्यवहार करणं, सभ्यपणा, माता-पित्याचा व शिक्षकांचा आदर-सन्मान करणं, प्रामाणिकपणा आणि नैतिकतेच्या इतर सर्वच गोष्टी नेहमी पसंत केल्या जातात, त्यांची प्रशंसा होत असते. पण उद्धटपणा, क्रूरपणा, खोटं बोलणं, इतरांना दुखावणं, माता-पित्याची व शिक्षकांची अवज्ञा करणं, दुष्ट नावांनी हाक मारणं आणि दुराचार हे कुणालाच आवडत नसतात. याचाच अर्थ आपण असे म्हणू शकतो की योग्य गोष्टींना पसंत करणं आणि वाईट गोष्टी न आवडणं हा माणसाचा स्वभाव होय.

अरबी भाषेत- जी कुरआनची भाषादेखील आहे- योग्य गोष्टींना ‘मारूफ’ आणि दुष्ट गोष्टींना ‘मुनकर’ असे म्हणतात.

तसेच शांततेची इच्छा असणं आणि अनाचाराचा द्वेष करणं ही मामसाची वृत्ती आहे. अल्लाहच्या नियमांचं पालन केल्यास शांतता लाभते आणि त्याची अवज्ञा केल्यानं अनाचार माजतो. इस्लाम हीच शांतता स्थापित करतो, जी माणसांची वृत्ती आहे. म्हणूनच इस्लामला ‘निसर्ग धर्म’ म्हटले जाते; यालाच अरबी भाषेमध्ये ‘दीनुल-फितरह’ (स्वाभाविक धर्म) म्हटलंय.

# २

# एकेश्वर

## इस्लामी श्रद्धेचा पाया

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना ईश्वराविषयी विचारणा केली असता पवित्र कुरआनद्वारे याचं उत्तर रास्त ईश्वराकडूनच अवतलं,

> ''म्हणा, तो ईश्वर (अल्लाह) एकमेव आहे. अल्लाह स्वयंपूर्ण आहे. त्यानं कुणाला जन्मलं नाही की कुणी त्यास जन्म दिलेला नाही. त्याच्या तोडीचा कोणच नाही.''
>
> (कुरआन, ११२:१-४)

ईश्वराकडूनच हे स्पष्ट निवेदन आहे, कसल्या शंका-कुशंकेला वाव न देता मानवाला केलेलं संबोधन. ईश्वर एकमेव आहे. सर्व चराचरावर त्याचं प्रभुत्व आहे. तो निर्माणकर्ता आहे. काहीही करण्यास तो समर्थ आहे.

> ''(फक्त) अल्लाहच, त्याव्यतिरिक्त इतर कुणी उपास्य नाही निरंतर आणि शाश्वत. त्याला गुंगी येत नाही की झोप येत नाही, आकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही त्याच्याच (अधीन). त्याच्या आज्ञेशिवाय त्याच्याकडं शिफारस करणारा कुणीही नाही. त्याच्या समोरील आणि मागं सर्वांची त्याला माहिती आहे. त्याच्या मर्जीपलीकडं

त्याच्याविषयीचं ज्ञान त्यांच्या आवाक्यात नाही. त्याचं आसन आकाश आणि पृथ्वीवर विस्तारित आहे. त्याची जोपासना करताना त्याला थकवा येत नाही. तो वैभवशाली आणि प्रतिभावंत आहे.'' (कुरआन, २:२५५)

(अल्लाहच्या गौरवाचं वर्णन करणारी ही आयत 'आयतुल कुर्सी' या नावानं ओळखली जाते.)

कोणताही धर्म श्रद्धा आणि परंपरांवर आधारित असतो. त्याच्या केंद्रस्थानी ईश्वराविषयीची आस्था असते. एकदा का हे केंद्रस्थान अंधुक झालं की सारी व्यवस्था विखरून जाते. प्रेषित मुहम्मद आणि त्यांच्या पूर्वीच्या सर्व प्रेषितांनी ''ईश्वराशिवाय इतर कोणीही ईश्वर नाही''ची जी शिकवण दिली तो इस्लामचा महत्त्वाचा भाग आहे. तो सर्वांचा निर्माणकर्ता आणि जोपासना करणारा आहे. तो सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञ आहे. दैवी कार्यात त्याचा कुणीही सहभागी नाही.

त्याच्या आणि त्याच्या निर्मितीदरम्यान कुणीही मध्यस्थ नाही. इस्लामच्या एकेश्वरी तत्त्वाचा हा महत्त्वाचा भाग आहे. तो वादातीत असून यात कसल्याही तडजोडीला थारा नाही. कुणीही मनुष्य अगर (माणसानं योजलेल्या) देवास ईश्वर आणि त्याच्या निर्मितीदरम्यान मध्यस्थी करण्याची अनुमती नाही. अनंतकाळापासून अनंतकाळापर्यंत त्याचं अस्तित्व कायम आहे. तोच अंतिम सत्य आहे,

''अल्लाहबरोबर दुसऱ्या कुणा उपास्याचा (ईश्वराचा) धावा करू नका. त्याच्याव्यतिरिक्त कुणीही उपास्य (ईश्वर) नाही. त्याचं अस्तित्व वगळता सर्व काही नष्ट होईल. हुकूम त्याचाच, त्याच्याकडंच तुम्ही परतणार.''

(कुरआन, २८:८८)

अरबी भाषेतला 'अल्लाह' हा शब्द 'अल-इलाह' याचं संक्षिप्त रूप आहे. म्हणजेच ईश्वर. एक आणि एकच - एकमेव. तोच या सृष्टीचा निर्माणकर्ता, जोपासना करणारा, सृष्टीचे पुनरुत्थान करणारा आहे. तो परम

दयावंत आणि कृपाळू आहे. सार्वभौम, विशुद्ध, सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, विद्वत्ताप्रचुर, न्यायी, दयाशील, प्रेमळ ईश्वर आहे. प्रारंभही तोच आणि शेवटही तोच. अनंतकालीन, अदृश्य व प्रकट तोच. तोच ईश्वर, सत्यता, अंतिम सत्य. तोच ईश्वर एकमेव एकच. त्याच्यासारखा कुणी नाही.

# एकच ईश्वर एकच मानवजात

''माझा भक्त जेव्हा तुमच्याकडं माझ्याविषयी विचारणा करतो, मी त्याच्या जवळच असतो. जेव्हा तो हाक देतो ती मी ऐकतो. त्यानंही माझं ऐकावं. माझ्यावर विश्वास ठेवावा तर ते रास्त मार्ग धरतील.'' (कुरआन, २:१८६)

कुरआनात इतर एके ठिकाणी–

''तो सूक्ष्म आहे, आम्ही त्याच्या कंठाच्या शिरेपेक्षाही जवळ आहोत.'' (कुरआन, ५०:१६)

अशा प्रकारे ईश्वर आणि मानव समोरासमोर आहेत. त्यांच्यामध्ये कोणी वैयक्तिक, अधिभौतिक घटक मध्यस्थी करत नाहीत. हे इस्लामचं वैशिष्ट्य आहे. तो अशा कोणत्याही पंडित, पुरोहिताच्या अस्तित्वास मान्यताच देत नाही जे ईश्वर आणि मानवांमध्ये मध्यस्थी करण्याचा हक्क सांगतो.

मानवाच्या ईश्वराशी असलेल्या अशा प्रकारच्या जवळीकीच्या संकल्पनेमुळे पवित्र कुरआनातील मानवामधील ते अल्लाहची निर्मिती असल्यानं नैसर्गिक समता आणि बंधुभाव आहे. म्हणूनच इस्लाम, एक ईश्वर - एक मानवजातीची आदर्श कल्पना व्यक्त करतो.

# ईश्वराचे अधिकार आणि सार्वभौमत्व विभागता येत नाहीत

आपण आपल्या भोवती पाहतो, प्रत्येक परिवाराचा एक कुटुंबप्रमुख असतो. शाळेत एक मुख्याध्यापक असतो, प्रत्येक राज्याचा एक मुख्यमंत्री किंवा अध्यक्ष असतो आणि प्रत्येक शहराचा एक नगराध्यक्ष / महापौर असतो. तसेच प्रत्येक उत्पादनामागं एक उत्पादक असतो. एखाद्या कलाकृतीमागे कलाकार असतो. आपण एखादी सुंदर वस्तू किंवा आश्चर्यकारक असे काही पाहतो तोच त्याच्या निर्मात्याबाबत विचार येतात. याच आधारे ही अफाट सृष्टी आपल्यावर पसरलेलं हे दोषमुक्त आकाश, पृथ्वीवर रोवलेली पर्वतं, ऊर्जेने संचारलेल्या समुद्राच्या प्रचंड लाटा, आपल्या डोळ्यांचं सांत्वन करणारी अरण्यं, धरतीवरून वाहणाऱ्या नद्या, सतत गतिमान असणारी तारकं ज्यामुळे रात्रीतून दिवस उजाडतो आणि दिवस रात्रीत विलीन होतो. एका ऋतुपासून दुसऱ्या ऋतुत प्रवेश करतो, समुद्रातून उठणाऱ्या वाफांद्वारे होणारी पर्जन्यवृष्टी. ज्याद्वारे आमची शेती पिकते. मानवाला आणि इतर प्राणीमात्रांना ऊर्जा मिळते. या सगळ्या घटना आम्हाला एका अशा सर्वोच्च अस्तित्वाची जाणीव करून देतात, ज्याच्या आदेशावर ही सारी व्यवस्था व्यवस्थितपणे चालत आहे.

या घटनाक्रमाला सुव्यवस्थितपणे कार्यरत ठेवणारी अशी एक शक्ती आहे हा या मागचा तर्कशुद्ध परिणाम आहे. सुंदरतेनं ओतप्रोत या निसर्गामागं एक कुशल कामगार आहे, जो या साऱ्या घटकांची योजना करतो आणि प्रत्येक घटनेस त्यानं एक उद्दिष्ट ठरवून दिलंय. त्याची कला आणि कौशल्य सर्वोत्तम असायला हवं. सत्यनिष्ठ श्रद्धावंत या कलाकारास मान्य करून त्यास

अल्लाह किंवा ईश्वर या नावानं ओळखतात. तो या सृष्टीचा निर्माणकर्ता आणि तिचा शिल्पकार आहे. शून्यातून जीवनाची सुरूवात करणारा आणि जे काही अस्तित्वात आहे त्याची तरतूद करणारा. तो काही यंत्र नव्हे. तो सूर्य नाही की चंद्र नाही अथवा एखादा तारा नाही. कारण या सर्वच वस्तू दुसऱ्या एका अस्तित्वाच्या आदेशावर अवलंबून आहेत. या सर्वांवर तो प्रभुत्व बाळगतो, कारण तो सर्वांचा कर्ता आणि परमेश्वर आहे.

# कोणत्याही वस्तूचा निर्माणकर्ता त्या वस्तूपेक्षा भिन्न आणि महान असायला हवा

आम्हाला सर्वांना याची जाणीव आहे की कोणतीही वस्तू स्वत: जन्म घेऊ शकत नाही आणि हे अद्‌भूत जगसुद्धा स्वत:हून उदयास आले नाही की आकस्मिक घटना नव्हे. या जगात निरंतर बदल होत असल्याने हे सिद्ध होते की हे साकारलेलं आहे आणि जे काही साकारलेलं असतं त्याचा कुणीतरी साकारणारा असला पाहिजे.

ईश्वराची अधिकारिकता आणि त्याचं सार्वभौमत्व अविभाज्य आहे. तो सर्वशक्तिमान असून सर्व निर्मिती त्याच्या नियंत्रणाखाली आहे. या सृष्टीचे व्यवस्थापन करण्याकरिता त्यानं कुणाला अधिकार दिलेले नाहीत की दुसऱ्यांच्या हाती कसली सत्ता दिलीय. तसे जर असते, आपल्या अधिकार व सत्तेत कुणाला सहभागी केले असते तर या सृष्टीमध्ये सर्वत्र गोंधळ निर्माण झाला असता आणि यामध्ये आम्हाला जी सुव्यवस्था अनुभवते ती हिरावली गेली असती.

या जगाला साकारणारा आणि मानवाची जोपासना करणारा, निसर्गात कार्यरत असलेल्या शक्ती आणि प्रभुत्वशाली सत्ता हे एक आणि एकमेवच आहे. त्याचंच नाव अल्लाह आणि ईश्वर होय. सर्व गुपितांमागं हाच गुपित असून सर्व अस्तित्वापासून सर्वोत्तम आहे.

# अल्लाह

## या नावाचा अर्थच प्रेम आहे

अल्लाह– जसं मुस्लिमांना चांगल्या प्रकारे समजते. उपासनेचं एकमेव उद्दिष्ट आहे. संपूर्ण समर्पित होऊन ज्याची उपासना केली जाते, सर्वतोपरी ज्याचा आदर केला जातो आणि हेच इस्लाममध्ये उपासनेचा सारांश आहे.

खरं पाहता इस्लाममध्ये आराधना म्हणजे आठवड्यातून एक दिवस अनिवार्य कर्म आहे असं नसून आपल्या निर्माणकर्त्या आणि पोशिंद्याची अखंड भक्ती आणि त्याच्यासाठी अपार प्रेम व्यक्त करणे होय. त्याच्यासमोर केवळ नतमस्तक होऊन त्याचा आदर-सन्मान करणे एवढेच नाही तर त्याच्या आदेशांचं पालन करणं आहे. हे आदेश आम्ही ज्याच्या प्रेमात पडलो त्यानं दिलेलं मार्गदर्शन होय. ज्याला आमचं मार्गदर्शन व्हावं, आम्ही यशस्वी व्हावं आणि प्रसन्न असावं हे आवडतंय. आमची निराशा होऊ नये आणि चुकीच्या मार्गांनी जाऊ नयेत. माता-पिता आपल्या मुलांवर काही नियम घालतात, ते त्यांच्यावर अत्याचार करण्यासाठी नव्हे, त्यांना अडचणीत टाकण्यासाठी नाही तर याउलट उद्दिष्टांसाठी ते तसे करतात. अगदी ईश्वराचीही तशीच इच्छा असते. त्यांना सुरक्षा देण्यासाठी, त्यांचं संरक्षण व्हावं म्हणून, जेणेकरून शेवटी त्यांना यश लाभावं.

प्रेषित मुहम्मद यांना त्यांच्या अनुयायांनी अल्लाहच्या बाबतीत विचारणा केली असता दस्तुरखुद्द अल्लाहनं त्यांना खालील स्पष्ट अशा शब्दांत उत्तर दिलं ज्यास कुरआननं जतन करून ठेवलंय,

> ''माझा भक्त जेव्हा माझ्याविषयी तुमच्याकडं विचारणा करतो, मी त्याच्या जवळच असतो. जेव्हा तो हाक मारतो ती मी ऐकतो, त्यानेही माझं ऐकावं, माझ्यावर विश्वास ठेवावा, तरच ते रास्त मार्ग धरतील.''
>
> (कुरआन, २:१८६)

त्याने आपल्या भक्तांना केवळ उदंड समतेचंच आश्वासन दिलं नाही तर त्यानं कुरआनद्वारे त्यांच्या मनांना आपल्या प्रेमभावनांनी व्यापून टाकण्याचंही वचन दिलंय.

> ''ज्यांनी एकनिष्ठ होऊन नेक कर्मं केलीत त्यांच्या बाबतीत तो श्रेष्ठ कृपावंत (मनांमध्ये) प्रेमभावना निर्माण करेल.''
>
> (कुरआन, १९:९६)

मुस्लिम आपल्या सर्व कामांची सुरूवात 'असीम कृपावंत आणि परम दयावंत अल्लाहच्या नावानं' या उद्‌गारानं करतात. हे स्मरण करून देते की अल्लाहच्या कृपेनं त्यांना कशाप्रकारे वेढलंय. आपल्या कर्मांना पवित्रता प्रदान करणं तसेच ते कार्य केवळ ईश्वराच्या इच्छेसाठीच केलं जातंय हे व्यक्त करण्यासाठीही असे उद्‌गार व्यक्त करण्यात येतात. मुस्लिमांनी या भावना आणि दया फक्त आपल्या सहकारी-सोबतींबाबतच व्यक्त करायच्या नसून इतर प्राणी आणि पर्यावरणाशीही असाच व्यवहार करावा असे त्यांना आदेश आहेत. वर सांगितल्याप्रमाणं प्रेमळ भावना आणि दया पवित्र कुरआन आणि प्रेषितांच्या शिकवणी (हदीस) या दोन्ही पवित्र ग्रंथांमध्ये सामावलेल्या आहेत.

आपण जेव्हा माणसामाणसांमधील प्रेमाच्या उत्कट भावनांचा विचार करतो तेव्हा साहजिकच आपल्या मनात एक माता आणि तिच्या मुलाबाळांदरम्यान असलेल्या प्रेमाचं नातं सर्वांत भक्कम वाटतं, हे कुणीही मान्य करील. प्रेषितांनी एकदा आपल्या अनुयायांसमोर यावर भाष्य करताना जे अल्लाहस समर्पित होऊन त्याची उपासना करतात त्यांचं उदाहरण दिलं :

प्रेषितांनी एकदा एका महिलेस पाहिलं. ती आपल्या मुलाला शोधत होती. तो गमावला गेला होता. तो जेव्हा तिला दिसला तिनं त्यास जवळं

घेतलं. आपल्या छातीशी घट्ट धरून ठेवलं आणि तिला पाजू लागली.

प्रेषितांनी आपल्या भोवती असलेल्या अनुयायांना विचारलं, ''तुमचा काय विचार आहे, ही माता आपल्या मुलास नरकाग्नीत टाकून देईल याची कल्पना करू शकता?''

ते म्हणाले, ''ईश्वराशपथ! असं मुळीच होऊ शकत नाही.''

यावर प्रेषित म्हणाले, ''अल्लाह आपल्या भक्तांवर या महिलेपेक्षाही अधिक दया करणारा आहे.''

म्हणूनच अल्लाह इस्लामनुसार स्वत:साठी १०० अशा विभिन्न नावांनी ओळख करून देतो. ज्यांचा अर्थ त्याचे विशिष्ट गुणधर्म आहेत. अल्लाह स्वत:स 'परम दयावंत' (अर-रहमान) या नावानं उल्लेख करतो. (कुरआनात) त्याची संख्या ५० आहे आणि ४० वेळा त्यानं आपला उल्लेख 'परम कृपावंत' असा केलाय. अशाच प्रकारे इतर ५० ठिकाणी त्यानं आपला उल्लेख 'दयाधन' (अर-रहीम) असा केलाय. याचाच अर्थ अल्लाहच्या दयेविषयीचा उल्लेख कुरआनात १५० ठिकाणी आलाय.

याची तुलना या गोष्टीशी करा की अल्लाहनं कुरआनात केवळ १९ ठिकाणी स्वत:चा क्रोध आणि संताप व्यक्त केलाय. अल्लाहनं आपल्या नावाचा उल्लेख अशा एकाही शब्दानं केलेला नाही ज्याचा अर्थ संताप आणि राग आहे. याव्यतिरिक्त पवित्र कुरआनात शंभर ठिकाणी अल्लाहनं आपला उल्लेख 'क्षमाशील' या शब्दानं केलाय.

# तौहीद

## ईश्वराचं एकत्व

''अल्लाहशिवाय कुणीही ईश्वर नाही'' अशी घोषणा करण्यास 'तौहीद' म्हटलं जातं. तौहीद, इस्लामी जीवनाचं अंग, ही सृष्टी आणि पाताळातील प्रत्येक वस्तू या सर्वांची अभिव्यक्ती आहे.

ईश्वराचं एकत्व मानवांमधील एकता दर्शविते. आपल्या सर्वांना ईश्वरानं निर्माण केलं असल्यानं त्याच्यासमोर आम्ही सर्व एकसमान आहोत. एका वंशाचे लोक इतर वंशांच्या लोकांशी भिन्न नाहीत. श्रीमंत आणि गरीब, शक्तिशाली आणि दुर्बल, स्त्री आणि पुरुष यांत कोणताही भेदभाव नाही. मानवतेच्या समानतेबाबत इस्लामला कसलीही तडजोड मुळीच मान्य नाही.

तसेच सर्वांची मालकी ईश्वराचीच असल्यानं कोणास कशावरही विशेषाधिकार नाही. निसर्गातील सर्व साधनं, जमीन व धनसंपत्ती साऱ्या मानवजातीची मिळकत असल्यानं सर्वांना त्यामध्ये बरोबरीचा वाटा आहे. कुणीही पुरुष अथवा स्त्री या साधनांची निर्मिती करू शकत नाही. म्हणून कुणालाही यांतील मोठा वाटा बाळगण्याचा अधिकार नाही.

# इस्लामच्या एकत्वाची श्रद्धा

ईश्वराच्या एकत्वाची धारणा श्रद्धेचा मुख्य भाग आहे (ईमान), कुरआनात अतिशय सुंदरपणे याची मांडणी केलीय,

> ''म्हणा, तो अल्लाह एकमेव आहे. अल्लाह, स्वयंपूर्ण आहे त्यानं कुणाला जन्मलं नाही की कुणी त्याला जन्म दिलेला नाही. त्याच्या तोडीचा कुणी नाही.''
>
> (कुरआन, ११२:१-४)

याचा अर्थ अल्लाह सर्वज्ञ, विद्वत्ताप्रचुर आणि सर्वशक्तिमान आहे. तो परम दयावंत, कृपाशाली आणि सर्वांत प्रेमळ आहे. तो सदैव आमच्याजवळ असतो. तो आम्हांस पाहतो. आम्ही त्यास पाहू शकत नाही. तोच प्रथम आणि शेवटही तोच. तो अनादी काळापासून आणि सदैव व अनंतापर्यंत तोच आहे. त्याचा कुणी भागीदार नाही, कुणी संतती (मुलं-मुली) नाहीत. त्यास कुणी जन्मलेलं नाही. तो आम्हाला जीवन देतो आणि मरणही तोच देतो. मृत्यूनंतर सर्वांना त्याच्याकडंच परतायचंय.

या पृथ्वीवरील सर्वकाही ईश्वरानंच निर्माण केलेत. तोच सर्वांची देखरेख करतो आणि त्यांचं संगोपन करतो. आपल्या मार्गदर्शनासाठी तोच एकमेव स्रोत आहे.

मुस्लिमाची पहिली जबाबदारी म्हणजे त्यानं आपल्या श्रद्धेची घोषणा करावी. या घोषणेसाठी एका व्यक्तीनं खालील शब्दांचा उच्चार मनापासून करायचा.

''लाइलाहा इल्लल्लाह मुहम्मदुर्रसूलुल्लाह''

> अल्लाहशिवाय कोणीच ईश्वर नाही. मुहम्मद अल्लाहचे प्रेषित आहेत.

एका माणसानं कोणत्याही इतर ईश्वर अथवा पूज्य अस्तित्वापासून स्वत:च्या मनास शुद्ध करावं, तर मग ईश्वराचं एकत्व त्याच्या मनात मूळ धरू शकतं.

आपण एका उदाहरणाद्वारे हे समजून घेण्याचा प्रयत्न करू. आमच्याकडं थोडीशी शेतजमीन आहे. यात आम्हाला गव्हाचं पीक घ्यायचंय. पण जमिनीवर सर्वत्र झाडं-झुडपं आणि गवत पसरलंय. या स्थितीत आपण जर जमिनीतली झाडं-झुडपं आणि गवत स्वच्छ केल्याशिवाय जर एखाद्या चांगल्या प्रकारच्या गव्हाची पेरणी केली तर आपणांस चांगलं पीक काढता येणार नाही. तेव्हा आपण काय करायचं? आपणांस प्रथम जमिनीची मशागत करावी लागेल. झाडं-झुडपं आणि गवत काढून टाकलं पाहिजे. बियांची पेरणी करण्याअगोदर जमिनीला त्यासाठी तयार केलं पाहिजे. तेव्हाच आम्ही चांगगल्या पिकाची अपेक्षा करू शकतो.

आपण जमिनीची तुलना माणसाच्या हृदयाशी करू या. जर आमच्या हृदयात थोतांड देवांची श्रद्धा असेल तर आपण ईश्वराचं एकत्व - तौहीद, अशा मनात मूळ धरू शकते, याची अपेक्षा बाळगू शकत नाही. म्हणून हृदयास कुठल्याही इतर ईश्वर किंवा उपास्यांपासून स्वच्छ करावं लागेल आणि मगच ईश्वराचं एकत्व - तौहीद आपल्या हृदयात मूळ धरू शकते आणि तेव्हाच श्रद्धेचा प्रकाश पसरू शकतो.

# माणसाच्या जीवनावर तौहीदचा प्रभाव

'लाइलाहा इल्लल्लाह' किंवा 'तौहीद' म्हणजेच 'ईश्वराशिवाय कोणी उपास्य नाही' या श्रद्धेचा आमच्या जीवनावर दूरगामी परिणाम उमटतो.

ईश्वराच्या एकत्वावर, 'तौहीद'वर श्रद्धा व्यक्त करणारा स्वत:ला पूर्णत: ईश्वरास समर्पित करतो, त्याचा सच्चा भक्त आणि दास बनतो. ईश्वरानं पृथ्वीवरील आणि आकाशातील सर्वकाही मानवजातीच्या सेवेसाठी निर्माण केलंय. जेव्हा एक माणूस स्वत:स ईश्वराच्या आदेशांना समर्पित करतो तेव्हा त्यास हे कळून चुकते की ईश्वराची सर्व निर्मिती त्याच्याकरिता हितकारक आहे.

कुरआन याची पुष्टी खालीलप्रमाणे करतो,

"दिसत नाही तुम्हांस, अल्लाहनं धरतीवरील सर्वकाही तुमच्या स्वाधीन केलंय." (कुरआन, २२:६५)

"तुम्ही पाहत नाही अल्लाहनं अवकाश आणि पृथ्वीमधील सर्वकाही तुमच्या अंकित केलं आणि उघड अथवा गुप्त, आपल्या औदार्यातून भरपूर असं दिलं."

(कुरआन, ३१:२०)

या दोन आयती स्पष्टपणे असे संकेत देतात की पृथ्वीवरील आणि अवकाशातील सर्वकाही मानवाच्या हितार्थ निर्माण केलंय. आपण जेव्हा एकमेव अल्लाहवर श्रद्धा ठेवतो तेव्हा आपल्याला इतर वस्तू आणि निर्मितीकडून सेवा मिळते या जाणीवेनं आपल्याला धन्यता वाटते. याचा अर्थ आपण पूर्णत: अल्लाहच्या आज्ञा पाळायला हव्यात.

१. यामुळे श्रद्धावंतामध्ये स्वत:विषयी उच्च दर्जाचा स्वाभिमान निर्माण होतो, आत्मविश्वास निर्माण होतो आणि याचं समाधान वाटते. त्यास माहीत होते की आपल्या गरजा पूर्ण

करण्यासाठी त्यानं फक्त ईश्वरावरच विसंबून राहायचंय. त्यास असा विश्वास होतो की त्याच्या सर्व गरजांची तरतूद केवळ ईश्वरच करू शकतो, इतर कोणात हे सामर्थ्य नाही.

२. त्याचा आत्मविश्वास आणि आत्मसन्मान केव्हा जागृत होतो? जेव्हा त्यास अशी खात्री पटते की आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी त्याला इतर कोणावर नव्हे फक्त त्याच्या निर्माणकर्त्या ईश्वरावरच अवलंबून राहायचंय. तो खऱ्या अर्थानं आज्ञाधारक झाला तर त्याला काळजी वाटण्याची गरज नाही, कारण ईश्वर त्याच्या सर्व गरजांची पूर्तता करणार आहे.

३. हा विश्वास एका श्रद्धावंतामध्ये नम्रता आणि सभ्यपणा निर्माण करतो. तो उद्धट बनत नाही की इतरांशी तुच्छतेनं व्यवहार करत नाही. त्यास ही पक्की खात्री होते की या पृथ्वीवरील सर्वकाही ईश्वराच्या मालकीचं असल्यानं त्याचा भक्त होऊनच तो त्यांच्यावर नियंत्रण करू शकतो. त्याच्याकडं जे काही आहे ते ईश्वरानंच दिलंय. म्हणून उद्धटपणानं वागणं किंवा तुच्छपणा दर्शविण्याचं मुळीच कारण नाही.

४. ईश्वराच्या एकत्वावर विश्वास बाळगण्यानं श्रद्धावंत सदाचारी होतो आणि प्रामाणिक बनतो. या जगात आणि परलोकात यशप्राप्तीसाठी त्यानं आपल्या निर्माणकर्त्याचे आदेश पाळायला हवेत. या जाणीवेमुळं तो आपल्या कर्तव्यांकडं दुर्लक्ष करत नाही आणि इतर चुकांपासून तो अलिप्त राहतो.

५. एकमेव ईश्वरावर श्रद्धा ठेवल्यानं माणसात साहस आणि शौर्य निर्माण होतं. मृत्यू किंवा असुरक्षेची भीती त्याच्या मनात जडत नाही. श्रद्धावंताला हे माहीत असते की ठरलेल्या वेळसच ईश्वर मृत्यू देणार आहे. त्याच्याशिवाय

दुसऱ्याच्या हाती त्याचा मृत्यू नाही की सुरक्षा होणार नाही. म्हणून जर तो ईश्वराच्या आदेशांचं पालन करत असेल तर त्याला घाबरून जाण्याचं कारण नाही. तो आपली सर्व कर्तव्यं कसलीही भीती न बाळगता पार पाडतो.

६. एकेश्वरावर श्रद्धा बाळगणारा माणूस स्वत:ला या संपूर्ण सृष्टीचा अंग समजतो. या सृष्टीच्या सर्व निर्मितींमध्ये तो सर्वोत्तम निर्मिती आहे. या विश्वासामुळं त्याच्या अस्तित्वाचा विस्तार होतो आणि त्याचा दृष्टिकोन उदार होतो.

७. एकेश्वरावरील विश्वासामुळं श्रद्ध व्यक्तीची निश्चयशक्ती बळकट होते. संयम आणि धैर्य निर्माण होते. श्रद्धावंत एकनिष्ठ होऊन स्वत:स आपल्या निर्माणकर्त्यास वाहून देतो.

८. 'लाइलाह इल्लल्लाह'च्या महत्त्वाचा माणसावर असा प्रभाव होतो की तो अल्लाहचा आज्ञाधारक बनतो. एकेश्वरावर आस्था ठेवण्यानं ईश्वर प्रत्येक घटना पाहत असून तो ईश्वराच्या निरंतर पाहणीतून एका क्षणासाठीदेखील पळ काढू शकत नाही, याची प्रत्येक श्रद्धावंताला पक्की खात्री होते. ''खरे पाहता आम्ही (अल्लाह) त्याच्या कंठाच्या शिरेहूनही जवळ आहोत.'' (कुरआन,५०:१६)

९. आपली कर्मं आपल्या श्रद्धेचं प्रतिबिंब असावेत. याचा एकमेव ईश्वराच्या एकत्वावर विश्वास ठेवणाऱ्यास आनंद वाटतो. इस्लाममध्ये श्रद्धेशिवाय कोणत्याही कर्मास मुळीच स्थान नाही.

# ३

# रिसालत

## (प्रेषित्व)

एका निवडलेल्या माणसाकडं ईश्वराकडून एक संदेश घेऊन देवदूत येतात आणि नंतर त्याच्यावर हा संदेश जनसामान्यांसमोर प्रस्तुत करण्याची जबाबदारी येते. पवित्र कुरआनच्या भाषेत या मनुष्यास नबी (प्रेषित), रसूल (संदेशवाहक), मुर्सल (प्रतिनिधी), बशीर (शुभवार्ता देणारा), नजीर (सावध करणारा) इत्यादी म्हटलं जातं.

सर्व प्रेषित महान धर्मनिष्ठ, ऐहिक आणि आध्यात्मिक दृष्टीनं सद्वर्तनाचे आदर्श असतात. त्यांच्याकरिता चमत्कार दाखविणं आवश्यक नाही. (तरीदेखील इतिहासात याची नोंद आहे की त्या सर्वांनी चमत्कार दाखवलेत आणि ते चमत्कार ईश्वरानंच घडवून आणल्याची कबुलीही त्यांनी दिलीय.) त्यांच्या शिकवणीच त्यांची अधिकृत तत्त्वे आहेत.

कुरआनच्या म्हणण्यानुसार काही प्रेषितांवर दैवी ग्रंथ अवतरलेत तर इतर प्रेषितांना वेगळे असे दैवी ग्रंथ देण्यात आले नव्हते तर पूर्वीच्या प्रेषितांवर अवतरलेल्या दैवी ग्रंथाचेच त्यांना पालन करायचे होते. एकेश्वर आणि दुष्टतेपासून दूर असणं, चांगलं ते करणं अशा मूलतत्त्वांबाबत या संदेशामध्ये कोणतेही मतभेद नसतात.

काही प्रेषितांना त्यांच्या घराण्यांचे (जमात-टोळी) काहींना एखादा देश तर काहींना ठराविक भूभागातील लोकांना दैवी शिकवण देण्याची जबाबदारी सोपविली होती, तर काहींना सबंध मानवजातीच्या मार्गदर्शनाची जबाबदारी दिली होती.

रिसालत (प्रेषित्व) मानव आणि ईश्वरामधील संभाषणाचा दुवा आहे. असीम दयावंत अल्लाहनं मानवानं रास्त मार्गाचा अवलंब करून हे जग शांततामय आनंददायी बनवावं याचं मार्गदर्शन दिलंय. जे लोक या रास्त मार्गाचा अवलंब करतील त्यांना मृत्यूनंतरच्या जीवनामध्ये प्रचंड मोबदला दिला जाईल.

निर्माणकार्याने सुरूवातीपासूनच मानवजातीचं मार्गदर्शन करण्यासाठी आपले प्रतिनिधी निवडलेत. त्यांनी आपल्या काळातील लोकांना फक्त एकमेव अल्लाहची उपासना करण्याची शिकवण दिली. लोकांनी अल्लाहच्या मार्गाचा अवलंब करावा यासाठी त्यांनी त्या लोकांचं मार्गदर्शन केलं आणि त्यांना प्रशिक्षण दिलं.

सर्व प्रेषित मनुष्यच होते. आपण त्यांना अल्लाहचे पुत्र असं कधीही म्हणू नये. ईश्वर एकमेव असून त्याचा कुणी भागीदार नाही, त्यास मुलगा किंवा मुलगी नाही, अल्लाहचा कुणी मुलगा, मुलगी किंवा त्याचा कोणी भागीदार आहे असं म्हणणं महापाप आहे.

सर्व प्रेषितांचा संदेश एकच, फक्त ईश्वराचीच उपासना करावी आणि खोट्या देवांना नाकारावं.

> ''आम्ही नूह (अ.) यांना त्यांच्या समुदायाकडं पाठवलं. ते म्हणाले, माझ्या लोकहो, अल्लाहची भक्ती करा, इतर कोणी तुमचा ईश्वर नाही. मला भीती आहे एका भयंकर प्रकोप तुमच्यावर कोसळण्याची.'' (कुरआन, ७:५९)

दुसऱ्या शब्दांत सांगायचं झाल्यास, सर्व प्रेषितांनी हाच संदेश दिला– 'अल्लाहशिवाय इतर कुणी ईश्वर नाही.'

आपण प्रश्न करू शकता ''आम्हाला सर्वशक्तिशाली अल्लाहच्या मार्गदर्शनाची गरज का बरं?'' याचं उत्तर साधं आहे. आम्ही माणसं दुर्बल आणि अशक्त. आम्हाला भविष्याबाबत काही माहीत नाही. आमचं ज्ञान मर्यादित आहे. त्याचबरोबर आम्ही परिपूर्ण नाही. आपण पाहू शकता अशा प्रकारचे शक्तीहीन असताना आपण स्वत:साठी असा मार्ग शोधू शकत नाही जो सर्वकाळ उपयुक्त असावा. याच कारणामुळं अल्लाहनं आपल्या प्रेषितांकरवी आमचं मार्गदर्शन करून आम्हांस धन्य केलं.

# अल्लाहचे प्रेषित

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या वर्णनानुसार प्रेषितांची संख्या एक लाख २४ हजार इतकी आहे. मुस्लिम या नात्यानं आम्हास सर्व प्रेषितांवर श्रद्धा ठेवणं अपरिहार्य आहे. (कुरआन, २:२८५) अल्लाहचे प्रथम प्रेषित आदम (त्यांना शांतता लाभो) यांच्यापासून मानवजातीच्या मार्गदर्शनाची सुरूवात झाली आणि प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्यावर सांगता झाली.

पवित्र कुरआनमध्ये यातील फक्त पंचवीस अशा निवडक प्रेषितांची नावे आलेली आहेत.

**पवित्र कुरआनात दिलेली प्रेषितांची नावे**

| | | |
|---|---|---|
| १. | आदम | आदम |
| २. | इद्रीस | इनॉक |
| ३. | नूह | नोआह |
| ४. | हूद | |
| ५. | सालेह | |
| ६. | इब्राहीम | अब्राहम |
| ७. | इस्माईल | इशमाईल |
| ८. | इस्हाक | आयजॅक |
| ९. | लूत | लॉट |
| १०. | याकूब | जॅकब |
| ११. | यूसुफ | जोजेफ |
| १२. | शुऐब | |
| १३. | अय्यूब | जॉब |

| | | |
|---|---|---|
| १४. | मूसा | मुजेस |
| १५. | हारून | ऐरन |
| १६. | जुल-किफ्ल | एजेकील |
| १७. | दाऊद | डेविड |
| १८. | सुलैमान | सॉलोमन |
| १९. | इलयास | एलियास |
| २०. | अल-यसअ | एलीशा |
| २१. | यूनुस | जोनाह |
| २२. | जकरिया | जेकरिया |
| २३. | यहया | जॉन |
| २४. | ईसा | जीसस |
| २५. | मुहम्मद | |

(या सर्वांना शांतता लाभो)

४

# देवदूत

देवदूत कोण आहेत?
ते काय करत असतात?
आपण त्यांना पाहू शकतो?
मानवांपासून ते कसे वेगळे?

देवदूत ही अल्लाहची विशिष्ट निर्मिती आहे. त्यांना दैवी प्रकाशापासून (नूर) निर्मिलंय. काही विशिष्ट कार्य करण्यासाठी. प्रेषित आदम, प्रथम मानव यांना चिखलमातीपासून निर्मिलं गेलंय. देवदूत आध्यात्मिक वैभवशाली अस्तित्व आहेत. त्यांना अन्न-पाणी की निद्रेची आवश्यकता नाही. त्यांना कसल्याही प्रकारच्या भौतिक आशा-आकांक्षा नाहीत. ते रात्रंदिवस अल्लाहच्या सेवेत असतात. ते असंख्य आहेत. प्रत्येकास विशिष्ट कार्य सोपवलंय. ते अल्लाहचं स्तवन आणि त्याचा गौरव करत राहतात. त्यांना कधीच थकवा येत नाही. सदैव अल्लाहचं आज्ञापालन करत राहतात. जरी आपणांस आपल्या डोळ्यांना ते दिसत नसले तरी त्यांचे अस्तित्व नाकारता येत नाही. जगात कितीतरी अशा वस्तू आहेत ज्या आपल्या डोळ्यांना दिसत नाहीत की त्यांचा स्पर्श होऊ शकतो तरीदेखील त्यांच्या अस्तित्वास आपण मान्य करतो. कितीतरी स्थळं आहेत जे आम्ही पाहिलेली नाहीत आणि वायू - हवा यासारख्या गोष्टी आपल्या डोळ्यांना पाहता येत नाहीत की त्यांना स्पर्श करू शकत नाही, तरीदेखील आम्ही त्यांचं अस्तित्व मान्य करतो.

देवदूतांना अशा शक्ती आणि गुण दिलेले आहेत जे त्यांना आपली कर्तव्य पार पाडण्यासाठी आवश्यक आहेत. ते नेहमी अल्लाहची आज्ञा पाळत असतात, नाकारू शकत नाहीत. दुसरीकडं मानवाला स्वतंत्र इच्छाशक्ती दिलीय. ते योग्य काय आणि अयोग्य काय यात निवड करू शकतात. आणि म्हणूनच न्याय-निवाड्याच्या दिवशी त्यांनी हिशोब द्यावयाचा आहे.

देवदूत अल्लाहनं जे ठरवून दिलंय तेवढंच करत असतात, अल्लाहच्या मर्जीनुसार. ते निष्पाप सेवक आहेत. माणसांना स्वतंत्र इच्छेची निवड करण्यात ते मदत करतात. काय करायचं ते माणसं ठरवत असतात आणि देवदूत त्यांच्या इच्छेनुसार ते करण्यास मदत करतात.

देवदूतांनी मनुष्यरूप धारण केल्याशिवाय आपण त्यांना पाहू शकत नाही. प्रेषितांच्या अनुयायांदरम्यान अल्लाहचे दूत जिब्रईल एकदा मनुष्यरूपी आले होते. ते त्यांना काही शिकवण देण्यास आले होते, ही गोष्ट फक्त प्रेषितांना माहीत होती. आपली कर्तव्य पार पाडण्यासाठी देवदूत कोणतेही उपयुक्त रूप धारण करू शकतात.

अल्लाहच्या अधिराज्यात कित्येक दूत आहेत. त्यातील काही विशिष्ट खालीलप्रमाणे–

जिब्रईल अथवा जिब्रील (Gabriel)

मिकाईल अथवा मिकाल (Michael)

इज्राईल (मृत्यूदूत Azrail नावानंही उल्लेख केला जातो)

इस्राफील

जिब्रईल यांनी ईश्वराचं अवतरण प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्यासह इतर सर्व प्रेषितांकडं आणलं होतं.

इज्राईल - ज्यांना मृत्यूदूतदेखील म्हटलं जातं. (मलकल मौत) यांच्यावर जीवन संपवण्याची जबाबदारी आहे. या विश्वाच्या अंताच्या दिवशी आणि न्यायनिवाड्याच्या दिवशी इस्राफील शंख फुंकतील.

आपण जे काही करत आहोत काही दूत त्या कर्मांची नोंद घेत आहेत.

त्यांना आदरणीय नोंद घेणारे (किरामन कातिबीन) म्हणतात. आपण बोलत असतो त्यातलं एक अक्षरदेखील नोंद घेतल्याशिवाय राहत नाही. (पाहा- पवित्र कुरआन,५०:१८)

अल्लाह आपल्या अधिराज्याची व्यवस्था परिपूर्णरित्या चालवतो. दूत त्याचे आज्ञाधारक सेवक आहेत. आमच्यापैकी जे लोक चांगले कर्म करतात हे देवदूत स्वर्गामध्ये त्यांचं स्वागत करतील आणि जे वाईट कर्म करतात त्यांना नरकाग्नीमध्ये टाकून देतील. (पाहा- पवित्र कुरआन,३९:७१-७४)

# ५

# जीवन मृत्यूनंतरचे

## परलोक आणि न्यायनिवाड्याचा दिवस

परलोकवरील विश्वास इस्लामचं मूलतत्त्व आहे. कुरआनच्या पहिल्या अध्यायात 'असीम दयावंत आणि परम कृपावंत' या अल्लाहच्या गुणांचा उल्लेख केल्यानंतर ईश्वर स्वत:स नायानिवाड्याच्या दिवसाचा स्वामी म्हणतो. (कुरआन, १:३) दुसऱ्या अध्यायाच्या तिसऱ्या आयतीत (श्लोक) श्रद्धावंतांना... जे अल्लाहबाबत विश्वास करतात... असे संबोधन आहे. (कुरआन, २:३)

अदृश्याविषयी कुरआनातली या संकल्पनेमध्ये पुनरुत्थानाचा दिवस, स्वर्ग, नरक म्हणजेच परलोकाशी संबंधित प्रत्येक कल्पनेचा समावेश आहे. अल-बकरा या अध्यायातील चौथ्या आयतीत (श्लोक)... परलोकाबाबत त्यांना विश्वास आहे... या शब्दांनी परलोकातील श्रद्धेचं स्मरण करून दिलंय.

पवित्र कुरआनमध्ये ठळक आणि भीतीयुक्त अशा शब्दांनी शेवटच्या दिवशी घडणाऱ्या घटनांचं वारंवार चित्रण केलंय. एकेदिवशी जेव्हा अल्लाहच्या मनात येईल आणि ज्याची माहिती त्यालाच आहे, या जगाचं,

सृष्टीतील अशा घडामोडींनी, ज्यांची भीतीदेखील कल्पनेपलीकडची आहे, शेवट होणार आहे. आणि निवाड्याच्या दिवशी मयतांची शरीरं त्यांच्या कबरीतून उठवली जातील आणि त्यांच्या आत्म्यांशी जोडली जातील. त्यावेळी जगात जे लोक अजून जिवंत असतील तेसुद्धा मरण पावून या लोकांमध्ये सामील होतील. सबंध मानवजात, भूतकालीन व वर्तमान, अल्लाहसमक्ष उभी राहील, एकएकटे, असहाय अवस्थेत. त्या दिवशी माणसांची ईश्वरावरील श्रद्धा नेक कर्म आणि आपल्या सहवासातील माणसांशी इतर निर्मितीशी केलेलं सद्वर्तनच फक्त कामी येईल.

जे लोक ईश्वराशी एकनिष्ठ होते, ज्यांनी त्याचं आज्ञापालन केलं त्यास समर्पित झाले. ्याच्या मर्जीनुसार जीवन व्यतीत केलं, हे जग सोडताना ज्यांना त्यास समर्पण केलं ते त्या दिवशी अतिशय समाधानी आणि संतुष्ट राहतील.

ज्यांनी ईश्वरास नाकारलं, त्याचं मार्गदर्शन धुडकावून लावलं, ईश्वराशिवाय इतर देवतांच्या उपासनेस स्वत:स वाहून घेतलं, दुष्कर्म करत राहिले त्यांना भयंकर भीतीदायक अशा स्थळी बंदिस्त केले जाईल. जिथं त्यांच्याबरोबर ते लोक असतील जे त्यांच्यासारखंच ईश्वराला पारखे झाले असतील. तिथं त्यांना सतत यातना भोगाव्या लागतील. सत्यता समोर आल्यानं, त्यांची अशी इच्छा होईल की त्यांना परत जाण्याची एक संधी मिळावी. म्हणजे ते आपलं जीवन खऱ्या पद्धतीनं जगतील पण आता उशीर झालेला असेल.

मोबदला म्हणून स्वर्गाचा आनंद आणि नरकातील यातनांचा उल्लेख आम्हाला समजता यावं म्हणून चित्रण केलं गेलंय. आहे कारण ते आपल्या आकलनशक्तीच्या पलीकडंचे आहेत. याविषयी कुरआन म्हणते,

> त्यांनी जे सर्व केलेत त्याचा मोबदला म्हणून ''त्यांच्यासाठी कोणते आनंद लपवून ठेवले आहेत ते त्यांना माहीत नाही.''
>
> स्वर्गामध्ये अशा वस्तू आहेत, ज्यासारखे डोळ्यांनी

> पाहिलेलं नाही किंवा ऐकण्यात नाही की त्याच्याविषयी कल्पनादेखील केली जाऊ शकत नाही.

मृत्यूनंतरचे जीवन (जगाच्या इतिहास किंवा मानवजातीच्या अंताबाबत धर्मशास्त्राचे ज्ञान) याची इस्लामी संकल्पना, अंतिम दिवस, पुनरुत्थानाचा, न्यायनिवाड्याचा दिवस आणि शाश्वत सुख किंवा शिक्षा या क्रमाप्रमाणं स्पष्ट केली जाऊ शकते. पवित्र कुरआनच्या खालील आयतींमध्ये या घटनांचं चित्रण आलंय.

> ''जेव्हा आभाळ फाटून जाईल, जेव्हा तारे कोलमडून पडतील जेव्हा महासागर उफाळून येतील आणि जेव्हा कबरी उकरून टाकल्या जातील. तेव्हा प्रत्येकास त्यानं जे काही पुढं पाठवलंय आणि मागं सोडलंय ते कळंल. हे मानवा आपल्या उपकारकर्ता विधात्याविषयी कशानं तुझ्यावर भुरळ घातली.'' (कुरआन, ८२:१-६)

> ''जेव्हा सूर्य गुंडाळून टाकला जाईल आणि तारे विझून जातील पर्वतं इकडे तिकडे होतील जेव्हा दहा महिन्यांची गर्भधारक उंटिण सोडून दिली जातील. जंगली जनावरे गोळा केली जातील (राहत्या वस्त्यांत) जेव्हा महासागरे उकळू लागतील आणि जेव्हा (सर्वांचे) आत्मे (शरीराशी) जोडले जातील'' (कुरआन, ८१:१-७)

> ''सरतेशेवटी जेव्हा कानठळ्या बसवणारा आवाज ऐकू येईल (तेव्हा) माणूस आपल्या भावापासून पळ काढेल आईवडिलांपासून सुद्धा तसेच आपल्या पत्नी आाणि मुलांपासून (पळून जाईल) त्यांच्यातले सर्वजण त्या दिवशी फक्त स्वत:च्या काळजीत मग्न होऊन इतरांना परके करतील.'' (कुरआन, ८०:३३-३७)

> ''ज्या दिवशी शंख फुंकला जाईल आणि तुम्ही झुंडीझुंडीनं धावत सुटाल.'' (कुरआन, ७८:१८)

> ''जेव्हा तारे विझून जातील, आकाश दुभंगून जाईल, पर्वतं

विखरून जातील.'' (कुरआन, ७७:८-१०)

''तुम्हा सर्वांना त्याच्याकडंच परतावयाचंय. अल्लाहचं वचन सत्य असते. तोच शून्यातून निर्माण करतो आणि मग त्यांची पुनरावृत्ती करतो, ज्या लोकांनी श्रद्धा धारण करून सदाचार अंगीकारला त्यांना त्यांचा न्याय्य मोबदला देण्यासाठी. ज्या लोकांनी विद्रोह अंगीकारला त्यांना उकळते पाणी आणि यातनादायक शिक्षा असेल, कारण ते बंड करत होते.'' (कुरआन, १०:४)

''ज्यानं धरती आणि आकाश निर्मिले, त्याला त्यांच्यासारखं निर्माण करण्यावर प्रभुत्व नाही? का नाही? तो तर सर्वज्ञ आहे सर्वोच्च कौशल्यवान निर्माता (होय.)''

(कुरआन, ३६:८१)

''हाच तो निर्णयाचा दिवस आम्ही तुम्हाला गोळा केलं आणि पूर्वीच्यांनाही.'' (कुरआन, ७७:३८)

''जेव्हा कर्मांची दप्तरं उघडली जातील.''

(कुरआन, ८१:१०)

''आणि जेव्हा जमिनीत गाडलेल्या जिवंत मुलीला विचारलं जाईल कोणत्या अपराधापायी तुला ठार केलं?''

(कुरआन, ८१:८-९)

''(तेव्हा) आपण काय आणलं आहे ते प्रत्येकाला कळेल.''

(कुरआन, ८१:१४)

''ज्यानं तिळमात्रही भलं केलं असेल तो त्याला पाहील. आणि ज्यानं यत्किंचितही दुष्कर्म केलं असेल तो ते पाहील.''

(कुरआन, ९९:७-८)

''आज कुणावरही कसलाच अन्याय केला जाणार नाही आणि जे काही तुम्ही करत राहिले त्याच प्रमाणात मोबदला दिला जाईल.'' (कुरआन, ३६:५४)

# श्रद्धा ठेवावी की ठेवू नये

सर्वशक्तिमान अल्लाह पवित्र कुरआनात म्हणतो,

जगातले सारेच धर्म आणि आधुनिक विज्ञान यांचा असा विश्वास आहे की या जगाचा अंत होणार आहे पण प्रश्न पडतो, ते कसे घडणार? आपण जेव्हा ताऱ्यांनी जडलेल्या विस्तृत आकाशाकडं नजर टाकतो आपल्याला विचार पडतो, शेवटी या सर्वांचं काय होणार आहे? आपल्या आतील मनापासून आपल्या सर्वांना स्वत:च्या अस्तित्वाची चिंता वाटते. श्रद्धावंत आणि नास्तिक दोघांनाही याची काळजी लागून आहे. मृत्यू शेवटचं ठिकाण आहे की त्याच्यापलीकडं आणखी काही आहे?

काही माणसांना मृत्यूनंतर जीवन आहे की नाही याशी काहीएक देणं घेणं नाही. काही लोकांचा तर यावर कसलाही विश्वास नाही.

मृत्यूनंतरच्या जीवनाबाबत श्रद्धाहीन लोक शंका उपस्थित करत आहेत. पुरुष आणि स्त्रियांना ते मृत झाल्यावर ईश्वर त्यांना पुन्हा जिवंत उठवेल, हे समजत नाही. पण ईश्वर माणसाला शून्यातून निर्माण करतो आणि म्हणूनच त्यांना ते मेल्यावर पुन्हा जिवंत करणं ईश्वरासाठी काहीच अवघड नाही. (पाहा- पवित्र कुरआन, २२:५-७ आणि ३६:७७-७९)

सर्वशक्तिशाली अल्लाह पवित्र कुरआनात म्हणतो,

> ''मानवास काय वाटतं? आम्ही त्याची हाडं (जुळवून) एकत्र करणार नाही. होय, आम्ही त्यांच्या बोटांची टोकंसुद्धा रचून पूर्ववत करून देण्यास समर्थ आहोत.''
> (कुरआन, ७५:३-४)

तरीसुद्धा कित्येक माणसं अशी आहेत ज्यांना मृत्यूनंतरच्या जीवनाबाबतच्या सत्यतेस मान्य करणं आणि पुनरुत्थान समजणं कठीण वाटतं, त्यांच्यासाठी हेच जीवन सर्व काय ते आहे आणि मृत्यूनंतर काहीच नाही. असा विश्वास ठेवणारे याला विज्ञान आणि सामान्य ज्ञानाच्या आधारावर अयोग्य ठरवण्याचा प्रयत्न करतात, हे विचित्र! ते स्वत:ला इतरांपेक्षा जास्त पुरोगामी समजतात आणि याचा विरोध करणाऱ्यास जुनाट विचारांचे सनातनवादी म्हणवून हिणवतात. अविश्वास आणि विश्वास दोन्ही तेवढेच जुने आहेत हे त्यांच्या लक्षात येत नाही. ज्यावेळी पवित्र कुरआनचं अवतरण होत होतं, मक्केच्या कुरैश लोकांनीदेखील मृत्यूनंतरच्या जीवनाला नाकारलं होतं. सध्याच्या पुरोगामी विचारांच्या मंडळींपेक्षा त्यांचा या बाबतीत वाद वेगळा नव्हता.

पवित्र कुरआनात सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो,

> ‘‘(तेव्हा) त्याच्या लोकांमधील ज्या प्रतिष्ठित लोकांनी (हे मानण्यास) नकार दिला होता, तसेच परलोकातील भेट घडणार आहे हे नाकारलं होतं, ज्यांना आम्ही या जगात चैनीचं जीवन दिलं होतं... ते म्हणतात, जगातल्या या जगण्यापलीकडं काहीच नाही. आम्ही मरू आणि आम्ही जगू, पण आम्ही पुन्हा उठवले जाणार नाहीतच.’’
>
> (कुरआन, २३:३३,३७)

पवित्र कुरआनच्या मते समाजातील, पिळवणूक करणाऱ्या वर्गामध्ये मृत्यूनंतरच्या जीवनाचं खंडन करण्याची परंपरा चालत आलीय. त्यांना स्वत:ला ईश्वराची भीती नाही आणि इतरांनी रास्त मार्गाचा अवलंब करावा, हेही त्यांना आवडत नाही. कोणताही पुरावा नसताना ते आपल्या अज्ञानी विचारांचा आग्रह धरतात आणि इतरांनीदेखील अंधकारात गुरफटून राहावं ही त्यांची इच्छा असते.

पवित्र कुरआन मरणोत्तर जीवन अपरिहार्य आहे हे स्पष्ट करते. माणसांच्या नैतिक विचारांना धरूनच. खरे पाहता मरणोत्तर जीवन, एकमेव ईश्वरावर श्रद्धा ठेवण्याचा तार्किक परिणाम आहे. माणसाला हिशोब देण्याची

जबाबदारी नसेल तर ईश्वराचं अस्तित्व निरर्थक ठरेल. तो एक असा देव असेल ज्याचा कुणाशी मुळीच संबंध नसेल. माणसाला एकदा जन्म दिला आणि आता त्यांच्या भवितव्य काय याच्याशी त्याला काही देणं घेणं नाही. या धर्तीवरील मानवाच्या नैतिक अस्तित्वाला तो उद्‌वस्त करील.

सध्याचं जीवन आपल्या अस्तित्वाच्या पुढील टप्प्यासाठी परीक्षेच्या तयारीसाठी आहे अशी पवित्र कुरआनची शिकवण आहे. एके दिवशी हे संपूर्ण ब्रह्मांड उद्‌ध्वस्त केलं जाईल आणि पुन्हा ते निर्माण केलं जाईल. मयतांना उठवलं जाईल. त्यांना अल्लाहच्या समक्ष नयासाठी उभं राहावं लागेल. (पाहा- पवित्र कुरआन, अध्याय १४:१९-२०)

पुनरुत्थानाच्या दिवसापासून दुसऱ्या शाश्वत जीवनाची सुरूवात होईल आणि त्या वेळी प्रत्येक स्त्री-पुरुषास त्यांनी जे काही वाईट अथवा नेक कर्म केले असतील त्याचा पुरेपूर मोबदला दिला जाईल.

श्रीमंत असो की गरीब, शक्तिशाली असोत की दुर्बल, चांगले आणि वाईट, एक दिवस या सर्वांचा न्याय करण्यासाठी निवाड्याचा दिवस असायलाच हवा. हेच पुनरुत्थान आहे.

प्रेषित मुहम्मद म्हणतात,

''न्याय-निवाड्याच्या दिवशी माणसांच्या बाबतीत ज्या प्रकरणाचा सर्वप्रथम निकाल दिला जाईल ते रक्तपाताशी संबंधित असेल.''

या प्रक्रियेआधी कोर्टाच्या औपचारिक सुरूवातीअगोदर योग्य ती कार्यपद्धत स्थापित केली जाईल. न्याय-निवाड्यासाठी सर्व औपचारिकतांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल. साक्षीदारांना बोलवलं जाईल. नोंदवलेला अहवाल प्रस्तुत केला जाईल.

आमचे डोळे, कान आणि त्वचासुद्धा साक्ष देतील :

''ज्या दिवशी अल्लाहचे शत्रू नरकाग्नीकडं लावून दिले जातील, टोळी-टोळीनं तिथं पोचल्यावर त्यांचे डोळे, कान

आणि त्यांची त्वचा त्यांच्या कर्मांबद्दल त्यांच्याविरूद्ध साक्ष देतील. ते आपल्या त्वचेला विचारतील, तू आमच्याविरूद्ध का बरं साक्ष दिली? ती म्हणेल, ज्या अल्लाहनं प्रत्येक वस्तूला वाचा दिली, त्यानंच आम्हाला बोलतं केलं. त्यानंच तुम्हाला पहिल्यांदा जन्माला घातलं होतं. त्याच्याकडंच तुम्ही परतणार आहात.'' (कुरआन, ४१:१९-२१)

ज्या लोकांनी पापं केलीत, ईश्वराकडं दुर्लक्ष केलं, अनैतिक कृत्यांत गुरफटले गेले असतील; ते लोक ईश्वराकडं त्यांना या जगात परत एकदा पाठवून देण्याची विनवणी करतील. म्हणजे ते नास्तिकता, अनेकेश्वरत्व सोडून देतील. चांगलं कर्म करतील. इस्लाम मान्य करण्याची शपथ वाहतील. पण त्यांची विनंती धुडकावून लावली जाईल. त्यांना दुसरी संधी मिळणार नाही. हे त्यांना आगाऊच सांगितलं गेलं होतं.

त्यांना शाश्वत अपमान पत्करावा लागेल. ईश्वराचे दूत त्यांना नरकाकडं फरफटत नेतील. ज्या लोकांनी चांगले कर्म केले असतील त्यांना उदारहस्ते मोबदला दिला जाईल आणि स्वर्गामध्ये त्यांचं स्वागत असेल.

बहुसंख्येनं लोकं शांततापूर्ण जीवन जगू इच्छितात, काही मोजकी त्रासदायक माणसं प्रत्येकाचं जगणं अडचणीत टाकत असतात. मग त्यांना शिक्षा करायला नकोका? या जगातल्या न्यायव्यवस्थेसमोरील जबाबदारीपासून त्यांनी पळ काढला? त्यांना नेहमीसाठी शिक्षा केल्याशिवाय सोडून दिलं जाईल? अशा अत्याचारी राजांना ईश्वर शिक्षा देणार आहे ज्यांच्या अपराधांची सीमा नसेल, ज्यांनी वंशहत्या केली, उपद्रव माजवला आणि लोकांना गुलाम करून आपल्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी त्यांना कष्ट दिलेत.

अशी माणसंदेखील आहेत, जे ईश्वरास नकारतात, अनैतिक कृत्यं करतात तरीदेखील ते आपल्या व्यापार-उदीम किंवा राजकारणामध्ये यशस्वी होताना आपण पाहतो आहोत. दुसऱ्या बाजूला चांगली सदाचारी माणसं आहेत, जे यातना सहन करतात आणि गरीबीचं जीवन जगतात. ही गोंधळात टाकणारी गोष्ट असून ईश्वराच्या न्यायाशी सुसंगत नाही. जर पापी लोकं

माणसांनी बनवलेल्या कायद्यांना, कोर्टांना हुलकावणी देत असतील, त्याचबरोबर श्रीमंती प्राप्त करत राहत असतील, तेव्हा सदाचारी लोकांसाठी बाकी काय उरणार? नैतिकता आणि चांगुलपणाला कोण उद्युक्त करतील? सदाचाराचा मोबदला देण्यासाठी आणि दुष्ट कृत्यांना रोखण्याचा एखादा मार्ग असायला हवा. जर याच जगात हे कार्य केले गेले नाही - आणि पाहातच आहोत हे नित्यनेमानं आणि लगेच होत नाही, कोणत्यातरी दिवशी हे कार्य केलेच पाहिजे, तोच दिवस 'निवाड्याचा दिवस' होय.

अशाप्रकारे माणसांच्या कर्मांची जबाबदारी असणे न्यायाची निकड आहे. ज्या कुणास न्याय हवाय, सभ्य असो की दुर्बल आणि गरीब सर्वांचीच गरज आहे.

श्रद्धा, मरणोत्तर जीवनात आणि निवाड्याच्या दिवसांत विश्वास यामुळं केवळ परलोकातीलच यश लाभत नसते तर या जगातसुद्धा शांतता नांदते, आनंद मिळतो; कारण माणसं दैनंदिन जीवनात जबाबदारीनं आणि कर्तव्यपूर्ण वागतात. याद्वारे जगातील गुंतागुंतीच्या समस्यांचं समाधान होतं.

# ६

# अवतरलेले ग्रंथ

आम्ही मानवजात ईश्वराचे दास असून या धर्तीवर त्याचे प्रतिनिधी आहोत. पण ईश्वराच्या प्रतिनिधी या नात्यानं आपली कर्तव्यं पार पाडण्यासाठी आम्हाला मार्गदर्शनाची गरज आहे. आम्ही स्वत: आपला मार्ग शोधू शकत नाही, कारण आमच्यामध्ये दोष आहेत, आपण दुर्बल आहोत. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळासाठीचं आपलं ज्ञान मर्यादित आहे. फक्त अल्लाहच या सर्व उणिवांपासून मुक्त असून तोच केवळ सर्व काळ-स्थळांची माहिती देण्यास समर्थ आहे. आपणास हे माहीत आहे की अल्लाहनं आपल्याला मार्गदर्शनापासून वंचित ठेवलेलं नाही. रास्त मार्ग दाखवण्यासाठी त्यानं प्रेषित पाठवलेत. याव्यतिरिक्त त्यानं काही प्रेषितांद्वारे मार्गदर्शनपर ग्रंथदेखील पाठवले आहेत.

अल्लाहच्या कृपेस सीमा नाही. आपल्याला ज्या कशाची गरज आहे, त्या सर्वांची त्यानं तरतूद केलीय. थोडीशी कल्पना करा, त्यानं जन्मापासून तारुण्यापर्यंत आमच्या मातापित्यांद्वारे आमचं अतिशय प्रेमानं संगोपन करण्याची कशी व्यवस्था केलीय. आपण आईच्या उदरात असताना आम्हाला कोण उपजीविका पुरवतो? आपण जन्म घेताच आईच्या स्तनात दुधाची व्यवस्था कोण करतो, नक्कीच परम दयाळू अल्लाह!

सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो,

"आम्ही ज्या लोकांना ग्रंथ दिलेत ते याला तसेच ओळखून आहेत जसे ते आपल्या मुलाबाळांना ओळखतात."

पवित्र कुरआनात ज्या ज्या धर्मग्रंथांचा उल्लेख आलाय त्या सर्व धर्मग्रंथांवर सर्व मुस्लिम श्रद्धा ठेवतात. ते अशाप्रकारे तौराह (तोरह) मूसा (मोजेस) यांच्यावर आधारलेला ग्रंथ, दाऊद (डेविड) यांचा जबूर (Psalams), इसा (Jesus) यांचा इंजील (Gospel) आणि मुहम्मद यांच्यावर अवतरलेला ग्रंथ पवित्र कुरआन. कुरआनात इब्राहीम यांचा सुहुफ (अब्राहम यांचा ग्रंथ) याचाही उल्लेख आहे.

दैवी ग्रंथांमध्ये फक्त कुरआनातच तेवढा काही बदल झालेला नाही, तो मूळ स्वरूपात सुरक्षित आहे. मूळ तौरह, जबूर आणि इंजिल अस्तित्वात नाहीत. सध्या लिखित स्वरूपातील जी पुस्तकं आहेत त्यांच्या अनुयायांनी त्यांच्या प्रेषितांच्या मृत्यूनंतर बऱ्याच वर्षांनी लिहून काढलेले आहेत. लिहणाऱ्यांनी ईश्वराच्या वचनांमध्ये मानवांच्या शब्दांची सरमिसळ केलीय.

बायबल हे ओल्ट टेस्टामेंड आणि न्यू टेस्टामेंट या ग्रंथांचा संग्रह आहे, ज्यांचा हिब्रू आणि ग्रीक या भाषांमधून इंग्रजी भाषेत अनुवाद केलाय. काळजीपूर्वक वाचन केल्यास त्यातील बदल आणि अतिरिक्त मजकुराची भर लक्षात येते.

सध्या जे बायबल अस्तित्वात आहे त्यामध्ये माणसांनी घातलेली भर मोठ्या प्रमाणात आहे. जे सत्य वाटत नाही, हे दैवी अवतरण नाही, यामध्ये प्रेषितांविषयी असंख्य गैरसमज आणि खोट्या नोंदी आहेत. त्यांच्या अनुयायांच्या दुर्लक्षामुळं किंवा त्यांच्या मूर्खपणामुळं त्या प्रेषितांद्वारे ईश्वराकडून पाठवलेल्या संदेशामध्ये विकृत केलं गेलं असेल किंवा तो नष्ट झाला असेल. दुसरीकडं पवित्र कुरआनात मानवजातीसाठी अल्लाहचं मार्गदर्शन आपल्या मूळ स्वरूपात, मूळ भाषेत काही बदल न झालेला किंवा विकृती नसलेला सुरक्षित आहे. यामध्ये अल्लाहचा संदेश जे पूर्वीच्या प्रेषितांच्या अनुयायांनी गमावून टाकलंय. त्याचं स्पष्ट आणि ठळकपणे विवरण केलंय. पवित्र कुरआनचा संदेश सर्व काळासाठी उपयोगी आहे.

# पवित्र कुरआन

## ईश्वराचं शक्तिशाली संबोधन

पवित्र कुरआन शक्तिशाली ईश्वराचं विशुद्ध आणि शक्तिशाली संबोधन आहे. या ग्रंथातला एकन्‌एक शब्द मानवजातीसाठी ईश्वराचा संदेश आहे. मानवी इतिहासात पवित्र कुरआनची वचनं महाशक्तिशाली आणि ज्ञानसंपन्न आहेत. कुरआनची हीच वचनं जगभर वेगानं पसरणाऱ्या इस्लामची प्रेरणा आणि दिशा देत आहेत.

एखादा माणूस जगभर आणि सर्वत्र असंख्य पुस्तकं मिळत असलेल्या पुस्तकांचं वाचन करू शकतो. पण कुरआन एक दैवी ग्रंथ असून १.७ बिलियन मुस्लिम त्याचा आदर करतात आणि वाचन करतात. ईश्वराकडून मिळालेली ही त्यांच्या दैनंदिन जीवनाविषयी मार्गदर्शनाची भेटवस्तू आहे. मुस्लिमांचा यावर पक्का विश्वास असतो की ते जेव्हा कुरआनचे पठण करत असतात तेव्हा ते रास्त शक्तिशाली अल्लाहशी संभाषण करत असतात.

मानवजातीकरिता पवित्र कुरआन ईश्वराची अद्वितीय देणगी आहे. कुरआनचा शब्दश: अर्थ वाचणे, पठण करणे असा आहे. विशुद्ध आणि स्पष्ट अरबी भाषेत पवित्र कुरआन मानवजातीसाठी अवतरलेलं दैवी वचन आहे. एकाच वेळी ते एक स्मरण, एक प्रकाश आणि एक चमत्कार होय. जिब्रईल यांच्याकरवी शक्तिशाली ईश्वरानं २३ वर्षांच्या अवधीमध्ये प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्यावर अवतरलंय. जेव्हा कधी त्यांना अवतरण येत असे प्रेषित आपल्या अनुयायांना ते कळवत असत आणि त्यास तोंडपाठ करण्यास सांगत. त्यांनी प्रार्थनेच्या वेळी ते पठण करण्यासाठी तसेच त्यास लिहून काढण्याच्या आज्ञा दिल्या होत्या.

हिजाजच्या भूभागामध्ये ज्यात मक्का आणि मदीनेचा समावेश आहे, जवळपास १४५० वर्षांपूर्वी इ. सन ६१० ते ६३२ च्या कालावधीत प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्यावर पवित्र कुरआनचे अवतरण झाले. त्या काळी अरब देशाचा इतिहास अंधकारमय होता.

## पवित्र कुरआन काय आहे?

पवित्र कुरआनची तुलना इतर धर्मग्रंथांशी करता येत नाही. उदा॰ तोराह, बायबल, महाभारत किंवा रामायणाशी. कारण यामध्ये प्राचीन काळातील लोकांचं वर्णन नाही. तरीपण यात काही प्रेषितांचा आणि इतर जनसमूहांचा व राष्ट्रांचा उल्लेख आलाय. हे क्रमानं केलेलं लिखाण नव्हे की क्रमबद्ध तार्किकरित्या सुरूवातीपासून मध्य भाग आणि शेवट असं लिहिलेलं नाही. हे एक सूरबद्ध गद्य, भव्य काव्य आणि लयबद्ध उत्कृष्ट असं लिखाण आहे. ६६६६ आयतींवर (श्लोक) आधारित संपूर्ण कुरआनात ११४ सूरह (अध्याय) असलेली एखाद्या जाळीसारखी ही बांधणी आहे, ज्याचा प्रत्येक शब्द दुसऱ्या शब्दाशी सूर-तालासारखं जुळलंय. कुरआनची बांधणी अशा तऱ्हेची आहे की यातला एखादा बिंदूही बदलता येत नाही. यत्किंचित बदलदेखील लगेच दिसून येतो.

## पवित्र कुरआनची अद्वितीयता

पवित्र कुरआनची विशिष्ट बांधणी, प्रत्येक शब्द आणि आयती एकमेकांशी जुळलेल्या असल्यानं भाषेची सुंदरता आणि सहजता, तिचा तंतोतंतपणा आणि मार्मिक भाषाशैलीमुळे पवित्र कुरआनची नक्कल करता येत नाही. यात बदल करणं किंवा विकृत करणं फक्त अशक्यच नव्हे तर पवित्र कुरआनच्या विलक्षण साहित्यिक भाषेत असलेल्या आयतींसारखी एखादी आयत निर्मिणं मानवाच्या सामर्थ्यापलीकडची गोष्ट आहे. पवित्र कुरआन स्वत: असे आव्हान करतो की वाचकांनी त्यातील सूरहच्या तोडीचा एकतरी सूरह रचून आणावा.

‘‘आम्ही आमच्या भक्तावर जे काही अवतरलंय त्यात

> तुम्हाला कसली शंका असेल, आणि तुम्ही प्रामाणिक असाल तर यासारखा एखादा अध्याय रचून आणा, आपल्या मदतीसाठी अल्लाहला सोडून तुम्ही हवे त्यांना बोलवा. पण जर तुम्हाला हे जमलं नाही आणि ते कदापि जमणार नाही, तेव्हा नाकारणाऱ्यांसाठी तयार ठेवलेल्या नरकाग्नीचं भय बाळगा, ज्यात इंधनासाठी मानव आणि दगड उपयोगी आणलेले आहेत.''
>
> (कुरआन, २:२३-२४)

पवित्र कुरआनची विशिष्ट भाषाशैली आणि शब्दरचनेमुळे ते तोंडपाठ करण्यास फार सोपे जाते. आपल्या डोळ्यांसमोर सुंदर असं चित्रीकरण करण्याच्या वैशिष्ट्याच्या जोरावर ही भाषा पठण करण्यास एका शब्दावरून दुसऱ्या शब्दावर नेते आणि शब्दरचना एका आयतीवरून दुसऱ्या आयतीपर्यंत पोचवते. 'तजवीद' म्हणजे संगीतमय कुरआनचे पठण आणि मंदगतीनं साध्या शैलीत त्याचं वाचण करणं. या दोन्ही पद्धती सर्वसाधारणपणे मान्य आहेत. मुस्लिम मुलांना कोवळ्या वयातच कुरआनचे पठण करणे शिकवले जाते. ते यास तोंडपाठही करत असतात. मानवी इतिहासात पवित्र कुरआन असा एकमेव ग्रंथ आहे जो सुरूवातीपासून शेवटपर्यंत तोंडपाठ केला जातो.

सबंध कुरआन तोंडपाठ केलेले लक्षावधी 'हाफीज' कोणत्याही काळात आढळतात.

दररोज पाच वेळच्या नमाजमध्ये कुरआनचे पठण केले जाते. पहाटेपासून दुपार, संध्याकाळ ते रात्रीपर्यंत, अशा रीतीनं अल्लाहच्या वचनांनी गेली १४५० वर्षांत अरबस्थानातील वळवंटापासून जगातल्या इतर राष्ट्रांपर्यंत पवित्र कुरआनचा हा प्रवाह अखंड वाहत आहे आणि येणाऱ्या सर्व शतकांमध्ये विशुद्ध आणि मूळ स्वरूपातील अल्लाहच्या या वचनांचं गुंजन असंच फैलावत राहणार आहे.

पवित्र कुरआन हे प्रेषित मुहम्मद यांनी रचलेलं असल्याचा गैरसमज आहे. या शंकेचं निरसन करण्यासाठी हे तथ्य पुरेसं आहे की प्रेषित निरक्षर

होते. त्यांना वाचता-लिहता य़ेत नव्हतं. पवित्र कुरआनातील वचनं विधीपूर्वक दैवी अवतरण आहे. पवित्र कुरआनची ऐतिहासिक, वैज्ञानिक आणि साहित्यिक सौंदर्याचं श्रेय फक्त ईश्वराला आहे. कारण या ग्रंथामधील भव्य शब्दरचना फक्त ईश्वरच करू शकतो. ज्या माणसाला अरबी भाषा समजत नाही, तोदेखील पवित्र कुरआनच्या सूरबद्ध शैलीनं प्रभावित होतो.

## कुरआनातील मजकूर आणि त्याचा हेतू

पवित्र कुरआन एकंदरित सर्व मानवजातीशी संबोधन करतो. राष्ट्र, जनसमूह, परिवार आणि व्यक्ती, वंश, भूभाग आणि काळ; सर्वांशी. बाह्य आणि आंतरिक दोन्ही बाजूंनी संपूर्ण शिकवण देतो. तो मनुष्य आणि त्याचा आत्मा दोघांना वय्क्त करतो. तो मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्र, आध्यात्मिक, ऐहिक, वैयक्तिक आणि सामूहिक बाबतीत मार्गदर्शन घडवतो.

वंश, भूप्रदेश आणि काळ यात काही भेद न करता पवित्र कुरआन सर्व मानवजातीला संबोधित करतो. पवित्र कुरआनचे ठळक विषय ईश्वर, मानवजाती, निसर्ग, बुद्धिमत्ता, प्रेषित आणि अवतरण हे आहेत. पवित्र कुरआन ईश्वराच्या उदात्ततेचं वर्ण करतो. खऱ्या अर्थानं तो मानवाच्या सर्व कल्पणांपलीकडं आहे आणि म्हणूनच कुरआनमध्ये ईश्वराच्या गुणांचं वर्णन करण्यात आलंय. त्याचा गौरव करण्यात आलाय. वैयक्तिक आणि समाजाचा घटक तसेच ईश्वराचा विश्वस्त या नात्यानं तो माणसांची जबाबदारी निश्चित करतो. पवित्र कुरआनात निसर्गाचा वारंवार उल्लेख येतो. ज्याद्वारे निसर्गाचा आकार, स्थिरता आणि नैसर्गिक प्रक्रियांवर भर दिली जाते. बुद्धिमत्तेच्या गुणांच्या स्तुतीविषयी पवित्र कुरआनात ७५० आयती (श्लोक) आल्या आहेत. म्हणजे १/८ कुरआन. सामाजिक आणि आर्थिक जीवनासंबंधी आणि शिक्षा (दंड), आंतरराष्ट्रीय कायदे व नियमांसंबंधी २५० आयती कुरआनात समाविष्ट आहेत.

कुरआनचा प्राथमिक हेतू वैयक्तिक विकास आहे. ज्यामुळे माणसानं आपल्या निर्मात्यासमोर जबाबदारीनं वागावं. हे उद्दिष्ट समोर ठेवून पवित्र कुरआन फक्त आज्ञाच देत नाही तर त्या समजावून देण्याचादेखील प्रयत्न

करतो. रास्त काय आणि चुकीचं काय, सत्य आणि खोटं काय याची दिशा पवित्र कुरआन ठरवून देतो. जर असं नसतं तर माणूस नुकसानीत राहिला असता.

ईश्वराचं एकत्व हे शाश्वत सत्य पवित्र कुरआन पुन्हा पुन्हा व्यक्त करतो आणि त्यानिमित्तानं यावर अढळ श्रद्धा ठेवावी, सत्कार्य करावं आणि पवित्र जीवन जगावं याकडं ईश्वर आपल्या निर्मितीला बोलावतो. लोकांच्या मोक्षप्राप्तीसाठीची ही अत्यंत महत्त्वाची तत्त्वे आहेत, ज्याच्या भक्कम पायावर इस्लाम उभा आहे.

एका अगदी लहानशा अध्यायात (सूरह) विशेषकरून ईश्वराच्या एकेश्वराच्या (तौहीद) सिद्धान्ताचं वर्णन आहे. प्रेषितांनी असं म्हटलंय की या अध्यायात पवित्र कुरआनच्या एकतृतियांश शिकवणींचा समावेश आहे.

- सर्वशक्तिशाली अल्लाह आम्हास याची माहिती देतो की त्याचा कोणी भागीदार नाही, त्याची कोणी संतती नाही, त्याच्यासमान कोणी नाही आणि हे की एकमेव त्याच्याशिवाय कुणीही उपासनेस पात्र नाही. ईश्वर कुणासारखा नाही आणि कोणती निर्मिती त्याच्यासारखी नाही. माणसांच्या गुणधर्मांशी आणि त्याच्या बंधनांची ईश्वराशी तुलना करण्यास कुरआन नाकारतो.

  ''अल्लाहच तुमचा एकमेव विधाता आहे. त्याच्या व्यतिरिक्त कुणीही भक्तीस पात्र नाही. तो अत्यंत कृपावंत आणि कनवाळू आहे.'' (कुरआन, २:१६३)

- ईश्वरच तेवढा उपासनेस लायक आहे. खोट्यानाट्या ईश्वर आणि देवतांना नाकारायला हवं. तसेच ईश्वराशिवाय कुणासही दैवी गुणांनी संपन्न करण्याच्या कल्पनांना पवित्र कुरआन धुडकावतो.

  ''अल्लाहची भक्ती करा, त्याचा कोणी भागीदार करू नका.'' (कुरआन, ४:३६)

ज्या श्रद्धेकडं कुरआन आमंत्रित करतो ती फार साधी व सरळ आहे. 'लाइलाहा इल्लल्लाह मुहम्मदुर्रसूलुल्लाह' - अर्थात अल्लाहव्यतिरिक्त कुणीही उपासनेस पात्र नाही. मुहम्मद अल्लाहचे प्रेषित आहेत.

इस्लाममध्ये 'उपासना' समावेशक शब्द आहे. यामध्ये माणसांची सर्व कर्मं (वैयक्तिक असोत की सार्वजनिक) ज्यांचा अल्लाहनं आदेश दिलाय, जी अल्लाहस प्रिय आहेत आणि ज्यामुळं त्याची प्रसन्नता लाभते, या सर्व गोष्टींचा समावेश आहे.

- पवित्र कुरआन वैश्विक बंधुभावाचा मंत्र देतो. मानवजात विविध जाती-जमातींची किंवा वेगवेगळ्या दर्जांची निर्मिती आहे, ही कल्पना धुडकावतो. ईश्वर वैश्विक बंधुभावाची इस्लामी संकल्पना विस्तृत करतो.

  ''लोकहो! अल्लाहनं तुम्हांस एक पुरुष आणि एका स्त्रीपासून जन्माला घातलं आणि तुमच्यात जमाती आणि टोळ्या बनवल्या, तुम्हांस ओळखता यावं म्हणून.''

  (कुरआन, ४९:१३)

- समता आणि न्याय हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि पवित्र कुरआन या दोन्हींचा कैवारी आहे. अल्लाहच्या नजरेत सर्व मानव एकसमान आहेत. मग ती स्त्री असो की पुरुष काळा असो की गोरा, गरीब असो की श्रीमंत, राजा असो की प्रजा, सभ्य असो की साधा मनुष्य, सर्वचजण. सदाचार, सत्कर्म आणि चांगली कृत्यं या बाबी एका माणसाला दुसऱ्यावर श्रेष्ठत्व देतात. रंग, वंश, भाषा आणि राष्ट्रीयत्व कुरआननुसार यांचा संबंध फक्त एकमेकांच्या ओळखीशी आहे. या मापदंडांवर मानवजातीला विभागण्यासाठी किंवा भेदभाव

करण्यासाठी; श्रेष्ठत्व देण्यासाठी नव्हे. पवित्र कुरआनात मानवी बंधुभाव आणि त्याचा आत्मा यांचा अतिशय सुरेख शब्दांत उल्लेख केला गेला आहे. (पाहा- कुरआन, ४९:१३,४:१३५)

- पवित्र कुरआन आमच्या लक्षात आणून देतो की प्रत्येकजण मरण पावणार आहे आणि तो आपल्या कर्मांसाठी जबाबदार असणार आहे. तसेच शिक्षा आणि मोबदला, मरणोत्तर जीवनाचे सत्य, न्यायनिवाड्याच्या दिवशी शक्तिशाली ईश्वरासमोर जबाबदार असणे, स्वर्ग आणि नरकाचं अस्तित्व आणि सत्य व दैवी अवतरणाची आवश्यकता या सर्वांचं स्मरण करून देतो.

  पवित्र कुरआन स्वर्गाचं आकर्षक शब्दांमध्ये वर्णन करतो. ज्यामध्ये ईश्वराशी एकनिष्ठ सेवकांना प्रवेश दिला जाईल. दुष्ट वर्तनांच्या लोकांना दिल्या जाणाऱ्या शिक्षेचाही कुरआनात तपशील दिलाय.

  ''या जगातलं जीवन खेळ-तमाशापलीकडं काय? पण सदाचारी लोकांसाठी मरणोत्तर जीवनाचं ठिकाणच उत्तम आहे,'' (कुरआन, ६:३२)

- पवित्र कुरआन मानवजातीला चांगल्या गोष्टींकडं, सदवर्तनाकडं आणि दुष्ट काय त्याचं निर्दालन करण्याचं आवाहन करतो.

  ''तुमच्यापैकी असा एक गट असायला हवा लोकांना भल्या गोष्टींकडं आमंत्रित करणारा, सद्‌वर्तन करण्यास प्रवृत्त करणारा आणि दुष्कृत्यास आळा घालण्यासाठी. हेच लोक तर उत्कर्ष पावणारे आहेत.'' (कुरआन, ३:१०४)

- विविध क्षेत्रांमध्ये नैसर्गिक प्रक्रिया जसे गर्भशास्त्रा, हवामानशास्त्र, खगोलशास्त्र, भूगर्भशास्त्र आणि

सागरशास्त्र यांची अचूक माहिती देणाऱ्या बऱ्याच आयतीं आहेत. सातव्या शतकातील ग्रंथामध्ये आलेल्या अचूक आणि संक्षिप्त माहितीस वैज्ञानिकांनी मान्य केले आहे.

''आम्ही आमच्या आयती लवकरच त्यांना या विश्वामध्ये सर्वत्र आणि त्यांच्या स्वत:च्या आत्म्यांतही दाखवून देऊ हे (कुरआन) सत्य असल्याचं त्यांच्यावर (पुरेपूर) स्पष्ट होईपर्यंत.'' (कुरआन, ४१:५३)

खरे पाहता आधुनिक विकास आणि उपकरणांद्वारे कुरआनमध्ये ज्यांचा उल्लेख आलेला आहे अशा वैज्ञानिक चमत्कारांचा नुकताच शोध लावला गेलाय.

- मानवी जीवनाच्या प्रत्येक बाजू आणि त्याच्या जीवनातील विविध टप्प्यांशी संबंधित जाणीव करून देणारे अशी पवित्र कुरआनात परिपूर्ण जीवनव्यवस्था आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहार, व्यापार, अर्थकारण, राजकारण, न्याय आणि समाजजीवन, विवाह व संपत्तीच्या वारसासंबंधी पवित्र कुरआन नियम नेमून देतो. त्यात नागरी नियमदेखील दिलेले आहेत.

  राज्यप्रमुखाचं आचरण कसं असावं आणि सामान्य नागरिकांशी कशी वर्तणूक असावी, गरीबानं कसं वागावं याबद्दलच्याही दिशानिर्देशांचा कुरआनात समावेश आहे.

- भूक, दारिद्र्य, विषमता, अन्याय, युद्धं, भांडण-तंटे यांचं निरसन करणं आणि अल्लाहच्या निर्मितीत ढवळाढवळ करून त्याचा अतिरेक थांबवण्यासाठीही पवित्र कुरआनात मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत.

- सर्वशक्तिशाली ईश्वरानं प्रत्येक वस्तू मानवजातीच्या सेवेसाठी निर्माण केलीय, याचेही संकेत कुरआनात दिलेत. वैज्ञानिकांनीही हे सिद्ध केलंय की जगातल्या सर्व वस्तूंचं

अंतिम उद्दिष्ट मानवजातीची सेवा करणं आहे. हे एक असं जग आहे ज्यात एक अस्तित्व सर्वांसाठी आहे आणि सर्वकाही एका अस्तित्वासाठी बनवलं गेलंय. हा निसर्गनियम आहे. अशा रितीनं मानवजातीच्या अस्तित्वाचं उद्दिष्ट त्याच्या निर्मात्याची सेवा करण्यापलीकडं काहीच नाही. ही जबाबदारी पार पाडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे प्रत्येकानं ईश्वराच्या उद्दिष्टासाठी झटत राहावं. त्याचबरोबर आपल्या लोकांचीही सेवा करावी, ही उपासना होय. ज्याचा सर्वोच्च आकार निसर्गात शांतता आणि एकोपा स्थापित करणे आहे. याबाबतीत आपल्या निर्मात्याचा आदेश असा–

''सुव्यवस्था नांदत असता पृथ्वीवर अत्याचार माजवू नका'' (कुरआन, ७:५६)

- पवित्र कुरआन लोकांना त्याच्या मार्गदर्शनाचं आणि शिकवणींचं पालन करण्यास उद्युक्त करतो. यामध्ये अव्यावहारिक आदर्शवादास चालना देत नाही. या जगी आणि मरणोत्तर जीवनात यशस्वी होणं पवित्र कुरआनच्या शिकवणी अंमलात आणण्यावर निर्भर आहे. सर्वशक्तिमान ईश्वराच्या कायद्याची प्रतिभा स्थापन करण्यासाठी लोकांनी आपल्या सर्व शक्ती आणि धनसंपत्ती एकवटावी असं कुरआनचं म्हणणं आहे. ज्या समाजात ते वावरतात त्यातील सर्व दुष्ट कृत्यांना आळा घालावा.
- व्यावहारिकता हे पवित्र कुरआनचं सर्वांत ठळक वैशिष्ट्य आहे. अव्यावहारिक आदर्शवादाला तो थारा देत नाही. तसेच याच्या शिकवणी अशक्य गोष्टी करण्यास सांगत नाहीत की ज्या उद्दिष्टांची उंची गाठता येत नाही. त्यासाठी प्रयत्न करण्यास सांगत नाही. माणूस आहे तसा त्याला मान्यता देतो आणि त्यास जे काही जमेल ते साकारण्यास

उत्तेजन देतो. जन्मापासून मृत्यूपर्यंत धिक्कारलेला, मातेच्या पोटापासून ते कबरीपर्यंत पापांमध्ये बुडालेली, असाहाय्य आणि निराशा अशी निर्मिती, असा कलंक पवित्र कुरआन मनुष्यावर लावत नाही; तर तो त्याचं चित्रण सभ्य, सन्मानीय आणि आदरणीय निर्मितीच्या रूपात करतो.

पवित्र कुरआनच्या शिकवणींची व्यावहारिकता प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी गिरवलेल्या कित्त्यानं स्थापित झालीय.

अशा संपूर्ण परिस्थितीत कुरआनचं ज्ञान परिणामकारक आहे. तो शरीराला त्रासदायक नाही की शारीरिक गरजांची अवहेलना करतो, तसेच तो आत्म्याकडंही दुर्लक्ष करत नाही. निर्माणप्रक्रियेत ज्या गोष्टींची जिथं आवश्यकता आहे त्यानुसारच त्याची योजना आहे.

- पवित्र कुरआन एकमेव सुरक्षित केलेला पवित्र ग्रंथ आहे. यात काही भर घातलेली नाही, काही मजकुर वगळण्यात आला नाही की काही फेरबदल केले गेलेत, याच्या अवतरणास १४५० वर्षं पूर्ण झालेली असूनसुद्धा.

शक्तिशाली ईश्वर कुरआनात नमूद करतो,

''होय, आम्ही ही शिकवण (कुरआन) पाठविली आहे आणि आम्हीच तिचं जतन करू.'' (कुरआन, १५:९)

पवित्र कुरआन फक्त लिखित स्वरूपातच सुरक्षित करण्यात आलेला नाही तर पुरुष, मुलं आणि स्त्रियांच्या हृदयांमध्येदेखील तो सुरक्षित केला गेलाय. आज आपण पाहतो लक्षावधी लोकांनी सुरूवातीपासून शेवटपर्यंत पवित्र कुरआन तोंडपाठ केलाय. यामुळं कुरआनशी छेडछाड करण्याची कसली शक्यता नाही.

पवित्र कुरआनचं आध्यात्मिक स्थान खालील आयतीत अशाप्रकारे व्यक्त केलंय,

“आम्ही जर हे कुरआन कुणा पर्वतावर अवतरला असता तर तुम्ही पाहिलं असता अल्लाहच्या भीतीनं नमून तो चिरडला गेला असता. आम्ही लोकांच्या चिंतनासाठी अशी उदाहरणं देत असतो.” (कुरआन, ५९:२१)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी म्हटलंय,

लोकांनी श्रद्ध व्हावं म्हणून सर्व प्रेषितांना चमत्कार देण्यात आले होते. मला पवित्र कुरआन हा चमत्कार दिला गेलाय.

# पवित्र कुरआनचा प्रभाव

मानवी इतिहासावर पवित्र कुरआननं अद्वितीय प्रभाव टाकलाय. हा ग्रंथ सर्वांत जास्त वाचन, पठण, तोंडपाठ, चर्चित, विश्लेषण केला जाणारा आणि सर्वांत जास्त आदरणीय ग्रंथ आहे. असं इतिहासात दुसरं कोणतंही उदाहरण नाही. विसाव्या शतकातील सर्वोत्तम आणि सन्मानित पवित्र कुरआनचे भाष्यकार मुहम्मद असद म्हणतात,

''आमच्या माहितीत ज्या ज्या घटना घडल्या त्यामध्ये धार्मिक, सामाजिक आणि राजकीय इतिहासामध्ये पवित्र कुरआननं सर्वांत जास्त मूलगामी प्रभाव टाकलाय. माणसांच्या जीवनावर इतर कोणत्याही धर्मग्रंथानं अशा प्रकारचा प्रभाव टाकलेला नाही. ज्यांनी प्रथम हा संदेश ऐकला त्यांच्यानंतर पुढील येणाऱ्या पिढ्यांनी त्यांच्याकडून तो ऐकला आणि सर्व सभ्यतांवर त्याचा परिणाम उमटला. शतकानुशतकं सतत एकमेकांशी लढाया करणाऱ्या, रक्तपात माजवणाऱ्या अरब टोळ्यांना या कुरआननं हेलावून टाकलं आणि त्याच्यापासून एका राष्ट्राची उभारणी केली. काही दशकांतच ही वैश्विक दृष्टीनं अरबच्या सीमा ओलांडून जगभर विस्तारली आणि विचारधारेवर आधारित जगातला प्रथम समाजसमूह उदयास आला. आपल्या अनुयायांमध्ये त्यानं ज्ञानाची जिज्ञासा आणि त्याचा आत्मा निर्माण केला तो ज्ञान आणि जागृतीचा आग्रह धरून. परिणामस्वरूप विज्ञान, शोधकार्य आणि शिक्षणाच्या एका भव्य कालखंडाची सुरूवात झाली आणि इस्लामी जगताला यामुळं एक वैशिष्ट्य प्राप्त झालं. इस्लामच्या या सांस्कृतिक शक्तीची परिणती पुढं जाऊन पवित्र कुरआननं जेव्हा या संस्कृतीला जन्म दिला ती मध्यावधी काळात यूरोपात सर्वदूर पोहोचली आणि पाश्चात्य संस्कृतीची पुनरावृत्ती यूरोपियन रेनेसांमध्ये झाली. अशाप्रकारे ज्या काळात आम्ही आज वावरत आहोत त्या वैज्ञानिक काळाचा जन्म झाला.''

# अवतरण

## दैवी संचारण

देवदूत जिब्राईल (त्यांना शांतता लाभो) अनेकदा प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्याकडं हजर झाले. प्रेषित मुहम्मद कळवतात की जिब्राईल काही वेळा दुसऱ्या रूपात आले तर काही वेळा मनुष्यरूपी आले. इतर काही वेळा मुहम्मद यांना घंटा वाजल्यासारखा आवाज येई आणि लगेच अवतरण येत असे. अशा वेळी त्यांना कमालीची एकाग्रता लाभत असे. दम कोंडल्यासारखं वाटे. ही शेवटची अवस्था त्यांना वेदनादायक होत असे. पण त्या प्रक्रियेनंतर त्यांच्याकडं जे अवतरण आलं होतं त्याचा शब्द न् शब्द ते म्हणून दाखवत. वीस वर्षं जिब्राईल दूत आवश्यकतेनुसार त्यांच्या सान्निध्यात राहत. अवतरलेल्या आयती आणि अध्यायांचं कुरआनात संकलन केलं जाई.

हे अवतरण त्यांच्या अवतरणकाळाच्या क्रमवारीनुसार संकलित केलं जात नसे, तर जिब्राईल यांनी प्रेषितांना दिलेल्या सूचनेनुसार केलं जाई. प्रत्येक वर्षी रमजानच्या महिन्यात प्रेषित त्या अवतरणांचं पठण जिब्राईल यांना त्यांच्या सूचनेनुसार क्रमवारीत ऐकवत असत. ही एक प्रकारची नियमित तपासणी होती, त्या ग्रंथाची जो २० वर्षांच्या कालखंडात साकारला जात होता.

# पवित्र कुरआनचं संग्रहण

जिब्रईल यांच्याद्वारे प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्यावर अवतरित झालेल्या कुरआनचा एकन् एक शब्द नोंदवून ठेवला जाई. कोणत्या अनुक्रमानुसार आयतींना एकत्र करावयाचं आहे हे जिब्रईल दूत प्रेषितांना लक्षपूर्वक सुचवत असत. ज्या क्रमानं कुरआनच्या आयती अवतरल्या आहेत त्यानुसार कुरआनचं संकलन केलेलं नाही किंवा विषयसूचीनुसार देखील नाही. त्याचा अनुक्रम ईश्वराच्या योजनेनुसार लावलाय. हे कुरआनचं आणखीन एक विलक्षण वैशिष्ट्य आहे.

प्रेषितांचे सचिव तसेच लिखाण करणारे त्यांचे अनुयायी जैद बिन साबित (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) प्रेषितांनी सांगितलं त्यानुसारच ते नोंदवून घेत असत. लिहून काढलेला मजकुर ते प्रेषितांना ऐकवत असत.

पवित्र कुरआनचे ११४ अध्याय आहेत. सुरूवातीच्या लहानसा 'सूरह फातिहा'नंतर सर्वांत मोठा 'सूरह बकरह' (गाय) आहे. यात २८६ आयती आहेत. नंतरचे सूरह लहान होत जातात. सर्वांत लहान अध्याय 'सूरह कौसर' (विपूलता) या नावानं आहे. यामध्ये केवळ तीन आयती आहेत. पवित्र कुरआनमध्ये एकंदर ६६६६ आयती आहेत. प्रेषित मक्केत असताना जे अध्याय (सूरह) अवतरले त्यांना 'मक्की' (मक्काकालीन) नावानं ओळखलं जातं आणि जे अध्याय मदीनेत अवतरले त्यांना 'मदनी' (मदीनाकालीन) म्हटलं जातं.

वाचन करण्यास सोपे जावे यासाठी पवित्र कुरआनची ३० भागांत विभागणी करण्यात आलीय.

आरंभकाळातील मुस्लिम लोक सूरहचे (अध्यायाचे) अवतरण झाले की लगेच ते तोंडपाठ करायचे. प्रख्यात हु.फ़्फ़ाज़ (हाफीजचं अनेकवचन,

म्हणजे तोंडपाठ करणारे) मुआज बिन जबल, उबैदा, अबू दरदा, अबू अय्यूब अन्सारी आणि उबैय बिन कअब होते.

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या निधनानंतर लवकरच ६३२ इ. सनात उमर (अल्लाह त्याच्याशी राजी होवो) यांनी प्रथम खलीफा अबू बकर (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांना अशी सूचना केली की संपूर्ण कुरआन एकाच खंडात संग्रहित केलं जावं. त्यावेळेपर्यंत कुरआन वेगवेगळ्या भागांमध्ये लिहून ठेवलं जात होतं. पवित्र कुरआनचा मजकुर एकाच खंडामध्ये संग्रहित करण्यासाठी जैद बिन साबित यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठन केली.

प्रेषित मुहम्मद यांच्या काळात कुरआन जसा लिहून काढलेला होता तंतोतंत तसा संकलित करण्याची काळजी घेतली गेली. लक्षपूर्वक तपासणी केल्यानंतर हे कार्य पूर्ण झाले. उमर यांच्या खिलाफतीत याची एक प्रत हफसा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो)- प्रेषितांच्या विधवा पत्नींपैकी एक- यांच्याकडं ठेवली गेली होती.

नंतर मुस्लिम इलाख्यात कुरआनच्या शिक्षणकार्यासाठी अनेक शाळा स्थापन झाल्या. उमर यांच्या खिलाफतकाळात दमास्कसमध्ये अशीच एक शाळा होती. या ठिकाणी १६०० विद्यार्थी प्रख्यात हाफीज अबू दरदा यांच्या देखरेखीत शिक्षण घेत होते.

खलीफा उस्मान यांच्या दूरदर्शी निर्णयामुळं कुरआनचं एकसारखं वाचन करणं शक्य झालं. खलीफा उस्मान यांच्या काळातील एक मूळ प्रत इस्तंबूल, टर्की येथील तापकापी संग्रहालयात, दुसरी मूळ प्रत उजबेकिस्तान येथील ताश्कंद येथे उपलब्ध आहे. ताश्कंदच्या मूळ प्रतीची एक फोटोकॉपी नॅशनल लायब्ररी कराची, पाकिस्तान येथे आहे.

# सीरत

## (प्रेषितांचं चरित्र)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या जीवनचरित्रास 'सीरह'ने ओळखले जाते. ते इतिहासाच्या संपूर्ण प्रकाशझोतात वावरत होते. त्यांच्या प्रत्येक उक्ती आणि कृतीची नोंद केली गेलीय. प्रेषितांना स्वतः लिहता-वाचता येत नसल्यानं ४५ नोंदणी करणाऱ्या अनुयायांचा समूह त्यांच्या सेवेत होता. ते त्यांची सुवचनं, निर्देश आणि त्याच्या कृतीची नोंद घेत असत. प्रेषित मुहम्मद यांनी महत्त्वाच्या निर्णयाची नोंद करून ठेवण्यास स्वतः निर्देश दिले होते. आमच्यापर्यंत जवळपास त्यांचे ३०० दस्तऐवज पोहोचले आहेत, ज्यांत राजकीय करार, सैन्यभर्ती, अधिकाऱ्यांची कर्तव्ये आणि कार्यालयीन पत्रव्यवहार इत्यादी चामड्यावर लिहलेले आहेत. अशाप्रकारे आम्हास त्यांच्या जीवनातील अगदी लहानसहान घटनांचादेखील तपशील मिळतो. ते कसे बोलायचे, कसे झोपत होते, त्यांचा पोशाख कसा, चालताना ते कसे दिसायचे, एक पती, पिता, पुतणे या नात्यानं ते कसे वागायचे, महिलांशी, मुलांशी आणि प्राण्यांशी त्यांचा व्यवहार कसा होता, व्यापारी म्हणून ते कसे होते, गरीब आणि अत्याचारपीडितांशी त्यांचा व्यवहार कसा होता, छावणीत आणि युद्धभूमीवर त्यांची भूमिका, राजकीय सत्ताधीश या नात्यानं ते कसे काम करत होते, त्यांच्या वैयक्तिक आवडीनिवडी, पत्नींशी खाजगीत त्यांची वर्तणूक या सर्व गोष्टींची माहिती मिळते. त्यांच्या निधनानंतर काही दशकांत प्रेषितांच्या जीवनचरित्रावरील साहित्य मुस्लिमांना लिखित स्वरूपात उपलब्ध झालं. सर्वांत पहिलं, प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्यावरील सुप्रसिद्ध चरित्रग्रंथ शंभर वर्षांच्या आतच इब्ने इस्हाक यांनी 'सीरत रसूलुल्लाह' या नावानं संपादित केला.

# हदीस

## (प्रेषितांची वचनं)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांची दिनचर्या आणि त्यांचे उवाच, त्यांना पवित्र कुरआनचं प्रथम अवतरण पोचण्यापासून ते त्यांच्या निधनापर्यंत, यास 'हदीस' असे म्हटलं जातं. हदीसचा शब्दश: अर्थ 'विधान' असा आहे. अशाप्रकारे हदीस म्हणजे प्रेषित मुहम्मद यांची सुवचनं आणि त्यांची परंपरा आहे.

त्यांच्या हयातीत हदीसचं लिखाण मुहम्मद यांचे अनुयायी विविध वस्तूंवर जसे हाडांचे तुकडे, पॅपायरस म्हणजे ज्याचा कागद बनवला जातो ते, पांढरे दगड आणि कापडांवर केले जात होते. त्याचबरोबर तोंडपाठही केले जाई. त्यांच्या मृत्युपश्चात मुस्लिमांनी हदीसची अधिकारिकता, त्याचं मूल्यमापन करण्यासाठी विशेष विज्ञान विकसित केलं. हदीसचं गुणविवेचन करण्याची ही पद्धत मुस्लिम सभ्यतेची गुणवत्ता बनली आणि त्यापासून भलंमोठं साहित्य उदयास आलं.

दहा वर्षे वयापासून अनस (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांनी लिहणं-वाचणं अवगत केलं. त्यांच्या माता-पित्यांनी त्यांचं वैयक्तिक लिखाण करण्यासाठी नियुक्ती करण्यास प्रेषितांना सांगितलं. प्रेषितांनी यास मान्यता दिली आणि ते लिखितकार्य करणाऱ्या मंडळींत सामील झाले. ते रात्रंदिवस प्रेषितांसोबत असायचे. प्रेषित मुहम्मद यांच्या मृत्युनंतर अनस हे सर्वप्रथम प्रेषितांच्या वचनांचं कथन करणारे ठरले. ते आपला लिखित अहवाल उघडून सांगायचे, ''ही प्रेषितांची सुवचनं आहेत. मी ती लिहून काढल्यावर प्रेषितांना वाचून दाखवत असे. म्हणजे त्यांनी चुकांची दुरुस्ती करावी.''

आरंभकाळातील मुस्लिम विद्वान हदीसचे प्रसिद्ध संपादक इमाम बुखारी यांनी ७२७५ हदीसी गोळा केल्या आहेत. यांचा संग्रह प्रसिद्ध ग्रंथ 'सहीह बुखारी'मध्ये करण्यात आलाय. इमाम मुस्लिम यांनी ९२०० वचनांचं संकलन केलंय, जी 'सहीह मुस्लिम' या ग्रंथात संग्रहित आहेत. एकंदर सहा सर्वपरिचित आणि विस्तृत उपयोगात असलेले अधिकारिक संग्रह आहेत. त्यांना संपादन करणाऱ्यांच्या नावांनी ओळखलं जातं. मुस्लिम आणि बुखारी यांच्याव्यतिरिक्त तिर्मिजी, इब्ने माजा, अबू दाऊद आणि अननिसाई अशी त्यांची नावं आहेत.

# सुन्नह

हदीस आणि सीरह यांना एकत्रित सुन्नह असं म्हटलं जातं. सुन्नह या शब्दाचा अर्थ पद्धत, उदाहरण आणि मार्ग होतो. सुन्नह म्हणजे प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांची उक्ती व कृती. या जगात प्रेषितांच्या दैवी कार्याची अंमलबजावणी हे त्यांच्या संदेशाचा गाभा आहे. प्रत्येक मुस्लिम यास आदर्श वर्तन समजतो. सुन्नहद्वारेच मुस्लिमांना आपल्या श्रद्धेच्या कर्मकांड आणि अध्यात्माविषयी माहिती आणि शिक्षण प्राप्त होते, म्हणजे प्रार्थना कशी करावी, उपवास कसा करावा आणि मक्केची यात्रा कशी करावी. सामाजिक आणि नैतिक बाबींमध्ये सुन्नह मार्गदर्शनदेखील करते. अशाप्रकारे ज्या मुस्लिमाला सदाचाराचं जीवन जगायचं आहे तो प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी घालून दिलेली पद्धत आणि त्या मार्गाचं अनुसरण करतो. सुन्नह इस्लामी जीवनाचा मार्ग आहे.

> ''सुन्नह इस्लामी कायद्याचा मूलस्रोत आहे. पवित्र कुरआन आणि सुन्नह मिळून इस्लामची वैचारिक आणि व्यावहारिक बाजू बनतात.''

७

# श्रद्धा कृतीत आणणे

या अध्यायामध्ये आम्ही इस्लामनं घालून दिलेल्या श्रद्धेच्या महत्त्वाच्या विधी कशा अंमलात आणायच्या याचं वर्णन करत आहोत ते अशा प्रकारे - प्रार्थना (नमाज), उपवास (सियाम), दान (जकात) आणि यात्रा (हज). अल्लाहनं अनिवार्य केलेल्या या कृती सर्व आध्यात्मिक उद्दिष्टांची पूर्तता करतात. त्यातील काही विधी दररोज, काही आठवड्यांतून एकदा, काही महिन्यात एकदा, काही दरवर्षी दोनदा आणि काही वार्षिक आहेत. तर काही आयुष्यातून कमीतकमी एकदा पार पाडायचे आहेत. याचा अर्थ त्या विधीमध्ये आठवड्याचा प्रत्येक दिवस, महिन्याचा प्रत्येक आठवडा, वर्षाचे सर्व महिने आणि आयुष्यातील सर्व वर्षांचा समावेश होतो आणि माणसांच्या संपूर्ण जीवनाला आध्यात्मिक स्पर्श प्रदान करतो.

श्रद्धा माणसांना आपल्या एकनिष्ठतेत आणि आपल्या व्याहारात सातत्य ठेवण्यास प्राृत्त करते.

## श्रद्धेचा संबंध

इस्लाममध्ये श्रद्धा आणि व्यवहाराचा आंतरिक संबंध धर्माच्या संपूर्ण व्यवस्थेवर ठळक प्रभाव टाकतो. त्याचबरोबर इस्लामच्या शिकवणी व्यक्त करतो. आत्मा आणि शरीर, अध्यात्म आणि ऐहिकता, धर्म आणि जीवन यामध्ये फरक असणे इस्लामला मान्य नाही. ईश्वरानं निर्मिलं त्यानुसार माणसाचा स्वीकार करतो आणि हे मान्य करतो की त्याच्या स्वभावात आत्मा

आणि शरीर समाविष्ट आहेत. तो त्याच्या आध्यात्मिक बाजूला नाकारत नाही, तसे नसेल तर तो एक पशुसमान होईल. तो त्याच्या शारीरिक गरजांना कमी लेखत नाही. तसे असते तर तो देवदूतासारखा असता, तो तसा नाही आणि कधीही होणार नाही.

इस्लाम मानवी स्वभावाला तो आहे तसाच मान्य करतो, त्याचबरोबर तो माणसाच्या आध्यात्मिक आणि भौतिक जडणघडणीत त्यास संपूर्ण आपुलकी असते. तो धर्माला वैयक्तिक बाब, समाजाशी अलिप्त अस्तित्व मानत नाही. दुसऱ्या शब्दांत म्हणायचं झाल्यास वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनावर धर्माची छाप नसेल तर त्याचं काही मोल नाही. दुसऱ्या बाजूनं दैवी कायद्यांप्रमाणे जर जीवनाची उभारणी केली नाही तर हे जीवन निरर्थक आहे.

जीवनाच्या वैयक्तिक आणि सामाजिक वर्तन, मजुर आणि उद्योग, अर्थ आणि राजकारण, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संबंध या सर्व क्षेत्रांना इस्लाम कसे संघटित करतो हे स्पष्ट होते. माणसांच्या एकमेकांशी दैनंदिन देवाणघेवाणीशी इस्लाम धर्माला अलिप्त ठेवत नाही, हेही यापासून व्यक्त होते. यासाठीच इस्लाम जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रवेश करतो. सर्व मानवी व्यवहार परिपूर्ण शिस्तबद्धतेनं चालावेत ते ईश्वराला मान्य असून मानवामानवांत आपुलकी निर्माण करतात. सत्यधर्म आणि अर्थपूर्ण जीवनामध्ये परस्परांचे संबंध अत्यंत आवश्यक आहेत. परिणामी धर्म आणि दैनंदिन जीवनामधील सुसंगततेमुळे इस्लामला समजण्यासाठी सहा दिवस आणि विधात्यासाठी एक दिवस हा सिद्धान्त मान्य नाही.

अशाच प्रमाणे सहा दिवस एकाग्रतेसाठी आणि एक दिवस स्वत:साठी असे निश्चित केले तरी ते त्याच्यासाठी चांगले नसेल, संतुलन बिघडून जाईल.

# इस्लामचे पाच स्तंभ

पवित्र कुरआनचा संदेश आणि प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या शिकवणी हे दोन्ही इस्लामी जीवनाची समावेशकता दर्शवितात, वैयक्तिक व सामाजिक दोन्ही बाजू.

यांच्या केंद्रस्थानी पाच स्तंभ किंवा अनिवार्य कर्तव्ये आहेत जी प्रत्येक श्रद्धावंत मुस्लिमानं पाळायला हवेत.

या स्तंभांचा उल्लेख हदीस - प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या वचनांमध्ये आलेला आहे.

शहादा - श्रद्धेची घोषणा

सलाह - दररोज पाच वेळा आणि आठवड्यातून एकदा शुक्रवारी अनिवार्य प्रार्थना (नमनाज) करणे.

सियाम - रमजान महिन्यात उपवास (रोजे) करणे.

जकात - कल्याणकारी कार्यामध्ये हातभार लावणे.

हज्ज - मक्केची यात्रा.

# शहादा म्हणजे श्रद्धेची घोषणा

शहादा म्हणजेच श्रद्धेची घोषणा करण्याने एक माणूस इस्लाममध्ये तसेच मुस्लिम समुदायात प्रवेश घेतो. अरबी भाषेतील या घोषणेचे शब्दोच्चार खालीलप्रमाणे–

*''लाइलाहा इल्लल्लाह मुहम्मदुर्रसूलुल्लाह''*

''ईश्वराशिवाय कुणी ईश्वर नाही आणि मुहम्मद ईश्वराचे प्रेषित आहेत.''

जे लोक पवित्र कुरआनास अल्लाहचं विधान आणि मुहम्मद अल्लाहचे प्रेषित असल्याचं मान्य करतात, त्यांना मुस्लिम संबोधलं जातं. शहादा किंवा श्रद्धेचं विधान केल्यावर एक माणूस मुस्लिम होतो.

या साध्या घोषणेचे परिणाम अत्यंत गहन आणि गंभीर स्वरूपाचे आहेत.

१. ते हे सूचित करतात की ईश्वराचं अस्तित्व सत्यता आहे. मानव, इतर वस्तू आणि सर्व निर्मितीचं अस्तित्व ईश्वराच्या इच्छेमुळे आहे.

२. आमचं अस्तित्व ईश्वराची कृपा आणि त्याच्या इच्छेनुसार आहे. म्हणून आम्ही त्याच्यावर अवलंबून आहोत. ईश्वराशी आमचं नातं मालक आणि सेवकासारखं आहे.

३. याचा अर्थ आम्ही आपल्या सर्व कर्म आणि विचारासाठी ईश्वरासमक्ष जबाबदार आहोत. निवाड्याच्या दिवशी आम्हाला आपल्या सर्व कर्मांचा ईश्वराकडं हिशोब द्यायचा आहे आणि परिणामी परलोकात, म्हणजेच आखिरतमध्ये आमचं ठिकाण कोणतं याचा निर्णय तोच करील.

४. शेवटच्या निर्णयासाठी आम्हाला तयारी करावी लागेल आणि म्हणूनच अल्लाहच्या इच्छेनुसार आम्हाला सद्वर्तनाचं जीवन व्यतीत करावं लागेल.

५. अल्लाहची इच्छा काय याची माहिती ईश्वराच्या प्रेषिताद्वारेच होणार आहे. म्हणूनच ईश्वरावरील श्रद्धेसाठी त्याच्या ग्रंथावर आणि ईश्वराच्या प्रेषितांवर श्रद्धा ठेवणे आवश्यक आहे.

६. जगातल्या प्रत्येक राष्ट्र, जनसमूहाकडं प्रेषित पाठवले गेलेत, मुहम्मद शेवटचे प्रेषित आहेत. या प्रक्रियेची सांगता त्यांच्याबरोबर झालीय.

७. ईश्वराचं अस्तित्व मानवी आकलनापलीकडचं, तो प्रेषितांना आपला संदेश त्यानं या कामासाठी नियुक्त केलेल्या दूतांद्वारे पाठवत असतो.

# धार्मिक विधी आणि इस्लामसमर्पित जीवन

अल्लाहनं मानवजातीस त्याच्या उपासनेसाठी निर्माण केलंय.

कुरआनात म्हणतो,

''मी जिन्न आणि मानवांना माझ्या भक्तीसाठीच निर्माण केलंय.'' (कुरआन, ५१:५६)

## इबादह

सेवा किंवा उपासनेसाठी इस्लामी शब्द 'इबादह' आहे. या शब्दाची व्युत्पत्ती 'अब्द' (सेवक) पासून झालीय. दुसऱ्या शब्दांत- सेवक उपासना करतो आणि स्वामीला त्याच्याकडून जे हवंय ती सेवा आहे.

## उपासना हा धर्माचा स्तंभ आहे.

प्रेषित मुहम्मद यांनी उघडपणे सांगितले आहे की,

''उपासना हा धर्माचा स्तंभ आहे.'' त्यांनी घोषणा केली, ''ईश्वरास समर्पित होणं इस्लाम आहे. माणसानं प्रार्थना करावी, दरवर्षी उपवास करावा, हज्जयात्रा करावी आणि जकात अदा करावी.''

प्रार्थना म्हणजेच 'सलाह' किंवा 'नमाज' दिवसातून पाच वेळा ठराविक समयी अदा करावी. शुक्रवारच्या नमाजसाठी हजेरी लावावी.

''निश्चितच मीच अल्लाह आहे, माझ्याव्यतिरिक्त कुणी ईश्वर नाही. तेव्हा माझी आराधना करा आणि माझ्या आठवणीसाठी नमाज कायम करा.''(कुरआन, २०:१४)

# मस्जिद

नमाज म्हणजेच इस्लामी उपासनापद्धत. नमाज धर्तीवरील तमाम मस्जिदींमध्ये दररोज पाच वेळा आयोजित केली जाते. एका मुस्लिमानं पाच वेळा प्रार्थना करावयाची आहे आणि शक्यतो मस्जिदीमध्ये परस्परांतील सामाजिक बंधनं वाढावित आणि एका अशा समाजाची उभारणी व्हावी ज्यात माणसं एकमेकांशी परिचित असावेत, त्यांच्या सुख-दु:ख आणि अडीअडचणींत सहभागी व्हावेत हे यामागचं उद्दिष्ट होय.

१. इस्लामच्या अनुयायांसाठी मस्जिद उपासनेचं ठिकाण आहे, जिथं ते नतमस्तक होतात.

२. अनेक मस्जिदींचे घुमट, मनोरे असतात आणि प्रार्थनेसाठी सभागृह असते.

३. मस्जिदी नमाज अदा करताना समोर मूर्ती, चित्रे, अवशेष, भिंतीवर टांगलेल्या नक्षीदार पट्टा, भिंतीवर कोणती कलाकृती आणि धर्मग्रंथ ठेवला जात नाही.

४. मस्जिदीत येताना प्रवेश फी किंवा नैवेद्य, नारळ मिठाई, अगरबत्ती इत्यादींची आवश्यकता नाही.

५. मस्जिदीमध्ये मुस्लिम एकत्रितपणे नमाज अदा करतात, तसेच माहिती, शिक्षण आणि भांडण-तंटे मिटवण्यासाठीचं हे केंद्रस्थान आहे.

६. सर्व मुस्मिल एकाच रांगेत उभं राहतात. मस्जिदीमध्ये कोणत्याही इसमाला प्रतिष्ठा दिली जात नाही अथवा

कुणाच्या समाजातील स्थान, राजकीय महत्त्व आणि श्रीमंती या आधारावर प्रथम रांगेत आरक्षण दिलं जात नाही.

७. वेळेचे काटेकोरपणे पालन केले जाते. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीच्या सवडीनुसार ठराविक वेळेत बदल केला जात नाही.

८. इमाम नमाजचं नेतृत्व करतो. मस्जिदीत पुजारी अथवा पुरोहित नसतो. कोणताही शिक्षित व्यक्ती किंवा असा व्यक्ती जो समाजामध्ये चांगल्या रीतीनं परिचित असेल तो नमाजचं नेतृत्व करू शकतो.

९. परधार्मियांनादेखील मस्जिदीत येण्याची अनुमती असते.

१०. मस्जिदीत पशुबळी देणं हा प्रार्थनेचा भाग नाही.

११. मद्य सेवन करून मस्जिदीत येण्यास प्रतिबंध आहे. कच्चा लसून आणि कांदा खाल्ल्यावर तोंड धुतल्यानंतर मस्जिदीत प्रवेश करावा.

# संपूर्ण धरती मस्जिद आहे

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले, ''ही संपूर्ण धरती एक मस्जिद आहे.'' प्रेषितांच्या या सुवचनाचा अर्थ असा की प्रेषितांना (अल्लाहकडून) अनुमती दिली गेलीय धरतीवर कुठंही प्रार्थना (नमाज अदा) करण्याची. अशा प्रकारे धरतीचा कुठलाही भाग अस्वच्छ नाही. आणि म्हणूनच प्रेषितांचं आज्ञापालन करताना त्यांना ही परवागी आहे (इस्लामी कायद्याप्रमाणं) की त्यांनी कुठंही प्रार्थना करावी. म्हणूनच मुस्लिम लोक पार्कमध्ये, सडकेच्या कडेला, रेल्वे स्थानकावर आणि विमानतळावर नमाज अदा करताना आढळतात. मुस्लिमांसाठी ही संबंध धरती मस्जिदच आहे. ठराविक वेळी ते ईश्वराचं स्मरण करतात, मग ते कुठं कोणत्याही ठिकाणी असोत.

या साध्या स्पष्टीकरणाशिवाय प्रेषित मुहम्मद यांच्या सुवचनांचा दुसरा महत्त्वाचा अर्थदेखील आहे. मुस्लिमाला याचं भान असते की मस्जिदीत शांतता नांदत असते. लोक यामध्ये पवित्र अवस्थेतच प्रवेश करतात. त्यांचं शरीर, त्यांची वस्त्रे स्वच्छ असतात. त्यांची मनं आणि त्यांचे विचार पवित्र असतात. मस्जिदीत ते ईश्वराचे विनम्र सेवक या वास्तवाचं भान ठेवून असतात. ते मस्जिदीत प्रवेश करताना पूर्वीपासून तिथं असलेल्यांना उद्देशून ''अस्सलामु अलैकुम'' (तुम्हांस अल्लाहची शांतता लाभो) असं अभिवादन करतात. आताच मस्जिदीत येणाऱ्यांकडून ही 'शांततेची' घोषणा आहे. मस्जिद शांतता आणि एकोप्याचं प्रसारण करते आणि तौहीद (एकेश्वर) आणि बंधुभाव हे दोन संदेश दिले जातात.

अशा प्रकारे जेव्हा प्रेषित मुहम्मद यांनी धरतीस मस्जिदीशी जोडलं, तेव्हा ते या धरतीला शांततेचं स्थान बनवण्यावर महत्त्व देत होते. प्रेषितांच्या दृष्टीनं धरतीवरील सर्व मानवांना सर्वत्र शांततेचा उपभोग घेता यावा. धरती जेव्हा प्रत्यक्षात मस्जिदीचं रूप धारण करील आणि तिथून एकोपा व बंधुभावाचा संदेश प्रसारित होईल तेव्हा आदर्श अशी शांतता नांदेल.

# *अजान*

## (नमाजसाठी बोलावणं)

लोकांना नमाजसाठी मस्जिदीकडं बोलावण्यासाठी अजान दिली जाते.

मायक्रोफोनवरून अजान देण्यासाठी केवळ २-३ मिनिटं लागतात.

जाकार्ता ते कासाब्लांकापर्यंत आकाशात झेप घेणाऱ्या मनोऱ्यांवरून, प्रेषितांनी ठरवून दिलेल्या शब्दांनुसारच अजान दिली जाते. तेव्हा चलनात असलेली पद्धत, घंटा वाजवणं, शंख फुंकून लोकांचं लक्ष वेधणं यापासून वेगळी पद्धत म्हणजे मस्जिदीतून अजान देण्याची पद्धत घालून दिली. अजानचा अर्थ लोकांना सांगणे उचित होईल.

| | | |
|---|---|---|
| १. | अल्लाहु अकबर | अल्लाह महान आहे (चार वेळा) |
| २. | अशहदुअनलाइलाह इल्लल्लाह | मी साक्ष देतो अल्लाहशिवाय कोणी ईश्वर नाही (दोन वेळा) |
| ३. | अशहदुअन्न मुहम्मदुर्रसूलुल्लाह | मी साक्ष देतो मुहम्मद अल्लाहचे पैगंबर आहेत (दोन वेळा) |
| ४. | हय्या अस्सलाह | प्रार्थनेकडं या (दोन वेळा) |
| ५. | हय्या अललफलाह | यशाकडं या (दोन वेळा) |
| ६. | अल्लाहु अकबर | अल्लाह महान आहे (दोन वेळा) |
| ७. | लाइलाह इल्लल्लाह | अल्लाहशिवाय कोणी ईश्वर नाही (एक वेळ) |

✯ पहाटेच्या नमाजसाठीच्या अजानमध्ये 'हय्या अललफलाह'नंतर एक ओळ अधिक म्हटली जाते.

| | |
|---|---|
| अस्सलातु खैरुम्मिनन्नोवन | निद्रेपेक्षा नमाज उत्तम आहे (दोन वेळा) |

जिथं कुठं मुस्लिम वस्त्या आहेत तिथून १५०० वर्षांपासून आपल्या श्रद्धेची, अल्लाहच्या महानतेची घोषणा करणारे हे विधान (मी साक्ष देतो अल्लाहशिवाय कोणी ईश्वर नाही आणि मुहम्मद त्याचे प्रेषित आहेत) लोकांना नमाजचं आमंत्रण या जगी आणि परलोकी यशप्राप्तीसाठी बोलावण्यासाठी सातत्यानं केलं जातंय, विविध स्वर, उच्चार, आवाज भिन्न असतील पण या लयबद्ध शब्दांनी अल्लाहच्या स्तुतीचं गाण केलं जातं लोकांना अध्यात्माकडं बोलाविण्याचं.

सकाळच्या वेळी लोकांना जागं करण्यासाठी तर दिवस संपताना लोकांच्या स्मरणात आणून देण्यासाठी ही हाक दिली जाते.

एकमेव ईश्वराकडं हे स्मरण आहे जो आपल्या सेवकांना आध्यात्मिक नवचैतन्याकडं बोलावितो. कामात गुंतून गेलेले असताना अल्लाहच्या स्मरणासाठी वेळ काढावी आणि त्याच्याशी एका प्रतिबद्धतेत पुनरुच्चार करून पावन अशा अवस्थेत परत आपल्या कामात गुंतावे.

# वजू

## (विधीपूर्वक तोंड, हात-पाय धुणे)

## स्वच्छता श्रद्धेचा निम्मा भाग आहे

नमाजचं पठण करण्यासाठी वजू करणे अनिवार्य आहे. कुरआनात अल्लाह फर्मावतो :

> ''श्रद्धावंत लोकहो, नमाजसाठी उभारण्याकरिता आपली तोंडवळा आणि हात कोपरापर्यंत धूत जा, डोक्यावरून (पाण्याचा) हात फिरवा, आपला पाय घोट्यापर्यंत धुवा.''
> (कुरआन, ५:६)

स्वच्छता श्रद्धेचा अर्धा भाग आहे हे प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचं फर्मान आहे. म्हणून प्रार्थना (नमाज अदा) करण्याचं निश्चित केल्यावर प्रथम शरीर स्वच्छ करावं. रोजच्या नमाजसाठी साध्या-सोप्या पद्धतीनं स्वच्छतेच्या विधी करावयाच्या आहेत. सर्वप्रथम ईश्वराच्या नावानं (बिस्मिल्लाह) सुरूवात करावी. अल्लाहची स्तुती करावी, ज्यानं स्वच्छ पाणी उपलब्ध करून दिलं. नंतर मनगटापर्यंत हात धुवावेत, तोंडात पाणी घेऊन स्वच्छ करावं, नाकात पाणी घालावं, कपाळापासून हनुवटीपर्यंत आणि दोन्ही कानांपर्यंत तोंड धुवा आणि म्हणा, ''कयामतच्या दिवशी माझा चेहरा तेजस्वी कर, काळवंडू नकोस.'' पहिला उजवा नंतर डावा हात कोपरापर्यंत धुवावा. ओल्या बोटांनी डोक्यावर हात फिरवा. कानात आणि मानेवरूनही ओले हात फिरवा आणि म्हणा, ''मला योग्य ज्ञान दे.'' मग उजवा व नंतर डावा पाय धुवा. प्रत्येक कृती तीन तीन वेळा करावी (जर पाण्याची टंचाई असेल तर एक

वेळ पुरे) आणि म्हणा, ''नरक ओलांडताना माझे पाय भक्कम ठेव, त्यांना अडखडू देऊ नकोस, ज्या दिवशी तुझ्या भक्तांचे पाय भक्कम असतील आणि तुझ्या शत्रूंचे पाय अडखळतील.''

निश्चय करा (नियत)

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम

असीम दयाळू आणि कृपावंत अल्लाहच्या नावानं

आता दोन्ही हात मनगटापर्यंत धुवा. बोटांदरम्यान पाणी पोचलं याची खात्री करून घ्या.




तीन वेळा तोंडात पाणी घेऊन चूळ भरा.




तीन वेळा नाकात पाणी घाला आणि स्वच्छ धुवा.




उजव्या आणि डाव्या कानादरम्यान कपाळापासून गळ्यापर्यंत तोंड धुवा.




उजवा आणि डावा हात कोपरापर्यंत तीन-तीन वेळा धुवा.




कपाळाच्या वरच्या बाजूनं मानेच्या खालच्या बाजूपर्यंत डोक्यावरून ओले हात फिरवा.



दोन्ही कानांचा आतील भाग ओल्या बोटांनी स्वच्छ करा आणि कानाच्या मागील भागावरून ओली बोटे फिरवा.




मानेच्या मागील भागावरून ओले हात फिरवा.







दोन्ही पाय घोट्यापर्यंत धुवा. उजवा पायानं सुरूवात करा. दोन्ही पायांच्या बोटांदरम्यान पाणी पोचलं याची खात्री करून घ्या.




या सर्व विधीनंतर याचं पठण करा.

''अशहदु अल्लाइलाह इल्लल्लाह वहदहु लाशरीकलहू व अशहदु अन्ना मुहम्मदन अब्दहु व रसूलहु''

अर्थात- ''मी साक्ष देतो, अल्लाहशिवाय कोणी ईश्वर नाही. तो एकमेव असून कुणी त्याचा भागीदार नाही. मी साक्ष देतो मुहम्मद त्याचे सेवक आणि रसूल (पैगंबर) आहेत.

# सलाह

## प्रार्थना (नमाज)

अल्लाहनं मानवजातीला त्याची उपासना करण्यासाठी निर्माण केलंय.

> ''मी जिन्न आणि मानवांना माझ्या भक्तीसाठीच निर्माण केलं.'' (कुरआन, ५१:५६)

> ''निश्‍चितच मीच अल्लाह आहे, माझ्याव्यतिरिक्त कुणी ईश्‍वर नाही. तेव्हा माझी आराधना करा आणि माझ्या आठवणीसाठी नमाज कायम करा.''(कुरआन, २०:१४)

मानवजातीसाठी ईश्वराकडून शेवटचा संदेश असलेला इस्लामचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे प्रार्थना (नमाज). ठराविक वेळी हे करणे सक्तीचे आहे. या प्रार्थना अनिवार्य कर्तव्य असून निर्माणकर्ता आणि भक्तादरम्यान ते रास्त संबंध जोडतात.

भक्तीच्या या विधी केवळ कृतीत आणणे याकडं इस्लाम बोलवत नाही. आपला आत्मादेखील शुद्ध करावा, ही त्याची मागणी आहे.

प्रार्थनेविषयी अल्लाहचं म्हणणं आहे,

> ''निश्चितच नमाज (प्रार्थना) अश्‍लील व वाईट गोष्टींस रोखते.'' (कुरआन, २९:४५)

प्रत्येक मुस्लिम पुरुष आणि स्त्रीनं दिवसातून पाच वेळा ठराविक समयी नमाज अदा करावी, कोणतंही वैध कारण वगळता.

नमाजच्या वेळा आकाशावर सूर्याच्या स्थितीनुसार निश्चित केलेल्या आहेत.

१. फज्र : पहाटेच्या वेळी फज्रची नमाज सूर्योदयापूर्वी अदा करायची असते.

२. जुहर : दुसरी नमाज. जेव्हा सूर्य ढळायला सुरूवात करतो, त्यावेळी.

३. अस्र : तिसरी नमाज. जेव्हा वस्तूंची सावली त्यांच्या मूळ आकाराहून दुप्पट होतात तेव्हा.

४. मगरिब : सूर्यास्त झाल्यावर लगेच मगरिबची नमाज अदा करावी.

५. इशा : पाचवी आणि दिवसातल्या शेवटच्या नमाजची वेळ सूर्यास्त झाल्यावर ९० मिनिटांनी सुरू होते. म्हणजे काळोख पसरल्यावर.

वर उल्लेखित नमाजमध्ये शरीरस्थिती, स्वरूप आणि त्यामध्ये पठण करावयाचा मजकूर सारखाच असतो. पण या प्रक्रियेच्या लांबीनुसार (रकअत) कमी जास्त असतो. जेव्हा एक मुस्लिम नमाज अदा करत असतो तो आपल्या विधात्याशी खासगीत आपुलकीनं बोलत असतो. त्या वेळी तो आपल्या विधात्याशी काय बोलत आहे याचं त्यास भान असायला हवं.

इस्लामच्या नमाजच्या पद्धतीचं जेव्हा आपण विश्लेषण करतो आणि त्या विशिष्ट प्रक्रियेचा अभ्यास करतो, तेव्हा आपणास हे कळून येईल की ही प्रक्रिया फक्त शारीरिक हालचाल किंवा निरर्थक कुरआनचं पठण नव्हे, तर नैतिकतेची उच्च पातळी आणि शारीरिक कृती यांचा समावेश असलेली अनन्यसाधारण आणि बौद्धिक एकाग्रतेची प्रक्रिया आहे. हा इस्लामचा विशिष्ट अनुभव आहे, ज्यामध्ये शरीर, आत्मा आणि विवेक एकत्र येऊन ईश्वराची उपासना आणि त्याचा गौरव करतात.

साधारणत: ही प्रत्येक मुस्लिमाला इस्लामनं घालून दिलेली शिस्तबद्धता आहे. त्यांना उपासना करण्यास प्रवृत्त करून इस्लाम त्यांना शिस्तबद्ध करून त्यांना ईश्वराच्या उपस्थितीबाबत सदैव जागृत ठेवतो. नमाज वेळेचे व्यवस्थापन करते आणि मुस्लिमांच्या निरोगी जीवनाचे नियोजन करते. विधीपूर्वक तोंड, हात, पाय धुणे; स्वच्छ आणि ताज्या पाण्यानं माणसाला

ताजेपणा लाभतो आणि विविध शारीरिक हालचालीत उभं राहणं, झुकणं, बसणं, नतमस्तक होणं यामुळं शरीराचा व्यायाम होतो. नमाजद्वारे आत्मिक समाधान आणि भावनिक परिपूर्णता लाभते. दैनंदिन व्यवहारांपासून मुक्त होून ईश्वराचं अस्तित्व आणि त्याची मर्जी साधण्यासाठी एकाग्र होणं म्हणजे त्या उच्चतम आणि एकमेव अस्तित्वाशी स्वत:ची जवळीक साधणं होय. आ कृतीद्वारे उपासना करणारा जीवन आणि त्याच्या समस्यांना सामोरं जाण्यास तयार होतो. नमाजच्या विधी, पठणाद्वारे सुचणाऱ्या कल्पना माणसाच्या स्वत्वाला बळकटी देतात. भली कामं करणं आणि दुष्ट कामांपासून दूर जाणं या जगाला नैतिक मूल्य प्रदान करण्यासाठी माणसाला निश्चयशक्ती प्रदान करतात. शेवटी जेव्हा मुस्लिम रांगेत उभं राहून एकत्र येतात, यामुळं मुस्लिमांना समता वैश्विक बंधुभाव आणि इतरांची काळजी घेम्यास प्रेरणा मिळते.

# नमाजची (प्रार्थनेची) कृती

आता तुम्ही नमाज अदा करण्यास तयार असलं पाहिजे. तुम्ही वजू केलेला आहे. तुमचं शरीर, तुमचं वस्त्र आणि ज्या जागी नमाज अदा करायची आहे ती स्वच्छ आहे ही खात्री करून घ्या. खालीलप्रमाणे नमाज अदा करा.


अ. काबागृहाच्या दिशेनं तोंड करून स्वच्छ जागेवर ताठ उभं राहा. याला 'कियाम' म्हणतात. भारतातून किबला पश्चिमेस आहे. दुसऱ्या देशांमधून 'किबला'ची दिशा वेगळी असेल. नमाजला उभं राहण्याआधी किबलाच्या दिशेची माहिती करून घ्या.

ब. आता निश्चिय (नियत) करा. शब्दांचा उच्चार करून किंवा मनातल्या मनात. नियतचे शब्द असे–

''मी आपलं तोंड अल्लाहच्या दिशेनं केलं, ज्यानं ही सृष्टी आणि आकाश बनवलं, (त्याच्याशी) मी एकनिष्ठ आहे. जे ईश्वराबरोबर भागीदार जोडतात त्यांच्यापैकी मी नाही. माझी उपासना, माझं जगणं, माझा मृत्यू ईश्वरासाठीच आहे; ह्या सृष्टीचा विधाता, ज्याचा कुणीही भागीदार नाही. मला आदेश आहे (श्रद्धा पाळण्याचा) मी समर्पित होतो.''


१. आपले दोन्ही हात कानापर्यंत उचला (महिला आणि मुलींनी खांद्यापर्यंत) आणि म्हणा,

अल्लाहु अकबर




अल्लाह महान आहे

२. आपला उजवा हात डाव्या हातावर ठेवा आणि बेंबीच्या थोडं खाली टेकवा किंवा छातीवर (महिला आणि मुलींनी छातीवर हात टेकवायचे) आणि 'सना'चं पठण करा-



''अउजुबिल्लाही मिनशैतानिर्रजीम''

धिक्कारलेल्या सैतानापासून मी अल्लाहची शरण मागतो.

''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम''

असीम दयावंत आणि परम कृपावंत अल्लाहच्या नावानं.

- आता अल-फातिहा या अध्यायाच्या (सूरहच्या) उर्वरित भागाचं पठण करा.

  ''सर्व स्तुती अखिल विश्वाचा स्वामी अल्लाहसाठीच. नितांत कृपावंत व नितांत दयावंत निर्णयाच्या दिनाचा स्वामी आम्ही तुझीच भक्ती करतो नि तुझीच मदत मागतो. आम्हाला सरळमार्ग दाखव. ज्यांच्यावर तू कृपा केलीस अशांचा, जे कोपग्रस्त झाले नाहीत की मार्गभ्रष्ट झाले नाहीत.''

अल-फातिहा या अध्यायाचं प्रत्येक नमाजमध्ये पठण करणं अनिवार्य आहे.


- आता कुरआनातील काही आयतींचं पठण करा. उदा.


  बिस्मिल्लाहहिर्रहमानिर्रहीम

  ''असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं. म्हणा, तो अल्लाह एकमेव आहे. अल्लाह, स्वयंपूर्ण आहे त्यानं कुणाला जन्मलं नाही की कुणी त्याला जन्म दिलेला नाही. त्याच्या तोडीचा कुणी नाही.''

३. ''अल्लाहु अकबर''चा उच्चार करत झुका. आपले दोन्ही हात गुडघ्यांवर ठेवा आणि तीन वेळा म्हणा–
''सुब्हान रब्बियल अजीम''
माझ्या महान विधात्याचा गौरव असो.

या अवस्थेला 'रुकु' असं म्हणतात.






४. 'रुकु'मधून सरळ उभं राहताना हे म्हणा,

''समीउल्लाह हुलिमन हमिदा'' जे अल्लाहचे गुणगान करतात, अल्लाह त्यांचं ऐकत असतो.

त्यानंतर- ''रब्बना लकद हम्द'' म्हणा.
आमच्या विधाता, तुझं स्तवन असो.

तुम्ही 'कियाम'च्या अवस्थेत परत येता.


५. आता ''अल्लाहु अकबर'' म्हणत नतमस्तक व्हा. तुमचं कपाळ, नाक, दोन्ही तळहात, गुडघे आणि तुमच्या पायाची बोटं जमिनीला टेकली पाहिजेत.



तीन वेळा याचं पठण करा- ''सुब्हान रब्बियल आला''
माझ्या विधात्याचा गौरव असो, तो उदात्त आहे.

या स्थितीला 'सुजूद' म्हणतात. तुमचे हात जमिनीला स्पर्श करायचे नाहीत.

६ व ७. आता ''अल्लाहु अकबर''चा उच्चार करीत सरळ उठून बसा. गुडघे दुमडून त्यांच्यावर तळहात ठेवा. एक-दोन सेकंदांनी ''अल्लाहु अकबर''चा उच्चार करीत परत नतमस्तक व्हा. मग ''सुब्हान रब्बियल आला''चं पठण करा आणि ''अल्लाहु अकबर''चा उच्चार करीत उठून बसा.





ही एक रकात पूर्ण झाली. दुसरी रकात अशाच तऱ्हेनं पण यामध्ये मात्र ''सुब्हानक...'' आणि 'तअव्वुज' (अउजु बिल्लाही...) किंवा 'तस्मिया' (बिस्मिल्लाह...) म्हणायचं नाही. दुसऱ्यांदा नतमस्तक झाल्यावर उठून सरळ बसावं आणि हळूहळू ''तशहुद - सर्व स्तुती, पावित्र्य, प्रार्थना अल्लाहसाठीच. हे प्रेषित तुम्हांस शांतता लाभो, अल्लाहची कृपा आणि त्याचा कृपाप्रसाद.''

''आम्हांसही शांतता लाभो आणि अल्लाहच्या सद्वर्तनी सेवकांना मी साक्ष देतो. अल्लाहशिवाय कोणी ईश्वर नाही आणि साक्ष देतो मुहम्मद त्याचे सेवक आणि पैगंबर आहेत.''

आता दरुदचं पठण करा-

''हे अल्लाह प्रेषितांना तुझा कृपाप्रसाद लाभो व त्यांच्या कुटुंबावर जसे तू इब्राहीम आणि त्यांच्या कुटुंबियांना धन्य केलं, मुहम्मद यांच्यावर तुझा कृपाप्रसाद व्हावा आणि त्यांच्या कुटुंबियांवर जसे इब्राहीम आणि इब्राहीमच्या कुटुंबियांना तुझा कृपाप्रसाद लाभला. खरेतर तूच स्तवन आणि गौरवास पात्र आहे.

यानंतर खालीलपैकी कोणत्याही प्रार्थनेचं पठण करा,


''हे अल्लाह मी स्वत:शी अन्यायी आहे, तुझ्याशिवाय कुणी अपराधांना क्षमा करणार नाही. मला क्षमा कर. आपल्या क्षमाशीलतेनं माझ्यावर दया कर. तूच तर दयापूर्ण आणि क्षमा करणारा आहे.''

''माझ्या विधात्या
मला नमाजसाठी स्थैर्य दे
माझ्या संततीलासुद्धा : आमच्या विधात्या
माझ्या प्रार्थना स्वीकार कर
आमच्या विधात्या
मला आणि माझ्या मातापित्यांना क्षमा कर
आणि सर्व श्रद्धावंतांना निवाड्याच्या दिवशी.''
(कुरआन, १४:४०-४१)

८. आता आपलं तोंड उजव्या बाजुला वळवा आणि म्हणा–


''अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाह''

तुम्हाला अल्लाहची कृपा आणि शांतता लाभो.



९. आणि मग डावीकडं तशाच प्रकारे

''अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाह''
तुम्हाला अल्लाहची कृपा आणि शांतता लाभो.




अशा प्रकारे रकात पूर्ण झाल्या.

१०. नमाजनंतरच्या काही प्रार्थना (दुआ) नमाजनंतर अल्लाहची क्षमायाचना आणि त्याच्या कृपेसाठी प्रार्थना करणे उत्तम असते. तुम्ही आपल्या मातृभाषेत दुआ मागू शकता. पण अरबी भाषेतल्या काही प्रार्थना तोंडपाठ केल्या तर बरे.



## नमाजनंतरच्या काही प्रार्थना (दुआ)–

''आमच्या विधात्या, आम्हाला या जगात आणि परलोकातही चांगलं दे, तसेच नरकाच्या शिक्षेपासून आम्हाला वाचव.'' (कुरआन, २:२०१)

''हे आमच्या पालनकर्त्या, आम्हीच स्वत:वर अत्याचार ओढवून घेतला. तू आम्हाला क्षमा केली नाहीस आणि दया दाखवली नाहीस तर नक्कीच आमचा नाश होईल.'' (कुरआन, ७:२३)

''हे अल्लाह! तूच शांतीचा स्रोत आहेस. तुझ्याकडूनच शांतता मिळेल. तू उदात्त आहे. हे अल्लाह, तूच स्वामी आणि तूच आदरणीय आहे.'' (हदीस)

''अल्लाहशिवाय कोणी ईश्वर नाही. तो एकमेव असून त्याचा कोणी भागीदार नाही. मालकी त्याचीच आहे. सर्व स्तुती त्याच्यासाठीच आहे. तो सर्व वस्तूंवर सामर्थ्य बाळगतो. हे अल्लाह, तू देत असल्यास कुणी तुला रोखू शकत नाही, किंवा तुझ्या मर्जीत नसेल तर कुणी काही देऊ शकत नाही. तुझ्याविरूद्ध कुणीही आमच्या साधनांना काहीही करू शकत नाही.'' (हदीस)

# नमाजची वैशिष्ट्ये

माणसास इस्लामी प्रार्थने (नमाज)पासून जे फायदे होतात ते मोजता येत नाहीत, कारण ते कल्पनेबाहेरचं आहेत. हा केवळ एखादा विचार किंवा पारंपरिक समज नसून एक मोहक तथ्य आणि आध्यात्मिक अनुभव आहे.

माणसाच्या जीवनामध्ये प्रार्थनेची वैशिष्ट्ये आणि शक्ती खालीलप्रमाणे आहेत–

१. यामुळं स्त्री-पुरुषांना अल्लाहशी जवळीक साधता येते.

२. एक ईश्वर आणि इस्लाम आणि शेवटच्या संदेशाचा हा प्रत्यक्ष पुरावा आहे.

३. ती माणसांना असभ्य वर्तणूक, लाजिरवाण्या गोष्टी, अवैध कृत्यांपासून दूर करते.

४. दुष्ट इच्छा आणि भावनांवर नियंत्रण ठेवायचं हे प्रशिक्षण आहे.

५. यामुळं हृदयास पावित्रता मिळते, बुद्धिमत्तेचा विकास होतो आणि आत्म्यास शांती प्राप्त होते.

६. अल्लाह आणि त्याच्या महानतेची ही सतत आठवण आहे.

७. शिस्तबद्धता आणि इच्छाशक्तीचा विकास होतो.

८. सर्वोत्तम सचोटीच्या मार्गप्राप्तीचं हे मार्गदर्शन आहे.

९. वास्तविक समता, एकता आणि वैश्विक बंधुभावाचा हा पुरावा आहे.

१०. संयम, साहस, आशा आणि आत्मविश्वासाचं हा स्त्रोत आहे.

११. स्वच्छता, पवित्रता आणि वेळेचं व्यास्थापन करण्याचा उपाय आहे.

१२. यामुळं कृतज्ञता, नम्रता आणि शुद्धता वृद्धिंगत होते.

१३. आपल्या निर्माणकर्त्याच्या आज्ञापालनाचं हे प्रात्यक्षिक आहे.

१४. आपलं आचरण आणि बोलणं सुसंगत असावं यासाठीची ही एक प्रक्रिया आहे.

१५. बौद्धिक एकाग्रता, आध्यात्मिक समर्पण, उच्च नैतिकता आणि शारीरिक व्यायामाचा हा एक अनन्यसाधारण मंत्र आहे.

१६. हा इस्लामचा विशिष्ट अनुभव आहे, ज्याद्वारे शरीराचा प्रत्येक भाग, आत्मा आणि मनाचं मिलन होऊन ईश्वराची भक्ती आणि त्याचा गौरव केला जातो.

प्रार्थनेला (नमाजला) प्रत्यक्षात अनुभवात आणणे याचा आध्यात्मिक आनंद मिळवण्यासाठी उत्तम पुरावा ठरेल.

# रमजान आणि रोजे (उपवास)

रमदान : रमजान; उर्दू भाषेत, इस्लामी वर्षानुसार हा नववा महिना आहे. जगभरातील मुस्लिम लोक यात महिनाभर उपवास (रोजे) करतात. ही वार्षिक उपासना इस्लामच्या पाच स्तंभांपैकी एक आहे. हा महिना चंद्रदर्शनानुसार २९ किंवा ३० दिवसांचा असतो, ज्याचं वर्णन असंख्य हदीस (प्रेषितांची वचनं) मध्ये आलंय. पूर्वकालीन जनसमूहांप्रमाणेच ईश्वरानं रोजे ठेवणं अनिवार्य केलंय. महान शक्तिशाली अल्लाहचे पवित्र कुरआनात असं उद्गार आहे,

> ''हे श्रद्धावंत लोकहो, जसे तुमच्या पूर्वीच्या लोकांवर उपवास (रोजा) करणं विहित केलं गेलं होतं तसेच तुमच्यावरही विहित केलं गेलंय तुम्ही सदाचारी व्हाल या अपेक्षेनं.'' (कुरआन, २:१८३)

शब्दाश: अर्थ लावायचा झाल्यास रोजा म्हणजे अन्न-पाणी, धूम्रपान, शारीरिक संबंध आणि सर्व प्रकारच्या हिंसक वृत्ती व वर्तन, ऐहिक इच्छा इत्यादींशी पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत रमजान महिनाभर पूर्णपणे अलिप्त राहणं.

इस्लामनुसार रोजाचा मोबदला अनंत आहे. या महिन्यात तर यात आणखी भर घातली जाते. रमजान महिन्यात उपवास पाळताना मुस्लिम नमाज आणि कुरआनचं पठणदेखील मोठ्या प्रमाणात करत असतात.

रोजा करणं हे आजारी आणि प्रवासी किंवा स्त्रियांना मासिक पाळी येत असेल तर अशांना वगळून सर्वांसाठी विहित केलंय.

पवित्र कुरआननुसार रोजा वैयक्तिक आणि सामूहिक दोन्ही प्रकारची

उपासना आहे. कुरआन रोजाच्या नैतिक आणि आध्यात्मिक बाजूस महत्त्व देतो आणि याचं उद्दिष्ट नैसर्गिक इच्छांवर नियंत्रण ठेवून स्वत:वर संयम राखणं असं स्पष्ट करतो. (कुरआन, २:१८३)

रोजा हे धार्मिक आदेश असल्याचं सिद्ध झाल्यावर मदीनेतील प्रेषितांच्या अनुयायांनी अशी समज करून घेतली की रमजान महिन्यात रात्रीच्या वेळीदेखील शारीरिक संबंध करणं निषिद्ध ठरवलंय. ही अधिकच सक्ती होती आणि कुरआनची आयत ''अल्लाह त्रास देऊ इच्छित नाही तर तुम्हांस सहजता देऊ इच्छितो'' याचा संदर्भ त्या मुस्लिम लोकांशी होता जे रमजानमध्ये महिनाभर शारीरिक संबंधांपासून दूर राहात होते. कुरआन भूक आणि तहान यांच्याशीच लैंगिक संबंधांची तुलना करतो. रोजा सोडल्यावर जशी अन्न-पाण्याची गरज ्सते त्याचप्रमाणे लैंगिक संबंधाचीही गरज ्सते. याची दुसरीही एक बाजू आहे. आध्यात्मिक आकासंक्षांची पूर्तता करण्यासाठी शारीरिक गरजांकडं दुर्लक्ष केलं जाऊ नये. अल्लाहशी जवळीक साधण्यासाठी शरीर आणि आत्मा एकरूप होणे आवश्यक आहे.

पती-पत्नीच्या नात्याची परस्परांशी तुलना करताना 'वस्त्र' या अलंकारिक शब्दाच्या उपयोगामागं हीच कल्पना आहे. (कुरआन, २:१८७) ज्याप्रकारे 'वस्त्रं' मानवाच्या शरीराचं रक्षण करतात, तशाच प्रकारे पती-पत्नी एकमेकांचं रक्षण करतात. वस्त्रांप्रमाणेच पती-पत्नी एकमेकांची काळजी घेत असतात, त्यांना सुख पोचवतात. वस्त्रं ज्याप्रकारे शरीराला सजवतात, शोभा वाढवतात, त्याचप्रकारे विवाहित स्त्री-पुरुष एकमेकांची शोभा वाढवतात. एकाच्या दुर्बलतेवर दुसऱ्याची शक्ती भरून काढते आणि एकमेकांना आधार देतात. यापेक्षा एका नात्यातलं सौंदर्य आणखी काय होऊ शकते!

रमजान महिन्यात रोजे करण्याच्या योजनेमागं कुरआन दुसरं एक उद्दिष्ट सादर करू इच्छिते. हाच तो महिना ज्यात कुरआनचं प्रथम अवतरण सुरू झालं होतं. कुरआनच्या सर्वप्रथम आयती- ''आपल्या विधात्याच्या नावानं वाचा...'' (कुरआन, ९६:१-५) याच अवतरणाची सुरूवात रमजान दिनांक २७ (इ.सन ६११) पासून झाली होती. अशाप्रकारे इस्लामनुसार रमजानचा ईश्वराशी घनिष्ठ संबंध आहे.

# रोजाचं महत्त्व

इस्लामनं जेव्हा ही असाधारण प्रथा रुजवली तेव्हा जणू सतत वृद्धिंगत होणाऱ्या सद्गुणांच्या एका वृक्षाचं रोपण केलं. इस्लामी रोजाच्या आध्यात्मिक अर्थबोधाचं स्पष्टीकरण खालीलप्रमाणे-

१. निर्माता आणि पालनकर्ता ईश्वरानं घालून दिलेलं कर्तव्य पार पाडण्यासाठी हे महिन्याभराचं एक आध्यात्मिक प्रशिक्षण आहे.

२. हे मानवास प्रेमाचं, आपुलकीचं गांभीर्य स्पष्ट करून देते. कारण जेव्हा तो रोजा (उपवास) पाळत असतो, तेव्हा तो ईश्वराच्या प्रेमाखातर हे उपवास पाळत असतो. आणि जो माणूस ईश्वराशी प्रेम बाळगतो, प्रेम काय असतं याची त्यास जाणीव होते.

३. हे मानवांवर दक्ष आणि निरोगी अशा विवेकाचे संस्कार घडवते. कारण रोजा पाळणारा गुप्तपणे तसेच जाहीररीत्या उपवास करत असतो. माणसाला कुणी अधिकारी नेमलेला नसतो. तो केवळ अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी आणि आपल्या विवेकाच्या समाधानासाठी रोजा ठेवत असतो. तो एकांतात आणि जाहीरपणे प्रामाणिक असतो. यापेक्षा दुसरा कोणताही परिणामकारक उपाय नाही.

४. रोजामुळं स्वत:वर आणि स्वार्थ, लोभ आणि आळस यावर नियंत्रण करण्यात मदत होते. रोजामुळं माणसाला भूक आणि तहानेच्या वेदनांचा अनुभव येतो. लक्षावधी गरीब

लोक जेव्हा उपाशी झोपत असतात तेव्हा त्यांची अवस्था कशी हेही त्याला कळून चुकते.

५. माणसाची सामान्य कमजोरी असलेल्या रागावर नियंत्रणात आणायला मदत होते.

६. जो माणूस व्यवस्थितपणे उपवास पाळतो तो आपल्या भावनांना, इच्छांना शिस्तबद्ध करतो आणि शारीरिक इच्छांच्या आहारी जात नाही. अशाच माणसाची इच्छाशक्ती, निश्चय आणि नैतिकता बळकट असते.

७. मनाला पवित्र आणि शरीरास हलकेपणा देण्यासाठी हे माणसाच्या आत्म्यास पारदर्शकता आणि उदात्तता प्रदान करते. तो जेव्हा आपल्या पोटात आणि पचनक्रियेत उसंत देतो, अशा सर्व इजांना प्रतिबंध करतो ज्यामुळं पचनक्रियेवर ताण पडतो. वैद्यकीय सूचना, जीवशास्त्राचे नियम आणि बौद्धिक अनुकंपा यास दुजोरा देतात.

८. मानवांमध्ये सामाजिक बांधिलकी, एकता, बंधुभाव, ईश्वर आणि कायद्यासमोर असलेली समता खऱ्या आध्यात्मिक अर्थानं जागृत होते. हे या तथ्याचं द्योतक आहे की मुस्लिम व्यक्ती जेव्हा रोजा ठेवते तेव्हा ती सबंध मुस्लिम समाजाशी जोडली जाते. एकाच वेळी सारखंच कर्तव्य, तशाच प्रकारचं आणि एकाच उद्दिष्टासाठी ही बांधिलकी असते.

# जकात

## उपेक्षितांचे हक्काधिकार

"जकात (दानधर्म) गोरगरीब आणि गरजवंतांसाठी आहे, हे अल्लाहनं अनिवार्य केलंय." (कुरआन, ९:६०)

जकात एकप्रकारची उपासना आहे. उपासनेसाठी अरबी भाषेत 'इबादा' या शब्दाचा उपयोग होत असतो. याचा अर्थ ईश्वराचं आज्ञापालन आहे. मुस्लिम लोक अल्लाहच्या प्रेमापोटी, त्याच्या प्रसन्नतेसाठी जकात देतात.

जकात देणं म्हणजे श्रीमंतांच्या धनसंपत्तीत वाटा, गरीब लोकांच्या कल्याणासाठी ठेवायचा असतो आणि ही त्यांच्या मिळकतीतून द्यावयाचा असतो. हे फक्त दानधर्म, खैरात किंवा एखादा कर शेतमालाचा दहावा हिस्सा नाही की हे केवळ दयाळुपणा व्यक्त करणं नव्हे. यात हे सर्व आणि आणखीन बरंच काही सामावलंय. एका माणसाच्या मिळकतीतून काही टक्केवारीची कपात करून एक विपुल संपन्नता आणि आध्यात्मिक गुंतवणूक आहे. हे कुणाला स्वखुशीनं दिलेली मदत नसून संपूर्ण समाजाच्या भल्यासाठी अल्लाहनं अनिवार्य केलेलं मुस्लिमांसाठीचं कर्तव्य आहे. हा श्रीमंतांच्या धनसंपत्तीमध्ये उपेक्षितांचा हक्काधिकार आहे.

इस्लामचा महत्त्वाचा सिद्धान्त असा की साऱ्या वस्तू अल्लाहच्याच मालकीच्या आहेत. मुस्लिमांनी आपली संपत्ती अल्लाहनं मान्य केलेल्या पद्धतीन खर्च करावी, हे त्याचं कर्तव्यपालन आहे. दैवी आदेशानुसार जकातची व्यवस्था म्हणजे अल्लाहच्या अधिराज्यात त्याचा हक्क आहे.

# जकातचे दूरगामी परिणाम

जकातचा शब्दिक आणि साधा अर्थ म्हणजे शुद्धीकरण आणि वाढ असा आहे. व्यावहारिक अर्थ - एका मुस्लिमानं दरवर्षी आपल्या संपत्तीतून रोख किंवा इतर साधनांद्वआरे योग्य लाभार्थींना वाटून द्यावं. समाजहितार्थ हे अल्लाहनं विहित केलेलं मुस्लिमांचं अनिवार्य कर्तव्य आहे. जकातचं धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व सखोल आणि चैतन्यपूर्ण आहे. म्हणजे याचं मूळ मानवतावादी तसेच सामाजिक व राजकीय आहे. जकातच्या दूरगामी परिणामांचं विश्लेषण खालीलप्रमाणे–

१. जकात लोभ, स्वार्थी वृत्ती, अभिलाषा आणि या जगाच्या मोहापासून मुस्लिमाला शुद्ध करते. अल्लाह म्हणतो : ''ज्यांनी स्वत:स लोभ आणि हव्यासापासून वाचवलं तेच यशस्वी होतील.'' (कुरआन, ५९:९)

२. जकात सधन माणसांच्या मालमत्तेला पवित्र करते आणि योग्य लाभार्थींना दिल्या जाणाऱ्या वाट्यामुळं त्यांच्या मालकीत आलेल्या भागास स्वच्छ करते. जेव्हा जकात द्यावी लागते तेव्हा संपत्तीतील निश्चित टक्केवारी योग्य रीतीनं लगेच वाटून द्यावी. कारण माणसाला त्या हिश्शावर नैतिक आणि कायद्यानुसार अधिकार नाही. जर तो असा करीत नसेल तर जी त्याच्या मालकीची नाही त्यावर त्यानं कब्जा केलाय, हे उघड आहे. कोणत्याही दृष्टिकोनातून हा सरळसरळ भ्रष्टाचार आहे, नैतिक, कायद्याच्या दृष्टीनं, आध्यात्मिक, वित्तीय; सर्व दृष्टिकोनातून. याचा अर्थ असा की नियमाविरूद्ध रोखून धरलेली टक्केवारी सबंध

मालमत्तेला दूषित आणि धोकादायक बनवते. दुसरीकडं जर गरिबांचा वाटा वेगळा करून त्यास गरजूंना वाटून दिले तर शिल्लक राहिलेली संपत्ती पवित्र आणि प्रामाणिक होते. शुद्ध भांडवल आणि प्रामाणिक मालकी कायमस्वरूपी भरभराटीची गुरुकिल्ली आहे.

३. जकात देण्यानं देणाऱ्याच्या मालमत्तेचं शुद्धीकरणच होत नाही तर ते लोभ आणि स्वार्थापासून त्याच्या मनासदेखील पवित्र करते. बदल्यात ज्यांना जकात दिली जाते त्यांच्या मनांना द्वेष, मत्सर आणि अस्वस्थतेपासून मुक्त करते. जकात देणाऱ्यासाठी लोकांच्या मनात प्रेमळपणा उत्पन्न करते. परिणामस्वरूप सबंध समाज स्वत:ला वर्गसंघर्ष, शंकाकुशंका, अविश्वास आणि दुष्ट भावना, भ्रष्टाचार वगैरे अवगुणांपासून अल्पित ठेवतो आणि विघ्नापासून सुरक्षितता होते.

४. स्वार्थ, लोभ आणि सामाजिक कलहापासून स्वत:चं रक्षण करण्यासाठी जकात उत्तम उपाय आहे. सामाजिक जबाबदारी आणि बांधिलकी जोपासण्यासाठी जकात एक प्रभावी व्यवस्था आहे. जकात देणारे आणि घेणारे दोन्हींमध्ये आपुलकी आणि समाजामध्ये आध्यात्मिक व आत्मिक मानवतावाद उत्पन्न करण्याचं जकात एक तेजस्वी माध्यम आहे. इस्लाम खासगी व्यवसाय आणि मालकीचा विरोध करत नाही, अडसर होत नाही याचाही स्पष्ट पुरावा देते. त्याच वेळी स्वार्थी आणि लोभी भांडवलशाहीला देखील इस्लाम सहन करत नाही. व्यक्ती आणि समाज नागरिक आणि राष्ट्र भांडवलवाद आणि समाजवाद, भौतिकवाद आणि अध्यात्म यामध्ये प्रभावी आणि सकारात्मक भूमिका बजावते. इस्लामी तत्त्वज्ञानाचीही उत्तम अभिव्यक्ती आहे.

६. इस्लाम एक परिपूर्ण जीवनव्यवस्था असून त्यामध्ये जीवनाच्या इतर क्षेत्रांबरोबरच इस्लामी अर्थकारणाचा देखील समावेश आहे. इस्लामचे स्वत:चे आर्थिक सिद्धान्त आहेत. जकात इस्लामच्या मूलभूत आर्थिक सिद्धान्तांपैकी एक आहे आणि हे समाजकल्याण आणि संपत्तीच्या योग्य वाटपावर आधारित आहे. जकातच्या अनिवार्य देणगीबरोबरच गरीब आणि गरजवंतांच्या मदतीसाठी स्वत:हून पुढं येण्याचंही प्रोत्साहन मुस्लिमांना दिलं जातं. ऐच्छिक मदतीला दान (सदकात) म्हटलं जातं.

७. जकातच्या माध्यमानं श्रीमंत लोक आपल्या संपत्तीत गरिबांना वाटा देतात आणि यामुळं धनसंपत्ती एकवटली जात नाही. जकात कोणत्या बाबीवर खर्च करावी याचा तपशील कुरआनात दिलाय. (पाहा : कुरआन, ९:६०)

# हज्ज

## यात्रा

> ''आपल्या विधात्याशी जवळीक साधण्यासाठी मक्केची यात्रा करा.'' (कुरआन, २:१९६)

हज्ज इस्लामचा पाचवा स्तंभ आहे. जे लोक या प्रवासाचं सामर्थ्य बाळगतात त्यांनी आयुष्यातून एकदा मक्का येथील अल्लाहचं घर - काबागृहास भेट द्यावी. इस्लामी वर्षाच्या १२व्या महिन्यात : जुलहज्ज दि. ८-१३ या कालावधीत हज्ज केला जातो. (पाहा : कुरआन, ३:९७, २२:२७, २:१९७)

काबागृहास 'बैतुल्लाह' (अल्लाहचं घर) या नावानंही ओळखलं जातं. ही चौरस आकाराची एकमजली इमारत आहे. अल्लाहच्या उपासनेसाठी बांधलेलं हे सर्वप्रथम घर आहे. (कुरआन, ३:९६) काबा काळ्या रंगाचं आवरण घातलेली, मक्का येथील आदरणीय मस्जिदीच्या मध्यभागी असलेली चौकोनी इमारत आहे.

हज्ज मानवजातीचं महाकाय संमेलन आहे. जगातल्या कानाकोपऱ्यातून, विविध राष्ट्रांचे, जाती-वंशाचे, विविध भाषा-सभ्यतेचे लक्षावधी लोक, सुमारे ३० लाख माणसं दरवर्षी या महाकाय संमेलनात एकत्र येतात. हज्जद्वारे इस्लामी शिकवणींचा सार आणि त्याचा जागतिक दृष्टिकोनाचा अनुभव घेता येतो.

व्यक्ती आणि समुदायांमध्ये इस्लाम कशी एकता घडवून आणतो, हज्जमध्ये भाग घेणाऱ्यांना त्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो. तो सामाजिक एकता

आणि समतेवर भर देऊन विलक्षण भावनांना उत्पन्न करतो. हज्जमधील एकतेचा आधार जात-वंश, संभ्यता-संस्कृती, रंग आणि वर्ग या सर्व भेदांच्या निर्मूलनावर आहे. सर्व यात्री एकसमान पोषाख परिधान करतात. राजा आणि धनसंपन्न एका गरीब व्यक्तीशी खांद्याला खांदा लावून चालत असतात. पण कुणासही त्यांच्यामध्ये भेद कळत नाही. अल्लाहच्या नजरेत हे भेदाभेद कवडीमोल आहेत. तेव्हा आपण आपल्या दैनंदिन जीवनात त्यांच्या आहारी जाऊ नये. अशाप्रकारचं संतुलन कायम करण्यासाठी आम्हाला झटावं लागेल. इस्लाम आम्हाला जो मार्ग दाखवतो, त्याच्याविरूद्ध माणसांनी ज्या रुढी-परंपरा घडवलेल्या आहेत त्यांचं महत्व काहीच नाही. हज्ज याचा पुरावा देतो. याचबरोबर ही गोष्टदेखील तेवढीच महत्त्वाची आहे की एकता आणि समता नांदत असलेल्या समाजजीवनात वैयक्तिक अस्मितेला नाकारलं जात नाही. हज्ज-यात्रेकरू वारंवार ही घोषणा करतात, ''लब्बैक, लब्बैक'' - 'मी हजर आहे, मी हजर आहे.' ईश्वरासमक्ष मानवतेनं उसळलेल्या या सागरातल्या प्रत्येक व्यक्तीची स्वत:ची अस्मिता असेल आणि त्याच्या स्वत:च्या कर्मामुळं आणि निष्ठेद्वारेच प्रत्येकाशी न्याय केला जाईल.

हज्जच्या पाच दिवसांच्या कालावधीत सर्व जगातले मुस्लिम यात्रेकरू मक्का येथे एकत्र येतात. एकत्र प्रार्थना व उपासना आणि इकडं-तिकडं ये-जा करतात. पवित्र क्षेत्रात प्रवेश करण्यापूर्वी त्यांनी सभ्यता जपली पाहिजे. ऐहिक भावना-इच्छांचं निर्मूलन करून दोन पांढऱ्या चादरींचं वस्त्र - इहराम नेसायला हवं.

पवित्र क्षेत्र सुरक्षित आहे. या क्षेत्रातील कोणताही प्राणी, झाड-झुडुप, एखाद्या माशीलादेखील इजा देता कामा नये. शोभा वाढवणाऱ्या सर्व वस्तू, केस विंचरणं, सुगंधी वस्तू इत्यादींचा वापर करणं, नखं काढणं, अशा सर्व गोष्टी यात्रेकरूंनी टाळायच्या असतात. आपलं संपूर्ण अस्तित्व ईश्वराला अर्पण केलं पाहिजे. ईश्वराच्या उपस्थितीनं भावनाविवश हे क्षण असतात, याचं भान ठेवायला हवं. त्याचबरोबर मानवजातीची भलीमोठी संख्या आपल्या अवतीभवती आहे याची जाणीव ठेवायला हवी. या गोष्टींचं महानत्व अनुभवताना आपला अहंकार नष्ट करून आम्हाला विनम्रतेची उंची गाठायला

हवी. सर्व इच्छा, लैंगिक वासनासहित बाजुला ठेवायला हव्यात. यात्रेकरू मक्केची वारी ईश्वराची कृपा आणि क्षमा मागण्यासाठी करतात. जेव्हा ते हज्जची विशिष्ट वस्त्रं नेसतात त्या क्षणापासून ''माझ्या विधात्या, मी हजर आहे, तुझ्या हाकेला साद देतो.'' अशी सतत घोषणा करतात. या सर्व प्रवासादरम्यान ते अल्लाहच्या गौरवाचं गुणगान करत असतात. ''अल्लाहु अकबर'' - 'अल्लाह महान आहे, अल्लाहशिवाय कुणी ईश्वर नाही.'

# विश्वव्यापी बंधुभाव

हज्जविधी इस्लामचं आणखीन एक वैशिष्ट्य आहे. जे अनेक उद्दिष्टं साकारण्यासाठी ईश्वरानं विहित केलंय. ते खालीलप्रमाणे आहे-

१. हा श्रद्धेचा सर्वांत महान मेळावा आहे जिथं मुस्लिम एकमेकांची माहिती करून घेण्यासाठी, त्यांच्या सामूहिक व्यवहारांचं अध्ययन करण्यासाठी आणि त्यांचं कल्याण करण्यासाठी एकत्र येतात.

२. मानवतेच्या इतिहासात नोंद असलेलं हे सर्वांत महान शांततापूर्ण संमेलन आहे. हज्जच्या विधींमध्ये शांतता हे प्रमुख उद्दिष्ट असते. ईश्वर आणि स्वत:च्या आत्म्याची शांतता, एकमेकांशी पशु-पक्ष्यांशी आणि क्षुल्लक जीवांशी शांतता बाळगणं, कोणत्याही निर्मितीची कशाही प्रकारे शांतत भंग करणं सक्तीनं निषिद्ध केलं गेलंय.

३. इस्लामची सर्वसमावेशकता, बंधुभाव आणि मुस्लिमांमधील समतेचं हे परिपूर्ण प्रत्यक्ष दर्शन आहे. ईश्वराच्या हाकेला साद देत मुस्लिम लोक प्रत्येक क्षेत्रातून, प्रत्येक वर्गाचे, व्यावसायिक, जगाच्या सर्व ठिकाणाहून मक्का येथे एकत्र होतात. ते एकाच प्रकारची वस्त्रं परिधान करतात. समान नियमांचं पालन करतात आणि एकाच वेळी एकाच पद्धतीच्या शब्दांनी भक्तीभाव अर्पण करतात. इथं कोणा दुसऱ्याची नव्हे तर केवळ ईश्वराचीच राजेशाही असते. कोणते अमीर-उमराव नाहीत, फक्त विनम्रता आणि एकनिष्ठता.

४. मुस्लिमांची ईश्वराशी प्रतिबद्धता आणि त्याच्या सेवेसाठी आपल्या ऐहिक लाभांना नाकारणं आजमावण्यासाठी हज्जची ही यात्रा.

५. यात्रीकरूंना प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या आध्यात्मिक आणि ऐतिहासिक वातावरणाशी परिचित करण्यासाठी, ज्यामुळं त्यांना उबदार प्रेरणा मिळाव्यात आणि त्यांची श्रद्धा समृद्ध व्हावी यासाठी.

हज्जच्या प्रक्रिया पार पाडताना हे सहजपणे लक्षातयेऊ शकते की हे विधी आध्यात्मिक समृद्धी आणि नैतिक बळकटी प्राप्त करण्यासाठी आहे. भावनाप्रवण परायणता आणि शिस्तबद्धतेचा अनुभव मानवतावादाच्या हितांचं रक्षण करणं आणि ज्ञान, हे सर्व गुण सामावलेला हा असा इस्लामचा एक विधी आहे.

ह्या यात्रेचा शेवटचा विधी म्हणजे अल्लाहच्या नावानं एका पशुचं बळी देणं (कुरबानी). याबरोबर हेही स्पष्ट करून दिलंय की,

> ''अल्लाहप्रत त्याचं मांस किंवा रक्त पोचत नसते तर त्यामागची तुमची निष्ठा पोचते.'' (कुरआन, २२:३७)

जे मुस्लिम लोक मक्केच्या बाहेर जगात कुठेही असतात तेदेखील ईदच्या दिवशी, जी या यात्रेची परिणती आहे, अशीच धार्मिक कृती करतात. आणि म्हणूनच या ईदला त्याचाच उत्सव 'ईदुल-अजहा' म्हणजेच 'कुरबानीची ईद' म्हणतात.

ही पाच अनिवार्य कर्तव्यं आहेत जी एका मुस्लिमाला आध्यात्मिक शिस्तबद्धता देतात आणि त्यांना सरळमार्गावर ठेवतात.

## समारोप-

पवित्र कुरआनात पुन्हा पुन्हा हे उच्चारलं जातं की नमाज कायम करा आणि जकात द्या. शरीर आणि आत्म्याचं एकत्व यापेक्षा उत्तम कशाप्रकारे प्रकट केलं जाऊ शकते. एकमेव ईश्वराची भक्ती आणि समाजासाठी योगदान

देणं, याचा उच्चार एकाच वेळी केला जातो. आध्यात्मिक कार्य ऐहिक लाभांशी भिन्न नाही. त्याचबरोबर ऐहिक कर्तव्याचेदेखील आध्यात्मिक मूल्य आहे. या कर्तव्यामागच्या इच्छा आणि त्यामागच्या हेतूवरच सर्वकाही अवलंबून आहे.

या पाच स्तंभांमध्ये वैयक्तिक जबाबदारी, सामाजिक भान आणि सामूहिक जाणीव आणि इस्लामच्या विस्तारित समुदायाचे घटक या सर्वांचा समावेश आहे.

इस्लामी श्रद्धा स्वीकारण्याचा अर्थ म्हणजे एकमेव ईश्वर अल्लाहच्या भक्तीसाठी समर्पित एका समुदायाचं अंग बनणं ज्याचं उद्दिष्ट त्याच्या इच्छांना साकारणं आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर आधारित एका समुदायाची निर्मिती करणं होय.

# ८

# इस्लामच्या मूलभूत संकल्पना

- जीवनाची संकल्पना
- पापाची संकल्पना
- पश्चात्तापाची संकल्पना - 'तौबा'
- श्रद्धेची संकल्पना - 'ईमान'
- निसर्गाची संकल्पना
- विश्वस्ताची संकल्पना - 'खलीफा'
- सद्वर्तनाची संकल्पना
- मध्यममार्गाची संकल्पना - 'ईतेदाल'
- भक्तीची संकल्पना
- स्वातंत्र्याची संकल्पना
- समतेची संकल्पना
- बंधुभावाची संकल्पना
- न्यायाची संकल्पना
- ज्ञानाची संकल्पना - 'इल्म'
- शांततेची संकल्पना

- नैतिकतेची संकल्पना
- जिहादची संकल्पना
- इस्लामी कायद्याची संकल्पना - 'शरियत'
- इस्लामी न्यायशास्त्राची संकल्पना - 'फिकह'
- स्पष्टीकरणाची संकल्पना - 'इज्तिहाद'
- सल्लामसलतीची संकल्पना - 'शूरा'
- विहित आणि निषिद्धची संकल्पना - 'हलाल आणि हराम'

# जीवनाची संकल्पना

हे जीवन ईश्वराची बुद्धिमत्ता आणि त्याच्या ज्ञानाचं देदीप्यमान दर्शन आहे. त्याची कला आणि सामर्थ्याचं एक ठळक प्रतिबिंब. तो जोपासणारा आणि जीवनाची निर्मिती करणारा आहे. आकस्मिकरित्या काहीही अस्तित्वात येत नसते आणि कुणी स्वत:ला आणि इतरांना निर्माण करू शकत नाही. हे जीवन जतन करण्यासारखा मौल्यवान ठेवा आहे आणि कुणीही साधारण समजुतदार व्यक्ती स्वेच्छेनं हे वाया जाऊ देऊ शकत नाही.

जीवन ईश्वरानं माणसाला दिलंय आणि यास परत घेण्याचा अधिकार त्यासच आहे. दुसरा कुणीही हे जीवन नष्ट करू शकत नाही. आणि म्हणूनच इस्लाम सर्व प्रकारच्या आत्महत्यांना आणि स्वत:चं दमन करण्यास आळा घालतो आणि जेव्हा एखादा प्रिय आत्मा निघून जातो त्यावेळी संयम बाळगण्यास सांगतो.

ईश्वर जेव्हा माणसाला जीवन देतो तेव्हा तो उगाच त्याला विशिष्ट गुण आणि सामर्थ्याची देणगी देत नाही की त्याचप्रमाणे तो माणसावर उगाच काही बंधनं घालत नाही. जीवनाचा उद्देश पूर्ण करण्यासाठी आणि अस्तित्वामागचा हेतू काय हे तथ्य ओळखून घेण्यासाठी ईश्वर माणसाला मदत करू इच्छितो. तो त्याला जगण्याची कला शिकवू इच्छितो आणि दैवी मार्गदर्शनानुसार जीवनाचा आनंद घ्यावा ही त्याची योजना आहे. जीवन ईश्वराकडून टाकलेली जबाबदारी आहे आणि माणसानं त्या जबाबदारीचं भान ठेवून प्रामाणिकपणे आणि कौशल्यानं एका विश्वस्ताप्रमाणं ईश्वराच्या विश्वासाचं रक्षण करावं.

जीवनाचं उद्दिष्ट ईश्वराची उपासना-भक्ती करणं होय. याचा अर्थ माणसानं उभी आयुष्य एकांतवासात एकाग्रतेनं सबंध जीवन खर्ची घालावं असं नाही. ईश्वराची उपासना म्हणजे त्याची इच्छा काय ही माहिती मिळवणं, त्याच्याशी जवळीक साधणं, त्याच्या आदेशांचं पालन करणं, जीवनाच्या

हरेक क्षेत्रात त्याचे नियम लागू करणं, भली कर्मं करताना दुष्टतेचं निर्मूलन करावं, त्याचं ध्येय साकारण्यासाठी प्रयत्न करावा, ईश्वराची उपासना हे जीवन जगणं यापासून पळून जाणं नव्हे.

जीवनाला एका प्रवासाची उपमा दिली जाऊ शकते. एका ठिकाणाहून सुरवात होते आणि दुसऱ्या ठिकाणी त्याचा शेवट होतो. जीवन मधली स्थिती आहे. परलोकातील शाश्वत जीवनाचा परिचय करून देणारं. या प्रवासात माणूस एक प्रवासी आहे आणि त्यानं भविष्यात त्याला काय उपयोगात आणायचंय याचीच फक्त काळजी घ्यायची आहे. दुसऱ्या शब्दांत त्यानं त्याला जमेल तेवढं भलं करावं आणि कोणत्याही क्षणी अनंतकालीन जीवनात पदार्पण करायची तयारी करावी. त्यानं या धरतीवरील आपल्याला मिळालेल्या जीवनाला एक संधी समजून जमेल तेवढं चांगलं ते करावं कारण जेव्हा त्याच्या जाण्याची वेळ येऊन ठेपेल तो त्याला एका क्षणासाठीही टाळू शकत नाही. त्याचा काळ संपला की काहीही करायला उशीर झालेला असेल आणि म्हणूनच यावर उत्तम उपाय म्हणजे त्यानं ईश्वराच्या शिकवणींनुसार जगावं आणि भविष्यातलं शाश्वत जीवन जगण्यासाठी या जगातल्या जीवनाला सुरक्षित मार्ग बनवावं. कारण अंतिम जीवनासाठी हे जीवन फार महत्त्वाचा मार्ग आहे. माणसानं कसं जगावं, काय करावं, काय करू नये हे दाखवून देण्यासाठी इस्लामनं या बाबतीत सबंध व्यवस्था, नियम आणि सिद्धान्त बनवले आहेत. सर्व माणसांना ईश्वरानं निर्माण केलंय आणि ते परत त्याच्याकडं जाणार आहेत यात शंका नाही. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी आपलं एक सर्वंकश विधान केलंय. त्यांनी उपदेश दिला, माणसानं या जीवनाला स्वत:ला अनोळखी समजावं, एक प्रवासी - या जगातून पुढं जाणारा.

# पापाची संकल्पना

> ‘‘तुम्ही त्यांना विचारा, मी अल्लाहला सोडून दुसरा कुठला विधाता शोधून काढू, तोच तर सर्वांचा विधाता आहे. प्रत्येकास आपल्याच कर्मांचे परिणाम भोगावे लागतील. कुणी इतर कुणाचं ओझं वाहणार नाही. मग तुम्हाला तुमच्या विधात्याकडं परतावयाचंय. तुम्ही ज्याबाबत वाद घालत होता (त्याचं सत्य काय) ते दाखवलं जाईल.’’
>
> (कुरआन, ६:१६४)

पण म्हणजे जाणूनबुजून हेतूपुरस्सर ईश्वराची अवज्ञा करणं पाप आहे. सर्वांत भयंकर पाप अनेकेश्वरवाद (एकापेक्षा अधिक आणि अनेक ईश्वर) आहे. अल्लाहच्या आदेशांची उद्दिष्टपूर्वक अवज्ञा करणं अपराधी कृती आहे. तरी ईश्वरानं (अल्लाहनं) व्यक्ती आणि समाजास हानिकारक अशा असंख्य कृती वर्ज्य केल्या आहेत. हत्या, चोरी, लुबाडणं, मारझोड, व्याज, व्यभिचार, बलात्कार, मद्यपान, जादूटोणा, डुकराचं मांस खाणं आणि मादक पदार्थांचं सेवन करणं ही सर्व पापी कृत्यं आहेत.

इस्लामला मुळात माणूस जन्मतःच गुन्हेगार असणं हा सिद्धान्त मान्य नाही. कुरआनात अल्लाहचं विधान आहे, ‘‘कोणताही आत्मा दुसऱ्याचं ओझं उचलणार नाही.’’ आपण सर्वचजण अल्लाहसमोर जबाबदार आहोत. जर एखादा माणूस दुसऱ्याला पाप करण्यासाठी उत्तेजित करतो, तेव्हा दोघंही शिक्षेस पात्र आहेत. त्यातल्या एकास प्रत्यक्ष पाप करण्यासाठी शिक्षा भोगवी लागेल तर दुसऱ्याला त्यास पाप करण्यास उत्तेजित करण्यासाठी शिक्षा भोगावी लागेल.

जेव्हा एखाद्या पुरुष किंवा स्त्रीकडून पाप घडतं तेव्हा ते शिक्षा भोगण्यास पात्र ठरतात. सुदैवानं ईश्वर मायाळू आणि अतिशय क्षमाशील आहे. ईश्वराचं वर्तन अमर्याद ज्ञान आणि न्यायावर आधारित असते. मरयमपुत्र जीजस यांना मानवजातीच्या पापासाठी मृत्यू पत्करावा लागला, यावर मुस्लिमांची श्रद्धा नाही.

परम कृपावंत ईश्वर ज्यास इच्छितो त्याला क्षमा करतो. आमच्या पापांच्या क्षमेसाठी येशू ख्रिस्तांनी यातना सहन करत मरण पत्करावं हे आवश्यक होतं अशी श्रद्धा ठेवणं ईश्वरेच्छेच्या अमर्याद सामर्थ्य आणि न्यायाला नाकरणं आहे. ईश्वराच्या दयेला सीमा नाही.

पश्चात्ताप करणं उपासनेचाच भाग आहे. अल्लाहच्या दयेनं एक माणूस मुक्ती मिळवू शकतो. आम्ही मनापासून प्रायश्चित्त करीत त्याच्याकडं वळलो तर शक्तिशाली अल्लाहनं हे वचन दिलंय की तो आम्हाला क्षमा करील.

मनापासून प्रयत्न करण्याच्या अटी खालीलप्रमाणे :

१. पुरुष / स्त्रीनं त्याच्याकडून पाप घडल्याचं मान्य करून तशी कबुली द्यावी आणि असं केलं म्हणून त्यांनी खऱ्या अर्थानं पश्चात्ताप व्यक्त करावा.

२. अशा माणसानं क्षमेसाठी नम्रतापूर्वक ईश्वराकडं वळावं.

३. अशा माणसानं हे मनापासून पुन्हा कधी पाप न करण्याचं संकल्प करावा.

४. त्याच्या पापामुळं दुसऱ्याला हानी पोचली असेल तर शक्य तेवढं करून त्याचा उपाय करण्याचा प्रयत्न करावा.

याचा अर्थ जर माणूस पुन्हा पापाकडं वळला असेल तर त्याची पूर्वीची क्षमायाचना फोल ठरली असं नाही, पुन्हा असं पाप न करण्याचं त्यानं ठरवावं. भविष्यात काय घडणार आहे याची आम्हाला माहिती नाही, म्हणून प्रायश्चित्त करण्याची संधी नेहमीच उपलब्ध असते परम क्षमाशील आणि शक्तिशाली अल्लाहला. जेव्हा जेव्हा आदमची संतती क्षमेसाठी त्याच्याकडं वळते त्याला याचा आनंद होतो.

ईश्वराशिवाय पापाची कुणीही क्षमा करत नाही. एका मुस्लिमानं कुणा दुसऱ्याकडं वळून आपल्या पापाची क्षमा मागणं वर्ज्य केलंय. मुस्लिमांच्या श्रद्धेप्रमाणं असं करणं अनेकेश्वरी कृत्य असेल. (एकापेक्षा अधिक किंवा अनेकेश्वर.)

# तौबा

## पश्चात्तापाची संकल्पना

प्रेमळ आणि दयाळू ईश्वर आम्हाला कधीही विसरत नाही किंवा आम्हाल टाकून देत नाही की आमच्या हाकेला दुर्लक्ष करत नाही. आपल्या कृपेनंच त्यानं आम्हाला रास्त मार्ग दाखवला आणि प्रेषितांना ग्रंथासहित आमच्याकडं पाठवलं. हे सर्व आमच्या मदती आणि मार्गदर्शनासाठी केलं. ईश्वराकडून शेवटचे प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आहेत आणि पवित्र कुरआन हे सर्व सत्य असलेला धर्मग्रंथ अस्तित्वात आहे. प्रेषितांच्या परंपरा आणि कुरआनच्या शिकवणींद्वारे आम्हाला क्षमाशील ईश्वराची माहिती मिळाली. एखादी व्यक्ती जेव्हा पाप करते किंवा काही अनुचित प्रकार त्याच्याकडून घडतो तेव्हा तो ईश्वराच्या नियमांचं उल्लंघन करतो. पण जर तो मनापासून पश्चात्ताप व्यक्त करू इच्छित असेल, आपल्या चुकीच्या कृतीसाठी दु:ख व्यक्त करत असेल, ईश्वराशी श्रद्धापूर्वक क्षमायाचना करत असेल, प्रामाणिकपणे ईश्वराकडं वळत असेल तर ईश्वर नक्कीच स्वीकार करून त्याला क्षमा करील.

जे लोक ईश्वराचा किंवा त्याच्या एकत्वाचा इन्कार करतात त्यांनादेखील खात्रीनं क्षमा मिळेल. त्यांनी आपल्या चुकीच्या भूमिकेचं स्पष्टीकरण करून ईश्वराकडं परतण्याचा संकल्प करावा.

जे लोक सद्‌वर्तनी आहेत. ईश्वरानं त्यांना स्वर्गाची हमी दिलीय. ज्या लोकांनी पाप केलं आणि पश्चात्ताप व्यक्त केला अशा सर्वांना क्षमेचं आश्वासन दिलं आणि ज्यांनी नाकारलं त्यांना सावधान केलंय. ज्यांनी ईश्वराच्या अस्तित्वाचं आणि त्याच्या एकत्वाला नकारलं त्यांनादेखील क्षमेची खात्री

दिली. जर त्यांनी आपली चुकीची भूमिका लक्षात घेतली आणि ईश्वराकडं परतण्याचं ठरवलं तर. या संदर्भात कुरआनचं वक्तव्य असं :

> "त्यांना सांगा, माझे भक्तहो, ज्यांनी स्वत:शी अतिरेक केला (त्यांनी), अल्लाहच्या कृपेपासून निराश होऊ नये. निश्चितच अल्लाह सारी पापं क्षमा करील. तोच खरा क्षमाशील व दयावंत आहे. आपल्या विधात्याकडं वळा, त्यास शरण जा, तुम्हांस शिक्षा घडण्याआधी. नंतर तुम्हांस मदत मिळणार नाही. आणि तुमच्या विधात्याकडून जे उत्तम (ग्रंथ) तुम्हांस पाठवलं गेलंय त्याचं पालन करा भान नसताना तुमच्यावर अचानक शिक्षा कोसळण्यापूर्वी."
>
> (कुरआन, ३९:५३-५५)

आपल्यासाठी कृपा आणि उपकारांच्या बदल्यात ईश्वरास आमच्याकडून कशाचीही गरज नाही, कारण त्याला कशाचीही आवश्यकता नाही, तो स्वतंत्र आहे, तो आम्हाला परतफेड करण्यासाठी सांगत नाही. आम्हीच त्यास मोबदला देऊ शकत नाही किंवा त्याच्या अमाप उपकारांचं व दयेचं मोल करू शकतो. तो आम्हाला जी आज्ञा देतो त्याची कृतज्ञता व्यक्त करण्याचं आणि त्यानं ज्या सद्‌गुणांचा अंगीकार करण्याचे आदेश दिलेत ते साकारण्यास सांगतो. भीती आणि भीतीदायक वातावरणातून आम्हाला मुक्त करतो. आमचा तिरस्कार करण्याची त्याची इच्छा नाही, कारण तोच एकमेव आहे जो आमची निर्मिती करतो आणि इतर सर्व वस्तूंवर आम्हाला प्रभुत्व देतो. अशा प्रकारे तो जे काही नियम आणि कायदे आमच्यावर लागू करतो ते आमच्या भल्यासाठी योजलेले आहेत.

# ईमान

## श्रद्धेची संकल्पना

इस्लाममध्ये श्रद्धा म्हणजे सकारात्माक कृती, विधायक संकल्पना आणि चैतन्यपूर्ण प्रभावी मार्गानं मिळवलेला आनंद होय. पवित्र कुरआन आणि प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या परंपरांद्वारे याची आवश्यक ती व्याख्या केली गेलीय आणि अर्थपूर्ण श्रद्धेचा मापदंड स्थापित केला गेलाय. खरे श्रद्धावंत मुस्लिम असं करतात :

१. जे लोक ईश्वरावर, त्याच्या दूतांवर आणि धर्मग्रंथांवर ज्यांची सांगता पवित्र कुरआननं झाली, त्याचे पैगंबर ज्यांचा शेवट मुहम्मद यांच्यावर झला, न्याय-निवाड्याच्या दिनावर आणि अल्लाहच्या स्वयंपूर्ण ज्ञान आणि बुद्धीमत्तेवर श्रद्धा ठेवतात.

२. जे नेहमी ईश्वरावर विश्वास ठेवतात आणि त्याच्यावर न डगमगणारा भरोसा बाळगतात.

३. जे लोक ईश्वरानं दिलेली धनसंपत्ती, आपलं जीवन, ज्ञान आणि अनुभव ईश्वराच्या मार्गात खर्च करतात.

४. जे लोक दररोज व आठवड्यातली आणि वर्षातून दोनदा (ईद) नियमितपणे प्रार्थना (नमाज अदा) करतात.

५. जे लोक धार्मिक निधी (जकात) योग्य लाभार्थींना देतात (वैयक्तिक व संस्थांना) ज्याची कमीतकमी टक्केवारी २.५ इतकी आहे, वार्षिक उत्पन्नातून आणि व्यापार असल्यास

वर्षाअखेरीस एकूण वस्तूंचा शिल्लक साठा यांच्या किंमतीतून त्यावर होणाऱ्या खर्चाची कपात केल्यावर.

६. जे लोक भल्या कामांना प्रोत्साहन देतात आणि दुष्ट गोष्टींचं निर्मूलन आपल्याकडील कायदेशीर साधनांनी करतात.

७. जे लोक ईश्वर आणि त्याच्या प्रेषितांशी सर्वांत जास्त प्रेम करतात. तसेच मुस्लिम आणि मुस्लिमेतर सर्वांना मनापासून आणि फक्त ईश्वराच्याच कारणास्तव प्रेम करतात.

८. जे आपल्या शेजाऱ्यांशी, जवळचे आणि लांबचे दोहोंशी, प्रेमानं वागतात आणि पाहुण्यांशी आदराचा व्यवहार करतात.

९. जे लोक सत्य बोलतात, भल्या गोष्टींत सामील होतात किंवा वेगळं राहतात.

१०. जे लोक निसर्गाचं आणि ईश्वराच्या निर्मितीचं रक्षण करतात.

श्रद्धेचा अर्थच मुळात जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांमध्ये इस्लामचा सखोल आणि सकारात्मक प्रभाव असणे हे स्पष्ट आहे. इस्लामप्रमाणे माणसाच्या आध्यात्मिक आणि ऐहिक जीवनावर खऱ्या श्रद्धेचा निर्णायक परिणाम होतो. तसेच त्याच्या वैयक्तिक आणि सामाजिक वर्तनावर आणि राजकीय आचार व आर्थिक जीवनावरही श्रद्धा परिणामकारक असते.

# निसर्गाची संकल्पना

शक्तिशाली ईश्वर स्पष्टपणे सांगतो की ही पृथ्वी आणि यातील सारी निर्मिती आज्ञाधारक सेवक आहे आणि ते त्याच्यापुढं नतमस्तक होतात.

> ''तुम्ही पाहत नाही. अवकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही अल्लाहपुढं नतमस्तक आहेत. तसंच सूर्य, चंद्र, तारे, पर्वत, वृक्षं व प्राणी आणि बहुसंख्येनं मानवजातीतील (लोक) पण मोठ्या संख्येनं लोक शिक्षेस पात्र आहेत. अल्लाह ज्यांना अपमानित करतो त्यांचा कुणी आदर करत नसतो. जे इच्छितो ते अल्लाह करत असतो.''
>
> (कुरआन, २२:१८)

अशाप्रकारे उपयोग आणि दुरुपयोग करण्यासाठीच निसर्ग नाही. खरं पाहता मानव आणि निसर्गाच्या दरम्यान जो घनिष्ठ संबंध आहे त्याचा दुरुपयोग करणं स्वत:चा दुरुपयोग करण्यासारखं आहे. जसं मानवी जीवन अत्यंत आदरणीय आहे त्याचप्रमाणे कुरआननुसार निसर्ग धार्मिक असल्यानं पवित्र आहे.

> ''चराचरासाठी पृथ्वी बनवली. यामध्ये फळफळावळ आहेत आणि खजुरीची झाडं, वलयांकित धान्ये पाल्यासहित आणि सुगंधी फुलं. तेव्हा तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या देणग्या नाकाराल?''
>
> (कुरआन,५५:१०-१३)

> ''उत्तुंग अवकाश उभारलं आणि समतोल राखलं. (तेव्हा) संतुलनाचं उल्लंघन करू नका. आणि मोजमापात कसर

होऊ देऊ नका.''                    (कुरआन, ५५:७-९)

पृथ्वी आणि तिच्या पर्यावरणाचे हक्क आहेत आणि याची प्रथम मान्यता म्हणजे आम्ही याचे मालक नाही. आम्ही यास निर्माण केलं नाही. म्हणून आम्ही याचे मालक नाही. याच्या खऱ्या मालकानं विश्वस्त म्हणून आम्हाला हे सोपवलंय. तौहीदची संकल्पना हे अधोरेखित करते की ईश्वराशी संबंध जोडल्याशिवाय निसर्गाला काहीच अर्थ नाही. दैवी उद्दिष्ट नसते तर हिला अस्तित्वच उरलं नसतं. आणि म्हणून निसर्गाला कुरआनात निर्मिती म्हटलंय.

# खलीफा

## विश्वस्ताची संकल्पना

इस्लामची दुसरी अत्यंत महत्त्वाची संकल्पना म्हणजे खलीफाची संकल्पना. साधारणपणे याचं भाषांतर 'नायब', 'विश्वस्त' (आणि 'प्रतिनिधी') केलं जातं. मानवांना पृथ्वीवर ईश्वराचे विश्वस्त बनवले गेलेत हे कुरआनात स्पष्टपणे नमूद केलंय. अध्याय २, आयत (श्लोक) ३० यामध्ये ईश्वर आपल्या दूतांना सांगतो, मी पृथ्वीवर माझा नायब पाठवणार आहे. उच्चाधिकारीचा प्रतिनिधी म्हणून खलीफा येत असतो. त्यास कशावरही कसले विशेषाधिकार नाहीत. विश्वस्ताचं कार्य आपली जबाबदारी परिश्रमपूर्वक पार पाडावी आणि 'ट्रस्ट' कार्यरत राहील याची खात्री करून घ्यावी. पृथ्वीवर ईश्वराचा विश्वस्त या नात्यानं निसर्गाचं संतुलन कायम ठेवणं, पर्यावरण, त्यातील वनस्पतींची जोपासना करणं आणि ईश्वराच्या सबंध निर्मितीचा आदर-सन्मान करणं आमची वैयक्तिक आणि सामूहिक जबाबदारी आहे. आम्ही ईश्वरापासून स्वतंत्र नाहीत तर आम्ही आपल्या पृथ्वीवरील कृत्यांबाबत ईश्वरासमोर जबाबदार आहोत. पृथ्वी आणि पर्यावरणाची प्रामाणिकपणे देखरेख करणं ही ईश्वराकडून आमची परीक्षा आहे आणि एका विश्वस्ताच्या नात्यानं आम्ही ही जबाबदारी कशी पार पाडली याची तपासणी होईल.

> ''तोच ज्यानं तुम्हाला धरतीवर प्रतिनिधी (नायब) बनवून पाठवलं.'' (कुरआन, ६:१६५)

म्हणून निसर्ग हे एक विश्वास किंवा अमानत आहे आणि आमच्या नैतिकतेचं व सदाचाराचं घटनास्थळ आहे. आम्ही निसर्गावर अल्पसा ताबा बाळगतो, पण आम्ही सार्वभौम अधिकारी नाही.

आपण जेव्हा निसर्गाचं रक्षण करण्यात अपयशी ठरतो तेव्हा माणूस म्हणूनदेखील आम्ही अपयशी होतो.

> ''सुव्यवस्था नांद असताना पृथ्वीवर अनाचार माजवू नका.'' (कुरआन, ७:५६)
>
> प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचं वक्यव्य आहे,
>
> ''तुम्ही पृथ्वीवरील चराचरावर दया करा, जो वर आकाशात आहे तो तुमच्यावर दया करील.''

# सदाचाराची संकल्पना

इस्लाम नेहमी भ्रामक संकल्पना आणि रूढी, औपचारिक वायफळ श्रद्धांविरूद्ध सावध करत असतो. कुरआनच्या एका प्रतिनिधिक आयत (श्लोक) मध्ये ईश्वर सदाचाराचा संपूर्ण अर्थ खालीलप्रमाणे स्पष्ट करतो :

> ''तुम्ही तुमचे तोंड पूर्वेच्या दिशेनं केले अथवा पश्चिमेकडं केले हा सदाचार नव्हे. वास्तवात सदाचार म्हणजे हे की जे लोक अल्लाहवर श्रद्धा ठेवतात, तसेच शेवटच्या दिवसावर, देवदूतांवर, ग्रंथांवर आणि प्रेषितांवर श्रद्धा ठेवतात आणि त्याच्या प्रेमापोटी आपल्या संपत्तीतून आपल्या नातेवाईकांना, अनाथांना, निराधारांना, वाटसरूंना, जे मागतील त्यांना आणि गुलामीतून (सुटका) करण्याकरिता देतात. तसेच नियमित नमाजचे पठण करतात, जकात अदा करतात आणि दिलेला शब्द पाळतात. दु:खात आणि आपत्तीत व युद्धाच्या प्रसंगी धैर्य राखतात, असेच लोक सत्यार्थी आहेत आणि हेच लोक सदाचारी आहेत.'' (कुरआन, २:१७७)

सद्‌गुणी माणसाचं हे कुरआननं केलेलं वर्णन आहे. सदाचार पोकळ शब्दांचा उपयोग आणि उथळ संकल्पना नाही. सद्‌गुणी माणसानं सर्व नियमांचं पालन करत असतानाच त्यानं मनापासून ईश्वराच्या प्रेमानं आणि आपल्या सहवासातील माणसांच्या प्रेमानं ईश्वरासाठी प्रवृत्त झालं पाहिजे.

# इ’तेदाल

## मध्यममार्गाची संकल्पना

न्यायासाठी (अद्ल) आणि मध्यममार्ग, नेमस्तपणा, संतुलन, समतोल, एकोपा (इ’तेदाल) हे सर्व इस्लामच्या समाजजीवनाच्या नैतिकता आहेत, ज्यावर समाजाचा आधार असतो. न्याय आणि संतुलन कायम करण्यासाठी म्हणजेच ईश्वराची प्रसन्नता संपादन करण्यास निसर्ग आणि इतिहासाच्या मध्यममार्गाचा शोध घेणं. हे एका ईश्वरास समाईक आणि विश्वस्त म्हणून टाकलेली जबाबदारी मान्य करून एका समुदाया (उम्मते-वस्त) साठी झटत राहण्यास भाग पाडते. न्यायाचं उद्दिष्ट मुस्लिम विचारांनुसार मध्यममममार्गाचा अवलंब करून साकारला जातो.

माणसाच्या वागणुकीत अतिरेक इस्लामला मान्य नाही. तो माणसाचा तिरस्कार करत नाही की ऐशआरामाचा उपभोग घेत राहणं या दोन्हींची तो बाजू घेत नाही. एकपत्नित्वाला प्राधान्य देतानाच त्यावर त्याचा आग्रह नाही. काही विशेष परिस्थितींमध्ये तो युद्ध करण्याचा आदेश देतो, पण त्याच्या संदेशाचा गाभा एकमेव ईश्वरास समर्पित होणे आणि शांतता स्थापित करणं होय. माणसामध्ये दडलेलं सामर्थ्य, त्याच्या गरजा आणि मर्यादांचा विचार करून तो त्याच्या आचरणाला नियमित करतो. पण प्राप्त परिस्थितींमध्ये माणसाच्या स्वभावात अमूलाग्र बदल घडवण्यास नाकारतो. कारण ते शारीरिक आणि आध्यात्मिक दोन्ही अंगांनं योग्य नाही.

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) मध्यममार्गाचे परम आदेशक होते. त्यांनी आपल्या अनुयायांना ब्रह्मचर्य न पाळण्याचा, उपवासाचा अतिरेक न करण्याचा आणि निराशावाद व उदासीनतेच्या आहारी न जाण्याचा

सल्ला दिला. प्रेषित मुहम्मद यांच्या अनुयायांना सद्‌गुणी जीवनाचा अभिमान वाटे. एकदा एकानं सांगितलं, त्यानं विवाह केला नाही, दुसरा म्हणाला, तो मांस खात नाही. तिसरा म्हणाला, तो जमिनीवर झोपतो आणि चौथा म्हणाला, तो निरंतर उपवास करतो. प्रेषित म्हणाले :

> ''तसं नका करू. काही दिवस उपवास करा, इतर काही दिवस खात-पीत जा. रात्रीतून काही काळ प्रार्थनेत उभं राहा, बाकीची वेळ झोप घ्या. तुमच्या शरीराचे तुमच्यावर अधिकार आहेत. तुमच्या पत्नीचे तुमच्यावर हक्क आहेत आणि तुमच्या पाहुण्यांचे तुमच्यावर हक्क आहेत.''
>
> एकदा प्रेषित उद्‌गारले आणि तीनदा म्हण त राहिले :
>
> ''अतिशयोक्ती क़रणाऱ्यांचा धिक्कार असो.''
>
> आणखी दुसऱ्या प्रसंगी प्रेषित म्हणाले :
>
> ''मध्यममार्ग! मध्यममार्ग! मध्यममार्ग..! मध्यममार्गाद्वारेच तुमचा उत्कर्ष घडेल.''

प्रेषितांनी एक प्रकारचं संतुलन कायम केलं आणि धार्मिक कार्यांबरोबरच भौतिक सुख-सुविधांचाही लाभ घ्यावा यावर भर दिला. त्यांनी भौतिक साधनांना अतिमहत्त्व दिलं नाही की आध्यात्मिक आनंदाला कमी लेखलं. संपत्ती गोळा करण्याच्या आणि भौतिक चमकधमकचा त्यांनी विरोध केला, पण यात सक्ती केली नाही की जग सोडून देण्यास सांगितलं.

अशा शिकवणींचा लाभ घेण्यासाठी कुणाला मुस्लिम होण्याची गरज नाही. संयुक्त राष्ट्र अमेरिकेचे उपाध्यक्ष अल-गोर यांचं या अनुषंगानं हे वक्तव्य पाहा :

''इस्लामच्या केंद्रस्थानी संकल्पना ज्याची शिकवण कुरआननं दिली, तौहीद- ईश्वराचं एकत्व, खलीफा, विश्वस्त आणि अद्‌ल (न्याय) हे इस्लामी नीतीमत्तेच्या वातावरणाचेदेखील स्तंभ आहेत.

# सेवेची संकल्पना

या जगात काही लोकांना सर्व सुख-सुविधांनी उपकृत केलं आहे तर काही लोक यापासून वंचित आहेत कुरआनची अशी मागणी आहे की प्रथम श्रेणीतल्या लोकांनी वंचितांची मदत करावी.

जीवनात ज्या माणसाची परिस्थिती चांगली असेल त्यांनी ईश्वराचे आभार मानावेत आणि आभार व्यक्त करण्याची उत्तम पद्धत म्हणजे जे आमच्याकडून मदतीची अपेक्षा करतात त्यांना हातभार लावावा. ईश्वरानं जे काही आम्हाला दिलंय त्यामध्ये आमच्या सहवासातील लोकांचा वाटा आहे. आम्ही त्यात त्यांना सहभागी केलं नाही तर आमचं आभार व्यक्त करणं अपुरं ठरेल. एवढ्या मोठ्या प्रमाणात उपकृत केल्यावरदेखील आम्ही त्यांना हातभार लावला नाही, तर आमची हृदये संकुचित आहेत.

इस्लाममध्ये मानवजातीची सेवा ईश्वराची सेवा समजली जाते. लोकांना त्यांच्या अडी-अडचणींत मदत करणे म्हणजे ईश्वराची सेवा करणे होय. एखाद्या माणसाला रिकाम्या हातांनी परत लावण्याचा अर्थ ईश्वराच्या मदतीस नकार देणं. ईश्वराची इच्छा मिळवायचा उत्तम उपाय त्याच्या निर्मितीला आनंदित करणं. पृथ्वीतलावरील लोकांनी एकमेकांवर उपकार केले नाहीत तर आकाशवाला त्यांच्यावर उपकार करणार नाही.

## सेवा सर्वांचीच

इस्लाम आपल्या निष्ठावंतांना मुस्लिमांचीच काळजी घेण्याची शिकवण देत नाही तर धरतीवरील प्रत्येक माणसाची काळजी वाहण्यास सांगतो. फाजील धर्माभिमान द्वेष आणि तिरस्कार शिकवतो. राष्ट्रवादाच्या

फाजील अभिमानात आंधळा झालेला मनुष्य दुसऱ्या राष्ट्रांशी कधीही सहनशील आणि दयावंत होऊ शकत नाही. इस्लाम याचा विरोध करतो. ईश्वराच्या सर्व निर्मितींना एक परिवार मानतो. अनस (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचे कथन करताना म्हणतात, ते म्हणाले,

> "सर्व निर्मिती मिळून अल्लाहचं कुटुंब बनते. जो माणूस या कुटुंबाची उत्तम सेवा करतो तो ईश्वरास प्रिय असतो."

कुरआननं गरजवंत, अपंग, अनाथ आणि उपेक्षितांच्या सेवेसाठी सरसकट आदेश दिले आहेत. त्यानं कधीही असं म्हटलं नाही की केवळ मुस्लिम किंवा एखाद्या समूहाचीच सेवा करावी. तमाम मानवजातीची सेवा करावी, अशी त्याची इच्छा आहे. ते आपले नातेवाईक असोत की नसोत, आपल्याशी एकमेत असोत की नसोत, ते आमची भाषा बोलतात की नाही, सर्वांची कोणतेही मतभेद न बाळगता सेवा केली जावी. या धरतीवर अडचणींत सापडलेल्या माणसाला तसेच सोडून दिलं जाणार नाही. आपल्या अडचणींवर मात करण्यासाठी त्यास मदत पुरविली जाईल. कारण रंग, राष्ट्रीयत्व, मायभूमीचा भेद असतानादेखील सर्व मानव एकमेकांचे अवयव आहेत. त्यांना एकाच अंशानं निर्माण केलंय. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी एका वक्तव्यात हे तथ्य स्पष्ट केलंय.

> "तुम्ही श्रद्धावान लोक होऊ शकत नाही जोवर तुम्ही एकमेकांशी दयेनं वागत नाही."
>
> अनुयायांनी अर्जव केला, "हे अल्लाहचे प्रेषित! आमच्यापैकी प्रत्येकजण दया करणारा आहे."
>
> प्रेषित म्हणाले, "तुम्ही फक्त आपल्या नात्या-गोत्यातल्यांवर दया करण्यात काही अर्थ नाही, सर्व लोकांशी दयेनं वागायला हवं."

## स्वत:चं बलिदान

इस्लाम नैतिक जबाबदारीची जाणीव जोपासण्यावर भर देतो, ज्याद्वारे मानवी हक्काधिकाराविषयी मानवांमध्ये जागृती निर्माण व्हावी. मानवी हक्काधिकारांबाबत प्रबोधन करणं, त्यांचा प्रचार करणं सोपं आहे, पण आपले आचारविचार, भावना दुसऱ्यांच्या मनामध्ये उतरविणं कठीण आहे. यासाठी अनुकंपा, नि:स्वार्थीपणा आणि प्रामाणिकपणा आवश्यक असतो.

प्रेषित मुहम्मद यांनी म्हटलंय,

''एक मुस्लिम स्वत:ला जे आवडते तेच दुसऱ्यासाठी इच्छिल नसेल तर तो खऱ्या अर्थानं मुस्लिम नाही.''

# स्वातंत्र्याची संकल्पना

एक संकल्पना आणि मौलिकता म्हणून अनेक व्यक्ती, समूह आणि राष्ट्रांना स्वातंत्र्य नाकारलं गेलंय. बऱ्याच वेळा याबाबत अपसमज असतो आणि दुरुपयोगही होतो.

या साधारण कल्पनेपलीकडं इस्लाम स्वातंत्र्याची शिकवण देतो, त्याचं जतन करतो आणि मुस्लिम तसेच मुस्लिमेतरांना त्याची हमी देतो. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आणि त्याच्या ऐच्छिक व्यवहारांत स्वातंत्र्याची इस्लामी संकल्पना लागू होते. प्रत्येक माणूस 'फितरह' म्हणजे शुद्ध प्राकृतिक स्थितीमध्ये स्वतंत्रपणे जन्माला आलाय. याचा अर्थ माणूस गुलामीपासून जन्मापासून सदोष आणि कोणताही वांशिक अडसर नसलेल्या मुक्त स्थितीत जन्माला आलाय. जोपर्यंत तो ईश्वराच्या नियमांचं उल्लंघन करत नाही आणि इतरांच्या हक्काधिकारांची पायमल्ली करत नाही, स्वातंत्र्यावरील त्याचा हक्क अत्यंत आदरणीय आहे. श्रद्धा, उपासना आणि विवेक यांचा विचार करता इस्लाममध्ये स्वातंत्र्याच्या प्रश्नाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक माणसाला श्रद्धेचं स्वातंत्र्य उपयोगात आणण्याचा, विवेक आणि उपासनेचा अधिकार आहे. कुरआनात ईश्वर म्हणतो :

> ''धर्माच्या बाबतीत सक्ती नाही. रास्त मार्गापासून वाममार्ग वेगळा केला गेलाय. तेव्हा ज्यानं बंडखोराला झुगारून अल्लाहशी एकनिष्ठता ठेवली त्यानं भक्कम न तुटणारा आधार धरला. अल्लाह ऐकणारा आणि माहिती ठेवणारा आहे.'' (कुरआन, २:२५६)

इस्लामची ही भूमिका यासाठी की धर्माचा आधार इच्छा आणि

प्रतिबद्धतेवर असतो. जर शक्तीच्या जोरावर हे लादलं गेलं तर त्यांना अर्थच उरत नाही. आणखीन असं की इस्लाम ईश्वराच्या सत्यतेला संधी म्हणून प्रस्तुत करतो आणि माणसानं काय निवडायचं आहे ते त्यानं ठरवावं. कुरआन म्हणतो-

> ''सांगा, हे सत्य तुमच्या विधात्याकडून (आहे) हवं त्यानं
> मान्य करावं हवं त्यानं नाकारावं,'' (कुरआन, १८:२९)

Fmueeceeceeue mjeel eÛeUeÛeer meekeâuheeve ßeeeÛee Skeâ keâ e meeÛeekÛe
efveceeeCekeâÛeeÛee efeeeDeeM e DeeeSe Deens pÛeeÛee hegeue ceeuel eÛeeleg DeeCe Deens
heefnueb eÛeJeekeâeÛee meyeCe Heeâ FÕej eMeeÛe Deens pÛeeue Cd Ûekeâe peCe j emle
peyeeyeoej Deens ogej b DeeheuÛee keâceeeeÛe" er Cd Ûekeâ ceeCeme JÛeefeâel eheCes
peyeeyeoej Deens DeeeCe l Ûeeuee Skeâ Ÿeeuee l ÛeeÛebCefeheâU efeU Cej Deens ef emej b
FÕej eveboeeCemeeJej mjel e yeö ue efveCeÛe l esÛeeÛeer peyeeyeoej er š ekeâueeÛe ÛeeMeb
ceeCemeeue e hegmeeDeeÛeeef cekeâ %eeve efoueb; pÛeeceg l s l eesmeeeeeeeCesÛeeÛe efveJe[
keâ Mekeâees DeMee Cekeâj Ûee ne Fmueeceer meekeâuheveÛee heeÛee DeeeCe FmueeceeceÛes
mjeel eÛeeÛeeceU DemeDeens meeÛeebej er n s FmueeceÛeekeâ eÛe Deens FmueeceÛee
mjeel eÛeeÛee meekeâuheveÛee Ûee ÛeeMeeš ere Ceefeekeâ ÚU keâ Ceb Je eeeee& JeeMekeâ
heÛeeen Ûeeee" er keâmeueeeerpeeee veeer Skeâ JÛeeeÛe mjeel eÛeeÛee nkeekeâ l ÛeeÛee
peeeeÛee DeeCekeâj emeeeeveÛe heeeÛe Deens mjeel eÛe cnCepespeeeeeveeeveÛe

## श्रद्धेच्या बाबतीत कोणतीही सत्ती नको

मुस्लिम लोक इतर धर्मांच्या श्रद्धा, शिकवणी आणि विधींचा आदर करतात. मुस्लिम सत्तेखाली कोणत्याही भूभागात सर्व मुस्लिमेतरांना स्वतःच्या नियमांनुसार समान नागरिक म्हणून आपल्या अधिकार आणि जबाबदारीसहित जीवन व्यतीत करता येतं.

# समतेची संकल्पना

समता किंवा न्याय्य समानता हे इस्लामचा मौलिक व्यवस्थेतील एक पायाभूत सिद्धान्त आहे. समतेच्या या मोलाची गल्लत साचेबद्धता किंवा सारखेपणाशी करू नये. इस्लामची शिकवण अशी की ईश्वराच्या नजरेत सर्व मानव समान आहेत, पण ते एकसारखे नाहीत. कौशल्य, सामर्थ्य, कार्यशक्ती, आकांक्षा, संपत्ती यासारखे भेद आहेत. तरीदेखील हे भेद एक व्यक्ती किंवा वंशाला दुसऱ्यावर प्रभुत्व स्थापित करू देत नाहीत. माणसाचं शरीर, त्वचेचा रंग, त्याच्याकडंची संपत्ती आणि त्याला लाभलेली प्रतिष्ठा, जोपर्यंत ईश्वराचा संबंध आहे या सर्वांचा त्याच्या नैतिकतेवर आणि जबाबदारीवर परिणामकारक ठरत नाही. ईश्वर ज्या वैशिष्ट्याला मान्य करतो ती त्याची ईश्वरनिष्ठा आहे आणि जी कसोटी ईश्वर लागू करतो ती भलेपणा आणि आध्यात्मिक श्रेष्ठतेची कसोटी आहे. कुरआनात ईश्वर म्हणतो :

> ''लोकहो! अल्लाहनं तुम्हांस एक पुरुष आणि एका स्त्रीपासून जन्माला घातलं आणि तुमच्यात जमाती आणि टोळ्या बनवल्या, तुम्हांस ओळखता यावं म्हणून. पण अल्लाहपाशी तर तुमच्यापैकी प्रतिष्ठित तोच, जो सदाचारी असेल. अल्लाह सर्वज्ञ आणि सर्वपरिचित आहे.''
>
> (कुरआन, ४९:१३)

रंग, वंश, सामाजिक दर्जाचे भेद फक्त आकस्मिक आहेत. अल्लाहच्या नजरेत माणसांच्या खऱ्या स्थितीवर त्यांचा प्रभाव पडत नाही. स्वातंत्र्याचं मोल फक्त घटनात्मक अधिकार नव्हे किंवा सभ्यतापूर्वक केलेली तडजोड अथवा कुणाच्या कृपेची देणगी नव्हे. हा श्रद्धेचा करार आहे जो मुस्लिम गांभीर्यानं बाळगतो आणि ज्याचं पालन त्यानं मनापासून करावं.

इस्लामच्या समान रचनेत इस्लामी समतेचं मोल खोलवर रुजलंय. खालील पायाभूत सिद्धांतापासून यांचा उगम होतो.

१. सर्व मानव एकाच ईश्वरानं निर्माण केले आहेत. तोच शाश्वत ईश्वर सर्वांचा सर्वोच्च विधाता.

२. तमाम मानवजाती मानववंशाचा घटक आहे आणि सर्व आदम व हव्वा (ईव्ह) ची समान संतान आहेत.

३. ईश्वर आपल्या निर्मितीशी न्याय करतो आणि कृपाशाली आहे. तो कोणत्याही वंश वा जातीवर्ग वगैरेंवर अन्याय करत नाही. सर्व सृष्टीवर त्याचं अधिराज्य आहे आणि सर्व लोक त्याची निर्मिती आहेत.

४. सर्व लोक समान जन्मले आहेत. कुणीही आपल्याबरोबर काही आणत नसतो आणि सर्व लोक सारखेच मरण पावतात, म्हणजे जगातील कोणत्याही वस्तू ते परत घेऊन जात नाहीत.

५. प्रत्येक माणसाबाबत ईश्वर त्याच्या गुणांच्या आणि कर्मांच्या आधारावर निर्णय घेतो.

६. ईश्वरानं माणसाला माणूस म्हणून आदर आणि सन्मान बहाल केलाय.

इस्लामच्या समतेच्या महत्त्वामागं हे काही सिद्धान्त आहेत. जेव्हा ही संकल्पना तंतोतंत अंमलात आणली जाईल, कोणताही पूर्वग्रह आणि छळ करण्यासाठी जागा नसेल आणि जेव्हा हे दैवी नियम पुरेपूर अंमलात आणले जातील तेव्हा अत्याचार, दमन करण्यासाठी कसलंही कारण नसेल. साधारण आणि निवडक व्यक्ती, प्रतिष्ठित आणि निंदनीय, सामान्यवर्ग आणि दुय्यम दर्जाचे नागरिक यासारख्या संकल्पना निरर्थक आणि जुन्या होऊन जातील.

# बंधुभावाची संकल्पना

"सर्व लोक एकाच समूहातील होते मग त्यांनीच भेदाभेद केले." (कुरआन, १०:१९)

"निश्चितच तुमचा समूह एकच समूह आहे. मी तुमचा विधाता आहे, माझी भीती बाळगा."

इस्लामी मूल्यांच्या व्यवस्थेमध्ये बंधुभावाचं मूलतत्त्व हा दुसरा घटक आहे. या व्यवस्थेचा आधारदेखील त्याच सिद्धान्तांवर आहे ज्यांची चर्चा आम्ही स्वातंत्र्य आणि समतेच्या संदर्भात केली आहे. यामागील सिद्धान्तांबरोबरच इस्लाम ईश्वराचं एकत्व आणि त्याची वैश्विकता ज्याची उपासना केली जाते, उपासना करणाऱ्या मानवजातीची अखंडता आणि उपासनेचं माध्यम धर्माच्या अखंडतेवर आधारित आहे. मुस्लिमांसाठी ईश्वर एकमेव असून तो शाश्वत आणि वैश्विकता आहे. सर्व मानवांचा निर्माता आहे, सर्वांचा पालनकर्ता, सर्वांचा निर्णय देणारा आणि सर्वांचा विधाता आहे. सामाजिक स्थिती, राष्ट्रीय प्रतिष्ठा आणि वांशिक मूळ यांचं त्याला काहीही महत्त्व नाही. त्याच्याबरोबर सर्व लोक एकमेकांचे भाऊबंद आहेत आणि समान आहेत.

निर्मितीचा स्रोत मूळ माता-पिता आणि अंतिम ठिकाण यांच्या संदर्भानं मुस्लिम लोकांचा मानवजातीच्या अखंडतेवर निर्मितीचा स्रोत स्वत: ईश्वर आहे. सर्वांचं मूळ आणि समाईक माता-पिता आदम आणि हव्वा आहेत. सर्व मानवजातीचं मूळ माता-पित्याचे घटक आहेत. सर्वांचं अंतिम ठिकाण ज्याकडं सर्व मानव परतणार आहेत तो ईश्वर आणि निर्माता आहे, याबद्दल मुस्लिमांना काहीही संशय नाही.

मुस्लिमांना ईश्वराच्या धर्माच्या अखंडतेवर विश्वास आहे. याचा अर्थ ईश्वरानं आपल्या धर्माला बंदिस्त केलेलं नाही की तो कुण्या वंशाची, राष्ट्रसमूहाची आणि काळाची बाजू घेतो. याचा पुढील अर्थ असा की ईश्वराच्या धर्मामध्ये विसंगती अथवा मूलगामी विभिन्नता नाही.

# न्यायाची संकल्पना

इस्लाममध्ये 'अद्ल' म्हणजेच न्याय सर्वोत्तम नीतीमत्ता आहे. खरं पाहता मुस्लिम अभ्यासकांची अशी मान्यता आहे की कुरआनचं अवतरण आणि प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचं प्रमुख उद्दिष्ट धरतीवर न्यायाची स्थापना करणे हे होतं. इस्लामध्ये संपूर्ण समाजजीवन न्यायाच्या कल्पनेभवती फिरते. श्रद्धावंतांना एकमेकांशी न्याय्य वागणूक करण्याचे आदेश आहेत. न्यायाची सुरवात स्वत:पासून होते. स्वत:च्या शरीराच्या, मानसिक आणि आध्यात्मिक गरजा पूर्ण करणे यांचा यात समावेश होतो. कौटुंबिक नात्याचा आधार न्यायावर असावा. माता-पित्यांचा, वृद्धांचा आदर, सर्व मुलामुलींशी एकसमान प्रेम करणं आणि आपल्या पती/पत्नीशी प्रामाणिक असणं, निष्ठावंत असणं हे सर्व एका न्याय्य कुटुंबाचं प्रकट रूप आहे. सांप्रदायिक स्तरावर आपल्या जबाबदाऱ्या आणि बंधनं पाळणं ही न्यायाची अपेक्षा आहे. एका मुस्लिमावर हे बंधनकारक आहे की त्यानं अत्याचाराविरूद्ध उभं राहावं, मग हा विरोध रक्ताच्या नात्याविरूद्ध असो की समाज किंवा देश, कोणत्याही प्रकारचा असो.

कुरआनात शक्तिशाली अल्लाह सांगतो :

''श्रद्धावंत लोकहो, अल्लाहच्या बाजूनं न्यायाची साक्ष देण्यास उभं राहा. एखाद्या जनसमूहाचं शत्रुत्व तुम्हाला त्याच्याशी अन्याय करण्यास प्रवृत्त करता कामा नये. न्याय करा, हे ईशपरायणतेशी निगडीत आहे.''

(कुरआन, ५:८)

''श्रद्धावंत लोकहो, तुम्ही अल्लाहसाठी न्यायनिष्ठ राहा.

जरी तुमच्याविरूद्ध किंवा तुमचे माता-पिता, तुमचे नातलग
मग ते श्रीमंत असोत की गरीब.'' (कुरआन, ४:१३५)

कुरआनातील या आयती स्पष्टपणे आदर्श न्यायाचा दृष्टिकोन उचलून धरतात. त्या माणसावर बंधन घालतात की त्यांनी न्यायाच्या बाजूनं भक्कमपणे उभं राहावं, जरी असं करणं त्याचे माता-पिता, सगेसंबंधी, मित्र आणि स्वत:विरूद्ध का असेना. कुरआन मुस्लिमांना ही शिकवण देतो की त्यांनी न्यायाच्या मार्गापासून वळू नये, जरी त्यांच्या विरोधात त्यांचा कट्टर शत्रू का असेना किंवा त्यांचा संबंध इस्लामच्या शत्रुंशीही असला तरी. कोणाची बाजू न घेता आणि भीती न बाळगता मुस्लिमानं साक्ष द्यावी, हे त्याच्यावर बंधनकारक आहे, याद्वारे त्यानं न्यायाचं व्यवस्थापन करण्यास मदत करावी. अन्याय आणि अत्याचाराचा विरोध करणं मुस्लिाचं धार्मिक कर्तव्य आहे.

''तुम्ही दीन-दलितांच्या (न्यायासाठी) पुरुष व स्त्री आणि
त्यांच्या संततीसाठी, अल्लाहच्या मार्गात का लढत नाही,
जे म्हणतायत, आमच्या विधाता! आम्हाला या वस्तीतून
बाहेर काढ. येथील लोक अत्याचारी आहेत आणि
आमच्यासाठी आमचं संरक्षक उभं कर आणि आम्हाला
तुझ्या वतीनं मदतगार बनव.'' (कुरआन, ४:७५)

एका तानाशाहसमोर उभं राहा आणि त्याला सत्य सांगा. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी मुस्लिम लोकांना आग्रहानं सांगितलं की त्यांनी न्यायासाठी आणि अन्यायाच्या विरोधात आणि पीडितांसाठी आवाज उठवावा. कुरआन म्हणतो की पीडितांची बाजू घ्या आणि जुलमी राजाच्या अत्याचाराविरूद्ध प्रतिकार करा.

# इल्म

## ज्ञानाची संकल्पना

मानवी आचरणाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये न्याय स्थापण्यासाठी बऱ्याच प्रमाणात 'इल्म' म्हणजेच ज्ञानाची आवश्यकता असते. प्रत्येक मुस्लिम स्त्री-पुरुषानं ज्ञान संपादन करावं, हे इस्लामचं बंधन आहे. मुस्लिम समाजाचा आधार ज्ञानावर असला तरच तो न्याय्य समाज बनू शकतो.

ज्ञान संपादन करणं हे समाजाचं बंधनदेखील आहे. जिथं जिथं मुस्लिम समुदाय असेल तिथं ज्ञानाच्या काही क्षेत्रांमध्ये जसं- कायदा, वैद्यकीय क्षेत्र, शिक्षण, अभियांत्रिकी बऱ्या प्रमाणात आहे, याची खात्री मुस्लिमांनी करून घ्यावी. ज्ञानाच्या एका विशिष्ट क्षेत्रातल्या तज्ञाला इस्लामी शब्दा 'आलिम' असा आहे. धार्मिक अभ्यासक, वकील, भौतिक शास्त्रज्ञ, सामाजिक शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ या सर्वांना 'आलिम' म्हटलं जातं. इस्लाममध्ये नम्रतेनं आणि सभ्यतेनं ज्ञान संपादन करायला हवं. यानंतर स्वातंत्र्य, न्याय, सभ्यता आणि सुसंस्कारांचा प्रसार करण्यासाठी ज्ञानार्जन करावं.

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचं वचन असं :

> ''एका सुशिक्षित माणसाचं अशा माणसावर जो उपासना-आराधनेत मग्न असतो, असं प्रभुत्व आहे जसं पौर्णिमेच्या चंद्राचं ताऱ्यांवर प्रभुत्व असते.''
>
> ''ज्ञानार्जन प्रत्येक मुस्लिमावर पवित्र अनिवार्य कार्य आहे. ज्ञानाच्या शोधात चायनापर्यंतही जावा.''

# शांततेची संकल्पना

इस्लाम शांततेच्या प्रश्नाकडं कसं पाहतो यासाठी इस्लामच्या काही वस्तुस्थितींचा विचार करावा लागेल. 'शांती' आणि 'इस्लाम' या शब्दांची व्युत्पत्ती एकाच शब्दाने होते आणि म्हणून ते समानार्थी आहेत. ईश्वराचं एक नाव 'शांतता'देखील आहे. मुस्लिम दररोज जी प्रार्थना करतात त्यातील शेवटचे शब्दसुद्धा शांततेचेच आहेत. मुस्लिम जेव्हा ईश्वराकडं परत जातात तेव्हा शांततेच्या शब्दांनीच स्वागत होते. मुस्लिम लोक एकमेकांचं अभिवादन शांततेच्याच शब्दांनी करतात. 'मुस्लिम' या विशेषणाचा अर्थ काही प्रमाणात शांततापूर्ण होतो. इस्लाममध्ये आकाशाला शांततेचा थर म्हणतात.

शांतता हा विषय इस्लाममध्ये किती महत्वपूर्ण आणि प्रभुत्वशाली आहे हे यावरून स्पष्ट होते. जी व्यक्ती इस्लामद्वारे ईश्वराजवळ जाते ती ईश्वराशी, स्वत:शी आणि सहवासातील लोकांशी शांततेविना राहू शकत नाही. या सर्व नीतीमूल्यांचा एकत्र विचार करता आणि माणसाला या विश्वामध्ये योग्य स्थान देऊन इस्लामच्या दृष्टिकोनातून जीवनाला पाहताना प्रामाणिक लोक आपल्या जगाला एक उत्तम जग बनवण्यात अपयशी होऊ शकत नाहीत, ज्याद्वारे मानवाची प्रतिष्ठा, समता आणि वैश्विक बंधुभाव आणि स्थायी शांतता पुन्हा एकदा हस्तगत करता येते.

# नैतिकतेची संकल्पना

इस्लाममध्ये नैतिकतेची संकल्पना काही मूलभूत श्रद्धा आणि सिद्धान्तांवर केंद्रित आहे. यात खालील गोष्टींचा समावेश आहे.

१. ईश्वर निर्माता असून सर्व सत्य, भल्या आणि सुंदर गोष्टींचा उगम आहे.

२. माणूस आपल्या निर्माणकर्त्याचा जबाबदार, आदरणीय आणि सभ्यतापूर्वक प्रतिनिधी आहे.

३. आकाश आणि पृथ्वीवरील सर्वकाही ईश्वरानं मानव-जातीच्या सेवेसाठी ठेवलंय.

४. त्याच्या मर्जी आणि कौशल्यानं ईश्वर माणसाकडून काही अशक्य गोष्टींची अपेक्षा करत नाही आणि त्याच्या शक्तीपलीकडं त्यास कोणत्या बाबींसाठी जबाबदार धरत नाही. तसेच चांगल्या वस्तूंपासून आनंद घेण्यासही ईश्वर मनाई करत नाही.

५. मध्यममार्ग, व्यावहारिकता आणि संतुलन हे उच्चतम् सचोटी आणि परिपूर्ण नैतिकतेची हमी आहेत.

६. सैद्धान्तिक रूपानं सर्व वस्तुंची अनुमती आहे, फक्त जे बंधनकारक आहेत त्यांना सोडून, हे अंमलात आणावे आणि जे निषिद्ध केलंय त्यापासून दूर राहिलं पाहिजे.

७. मानवांची अंतिमत: जबाबदारी ईश्वराशी आहे आणि निर्माणकर्त्याची प्रसन्नता हे उच्चतम् ध्येय आहे.

इस्लाममध्ये नैतिकतेच्या असंख्य बाजू आहेत आणि त्या दूरगामी परिणामकारक आणि सर्वसमावेशक आहेत. इस्लामची नीतीतत्त्वे ईश्वर, माणूस आणि त्याच्या सहवासातील लोकांशी त्याचं नातं याच्याशी संबंधित आहेत.

अधिक विस्तारानं सागायचं झाल्यास ईश्वराशी मुस्लिमांचं नातं प्रेम आणि आज्ञापालन, पक्का विश्वास आणि विचापूर्वक, शांतता आणि त्याचं महत्त्व जाणणारा, गंभीर आणि त्याची सेवा करण्याचं आहे. ही उच्चदर्जाची नैतिकता मानवी स्तरावरदेखील नैतिकतेला बळ देईल. आपल्या सहवासातील लोकांशी नातं जोडण्यासाठी मुस्लिमांनी आपल्या नातलगांशी, स्नेहानं वागावं लागेल. वृद्धांचा आदर आणि तरुणाईशी प्रेमळपणा, शेजाऱ्यांची काळजी घ्यावी लागेल, आजारी लोकांकडं लक्ष पुरवावं लागेल, गरजवंतांना आधार द्यावा लागेल, दुखितांशी दया आणि उपेक्षितांना उत्साह पुरवावा लागेल, उपकृतांशी आनंद व्यक्त करावा, मार्ग चुकलेल्यांशी संयमानं वागावं, अज्ञानी लोकांशी सहिष्णुतेचं वर्तन करावं, असाहाय्यांना क्षमाशीलता दाखवावी, चुकांना पसंती देऊ नये. क्षुल्लक गोष्टींपासून वर उठावं. त्यानं इतरांच्या कायदेशीर हक्काधिकारांचा आदर करावा, आपल्या अधिकारांचं जसं जतन करतो तसेच. त्याच्या डोक्यात सकारात्मक कल्पना आणि गांभीर्यपूर्ण विचार असावेत. त्याच्या हृदयाचे ठोके दयाळू भावना आणि सदिच्छेत वाढीस लागावेत. त्याचा आत्मा शांत आणि प्रसन्न असावा. सत्यता आणि सद्‌गुण त्याचं उद्दिष्ट, नम्रता, साधेपणा आणि स्नेह हा त्याचा दुसरा स्वभाव. अडाणीपणा, पोकळ गर्व, कठोरता, दुर्लक्ष करणे या गोष्टी त्यास आवडू नयेत, हे अपमानकारक आहेत म्हणून ईश्वराला नाराज करतात.

पवित्र कुरआनात शुद्ध नैतिकेचे तत्त्वज्ञान अत्यंत लक्षणीय पद्धतीनं मांडण्यात आले आहेत.

> ''हे आदमची संतती, प्रत्येक वेळी मस्जिदीकडं (प्रार्थनेसाठी) निघताना उचित असा आकर्षण अंगीकारा, खा-प्या, पण एका मर्यादेत राहून. तो निश्चितच उधळपट्टी करणाऱ्यांना पसंत करीत नाही. म्हणा, जी आकर्षणं आणि

> स्वच्छ व पावन उदरनिर्वाहाच्या वस्तू अल्लाहनं आपल्या भक्तांसाठी काढल्या आहेत त्या कुणी वर्ज्य केल्यात? सांगा त्यांना, श्रद्धाळूंसाठी या (वस्तू) जगातील जीवनासाठी आहेत आणि निर्णयाच्या दिवशी तर फक्त त्याच्यासाठीच असतील. अशाप्रकारे आम्ही आमच्या वचनांचं विवेचन करतो ते जाणकारांसाठी. त्यांना सांगा माझ्या विधात्यानं व्यभिचारास अवैध ठरवलंय मग ते उघड असोत की गुप्त. तसेच पापं आणि सत्याधिष्ठित नसलेली उल्लंघनं, आणि अल्लाहचे भागीदार ठरवणं ज्यांच्याविषयी अधिकृत (प्रमाण) अवतरले नाहीत आणि अल्लाहविषयी असं काही बोलणे ज्याची तुम्हाला माहिती नाही.''
>
> (कुरआन, ७:३१-३३)

इस्लामच्या नैतिकता इतक्या विस्तृत आहेत की यामधील मूल्यांमध्ये ईश्वरावरील श्रद्धा, धार्मिक कर्मकांड आध्यात्मिक विधी, सामाजिक वर्तन, निर्णयप्रक्रिया, बौद्धिक कार्य, खाण्या-पिण्याच्या सवयी, बोलचाल आणि माणसांच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राचा समावेश होतो. नैतिकता इस्लामचं अविभाज्य अंग असल्यानं कुरआनातील प्रत्येक आयतीमध्ये नैतिकतेचा उल्लेख होत असतो. नैतिक शिकवणीवर विविध संदर्भांमध्ये वारंवार भर दिली जाते.

पवित्र कुरआनात अल्लाह फर्मावत आहे :

> ''अल्लाहची भक्ती करा, त्याचा कोणी भागीदार करू नका. आणि माता-पित्यांशी दयेनं वागा. तसेच जवळच्या नातेवाईकांशी, अनाथांशी, निराधारांशी, निकटच्या शेजाऱ्यांशी, निकटवर्ती, अनोळखी, सान्निध्यातील लोकांशी, प्रवाशांशी आणि तुमच्या अधीन असलेल्यांशी (सदवर्तनानं वागा), कारण अल्लाहला उद्दाम आणि गर्विष्ट माणसं आवडत नसतात. जे लोक लोभी असून इतर लोकांनादेखील त्याचे धडे देतात, अल्लाहनं आपल्या

कृपेनं त्यांना जे काही दिलंय ते लपवून ठेवतात (तेही अल्लाहला आवडत नाहीत) आम्ही अशा अधर्मी लोकांसाठी अपमानित करणारी शिक्षा तयार ठेवली आहे. आणि जे लोक इतरांना दाखवण्यासाठी आपली मालमत्ता खर्च करतात, अल्लाहवर त्यांची श्रद्धा नाही की अंतिम दिनावरदेखील त्यांचा विश्वास नाही. सैतानाला ज्यांनी सोबती निवडला, भयानकच तो सोबती (ठरला).''

(कुरआन, ४:३६०३८)

# जिहादची संकल्पना

न्यायासाठी सतत संघर्ष करत राहणं म्हणजे जिहाद. निश्चित उद्दिष्टासाठीचा लढा अनेक प्रकारचा असू शकतो. प्रेषितांचं एक विधान असं की, सर्वोत्तम जिहाद स्वत:शी, आपल्या अहंकाराविरूद्ध, लोभ आणि कधी न संपणाऱ्या इच्छांविरूद्ध आहे. एका समाजासाठी त्याच्या विकासासाठीही जिहाद केला जातो. अत्याचारी एकाधिकारवादी विचारांविरूद्धही, समाजाच्या बौद्धिक उन्नतीसाठीही बौद्धिक जिहाद केला जातो. अत्याचार आणि हिंसेविरूद्ध, शारीरिक लढा देणं हा शेवटचा प्रकार आहे. अशा प्रकारे जिहाद फक्त 'धर्मयुद्ध' नव्हे. कुणावर अतिक्रमण करणं, एखादा भूप्रदेश जिंकणं किंवा एखादी राजकीय व्यवस्था लोकांवर लादण्यासाठी जिहाद केला जात नाही. हे एक संरक्षणार्थ युद्ध आहे आणि जे लोक यात गुंतलेले असतात त्यांच्यावर काही जबाबदाऱ्या टाकलेल्या असतात. जिहाद पूर्णपणे युद्धाच्या इस्लामी नियमानुसार करायचा असतो. याचा अर्थ निष्पाप स्त्री-पुरुष, मुलंबाळं, शस्त्रहीन नागरिकांना हानी पोचवू नये. मालमत्ता आणि पर्यावरणाची नासधूस करू नये. परधर्मियांच्या धर्मस्थळांना उद्ध्वस्त करू नये. अपहरण करणं, ओलीस ठेवणं, नागरिकांवर बेछूट गोळीबार करणं, ज्या ठिकाणी लोक राहतात, काम करतात अशा ठिकाणी बॉम्ब पेरू नयेत. ही सर्व ती कृत्यं आहेत ज्यांची इस्लाम निंदा करतो.

कुणाकडूनही कुणाविरूद्ध जिहादची घोषणा केली जाऊ शकत नाही. उदाहरणार्थ- एक मुस्लिम देश दुसऱ्या देशाविरूद्ध जिहादची घोषणा करू शकत नाही किंवा एखादा अत्याचारी एकाधिकारशाह आपल्या विरोधातील देशांविरूद्ध जिहादची घोषणा करू शकत नाही. जिहादसाठी सर्व मुस्लिम समुदायाची सहमती असणे आणि शत्रुला निश्चित करणं आवश्यक आहे.

# शरिआह

## इस्लामी कायद्याची संकल्पना

शरीआह इस्लामचा अविभाज्य घटक आहे. याला साधारणपणे 'इस्लामी कायदा' म्हटलं जातं. यामुळं शरिआह म्हणजे केवळ फौजदारी कायदे आणि दंड आकारणी यांचा यात समावेश होतो अशी समज निर्माण होते. पण शरिआहमध्ये पारंपरिक कायद्यांव्यतिरिक्त बरेच काही सामावलंय. शरिआह समाजजीवनाच्या स्थापनेसाठी कायदेशीर चौकट उपलब्ध करून देते. मुस्लिमांच्या व्यक्तिगत आणि सामूहिक आचारासाठी नैतिक, सामाजिक आणि राजकीय वर्तनाची व्याख्या करून देते.

शरिआह किंवा इस्लामी कायदा मुस्लिमांची आचारसंहिता आहे ज्याचे दोन स्रोत आहेत - कुरआन आणि प्रेषितांची सुन्नाह, ज्याचं उद्दिष्ट मानवजातीचं कल्याण आणि या जगी व परलोकात मरणोत्तर जीवनात त्याचा उत्कर्ष होय. मानवजातीच्या मार्गदर्शनासाठी शरिआह परिपूर्ण कायदेसंग्रह नेमून देते म्हणजे समाजामध्ये नेकी 'मारूफ'ची स्थापना व्हावी आणि दुष्टतेचं निर्दालन व्हावं. हे एक स्पष्ट आणि सरळमार्गाची तरतूद करून देते, जेणेकरून जीवनात उन्नती व परिपूर्णता आणि ईश्वराची मर्जी लाभावी.

शरिआहचा मुख्य स्रोत आहे कुरआन. यामध्ये सिद्धान्त दिले आहेत आणि यांना अंमलात कसं आणावं याची 'ब्लू प्रिंट' प्रेषितांच्या 'सुन्नाह' (कृती) मध्ये देण्यात आलीय. उदाहरणार्थ- कुरआन म्हणतो, नमाज कायम करा, उपवास करा, जकात द्या, आपला निर्णय सल्लामसलतीनं घ्या. वाममार्गातून कमवू नका आणि खर्च करू नका. पण हे कार्य कसं करावं याचं वर्णन यात नाही. हे प्रेषितांच्या सुन्नाह आम्हाला त्या सिद्धान्तांना कसे आचरणात आणावे हे दाखवून देतात.

कुरआन मार्गदर्शनाचा मूळ ग्रंथ आहे आणि त्यावर कसं चालावं हे प्रेषितांनी शिकवलं. प्रेषितांनी आम्हाला त्या मार्गदर्शनावर कसं अनुसरण करावं एवढंच सांगितलं नाही तर त्यांनी स्वत: ते प्रत्यक्षात आणलं. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) एक कुरआनचं जीवित स्वरूप होतं.

## शरिआहचा उद्देश

शरिआहचा अंतिम हेतू माणसांचा एकमेकांशी दयापूर्ण व्यवहार, शासन आणि जनता यांच्याबाबत आपुलकी या आधारांवर एका समाजाचं गठण करण्याचा आहे. हा हेतू साध्य करण्यासाठी व्यक्ती आणि समाज, जनसमूह आणि राज्यव्यवस्था, सत्ताधीश आणि प्रजा यांचे एकमेकांवरील हक्काधिकार आणि जबाबदाऱ्यांना महत्त्व देते. एका नैतिक समाजाची निर्मिती, ज्यात सामाजिक, धार्मिक आणि राजकीय न्यायावर भर दिला जाईल, हा शरिआहचा मुख्य हेतू आहे. शरिआहच्या विचाराधीन मानवाचं संपूर्ण स्वातंत्र्य आहे. शरिआहप्रमाणे आचरण करणं अथवा शरिआहनुसार आचरण न करण्याचं स्वातंत्र्य आहे.

शरिआहच्या नियमांनुसार ज्यांना समाजव्यवस्था करायची असते ते स्वखुशीनं आणि पूर्ण जाणिवेनं करतात. शरिआह एक स्वतंत्र समाजाची कल्पना मांडते. स्वत:चे नियोजन करण्यास समर्थ अशा समाज आणि आपल्या साधनांची मालकी असलेला समाज जर स्वत:च्या साधनांचा उपयोग करण्यास स्वतंत्र नसेल तर तो या साधनांची योग्य रितीनं कशी वाटणी करून देऊ शकेल आणि आपल्या सदस्यांना आर्थिक आणि सामाजिक न्याय कसा मिळवून देऊ शकेल? शरिआहवर आधारलेल्या समाजासाठी स्वावलंबी, स्वयंपूर्ण आणि स्वत:च्या समाजाची प्रगती वैयक्तिक आणि सामूहिकपणे आवश्यक तत्त्वे आहेत.

# फिकह

## इस्लामी कायदेशास्त्राची संकल्पना

'फिकह' इस्लामी कायदा अथवा कायदेशास्त्राचं विज्ञान आहे. इस्लामी कायदे ज्यांचा मुलाधार कुरआन आणि प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या सुन्नाहवर आहे. यांचं स्पष्टीकरण, संकलन आणि एकत्रीकरणाशी यांचा संबंध आहे. 'फिकह'चा शब्दश: अर्थ ज्ञान आणि बुद्धिमत्ता आहे. अशाप्रकारे सुरुवातीच्या कायदेतज्ञांनी आपल्या ज्ञान आणि बुद्धिमत्तेद्वारे शरिआहपासून तयार केलेले कायदे आहेत. विस्तृत कल्पनेनुसार फिकहमध्ये धार्मिक, राजकीय आणि सामाजिक जीवनाचं प्रत्येक क्षेत्र सामावलंय. उपासनेसंबंधीच्या कायद्यांबरोबरच यामध्ये कौटुंबिक कायदे, मालमत्तेसंबंधी कायदे, वारसाहक्काचे कायदे तसेच यात राज्य प्रशासनासंबंधीच्या व युद्धसंबंधीच्या कायद्यांचा समावेश आहे.

इस्लामी कायदे म्हणजेच शरिआह, आदर्श इस्लामी जीवन साकारते. इस्लाम परिपूर्ण जीवनव्यवस्था आहे आणि इस्लाम ज्या आदर्श समाजाची कल्पना देतो ते साकारण्याचं माध्यम शरिआह आहे. शरिआह आम्हाला आमचं जीवन अल्लाहच्या बरहुकूम जगण्यास समर्थ करते. या जीवनात आपलं उद्दिष्ट पूर्ण करण्याचं हे माध्यम आहे.

इस्लामी कायद्याच्या अभ्यासकांनी फिकहचं विज्ञान समजून घेण्यासाठी शरिआहला सोपं केलंय. जो माणूस फिकहचं सखोल ज्ञान आणि समज बाळगतो, त्यास 'फकीह' म्हटलं जातं. शरिआहशी संबंधित प्रकरणांमध्ये निर्णय देण्यास योग्य असतो त्याला 'मुफ्ती' म्हणतात. त्यानं दिलेल्या निर्णयास 'फतवा' म्हणतात.

# इज्तिहाद

## बदलाचं मूलभूत तत्त्व

शरिआह इस्लामसाठी कायमस्वरूपी स्थान उपलब्द करून देते. पण इस्लाममध्ये जे स्थायी आहे ते बऱ्याच अंशी नैतिक आहे. जे उपासनेचे प्रकार, काही सामाजिक दुष्कृत्यं वर्ज्य करणारे आदेश आणि सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाचे सिद्धान्त आणि ज्ञानाची प्रेरणा देणारे आहेत. बाकी सर्वकाही बदलू शकतात. इस्लाम एक चैतन्यशाली, वृद्धिंगत आणि पुरोगामी समाजाची कल्पना रुजवितो.

बदल घडवून आणण्याच्या सिद्धान्ताला इस्लाममध्ये 'इज्तिहाद' म्हणतात. शरिआहशी निगडीत एका प्रश्नाला समजून घेण्यासाठी स्व-आकलणावर जास्तीतजास्त शक्ती उपयोगात आणणं अशी 'इज्तिहाद'ची व्याख्या आहे. या आकलनासाठी नव्या पद्धती, नव्या सामाजिक व बौद्धिक अंतरंग आणि समंजसपणाच्या नवीन वाटा उपयोगात आणल्या जाऊ शकतात. इज्तिहादद्वारे शरिआहचे नवीन आकलन होते आणि जागतिक मुस्लिम समुदायाची त्यास सहमती प्राप्त होते, त्यावेळी तो इस्लामी कायद्यांचा एक भाग बनतो.

इज्तिहाद (सर्वांगीण स्पष्टीकरण), इजमा (सहमती), शूरा (सल्लामसलत) आणि इस्तिस्लाह (सार्वजनिक हित) च्या आधारावर मुस्लिम समाजाची आगेकूच होते, समाज बदलाशी सुसंगत होतो आणि इस्लामी कायदा विस्तारित होतो.

# शूरा

## सल्लामसलतीची संकल्पना

'शूरा' म्हणजे सल्लामसलत. यात जीवनाचे प्रत्येक अंग सामावलं असून विविध परिस्थिती सहजपणे हाताळू शकते. इस्लाममध्ये राजकीय वर्तुळातच याला उत्तेजन दिलं जात नाही तर सामाजिक स्तरावर, त्याचबरोबर कौटुंबिक आणि व्यावसायिक क्षेत्रासुद्धा प्रोत्साहन दिलं जातं.

''जेव्हा लोक आपलं प्रकरण सल्लामसलतीनं हाताळत असतात.'' (कुरआन, ४२:३८) तेव्हा यास कुरआन शूरा म्हणून संबोधतो. म्हणजेच शूरा इस्लामचा बंधनकारक सिद्धान्त आहे.

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) महत्त्वाच्या प्रकरणांचा, मग ते समाजाशी संबंधित असोत की घरातील प्रश्न, आपल्या सान्निध्यातील अनुयायांच्या सल्लामसलतीनं निर्णय घेत असत. अशी अनेक उदाहरण त्यांनी घालून दिलीत ज्यांत त्यांनी सल्लामसलत केली, मग ते लोकांचं म्हणणं ऐकून घेण्यासाठी असोत की ती अंमलात आणण्यासाठी असोत. अशा रितीनं त्यांनी एक न्यायी, मार्गदर्शक, सेनापती, पिता आणि पती कसा असावा याचा कित्ता गिरवला. खरं पाहता त्यांच्यासाठी शूरा एक अविभाज्य प्रक्रिया होती आणि त्यांनी आपल्या समाजात त्याला रूढ केलं. आपसांतील संभाषण आणि एकतेस चालना दिली.

शक्तिशाली अल्लाह प्रेषितांना म्हणतो :

> ''तुम्ही (प्रेषित) त्यांच्या बाबतीत मायाळू स्वभावाचे आहात हे अल्लाहच्या कृपेनंच. तुम्ही जर कडक आणि कठोर वृत्तीचे असता तर ते तुमच्याकडून पळून गेले असते. तेव्हा त्यांना माफ करा, त्यांच्यासाठी क्षमेची याचना करा. त्यांच्याशी सल्लामसलत करा आणि एकदा का ठरवल्यावर अल्लाहवर विश्वास टाका. निश्चितच अल्लाह विश्वास टाकणाऱ्यांना पसंत करतो.'' (कुरआन, ३:१५९)

# परिवारात सल्लामसलत

परिवारामध्ये ‘शूरा’- सल्लामसलत करणं आणि या प्रक्रियेत मुलांनाही सामील करणं अत्यंत महत्त्वाचं आहे. सल्लामसलत परिवारास बळकट करतो आणि समावेशक निर्णय घेण्याचं वातावरण निर्माण करतो. यामुळं मुलाबाळांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि कुटुंबात विश्वसनीय नात्यांची जोपासना होते. शूरा जेव्हा परिवाराचा एक घटक असते तेव्हा जीवनाच्या ओभडधोबड वाटा सुकर होतात, जसं- मुलांच्या संगोपनाचा काळ, त्यांच्या वर्तनार होणार बदल, आर्थिक आव्हानं, प्रिय व्यक्तीचं सोडून जाणं इ..

> प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी विधान केलंय,
>
> “ज्यांचं वर्तन सर्वोत्तम असते असे श्रद्धावंत श्रद्धेत परिपूर्ण असतात. तुमच्यातील सर्वोत्तम ते लोक आहेत जे आपल्या परिवारासाठी उत्तम असतात.”

आता आपण आपल्या वर्तनाशी तुलना करा. आपण आपल्या महिलांचं मत मान्य करूनच व्यवहार करतो. त्यांचं मत विवाहासारख्या अतिमहत्त्वाच्या बाबतीतही टाळत असतो, ही स्थिती गुंतवणूक, घराचं बांधकाम, मुलांचं शिक्षण- ज्यांच्या जन्मामध्ये त्यांची भागीदारी ९० टक्क्यांपेक्षा अधिक असते- या बाबतीत आहे. अनेकजण स्त्रीला दुय्यम अस्तित्व समजतात. यामध्ये ते लोकही आहेत जे महिलांच्या हक्काधिकारांचं रक्षण करत असतात आणि जे कायदेविषयक उच्चस्थानावर कार्यरत असतात. याउलट स्त्रिया एका अखंड अस्तित्वाचा भाग आहे आणि याच निम्म्या भागामुळं दुसऱ्या भागाला उपयुक्तता लाभते. त्यांची स्थिती पुरवणी नसून सराहनीय आहे. जेव्हा दोन भाग एकत्र येतात तेव्हा पूर्णत्व लाभते. असा एकोपा नसेल तर मानवजात अखंड होऊ शकत नाही. मग ते प्रेषित असोत की संत असोत अथवा साधारण मनुष्य.

# विहित आणि निषिद्ध

## कायदेशीर आणि बेकायदेशीरची संकल्पना

इस्लाम एक परिपूर्ण जीवनव्यवस्था आहे. एक व्यक्ती किंवा समाजाच्या जीवनाचा कोणताही भाग इस्लाममधून वगळलेला नाही. आर्थिक बाजू जीवनाचा महत्त्वाचा भाग असतो, म्हणून इस्लाम आपल्या आर्थिक जीवनाबाबत सविस्तर मार्गदर्शन करतो. प्रामुख्यानं आपण संपत्ती कशी कमावतो आणि ती कशी खर्च करतो याची इस्लाम काळजी घेतो. इस्लामची व्यवस्था संतुलित असून तो प्रत्येक गोष्ट योग्य ठिकाणी ठेवतो.

आमच्या जगण्यासाठी पैसा कमवणं आणि तो खर्च करणं आवश्यक आहे; पण आपण यासाठीच जगत नसतो. माणसाला जगायला भाकरीची गरज असते; पण तो केवळ भाकरीसाठीच जगत नाही. या जीवनात आमचं उद्दिष्ट महान आहे. आपण धरतीवर ईश्वराचे प्रतिनिधी (खलीफा) आहोत. आपलं शरीरच नाही तर आत्मा (रूह) देखील आहे त्याचबरोबर विवेकबुद्धीही. सद्सद्विवेकबुद्धी नसेल तर आपण एखाद्या जंगली जनावरापेक्षाही अधिक वाईट असू आणि मसाजामध्ये मोठ्या समस्या निर्माण करू.

इस्लाममध्ये प्रत्येक वस्तू मानवजातीचे फायदे आणि कल्याणासाठी आहे. इस्लामच्या आर्थिक सिद्धान्तामागे एक न्याय्य समाजाची स्थापना आहे, ज्यामध्ये आपण जबाबदारीनं आणि प्रामाणिकपणे वागावं; स्वहितासाठी नव्हे. प्रामाणिकपणा, सभ्यपणा, विश्वासार्हता आणि जबाबदारीचा विचार न करता शक्यतो मोठ्या प्रमाणात मिळवण्यासाठी स्वहित जपण्यासाठी आपसांत भांडण करू नये.

इस्लामी आर्थिक व्यवस्था खालील सिद्धान्तांवर आधारित आहे.

१. कमवणं आणि खर्च करणं कायदेशीर मार्गानं (हलाल).

मुस्लिमांनी त्यांना हव्या त्या मार्गानं कमवणं आणि खर्च करण्याची अनुमती नाही. कुरआन आणि सुन्नाह (प्रेषित मुहम्मद यांच्या शिकवणी आणि त्यांचं आचरण) वर इस्लामचे कायदे आधारलेले आहेत.

अ) मादक पदार्थांचं उत्पादन, विक्री आणि त्यापासून कमाई कायदेशीर नाही. तसेच जुगार, लॉटरी आणि व्याज देणं-घेणं निषिद्ध आहे. (कुरआन- ५:९०-९१, २:२७५)

ब) लबाडी, धोका देणं, चोरी करणं आणि फसवणूक करून कमवणं निषिद्ध (हराम) आहे. अनाथाची मालमत्ता फसवणुकीनं हस्तगत करणं विशेषकरून निषिद्ध आहे. (कुरआन- ७:८५, २:१८८, ४:२, ६:१५२, ८३:१-५)

क) अन्नधान्य आणि आवश्यक वस्तूंचा साठा करणं आणि कृत्रिम कमतरता निर्माण करणं बेकायदा आहे. (पाहा- कुरआन- ३:९८, ९:३४-३५)

ड) देहव्यापार आणि समाजाला घातक अशा इतर अनैतिक स्त्रोत बेकायदा आहेत. (पाहा- कुरआन- २४:२३)

इस्लाम दुष्टतेच्या मुळावर आघात करतो आणि एक न्यायी व प्रामाणिक समाज स्थापू इच्छितो. एका मुस्लिमानं वैध मार्गानं कमवावं आणि त्यानं हे लक्षात ठेवावं की तो जे काही करतो त्याची ईश्वराला माहिती आहे. निवाड्याच्या दिवशी तो आपल्या कृत्यांसाठी जबाबदार राहील. शक्तिशाली ईश्वराच्या माहितीपासून तो काहीही लपवू शकत नाही.

इस्लाममध्ये अवैध खर्च करण्यास परवानगी नाही. एका मुस्लिमानं आपली संपत्ती बेजबाबदारपणे खर्च करू नये. त्यानं विचारपूर्वक आणि समंजसपणानं खर्च करावा. उधळपट्टी आणि वाया घालवण्यापासून परावृत्त केलं गेलंय. (कुरआन- ७:३१, १७:२६)

# ९

# दैनंदिन जीवनात इस्लामचं आचरण

## इस्लाममधील पारिवारिक जीवन

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना जगभर पसरलेल्या मानवजातीचं मार्गदर्शन करून त्याची सुधारणा करण्याचं कार्य नेमून दिलं होतं. यात जीवनाच्या भौतिक आणि आध्यात्मिक या दोन्ही अंगांचा समावेश होता आणि त्यांना हे कार्य कुरआनद्वारे लाभलेल्या दैवी मार्गदर्शनानुसार पार पाडण्यास सांगितलं होतं.

कुरआन आणि प्रेषित मुहम्मद यांच्या शिकवणींनी काळ आणि समाजाची बंधनं ओलांडली होती. त्यांचा संबंध जीवनातील प्रत्येक क्षेत्राशी होता, ज्यांची माहिती होती किंवा अद्याप ही माहिती झालेली नव्हती. त्यांनी वैश्विक विचारधारा मांडली आणि त्यानुसार नियम आणि कायदे केले. ही व्यवस्था मानवजातीचा समाईक वारसा असून ज्याला जे हवंय ते मिळवता येतं. उत्तम माणूस आणि उत्तम उपासक बनण्यासाठी मुस्लिम आणि मुस्लिमेतर यांना पुढं जाऊन कुरआन आणि प्रेषितांच्या शिकवणींचा अधिक अभ्यास करण्याची प्रेरणा दिली. जर आपली आराधना लोकांची काळजी घेणं, त्यांच्यावर कृपा करणं, आपल्याभवती पर्यावरण आणि पशु-पक्षांबाबत काळजी घेणं यापासून मुक्त असेल तर अल्लाह त्याकडं लक्ष देत नाही.

खाली इस्लामनं मानवजातीसाठी घालून दिलेली काही तत्त्वे आहेत जी आजच्या २१व्या शतकातील परिपक्व अशा काळामध्ये आमचा मार्ग प्रकाशमान करतील.

# माता-पित्यासाठीची कर्तव्यं

माता-पिता सर्वांत जास्त दयेस पात्र लोकांमधील आहेत. कारण कुरआन तौहीद (ईश्वराचं एकत्व) चा संबंध दया आणि कृपा करण्याशी जोडतो.

> ''तुझ्या विधात्यानं आज्ञा दिली त्याच्याशिवाय कुणाची भक्ती करू नका, माता-पित्याशी चांगुलपणानं वागा.''
> (कुरआन, १७:२३)

अल्लाहची आराधना करण्याच्या आदेशानंतर आम्हाला लोकांशी दयेनं वागण्यास सांगितलंय. यासंबंधानं पहिल्यांदा माता-पित्याचा उल्लेख केलाय.

> ''आणि माता-पित्याशी भलाई करा.'' (कुरआन, ४:३६)

कुरआनात असंख्य ठिकाणी ईश्वराच्या आराधनेनंतर आपल्या माता-पित्याशी चांगुलपणाचा व्यवहार करण्यास ठळकपणे सांगितलंय. याचा अर्थ ईश्वराच्या उपकारानंतर माता-पित्याचे उपकार फार मोठे आहेत. माणसाच्या अस्तित्वात त्याचा जन्म, संगोपन, त्याचं शिक्षण आणि त्याच्या नैतिक व ऐहिक प्रगतीमध्ये त्यांची भूमिका महान असते. माता-पित्यांनी काळजी घेतली नाही तर त्याचा विकास संकटात सापडेल. निरक्षर आणि अडाणी माता-पितादेखील आपल्या मुलासाठी इतकं बलिदान देतात की त्याची तुलना समाजातील कुणाशीही होत नाही.

माता-पित्यांच्या उपकारांमध्ये आम्हाला ईश्वराच्या उपकारांचं प्रतिबिंब आढळते. उपासना-आराधना खरं पाहता ईश्वराच्या उपकारासाठी त्याची कृतज्ञता व्यक्त करणे होय. माता-पित्याची स्थिती ईश्वरासमान नाही

म्हणून त्यांची आराधना करता येत नाही. त्यांच्याशी अत्यंत आदरपूर्वक वागायला हवं. त्यांच्याशी दयापूर्ण व्यवहार करणं त्यांच्या उपकारांची परतफेड करण्याचा एक मार्ग आहे. कुरआन आम्हाला ईश्वराशी आणि माता-पित्याशी कृतज्ञता व्यक्त करण्याचा आदेश देतो :

> ''माझं कृतज्ञ व्हा आणि माता-पित्यांचं. (तुम्हांस) माझ्याप्रतच येणं आहे.'' (कुरआन, ३१:१४)

## भौतिकवादी समाज

आधुनिक सभ्यतेनं परिवारसंस्था भंग केलीय. या व्यवस्थेची उच्च मूल्येदेखील खिळखिळी केली आहेत. या प्रक्रियेचा वृद्ध माता-पित्यांवर विदारक परिणाम झाला. आजकाल लोक आपली उपयुक्तता संपवलेल्या माता-पित्यांचे काय करावे यावर चर्चा करत आहेत. भविष्यात ते कोणती उपयुक्त भूमिका वठवत नसताना कुठवर त्यांना सहन करावे. ज्या माता-पित्याचा आज इतका तिरस्कार केला जातो, एकेकाळी त्यांना आपल्या मुलांवर इतकी सत्ता होती की त्यांनी त्यांचा सहज नाश केला असता; पण त्यांनी तसं केलं नाही. नवीन पिढी एकवेळ त्याच वृद्ध माता-पित्यांच्या दयेवर विसंबून होती, तरीदेखील त्यांनी परिश्रम घेतले, घाम गाळून आपल्या मुलाबाळांचं संगोपन केलं. पवित्र कुरआननं आपल्या वृद्ध माता-पित्यांशी नम्रतापूर्वक आणि दयेनं वागण्यचे आदेश दिले आहेत.

> ''त्यांच्यापैकी एक अथवा ते दोन्ही वृद्धापकाळात पोचले तर त्यांच्यासमोर 'ब्र' शब्ददेखील काढू नका, त्यांना झिडकारू नका, त्यांच्याशी आदरानं बोला. आणि त्यांच्यासमोर सहानुभूती व नम्रतेनं झुका आणि म्हणा, हे विधाता तू यांना दया दाखव जसं त्यांनी लहानपणी माझं पालन केलं.''
> (कुरआन, १७:२३-२४)

इस्लाममध्ये आपण माता-पित्यासाठी प्रार्थना करणं इतकंच पुरेसं नाही. त्यांच्याशी आपण अमर्याद स्नेहानं व्यवहार करावा, आपण जेव्हा

लहान होतो त्यावेळी त्यांनी आम्हाला स्वत:वर प्राधान्य दिलं याची आठवण करावी, मातेचा विशेष आदर करावा.

आपले माता-पिता / वृद्ध माणसांची त्यांच्या जीवनातील अत्यंत कठीण काळात काळजी वाहणम्याचा त्रास सहन करणं एकप्रकारचा आदर आणि धन्यता समजली जाते आणि आध्यात्मिक उंची प्राप्त करण्याची एक संधी. जेव्हा माता-पिता वृद्धापकाळ गाठतात तेव्हा त्यांची सेवा मोठ्या दयेनं, कृपेनं आणि नि:स्वार्थीपणानं केली जावी.

> ''त्यांना 'ब्र'देखील शब्द बोलू नका, त्यांना झिडकारू नका, त्याच्याशी आदरानं बोला.'' (कुरआन, १७:२३)

# स्त्रिया

अत्याचारपीडित, अल्पदर्जाची, पुरुषासमान नाही; मुस्लिम स्त्रीचा विचार करताना अनेक लोकांच्या मनात हेच शब्द येतात. या ठराविक साचांमुळं आणि एकीकडं मुस्लिमांची पारंपरिक सभ्यता आणि दुसरीकडं इस्लाम, असा गोंधळ निर्माण होतो. हे मान्य करणं की इस्लामनं सातव्या शतकातच मुस्लिम स्त्रीला सशक्त करून तिला अत्यंत पुरोगामी हक्काधिकार दिले होते, कठीण जाते. इस्लाममध्ये स्त्री पुरुषापेक्षा कमी दर्जाची आणि असमान नाही. या अध्यायात मुस्लिम स्त्रीविषयी इस्लामची प्रत्येक शिकवण, तिचे अधिकार, तिची भूमिका आणि जबाबदाऱ्या, इस्लाममधील लैंगिक समानतेवर केंद्रित प्रस्तुत केले जात आहे.

अशा काळात जेव्हा अरबस्थानात मुलींना जीवंत गाडलं जाई आणि स्त्रियांना जंगम मालमत्ता समजलं जात होते. इस्लामनं स्त्रियांना अभूतपूर्व हक्काधिकार देऊन संरक्षण दिलं आणि समाजामध्ये त्यांना उच्चस्थान मिळवून देऊन तिला आदरसन्मान बहाल केला. इस्लामनं स्त्रियांना शिक्षण, आपल्या आवडत्या व्यक्तीशी विवाह करणं, मालमत्तेची मालकी, कायद्याद्वारे आपलं रक्षण करणं, मताधिकार आणि नागरी व राजकीय प्रक्रियेत सहभागाचे हक्काधिकार दिले.

इ. स. ६१० मध्ये ईश्वरानं प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) मक्केत इस्लामच्या संदेशाच्या अवतरणाची सुरूवात केली. प्रेषित मुहम्मद यांनी लोकांना एकमेव ईश्वराची श्रद्धा व्यक्त करण्याचं आमंत्रण दिलं आणि एकमेकांशी न्याय व दयापूर्ण वर्तन करण्याची प्रेरणा दिली. खोट्या देवांची पूजा करणाऱ्या अरब समाजाची सुधारणा करताना महिलांशी व्यवहार करण्याची त्यांची मानसिकता बदलून टाकली. मुलींना ठार करण्याची पद्धत

निषिद्ध ठरवून इस्लामनं समाजात स्त्रीचा दर्जा उंचावला. तिला आदर, अब्रू आणि प्रतिष्ठा बहाल केली.

ईश्वरानं इस्लामचा पवित्र ग्रंथ कुरआनचा एक सबंध अध्याय स्त्रियांच्या नावानं अर्पण केलाय. ईश्वराद्वारे कुरआनातून स्त्रीशी वारंवार रास्त संबोधन करतो. इस्लाम स्पष्ट करतो की सर्व मानवजात, पुरुष आणि स्त्रिया पवित्र अवस्थेत जन्मले आहेत. प्रत्येक मुस्लिमाचं उद्दिष्ट या दुष्ट वृत्तींना आळा घालून त्यांच्या अस्तित्वाला सद्‌गुणाचं सौंदर्य मिळवून देऊन या पावित्र्याचं जतन करणं आहे.

इस्लाम पुढं जाऊन हे सिद्ध करतो की ईश्वराच्या नजरेत स्त्री आणि पुरुष दोन्ही समान आहेत. पवित्र कुरआनात ईश्वर जाहीर करतो,

> ''...खरं पाहता अल्लाहपाशी तुमच्यापैकी तोच प्रतिष्ठित आहे जो सदाचारी आहे.'' (कुरआन, ४९:१३)

कुरआनात इतर एके ठिकाणी ईश्वर स्पष्टरित्या घोषणा करतो की सर्व मानव समान आहेत.

> ''पुरुष अथवा स्त्रियांचपैकी कुणीही श्रद्धा ठेवून नेक कर्म केलं तर आम्ही त्यांना पावन जीवन देऊ. तसेच परलोकातदेखील त्यांना त्यांच्या कर्मांचा उत्तम मोबदला देऊ.'' (कुरआन, १६:९७)

इस्लाम निर्विवादपणे हे सिद्ध करतानाच की पुरुष आणि स्त्रिया समान आहेत, तो हेदेखील मान्य करतो की दोघे सारखे नाहीत. ईश्वरानं स्त्री आणि पुरुषास विशिष्ट शरीररचना आणि मानसशास्त्र गुणधर्मांनी निर्माण केलंय. इस्लाममधील एका निरोगी कुटुंब आणि समाजरचना ज्यामध्ये प्रत्येक व्यक्ती आपल्या उपजत कौशल्याचं योगदान देतो, हे मतभेद एक महत्त्वाचा घटक म्हणून स्वीकारलाय.

अशा प्रकारे ईश्वराचे नियम दोन्ही लिंगांना लागू होतात, पण निराळ्या पद्धतीनं. उदाहरणार्थ- ईश्वरानं स्त्रीला आपल्या शरीराचा काही भाग झाकून ठेवण्यास सांगितलंय, यात त्यांच्या केसांचादेखील समावेश आहे, हे

त्यांची विनयशीलता जपण्यासाठी. पुरुषांनाही आपल्या शरीराचा काही भाग झाकण्याची आवश्यकता दर्शविली आहे. विनयशीलता जपण्यासाठीच. पण स्त्रियांसारख्या पद्धतीनं नव्हे. ईश्वरानं पुरुष व स्त्री दोघांना सभ्यता अंगीकारण्याचा आदेश दिलाय. पण ज्या पद्धतीनं ते अंमलबजावणी करतात ती भिन्न आहे.

अशाच प्रकारे स्त्री-पुरुषांचे हक्काधिकार, जबाबदाऱ्या आणि दोघांच्या भूमिकेत संतुलन पाळलंय; पण ते सारखं नाही. इस्लामनं स्त्री आणि पुरुषांना जशी व्यक्तिगत अस्मिता बहाल केलीय, त्यांच्यात नेहमी तुलना करत राहणं चुकीचं आहे. दोघं सामाजिक नैतिकता आणि त्याचं संतुलन जतन करण्यासाठी आपापली भूमिका पार पाडतात. पुढं इस्लाममध्ये स्त्रियांच्या विस्तृत हक्काधिकारांचा तपशील दिला जातो. यात काही साधारण अपसमज विशद केले आहेत आणि समाजामध्ये ज्या निरनिराळ्या भूमिका वठवितात त्यांचे अंतरंग दिलेत. या ठिकाणी याचाही उल्लेख केला जावा की मुस्लिम नेहमी इस्लामचं प्रतिनिधित्व करत नसतात. ते आपल्या सांस्कृतिक चाली-रीतींचं आणि व्यक्तिगत हितसंबंधांचं पालन करत असतील. असं करताना ते स्त्रियांचे नागरी अधिकार नाकारतात. एवढंच नाही तर स्त्रियांशी व्यवहार करण्यासंबंधी इस्लामनं घालून दिलेल्या स्पष्ट मार्गदर्शनाविरूद्ध जातात. आणि म्हणून खाली नमूद केल्याप्रमाणे त्यांची कृती इस्लामनं महिलांना दिलेलं स्वातंत्र्य आणि अधिकारांच्या विरोधात जात असते.

## शिक्षण

मागील सातव्या शतकात प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी जाहीरपणे सांगितलं की ''ज्ञान संपादन करणं प्रत्येक स्त्री-पुरुषाचं अनिवार्य कर्तव्य आहे.'' ही घोषणा अगदी स्पष्ट होती आणि ती इतिहासात मुस्लिमांनी मोठ्या प्रमाणात अंमलात आणली. इस्लामच्या सर्वांत प्रभावी अभ्यासकांपैकी प्रेषितांच्या पत्नी आयशा होत्या. प्रेषितांच्या निधनानंतर स्त्री-पुरुष त्यांच्याकडून शिक्षण घेण्यासाठी प्रयत्न करत असत, कारण त्या इस्लामच्या महान अभ्यासक मान्य करण्यात आल्या होत्या. स्त्री-अभ्यासक

आणि साहित्याच्या क्षेत्रात महिलांच्या सहभागाला इस्लामी इतिहासात नेहमी प्रोत्साहन दिलं जात होतं. उदाहरणार्थ- अल-करावियीन ही मस्जिद आणि विद्यापीठ, सर्वांत जुन्या कार्यरत विद्यापीठाची स्थापना फातिमा-अल-फिहरी या महिलेनं मोरोक्को इथं इ. सन ८५९ ला केली होती.

## मातृत्व

इस्लाममध्ये ईश्वरानं मातेला उच्च स्थान देऊन कुटुंबात तिला महत्त्वाचं स्थान दिलंय. माता आपल्या मुलांना जन्म देऊन जे बलिदान देत राहतात, असा उल्लेख कुरआनात ईश्वरानं केलाय, जेणेकरून लोकांनी आपल्या मातांची काळजी घ्यावी, त्यांचा आदर करावा आणि स्नेहपूर्वक वर्तन करावं.

मातांचं महत्त्व विशद करताना प्रेषित म्हणाले, ''स्वर्ग तुमच्या मातेच्या चरणांखाली आहे.''

एका दुसऱ्या प्रसंगी एक व्यक्ती प्रेषितांना वारंवार विचारत होती, ''या जगात कुणी अधिक प्रेमास आणि अधिकारास पात्र आहे?''

प्रत्येक वेळी प्रेषितांनी उत्तर दिलं, ''तुमची माता.''

जेव्हा त्या व्यक्तीनं चौथ्यांदा तोच प्रश्न विचारला तेव्हा प्रेषित म्हणाले, ''तुमचे पिता.''

प्रेषित मुहम्मद आपल्या अनुयायांना म्हणाले, ''आपल्या माता-पित्याशी दयेनं वागा, त्यांच्या धर्माचा विचार न करता.''

असमा म्हणाल्या की माझी आई श्रद्धाहीन होती. मक्केहून मदीनेस माझ्याकडं आली आणि माझ्याकडं काहीतरी मागितलं. मी प्रेषितांना विचारलं, ''माझ्या आईला माझ्याकडून काहीतरी मिळावं अशी अपेक्षा आहे. मी तिच्या विनंतीचा स्वीकार करावा काय? मी तिच्याशी आपुलकी दाखवून प्रेमळपणे वागावं काय?''

प्रेषित म्हणाले, ''होय. आपल्या आईशी दयेनं वागा.''

## राजकारण आणि समाजसेवा

आरंभकाळातील मुस्लिमांमध्ये समाजाच्या सामूहिक कार्यांमध्ये स्त्रियांचा क्रियाशील सहभाग होता. स्त्रिया आपलं मत मुक्तपणे मांडत आणि सल्ला सांगत. युद्धावेळी स्त्रिया जखमींची सेवा करीत. काहींनी तर युद्धात भागही घेतला होता. बाजारहाटमध्ये स्त्रिया मुक्तपणे व्यापार करीत असत. दुसरे खलीफा उमर यांनी तर शफ्फा बिन्त अब्दुल्लाह या महिलेस बाजारपेठेच्या अधीक्षकपदावर नियुक्त केलं होतं.

इस्लामी इतिहासात महिला शासकीय आणि सार्वजनिक कार्यामध्ये, कायदे करण्यात, अध्ययन आणि शिक्षिका म्हणून सहभागी होत असत. ही प्रथा चालू ठेवण्यासाठी समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये सेवा करणं, समाजाचं नेतृत्व करण्यासाठी महिलांना प्रोत्साहन दिलं जात असे.

## वारसा

इस्लामपूर्व जगामध्ये सर्वत्र महिलांना वारसाहक्कापासून वंचित ठेवण्यात आलं होतं. त्यांना स्वत:लाच मालमत्ता समजलं जाई आणि पुरुषांना त्या वारसात मिळायच्या. इस्लामनं महिलांना मालमत्तेच्या मालकीचे अधिकार दिले. आपल्या नात्यातील लोकांचा मालमत्तेत वारसाहक्क दिला. ही सातव्या शतकात क्रांतिकारी संकल्पना होती.

एक स्त्री पत्नी असो की माता, बहीण किंवा कन्या असो तिला तिच्या मयत नातलगांच्या मालमत्तेत एक निश्चित हिस्सा मिळत आहे. हा वाटा त्या नात्याच्या प्रमाण आणि वारसदारांच्या संख्येवर अवलंबून आहे. जगातल्या अनेक समुदायांत महिलांना वारसाहक्क नाकारलेला आहे. इस्लामनं या हक्काची स्त्रीला हमी दिली. इस्लामच्या दैवदत्त वैश्विक न्यायाचं हे द्योतक आहे.

## वित्तीय जबाबदारी

इस्लाममध्ये महिलांवर घर, अन्न आणि सर्वसाधारण खर्च करण्याचं बंधन नाही. स्त्री विवाहित असेल तर तिच्या पतीनं तिला पूर्णपणे आर्थिक आधार द्यावा. जर ती विवाहित नसेल तर ही जबाबदारी तिच्या अगदी जवळच्या पुरुष नातलगावर आहे. (पिता, चुलता, भाऊ वगैरे)

तिलासुद्धा काम करण्याचा अधिकार आहे आणि आपल्या कमाईतून इच्छेनुसार खर्च करण्याचा अधिकार आहे. तिनं आपल्या कमाईतून आपल्या पतीला किंवा परिवारातील कोणत्याही सदस्याला वाटा देणं तिच्यावर बंधनकारक नाही. उदाहरणार्थ- प्रेषितांच्या पत्नी खदीजा मक्केच्या सर्वांत यशस्वी व्यापारी होत्या आणि त्या आपल्या कमाईतून आपल्या पतीला आधार देण्यासाठी व इस्लामच्या कार्यासाठी उत्तमपणे खर्च करत होत्या.

विवाहाप्रसंगी आपल्या पतीकडून आर्थिक भेट (मेहेर) घेण्याचा स्त्रीला अधिकार आहे.

ही मेहेरची रक्कम कायदेशीर तिच्या मालकीची असून कुणीही त्याचा उपयोग करू शकत नाही. तलाकची वेळ आली तर तलाकपूर्वी तिच्याकडं जे काही होतं त्यावर तिचाच हक्क आहे. तसेच विवाहानंतर तिनं व्यक्तिगत मिळवलेल्या संपत्तीची तीच मालकीन आहे. पतीला तिच्याकडं जे काही असेल त्यावर कसलाही अधिकार नाही. यामुळं स्त्रीला आर्थिक सुरक्षा आणि स्वातंत्र्य लाभते. तलाकची वेळ आल्यावर तिला स्वत:ला आधार देण्यास ती पात्र ठरते.

## विवाह

स्त्रीला विवाहाचा प्रस्ताव स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आहे. विवाहबंधन पूर्ण करण्यासाठी तिचीसंमती आवश्यक आहे. तिच्या इच्छेविरूद्ध कुणाशी विवाह करण्यास तिच्यावर दबाव आणला जाऊ शकत नाही. काही सांस्कृतिक कारणांनी जर असं झालंच तर ते इस्लामविरूद्ध असेल.

इस्लाममध्ये विवाह परस्परांतील शांतता, प्रेम आणि स्नेह यावर

आधारित आहे. ईश्वर स्वत:विषयी सांगतो,

> ''हेदेखील त्याच्या संकेतांपैकीच, तुम्हांमधूनच तुमची जोडपी निर्माण केली (पुरुषासाठी स्त्री आणि स्त्रीसाठी पुरुष) तुम्हांस त्यांच्या सान्निध्यात सुखसमाधान लाभावं म्हणून. आणि तुमच्यामध्ये त्यानं प्रेम आणि दया रोवले.''
>
> (कुरआन, ३०:२१)

प्रेषित मुहम्मद सर्वोत्तम आचरणाचे मूर्त स्वरूप आणि मुस्लिमांसाठी आदर्श होते. घरकामात ते घरच्यांना मदत करत आणि आपल्या कुटुंबियांशी प्रेमळ व्यवहार करत होते. त्यांची ही परंपरा मुस्लिम लोक आपल्या जीवनात जगण्याचा प्रयत्न करतात. प्रेषित मुहम्मद आपल्या पत्नींशी अत्यंत आदर आणि सन्मानपूर्वक वर्तन करत होते. त्यांनी आयुष्यात कधीही त्यांना अपशब्द काढला नाही. आपल्या एका विधानात ते स्पष्ट करतात, ''तुमच्यातील सर्वोत्तम लोक आपल्या पत्नींसाठी उत्तम आहेत.''

## हानी पोचण्यापासून रक्षण व प्रतिष्ठा

इस्लाममध्ये कोणत्याही प्रकारचं भावनिक, शारीरिक आणि मानसिक दुर्वर्तन वर्ज्य आहे. महिलांशी अनुचित व्यवहार करणे या नियमांना अपवाद नाही. सविस्तरपणे इस्लामचा अभ्यास केला तर इस्लाममध्ये अशी कोणतीही शिकवण नाही जी कोणत्याही प्रकारच्या घरगुती हिंसेकडं दुर्लक्ष करत असेल.

डॉ. जैनब अलवानी, प्रख्यात मुस्लिम महिला अभ्यासक यांच्या मतानुसार, इस्लाम कोणत्याही प्रकारच्या अत्याचाराची आणि दुरुपयोगाची अनुमती देत नाही. ही गोष्ट वारंवार सांगण्यासारखी आहे की इस्लामच्या नावात जर कुणी अयोग्य अधिकार बाळगत असेल तर तो आपल्या स्वत:च्या सांस्कृतिक प्रभाव आणि स्वहित साधण्यासाठी असं करत असतो. ईश्वराची हरेक निर्मिती प्रतिष्ठित असून कायद्याचं तिला संरक्षण प्राप्त आहे.

## विनयशीलता

अशा वातावरणात ज्यामध्ये विविध माध्यमांद्वारे शरीररचनेवर भर दिला जात आहे. स्त्रियांना गाठता येत नाही अशा सुंदरतेच्या प्रमाणांशी सामना करावा लागत आहे. जरी मुस्लिम स्त्रियांना खोटेपणाच्या अत्याचारपीडित वर्गात गणलं जात असलं तरी खरं पाहता त्या आपल्याभोवती समाजापासून त्यांना भोगवस्तू बनवण्याच्या प्रयत्नांपासून ते खऱ्या अर्थानं मुक्त आहेत. याचं कारण त्यांच्या विनयशील पेहरावात (पोषाखात) आहे. हे सभ्य स्वरूप ज्यामध्ये चेहऱ्यावरील नकाब सामील आहे, एका महिलेचं व्यक्तिमत्त्व आणि तिच्या नैतिकतेवर प्रकाश टाकते, तिच्या शरीरावर नाही. याच संदर्भात मुस्लिम महिलांचा संबंध मेरी, येशू ख्रिस्तांच्या आई (त्यांना शांतता लाभो) यांच्याशी जुळतो, ज्या आपल्या ईशनिष्ठा आणि विनशीलतेसाठी ओळखल्या जातात.

सारंश असा की मुस्लिम महिलांचं नागरी स्वातंत्र्य जपण्याची इस्लामची विशाल परंपरा आहे, ज्याचा आधार ईश्वरानं पाठवलेल्या मार्गदर्शक तत्त्वांवर आणि प्रेषितांच्या शिकवणींवर आहे. विविध हक्काधिकार आणि सुरक्षेद्वारे इस्लामी कायद्यांत स्त्रियांचा उद्धार घडून आला आहे आणि समाजामध्ये त्यांना प्रतिष्ठा लाभलेली आहे.

# पिता

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणतात, ‘‘आपल्या मुलांच्या मनावर सभ्य नैतिकता ठसविणे यापेक्षा दुसरी कोणती अधिक उत्तम देणगी नाही.’’ दुसरं असं, ‘‘एक पिता आपल्या मुलांना जी सर्वोत्तम देणगी देऊ शकतो ती वागण्याची शुद्ध पद्धत आणि शिक्षण आहे.’’ प्रेषित म्हणाले, ‘‘मृत्यू पावल्यावर माणसांची कर्मं संपुष्टात येतात, मात्र तीन गोष्टी वगळता : दानधर्म, ज्यामुळं भावी पिढ्यांचं कल्याण होतं, फलदायी ज्ञान, जी मुलं त्याच्यासाठी प्रार्थना करतात त्यांचा सन्मान.’’

# मुलंबाळं

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना मुलंबाळं, त्यांचा निरागसपणा फार आवडत असे. ईश्वराशी जवळीकता असलेल्या मुलांशी ते लक्षपूर्वक वागत असत. त्यांना त्यांच्या मनाची भाषा अवगत होती. ते मुलांचं चुंबन घेत, अंगाखांद्यावर खेळवत, त्यांचा निरागसपणा न्याहाळत, जणू ते ईश्वराची प्रार्थनाच असल्यासारखं. प्रेषितांची वर्तणूक याचं सतत स्मरण करून देई. जर प्रार्थना करताना (नमाजमध्ये) एखाद्या बाळाच्या रडण्याचा आवाज आला तर प्रेषित प्रार्थना लवकर आटोपून घेत, जणू त्या मुलांच्या विनंतीला उत्तर दिल्यासारखं.

प्रेषित मुलांशी अत्यंत आपुलकीनं वागत, त्यांना ते 'स्वर्गातील फुलं' म्हणत असत. ते म्हणायचे,

''माणसांचं उज्ज्वल भविष्य म्हणजे गुणसंपन्न मुलंबाळं.''

कुणी त्यांना कधी मोसमाचं एखादं पहिलं फळ आणून दिलं तर ते तिथं हजर असलेल्या सर्वांत लहान मुलाला देत. ते मुलांचं स्वागत त्यांच्या गालाचं किंवा कपाळाचं चुंबन घेऊन करत. एकदा ते काही बाळांचं चुंबन घेऊन स्वागत करत होते. एका खेडूत अरब (बेदुईन) म्हणाला, ''तुम्हाला मुलंबाळं फार आवडतात. मला दहा मुलं आहेत, पण मी कधीही कुणाचं चुंबन घेतलं नाही.''

प्रेषितांनी उत्तर दिलं,

''ईश्वरानंच तुमच्यातलं प्रेम काढून टाकलं असेल तर मी काय करू शकतो.''

प्रेषितांचं प्रेम आणि दयाळूपणा मुस्लिम मुलांपुरताच मर्यादित नव्हता. ते उद्‌गारले,

"प्रत्येक बाळ शुद्ध स्वभावानं जन्म घेतं."

प्रेषित म्हणाले,

"खोटं बोलणं वाईट आहे. चेष्टेनं बोललेलं असो की गांभीर्यपूर्वक, मुलांना खोटं वचन देऊ नका."

## माता-पिता आणि मुलाबाळांमधील नातेसंबंध

इस्लामनुसार मुलाबाळांचं संगोपन करण्याची जबाबदारी पूर्णपणे त्यांच्या मातापित्याची आहे. शारीरिक पोषण आणि काळजी घेण्यापलीकडं त्यांना इस्लामी संस्कृतीशी परिचित करणं, मुस्लिम समुदायात त्यांना सहभागी करणं त्यांची जबाबदारी आहे. शरिआहची योजना आहे की, मातापित्यांनी आपल्या मुलाबाळांना इस्लामी श्रद्धा, कर्मकांड, इस्लामी कायदे आणि नीतीमत्तेची शिकवण द्यावी. मातापित्यांनी त्यांना लांबचे नातलग आणि समाजाच्या सेवेसाठी तयार करावं, ते चुकले तर चुकांची दुरुस्ती करावी. त्यांना उपदेश द्यावेत आणि सदैव त्यांच्यासमोर चांगले आदर्श ठेवावेत. मुलांना आधुनिक ज्ञान अवश्य दिलं पाहिजे. एका बहुधर्मिय समाजात विविध आस्था-श्रद्धा असतात. मुलांना विविध धर्मांच्या मूलभूत शिकवणी शिकविल्या पाहिजेत. मातापित्यांनी आपल्या मुलांच्या मनात परधर्मिय तत्त्वज्ञानाच्या बाबतीत सहिष्णुता बिंबवली पाहिजे.

# बुजुर्ग लोक

इस्लामी शिकवणी वयोवृद्ध लोकांसाठी तीव्र भावना आणि सन्मानाची ताकीद करतात. त्यांच्या आकांक्षांना संजीवनी देतात. त्यांच्या जीवनाच्या सूर्यास्ताच्या वेळी त्यांच्या आशा पल्लवित करतात. अनस प्रेषितांच्या वचनाचं कथन करतात :

> ''जर तरुण माणसानं वयोवृद्ध माणसाला तो वयोवृद्ध असल्यामुळं आधार दिला तर ईश्वर नक्कीच तो वृद्ध झाल्यावर त्याचा आदर करण्यासाठी लोकांना प्रवृत्त करील.''
>
> एकदा प्रेषित मुहम्मद यांनी सांगितले,
>
> ''ईशदूत जिब्रईल यांनी मला वयोवृद्धांना प्राधान्य देण्याचा आदेश दिला. त्यांनी शिकवण दिली की जेवणाच्या वेळी आणि समारंभात वृद्ध माणसांना इतरांवर प्राधान्य द्यावे.''
>
> ते म्हणाले,
>
> ''जेवणाच्या वेळी वृद्धांपासून सुरवात करा.''
>
> प्रेषित हेही म्हणाले,
>
> ''जो माणूस तरुणांना दया दाखवत नाही आणि आमच्यातील वृद्धांचा सन्मान करीत नाही तो आमच्यापैकी (मुस्लिम) नाही.''

# नातेवाईक

कुरआनात अल्लाहचं विधान आहे :

“जवळच्या नातेवाईकांशी दयेनं वागा.”

(कुरआन, ४:३६)

मातापित्यानंतर कुरआननं नातेवाईकांचा उल्लेख केला आहे. कारण ते आपल्याकडून कृपाशाली व्याहारास पात्र आहेत. आपल्या नातलगांशी बंधनं पाळल्यास समाजजीवन आनंददायी होते. जिथं असं होत नाही तिथं सामाजिक कलह जन्म घेतात.

अमीरपुत्र सुलैमान प्रेषितांचं वचन करतात :

“एखाद्या गरीब व्यक्तीला काही देऊन खूश (ज्याशी कोणतं नातं नाही) करणं दान आहे आणि जर तेच आपल्या कुणा नातेवाईकास दिलं तर हे त्याच्याशी नातेसंबध अबाधित ठेवण्यासारखं आहे.”

याचा अर्थ नातेवाईकांसाठी खर्च करण्याचा दुप्पट मोबदला मिळेल. आपल्या नातेवाईकांची आवड असणं स्वाभाविक आहे आणि हे सत्य आहे. याचबहोबर हेही तथ्य आहे की हे नातेसंबंध फार नाजूक असतात. साध्या घटनांमुळं हे संबंध भंग होतात.

प्रेषित मुहम्मद म्हणतात, “हे नातेसंबंध तुटायला नको आहेत. ते अबाधित ठेवण्यासाठी सर्व प्रयत्न केले जावेत.”

उमरपुत्र अब्दुल्लाह कथन करतात :

प्रेषित म्हणाले, “नातेसंबंध घट्ट ठेवण्याचा अर्थ असा नव्हे की त्या नातलगांचे संबंध आमच्याशी चांगले आहेत; खरं असं की जर नातेसंबंध भंग झाले असतील तर ते पूर्ववत करावेत.”

# १०

# इस्लाममधील समाजजीवन

## शेजारी

इस्लामनं शेजाऱ्यांना अनेक विशेषाधिकार दिले आहेत. ज्या लोकांच्या सहवासात आपण राहतो ते शेजारी, ज्यांच्याशी आमची सामाजिक बंधनं आहेत, त्यांना सोडून द्यायला नको. शेजारी तीन प्रकारचे असतात. असे शेजारी ज्यांच्याशी आमचं नातं आहे, असे शेजारी ज्यांच्याशी आमचं कोणतंच नातं नाही आणि ते लोक ज्यांच्याशी प्रवासादरम्यान आमची भेट होते. ऑफिसमधील, शाळा आणि कॉलेजमध्ये तसेच कामाच्या ठिकाणी ज्यांचं सहकार्य असते असे लोकदेखील शेजारी मानले जातात.

कुरआनच्या खालील आयतीमध्ये शेजाऱ्यांशी सभ्यपणा आणि दयेचा व्यवहार करण्याचा आदेश दिला आहे.

> ''निकटच्या शेजाऱ्यांशी, निकटवर्ती अनोळखी सान्निध्यातील लोकांशी भलाईनं वागा.''
>
> (कुरआन, ४:३६)

जगातील सर्व धर्मांनी शेजाऱ्यांशी सद्व्यवहाराला महत्त्व दिलंय. तसेच इस्लामनं ही अशा व्यवहारासच महत्त्व दिलंय असं नाही तर 'शेजारी' या संकल्पनेला विस्तृत अर्थ दिला आहे की ज्याची तुलना इतरत्र कुठंच करता येत नाही. थोडा वेळ जरी एकत्र राहिले तर त्यांचे अधिकार प्रस्थापित होण्यास हे

पुरेसं आहे आणि फार काळासाठी एकत्र राहत असल्यास तर त्यांचे अधिकार अधिक वाढतात.

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या पत्नी आयशा प्रेषितांच्या वचनांचं कथन करतात :

> ''ईश्वराचे दूत जिब्राईल यांनी शेजाऱ्यांशी औदार्यपूर्ण व्याहारावर इतका भर दिला की मला भीती वाटली, कदाचित ते शेजाऱ्यांना वारसाहक्कात सहभागी करतील.''

इस्लामचं म्हणणं एवढंच नाही की शेजाऱ्यांना कशाही प्रकारे दुखविलं जाता कामा नये तर ते आपल्या नैतिक आणि सामाजिक मदतीस पात्र आहे याचं महत्त्व सांगतात. आपण त्यांच्याशी सभ्यपणानं वागलं पाहिजे जेणेकरून समाजाचा प्रत्येक सदस्य या विश्वासानं जगायला पाहिजे की तो आमच्या सान्निध्यात सुरक्षित आहे आणि कोणत्याही समयी आपण त्याच्या सेवेस हजर आहोत. या संदर्भात इस्लामच्या भूमिकेचा खालील वचटनांनुसार अर्थ लावता येईल.

> अबु हुरैरा म्हणतात : प्रेषितांनी तीन वेळा उच्चार केला,
>
> ''ईश्वराशपथ तो मुस्लिम नाही!''<br>
> ''ईश्वराशपथ तो मुस्लिम नाही!''<br>
> ''ईश्वराशपथ तो मुस्लिम नाही!''
>
> त्यांना विचारण्यात आलं, ''कोण तो?''
>
> त्यांनी उत्तर दिलं,
>
> ''अशी व्यक्ती जिचा शेजारी त्याच्या त्रासापासून सुरक्षित नाही.''

ह्या वचनानुसार हे स्पष्ट आहे की शेजाऱ्याला दुखवणं श्रद्धेच्या विपरित आहे.

दुसऱ्या एका वचनात प्रेषित म्हणाले,

''अशी व्यक्ती मुस्लिम नाही जिचा शेजारी उपाशी झोपतो आणि तो पोटभर जेवतो.''

एका दुसऱ्या प्रसंगी प्रेषित आपले मत व्यक्त करत म्हणाले, ''एक शेजाऱ्याची कर्तव्यं कोणती आहेत ते तुम्हाला माहीत आहेत काय? आपल्या शेजाऱ्यानं मदत मागितल्यास त्याला मदत करा, अडचणीच्या वेळी त्यानं तुमची मदत मागितली तर त्याला मदत करा, त्याला हवं असेल तर कर्ज द्या, कर्ज दिल्यावर त्यास गरज भासल्यास त्याला सवड द्या. तो आजारी पडल्यास औषधोपचार करा, तो मरण पावल्यास त्याच्या अंत्यविधीत (जनाजा) सहभागी व्हा. त्यानं काही जिंकल्यास त्याचं अभिनंदन करा, कोणती आपत्ती कोसळल्यास त्याच्यावर दया करा, त्याच्या अनुमतीशिवाय आपली इमारत त्याच्यापेक्षा उंच उभारू नका म्हणजे त्याला काही अडथळा होऊ नये, त्याला भीती दाखवू नका, तुम्ही फळं घरी आणल्यास त्यालाही त्यातले वाटून द्या.''

# गरीब

कुरआनात शक्तिशाली अल्लाहचं विधान :

पापी लोकांना (तो विचारेल), ''तुम्ही नरकात कशापायी?'' ते म्हणतील, ''आम्ही नमाज अदा करत नव्हतो आणि गरजूंना अन्न देत नव्हतो.''

(कुरआन, ७४:४१-४४)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी आपल्या पत्नी आयशा यांना सांगितलं,

''आयशा! कोणाही गरजवंताला रिकाम्या हातांनी तुमच्या दरवाजातून परत करू नका. काहीतरी द्या, एक अर्धा खजूर का असे ना. आयशा! गरीबांशी प्रेम करा, त्यांना जवळ करा. पुनरुत्थानाच्या दिवशी ईश्वर तुम्हाला जवळ करील.''

प्रेषित उद्‌गारले, ''अशा मेजवानीत जिथं श्रीमंतांना निमंत्रण दिलं आणि गरीब लोकांना वगळण्यात आलं असेल, असं अन्न नासलेलं आहे.''

प्रेषितांचे एक अनुयायी गरीबांवर प्रेम करत, त्यांच्याजवळ बसत, त्यांच्याबरोबर राहायचे आणि त्यांच्याशी बोलायचे. प्रेषितांनी त्यांना 'अबुलमसाकीन' (गरीबांचे पिता) ची उपाधी दिली.

प्रेषितांचे दुसरे एक अनुयायी सअद, स्वभावानं काहीसे मोठेपणानं वागत आणि स्वत:ला गरीबांपेक्षा श्रेष्ठ समजत. प्रेषित त्यांना म्हणाले, ''तुम्हाला जी काही श्रीमंती आणि यश लाभलंय ते गरीबांच्या श्रमामुळंच.''

# आजारी माणसं

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आजारी लोकांना आवर्जून भेटत असत. त्यांच्या आरोग्याबाबत विचारपूस करत. त्यांच्या शेजारी बसत. त्यांच्या कपाळावरून हात फिरवत. त्या आजाऱ्यानं काही खावयास मागितल्यास त्याची व्यवस्था करत. आजाऱ्याला प्रेमानं कुरवाळत. त्यांना शांत करत आणि म्हणत, ''ईश्वरानं इच्छिलं तर आपण लवकरच बरे व्हाल.'' ज्या क्षणी ते आजारी लोकांबाबत ऐकत असत ते मुस्लिम असोत की मुस्लिमेतर त्याच क्षणी ते त्यांना पाहायला जात. उबैपुत्र अब्दुल्लाह इस्लामचा शत्रू आणि दांभिक लोकांचा नेता आजारी पडल्याची माहिती मिळताच त्याला जाऊन भेटले.

# गुलाम / सेवक

अब्दुल्लाह इब्ने उमर कथन करतात :

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले,

''मजुरांचा घाम वाळण्याआधी त्याची मजुरी देऊन टाका.''

प्रेषित मुहमम्द गुलामांवर विशेष कृपा करत होते. ते म्हणत असत,

''ते तुमचे भाऊ-बहीण आहेत. तुम्ही जे खाता ते त्यांना खावयास द्या, तुम्ही जे नेसता तेच त्यांना नेसायला द्या.''

गुलामांना 'गुलाम' म्हणून हाक दिल्यास त्यांना नेहमी तिरस्कार वाटे. प्रेषितांनी अनुयायांना शिकवलं,

''त्यांना 'माझा गुलाम' किंवा 'माझी गुलाम' म्हणून पुकारू नका, तर 'माझ्या मुला / मुली' म्हणून संबोधा.''

प्रेषित गुलामांना म्हणाले,

“आपल्या मालकांना ‘स्वामी’ म्हणत जाऊ नका. ईश्वरच फक्त ‘स्वामी’ आहे.”

ते त्यांच्यावर एवढी दया करत होते की आपल्या अंतिम प्रवचनात त्यांनी उपदेश दिला,

“गुलामासंबंधी ईश्वराची भीती बाळगा.”

# अपंग

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) शारीरिक आणि मानसिक अपंग व्यक्तींशी अपार अनुकंपा व स्नेह बाळगत. त्यांची काळजी घेत. त्यांच्याकडं विशेष लक्ष देत. इतिहासाच्या सर्व काळात आजवर समाजानं अपंग आणि दुर्बलांकडं अन्यायपूर्ण दुर्लक्ष केलंय. त्यांना पहिल्यापासून आणि आतासुद्धा अनावश्यक व समाजावर बोजा समजलं जातं. दयासंपन्न प्रेषितांनी त्यांना कष्टाच्या खाईतून काढून परमानंद आणि यशासाठी खालील शिकवण दिली.

“धरतीवरील लोकांवर दया करा, आकाशात जो आहे तो तुमच्यावर दया करील.”

प्रेषितांच्या या कळकळीच्या वचनात साधारणपणे दुर्लक्षित समाजघटक, अंध, बधीर, मनोविकारानं अथवा शरीरानं अपंग सर्वांचा समावेश आहे.

# अनाथ

इस्लाममध्ये मातापिता आणि नातलगांच्या हक्काधिकारांना सर्वाधिक प्राधान्य दिलंय. यानंतर समाजातील दुर्बल लोक आमच्या कृपेस पात्र आहेत. यासंबंधानं अनाथ आणि दारिद्र्यानं ग्रासलेल्यांचा प्रथम उल्लेख केलाय.

कुरआनचं विधान आहे :

''अनाथांशी आणि निराधारांशी स्नेहपूर्वक वर्तन करा.''
(कुरआन, ४:३६)

पिता किंवा मातेच्या निधनानं मुलं प्रेम आणि काळजीला मुकतात. काही वेळा आर्थिक स्थैर्यालाही वंचित होतात जे महत्त्वाचं असते. अशा अनाथ मुलांची काळजी घेणं समाजाची जबाबदारी आहे आणि या मुलांना त्यांच्या माता किंवा पिता हरवल्याच्या दु:खद संवेदना होऊ नयेत याकडं लक्ष द्यावं. समाजाकडून झालेल्या दुर्लक्षानं त्यांच्या शारीरिक वाढीवर परिणाम होणार नाही तर त्यांचा भावनात्मक आणि मानसिक विकासदेखील खुंटेल. या दुर्लक्षित मुलामुलींमध्ये निर्दयी समाजाविरूद्ध बंडाची वृत्ती निर्माण होण्याची दाट शक्यता असते. देशाचे चांगले नागरिक न होता ते समाजविरोधी तत्त्व बनतील.

पवित्र कुरआन आणि प्रेषितांची वचनं या अनाथ मुलांची काळजी घेण्यावर, त्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यावर आणि त्यांच्या मालमत्तेची देखरेख करण्यावर वारंवार लक्ष देतात. असहाय्य आणि समंजसपणाच्या अभावामुळं अनाथ मुलं आपल्या अधिकारांची काळजी घेऊ शकत नाहीत. त्यांचे हक्काधिकार हिरावून घेणं सहज सोपं होत असते.

अशा वृत्तीची कुरआन निंदा करतो :

“जे लोक अन्यायाचा अवलंब करून अनाथांची मालमत्ता हडप करतात ते खऱ्या अर्थानं आपलं पोट आगीनं भरतात. लवकरच ते नरकात सामावतील.” (कुरआन, ४:१०)

इस्लाम समाजावर अनाथ मुलांची काळजी घेण्याचीच नव्हे तर ईश्वराची भीती बाळगणारे सभ्य नागरिक बनण्याची जबाबदारी टाकतो. ते समाजाचा अमूल्य ठेवा होतील या हेतुनं.

# दया सर्व निर्मितीसाठी

कुरआनात ईश्वराचे ठळक स्वाभाविक गुणधर्म : 'अर्रहमान' (असीम कृपावंत) आणि 'अर्रहीम' (अनंत दयापूर्ण) असे आहेत. या शब्दांचा समावेशक अर्थ- दया, स्नेह, अनुकंपा, कृपा, दानशीलता आणि वैभवसंपन्न आहे.

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले :

> ''जेव्हा ईश्वरानं सर्व चराचराची निर्मिती केली, त्यांनी आकाशातील त्याच्याकडील पवित्र ग्रंथात लिहून ठेवलं- 'माझी दया माझ्या क्रोधाच्या पुढं असते.' ईश्वर म्हणतो की त्यानं आपल्या दयेला शंभर भागांत विभागलं. त्यातले ९९ भाग त्यानं आपल्याकडं ठेवले आणि एक भाग धरतीवरील सर्व निर्मितीसाठी खाली पाठवले. सर्व निर्मितीकडं दिलेला हा एकमेव भाग एकमेकांशी दयेनं व्यक्त होतो.''

कुरआनात म्हटलंय :

> ''आणि (हे प्रेषित!) आम्ही तुम्हांस सकल जगांसाठी दयाधन (बनवूनच) पाठवलंय.'' (कुरआन, २१:१०७)

ईश्वरानं प्रेषितांना दिलेली दयेची देणगी केवळ मानवजातीपुरतीच सीमित नाही तर सर्व निर्मिती या महानतम दैवदत्त दयेशी लाभान्वित होऊ शकते.

कुरआनच्या भाष्यकाराचं विधान आहे की कुरआन दयेचा झरा असल्यानं सर्वप्रथम याची शिकवण प्रेषित मुहम्मद यांना दिली गेली म्हणजे ते मानवजातीला दयेचा संदेश देतील. अशा प्रकारे कुरआनची ही आयत हे व्यक्त करते की प्रेषित मुहम्मद यांना सर्व निर्मितीसाठी दयाधन बनवून पाठविलंय. कारण त्यांच्याविना कुरआन आले असते.

प्रेषित मुहम्मद आणि कुरआन हे दोन्ही दयेनं परिपूर्ण ईश्वराचं

प्रकटीकरण आहे. याची परिणती एका अशा माणसामध्ये झाली जे इतर पुष्कळ गुणांसहितच आदर्श अनुकंपा आणि दयास्वरूप आहेत.

## पशु-पक्ष्यांशी व्यवहार

शक्तिशाली ईश्वर कुरआनात म्हणतो :

''भूतलावर वावरणारे प्राणी अथवा आपल्या पंखांद्वारे उडणारे पक्षी, तुमच्याप्रमाणं त्यांचेही विविध समूह आहेत.'' (कुरआन, ६:३८)

''अल्लाहनं सर्व प्राणी पाण्यापासून निर्माण केलेत. त्यांच्यामधले काही आपल्या पोटांवर चालतात काही दोन पायांवर चालतात आणि त्याच्यामधले काही चार (पायांवर) चालतात.'' (कुरआन, २४:४५)

''सर्व चराचर ईश्वराचा परिवार आहे आणि जो ईश्वराच्या परिवाराचं भलं करतो ईश्वर त्याच्यावर सर्वांत जास्त प्रेम करतो.''

ईश्वरानं प्राण्यांना मानवजातीच्या उपयोगासाठी जरी निर्माण केलं असलं तरी इस्लामचे माणसावर काही अनुल्लंघनीय कर्तव्यं आहेत. कुरआननुसार, पशुमात्रांशी वागण्याची पद्धत आणि प्राण्यांची निर्मिती माणसाला या विश्वामध्ये त्याची ईश्वराच्या संकेतांमागील बुद्धिमत्तेची माहिती देतात. कुरआननं कीटकशास्त्राच्या अगोदरच मुंग्यांमध्ये एकमेकांशी संपर्काच्या माध्यमाची माहिती दिलीय. (कुरआन, २७:१८) आणि याकडंही निर्देश दिले आहेत की ईश्वरानं मधमाशांना आपला संदेश पाठविण्यास पात्र केलं. कुरआन, १६:६८-६९) मधामधील उपचाराच्या गुणधर्मांबाबतही कुरआनात संदर्भ दिले आहेत, जसे अल-बकरा (गाय, अध्याय २), नम्ल (मुंगी, अध्याय २७), अनकबूत (कोळी, अध्याय २९), नहल (मधमाशी,

अध्याय १६). इस्लामनं प्राण्यांच्या जीवाशी खेळणं आणि करमणूक म्हणून त्यांचा छळ करणं सक्तीनं मनाई केलीय. खाली दिलेल्या प्रेषितांच्या वचनांमध्ये त्यांचा उल्लेख आहे.

- प्रेषितांच्या एका अनुयायांनी एका घरट्यातून पक्ष्याचं पिलू काढून घेतलं. त्याची आई घाबरून त्याचा शोध घेत होती. अचानक तिनं त्या अनुयायांवर मारा केला. प्रेषितांनी अनुयायांना त्या पिलाला परत त्याच्या घरट्यात ठेवून देण्यास सांगितलं आणि तिथं उपस्थित असलेल्या अनुयायांना उद्देशून म्हणाले,

  ''तुमच्यावर ईश्वराची कृपा त्या पक्ष्यापेक्षही अधिक आहे.''

  प्रेषित मुहम्मद यांनी ताकीद दिली :

  ''जो कुणी एखादा चिमणीसारखा पक्षी किंवा एखाद्या पशुच्या जगण्याच्या अधिकाराचा आदर करत नसेल तो निवाड्याच्या दिवशी ईश्वरासमोर जबाबदार धरला जाईल.''

  प्रेषितांनी शिकवण दिली की,

  ''प्राण्यांच्या अधिकारांचा आदर करणं, त्याच्या खाण्याची व्यवस्था करणं आणि त्याच्याशी चांगला व्यवहार करणं याबाबत कसलीही तडजोड केली जाऊ शकत नाही. मानवजातीच्या कर्तव्यांचा हा एक भाग आहे आणि आपल्या आध्यात्मिक समृद्धीसाठी ही एक अट आहे, हे समजून घ्यावे.''

- प्रेषित मुहम्मद यांनी जीवंत प्राण्यांना जाळून टाकणं, निषिद्ध केलंय. मुंग्यांच्या वारुळाजळवून जात असताना ते जाळून टाकलं असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. त्यांनी विचारलं, ''कुणी याला जाळलं?'' त्यांना सांगण्यात आलं की अमुक आणि अमुकानं हे केलंय. तेव्हा ते म्हणाले, ''केवळ त्यांच्या विधात्यालाच अग्निशिक्षा देण्याचा अधिकार आहे.'' याद्वारे त्यांनी लोकांना ही शिकवण दिली.

- निसर्गातील हानिकारक दिसणाऱ्या घटकांनादेखील प्रेषित मुहम्मद

ईश्वरानं निर्माण केलेल्या व्यवस्थेचाच एक भाग समजत होते. एकदा मक्का येथील अराफातच्या ठिकाणी प्रेषित आपल्या अनुयायांसमवेत जात असता एका गुहेतून सर्प बाहेर आला. अनुयायांनी त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला, पण तो पळून गेला. त्यावर प्रेषित म्हणाले, ''ईश्वरानं त्याच्या इजेपासून तुमची सुरक्षा केली जशी त्याला तुमच्यापासून पोचणाऱ्या इजेपासून त्याची सुरक्षा केली. सर्पसुद्धा निसर्गात महत्त्वाची भूमिका पार पाडतात, हे या उदाहरणावरून उघड झाले. प्रेषित जगातील सर्व निर्मितींना व्यवस्थेचा एक भाग समजत होते.

- प्रेषित मुहम्मद यांना विशेषकरून मांजर खूप आवडायचे. त्यांनी आपल्या अनुयायांमध्ये सर्व प्राण्यांचा आदर करण्याची जागरुकता निर्माण केली. एकदा त्यांनी अनुयायांना ही कथा सांगितली.

  ''तीव्र उन्हाळ्यात एक माणूस रस्त्यावरून चालत होता. त्याला एक विहीर दिसली आणि तो आपली तहान भागविण्यासाठी त्या विहिरीत उतरला. तो वर आल्यावर त्याला तहानेनं व्याकूळ झालेला एक कुत्रा दिसला. तो माणूस स्वत:शी म्हणू लागला, हा कुत्रा माझ्यासारखाच तहानलेला आहे. तो पुन्हा विहिरीत उतरला. आपल्या जोड्यात पाणी भरून त्याला दातांत धरलं आणि वर आला आणि त्या कुत्रास प्यायला दिलं. ईश्वरानं त्या माणसास याचा मोबदला दिला. त्याचे सारे पाप क्षमा करून टाकले.''

  त्यावेळी प्रेषितांना विचारलं गेलं, ''हे प्रेषिता! आम्ही पशु-पक्ष्यांशी भला व्यवहार केला तर आमहाला मोबदला मिळेल?''

  प्रेषित म्हणाले, ''कोणत्याही सजीवाचं काहीही भलं केलं तर मोबदला मिळतोच.''

- दुसऱ्या एका प्रसंगी प्रेषित मुहम्मद यांनी एक स्वप्न सांगितलं. त्यामध्ये त्यांनी पाहिलं की एका स्त्रीनं एका मांजरीला ती मरेपर्यंत बंदिस्त ठेवलं होतं. या मांजरीमुळं तिला शिक्षा झाली. तिला बंदिस्त ठेवून ती तिला खाण्यापिण्यास काही देत नसे किंवा तिला शिकार करून खाण्याची

मोकळीक देत नसे. या मांजरीमुळे तिला नरकवास झाला.

अशा वचनांद्वारे प्रेषित पशु-पक्ष्यांच्या आदराचं महत्त्व सांगत होते, हे इस्लामी शिकवणीचा अत्यावश्यक भाग आहे.

- आपल्या सैन्यासहित मक्केस कूच करताना रस्त्यात कुत्र्यांची पिले होती, प्रेषितांनी त्यांची सुरक्षा करण्याची ताकीद दिली. एक कुत्री पिलांना दूध पाजत असल्याचं त्यांच्या नजरेस पडलं, तेव्हा त्यांनी आपल्या अनुयायी शिपाई जुनैल बिन सुरागा यांना त्यांचं रक्षण करण्यासाठी तिथंच थांबायला सांगितलं. म्हणजे त्या रस्त्यावरून येणारं सैन्य त्यांना विचलित करू नये. सर्व सैन्य तिथून निघून जाईपर्यंत ते तिथंच थांबले. प्रेषितंच्या मनात पशुंसाठी किती अनुकंपा आहे हे यावरून लक्षात येते. एका सैन्याचं नेतृत्व करण्यासारखं अत्यंत महत्त्वाचं कर्तव्य पार पाडतानादेखील त्या पिलांची बिकट परिस्थिती त्यांच्या ध्यानात आली होती.

# हरित पृथ्वी

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी जाहीर केलं की,

> ''एखाद्या माणसानं झाड लावलं आणि लोकांनी अथवा ईश्वराच्या इतर निर्मितीनं त्याची फळं खाल्ली तर ते त्याच्याकडून दान दिल्यासारखं आहे.''

या वचनामध्ये रस्त्याच्या कडेला सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड सामाजिक वनीकरण आणि जंगलांचं संरक्षण यावर महत्त्व दिलंय.

प्रेषितांनी हेदेखील सांगितलं,

> ''एखाद्या माणसानं वाळवंटात लोकांना सावली देणारं झाड कापून टाकलं तर ईश्वर निवाड्याच्या दिवशी त्याला शिक्षा देईल.''

प्रेषित पृथ्वीला हिरवीगार ठेवण्यासाठी किती बारकाईनं लक्ष देत होते हे दिसून येते. या जगाच्या रक्षणासाठी प्रेषितांनी अभिनव कल्पना मांडली त्याचे आमच्यावर काही अधिकार आहेत आणि तो आमची कृत्य ईश्वरासमोर निवाड्याच्या दिवशी उघडे करील.

अशा प्रकारे एका मुस्लिमानं विवेकबुद्धीनं शेवटपर्यंत निसर्गाशी आपल्या घनिष्ट संबंधांचं रक्षण करायला हवं. त्याचा शेवटचा प्रयत्न जीवनचक्र सुरूच ठेवण्यासाठी असावा.

# हरित पट्टे

शहरांच्या बाहेर जंगलांच्या आणि वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी हिमा क्षेत्रे निश्चित करण्यात आली होती. मदीनेभोवतीचा भूभाग प्रेषितांनी हिमा म्हणून जाहीर केला होता आणि शहरांमध्ये त्यांनी हरम क्षेत्रे निश्चित केली होती. मदीनेपासून २० मैलांच्या अंतरावर अकीक नावाच्या दरीत हिमा अल-नकीस या नावानं ओळखला जाणारा असाच एक क्षेत्र स्थापण्याचा हुकूम दिला होता. हे घोड्यांसाठी कुरण म्हणून आरक्षित केलं होतं. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी मोठ्या प्रमाणात झाडे लावण्याची व्यवस्था केली होती. काही काळातच हा सबंध परिसर हिरवागार झाला. आत एखादा प्राणी चरत असल्यास तो दिसनासा झाल्यावर त्याच्या सीमा निश्चित केल्या. एका झाडावर माणसाला चाढवून त्याला हाक देण्यास सांगितलं. जितक्या दूर अंतरावर त्याचा आवाज पोचला त्या अंतरापर्यंत त्याच्या सीमा निश्चित करण्यात आल्या. या परिसरात झाडे कापण्याची परवानगी नव्हती.

एकदा प्रेषित त्या खोऱ्यातून परतले आणि आपल्या प्तनी आयशा यांना त्याचं सौंदर्य आणि शांत वातावरणाचं वर्णन ऐकवलं. आयशा यांनी आपलं घर अकीककडं हलवण्याची सूचना केली. नंतरच्या काळात मदीनेच्या अनेक श्रीमंतांनी त्या ठिकाणाजवळ उन्हाळ्यासाठी निवास बांधले. लवकरच हे स्थान मदीनेच्या नागरिकांसाठी रिसॉर्ट बनले आणि लोक करमणुकीसाठी तिथं जाऊ लागले.

हरम आणि हिमाची ही योजना इस्लामी कायदा, शरिआहचा एक भाग होता. तसेच पशुपक्ष्यांच्या अधिकारांचं रक्षण करण्यासाठी इस्लामी कायदे होते. ईश्वर कुरआनात म्हणतो,

> ''पोटावर रांगणाऱ्या आणि हवेत उडणाऱ्या सर्व निर्मितीचे
> तुमच्यासारखेच समूह आहेत.'' (कुरआन, ६:२८)

पशु-पक्ष्यांवरील प्रेम आणि त्यांचं संरक्षण इस्लामच्या परिचित सभ्यतेचं प्रतिबिंब आहे.

# निसर्गदत्त साधनसंपत्ती

निसर्ग ईश्वराची निर्मिती असून त्याची साधनं मानवांसाठी वरदान आहेत. अल्लाहनं आम्हाला त्याचा नाश करू नये किंवा त्याचा काही भाग वाया घालवू नये असा आदेश दिला आहे.

> ''हे आदमची संतती, प्रत्येक वेळी मस्जिदीकडं (प्रार्थनेसाठी) निघताना उचित असा आकर्षण अंगीकारा, खा-प्या, पण एका मर्यादेत राहून. तो निश्चितच उधळपट्टी करणाऱ्यांना पसंत करीत नाही.'' (कुरआन, ७:३१)

नैसर्गिक साधनांची निर्दयी लूट निसर्गाच्या निर्माणकर्त्या आणि मानवजातीविरूद् अत्यंत वाईट कृत्य आहे. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी आपल्या अनुयायांना नैसर्गिक आणि इतर साधनांचा अत्यंत काळजीपूर्वक उपयोग करण्याची शिकवण दिली. पाण्याचा उपयोग कमीतकमी करण्याची शिकवण दिली.

एके दिवशी आपले अनुयायी सअद यांच्याजवळ आले. ते वुजू करत होते. ते पाण्याचा वारेमाप वापर करत असल्याचे प्रेषितांच्या लक्षात आले. त्यांना प्रेषित म्हणाले, ''सअद ही उधळपट्टी का बरं?''

सअदनी विचारलं, ''वुजू करतानादेखील ही उधळपट्टी आहे का?''

प्रेषित म्हणाले, ''जरी एखाद्या नदीपाशी असला तरीही उधळपट्टीच होय.''

सअद आणि इतर अनुयायांना प्रेषितांनी ही शिकवण दिली :

''पाणी अथवा निसर्गाच्या कोणत्याही त्तवाला आपल्या

> आध्यात्मिक सुधारणेचं एक साधारण साधन समजू नका. याउलट निसर्गाचा आदर करणं आणि त्याचा किफायतशीर उपयोग करणं ही स्वत:च्या निर्माणकर्त्याशी जवळीक साधण्यासाठी आध्यात्मिक कार्य आहे.''

जरी तुम्ही नदीकाठी असलात तरी पाण्याचा दुरुपयोग करू नका. यावर प्रेषितांच्या आग्रहानं संकेत होते की निसर्गाचा आदर कोणत्याही स्थितीत आणि काहीही परिणाम उमटत असले तरी ते माणसाच्या वर्तनाला शिस्त लावण्यासाठी आवश्यक सिद्धान्तांशी तुलना करत होते.

आजकाल बऱ्यांच देशांना पाण्याच्या तुटवड्याशी सामना करावा लागत आहे. आम्हाला वेळ असताना याचं स्मरण करून देतात की आम्हाला निर्माणकर्त्याचे आभार मानावे लागतील आणि हे लक्षात ठेवून आपण व्यक्तिगत जीवनात पाण्याचा उपयोग करताना याची काळजी घेतली पाहिजे. प्रेषितांच्या या स्मरणाकडं आम्ही लक्ष द्यायला हवं आणि कोणत्याही वस्तूंचा दुरुपयोग करू नये, 'पृथ्वीवर अनाचार माजवू नये.'

कॅरेन आर्मस्ट्रांग पूर्वाश्रमीच्या कॅथॉलिक नन, ज्या प्रेषित मुहम्मद यांच्या जीवनचरित्राच्या प्रख्यात लेखिका आहेत. त्यांनी प्रेषितांना "Prophet of Our Time" (आमच्या काळातले प्रेषित) म्हणून उल्लेख केला आहे. त्या लिहितात, पृथ्वी आणि त्यमधील रहिवासी - कीटक, पशु, पक्षी, वृक्षं, पाषाण, पर्वतं, नद्या आणि सागरं याबाबतच्या त्यांच्या शिकवणी समावेशकता आणि निसर्गाच्या दृष्टीनं चिरस्थायी आहेत.

आज जेव्हा मानवजातीला वातावरणाच्या संकटाच्या धोक्यांना, पर्यावरणाचं असंतुलन, ओझोन लेयरमधील घट, जागतिक उष्णता इत्यादींना सामोरं जावं लागत आहे. आपण यापुढं प्रेषितांच्या शिकवणी आणि त्यांच्या कृतींचा अमूल्य ठेवा दुर्लक्षित करू शकत नाही.

# ११

# व्यक्तिगत जीवन

## व्यक्तित्वाचा विकास

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचं वैशिष्ट्य एवढंच नाही की त्यांनी लोकांचं मार्गदर्शन केलं, तर त्यांनी मोठ्या संख्येनं प्रशिक्षकांचं भलं मोठं संघटन करून त्यांना प्रशिक्षण दिलं, जे जगातून त्यांच्या समारोपानंतर इस्लामच्या प्रभावाखाली आलेल्या अफाट भूभागात विखुरले. प्रेषित एक महान धर्मगुरू होते. (अरबी भाषेत मुजक्की) त्यांनी आपल्या अनुयायांना लोकांचे गट संघटित करण्यासाठी प्रशिक्षण दिलं जे मानवजातीची उच्च मूल्यं जपणारे सजीव आदर्श होते. इस्लामचे हे ध्वजवाहक नंतर इस्लामची मशाल जी प्रेषितांनी मक्केत पेटवली होती, आपल्यासोबत घेऊन निघाले.

लोक नेहमी धार्मिक व्यक्तींना ईश्वराचा अवतार समजण्याची चूक करतात आणि त्यांचं म्हणणं दैवी समजतात. इस्लामच्या प्रेषितांनी ईश्वराकडून जे अवतरण आलं आणि त्यांनी जे काही सल्ला, उपदेश आणि मत मांडलं या दोहोंमध्ये नेहमी फरक केला. दैवी संदेश शब्दन् शब्द पोचता केला आणि लोकांना स्पष्टपणे सांगण्यात आलं की ते ईश्वराकडून असून अनिवार्य आहे. दैनंदिन गोष्टींमध्ये प्रेषित आपल्या पत्नी, अनुयायी आणि उपस्थित असलेल्यांशी सल्लामसलत करत. ते एक मनुष्य आहेत आणि सामूहिक प्रकरणे समाजाच्या सदस्यांशी चर्चा करूनच निकाली काढतील हे त्यांनी स्पष्ट केलं होतं. सातव्या शतकात लोकशाही शासनपद्धतीची संकल्पना अजूनही

लोकांच्या विचारशक्तीपलीकडची होती, तरी प्रेषितांनी विचारविनिमय 'शूरा'व्यवस्थेचा परिचय करून दिला. अशा प्रकारे त्यांनी विस्तृतपणे हेस्पष्ट केलं की त्यांना अल्लाह मार्ग दाखवत होता ते मानवी स्वभावाच्या पलीकडं नव्हते. निर्णय घेताना चूक होत असेल म्हणून कोणत्याही कार्यात लोकांचं मत काय आहे ते विचारत असत.

निर्णय घेतेवेळी त्यांच्या अनुयायांनी सूचना द्याव्यात, आपले मत मांडावे यासाठी त्यांना प्रोत्साहन देत असत. आपल्या अनुयायांमध्ये चिंतनशक्ती उत्पन्न करण्यासाठी ते त्यांच्या समवेत असताना त्यांना प्रश्न विचारत, म्हणजे ज्यांच्या हाती ते भावी शासनाची जबाबदारी सोपवणार आहेत त्या लोकांनी निर्णय घेताना विवेकशक्ती आणि तर्काधिष्ठितपणा केंद्रस्थानी ठेवावा. हे प्रश्न अशा शैलीत केले जायचे ज्यामुळं अनुयायांनी विचारात पडावे. ते वरकरणी इस्लामच्या आदेशाविरूद्ध असल्याचे भासत आणि म्हणून अनुयायी अशा गोष्टींबाबत खोलवर चिंतन करायचे.

उदाहरणार्थ- प्रेषित एकदा म्हणाले, ''आपल्या शत्रूवर ताबा मिळवणारा माणूस बलवान माणूस नव्हे.'' यामुळं त्यांच्याभवती असलेल्या अनुयायांमध्ये जिज्ञासा पसरली. त्यांनी विचारलं, ''मग प्रेषितांच्या मते कोणता माणूस बलवान?'' काही क्षणांनंतर प्रेषित त्यांना म्हणाले, ''रागाच्या भरात जो माणूस स्वत:वर नियंत्रण करू शकतो, तो शक्तिशाली होय.'' काही वेळा प्रेषित अलंकारित भाषेत बोलायचे. एकदा ते अनुयायांना म्हणाले, ''श्रीमंती लाभलेल्या माणसाकडं धनसंपत्ती नसते.'' यामुळं अनुयायी काही क्षण विचारात पडले. प्रेषितांनी जाहीर केलं, ''खरी संपत्ती म्हणजे आत्मिक धन होय.''

काही वेळा तर प्रेषितांची विधानं वरकरणी साधारण नैतिक नियमांविरूद्ध असायची. एकदा त्यांनी अनुयायांना सांगितलं, ''आपल्या सहकाऱ्यांना मदत करा. मग ते अन्यायी असोत की अत्याचारपीडित.'' त्यांचे अनुयायी काहीसे गोंधळून गेले. त्यांना कोडं पडलं. त्यांच्यातील एकानं विचारलं, ''जे न्यायी आहेत त्यांना मुस्लिमांनी मदत करावी, पण जो अन्याय करतो त्याला कुणी कशी मदत करणार?'' प्रेषित म्हणाले, ''त्याला अत्याचार

करण्यापासून रोखा.''

दुसऱ्या एका प्रसंगी प्रेषितांनी आपल्या अनुयायांना ताकीद दिली, ''केवळ प्रार्थना, भक्ती वा उपासनेनं पापं धुतली जाणार नाहीत, तर निवाड्याच्या दिवशी मानवी हक्कांचं उल्लंघन करणाऱ्या लोकांना त्या अपराधातून मुक्त केलं जाणार नाही.''

लोकांना फेरविचार करण्यास भाग पाडताना त्यांनी विचारलं, ''माहीत आहे कंगाल कोण?'' त्यांनी अपेक्षेप्रमाणंच उत्तर दिलं, म्हणाले, ''कंगाल तो ज्याच्याकडं रुपये-पैसे नाहीत की साधनं नाहीत असा.'' पण प्रेषितांनी या संधीचा उपयोग करून या परीक्षेला नवा अर्थ देऊन आपल्या अनुयायांना मानवाधिकारांचं उल्लंघन करण्यापासून कसं परावृत्त केलं ते पाहा.

प्रेषित म्हणाले, ''खरा कंगाल जो निवाड्याच्या दिवशी खूप सारे गद्‌गुण घेऊन येईल. प्रार्थना, उपवास, दानधर्म; पण त्याच वेळी इतर लोक त्याच्याविरूद्ध तक्रार मांडतील. त्यांचा दुरुपयोग केल्याचा. त्यांच्या मागं त्यांना वाईट म्हणण्याचा, एखाद्याची संपत्ती हिरावून घेतली असेल आणि त्याच्या हातांवर कुणाचं रक्तही माखलेलं असेल. त्याच्या अतिरेकी कृत्यांच्या पीडितांना त्याच्या सद्‌गुणांमधून कपात करून परतफेड केली जाईल आणि त्याचे सर्व कर्म वाया जाऊन पापांचं पारडं जड होईल. त्याला नरकाकडं फरफटत नेलं जाईल.''

अशा प्रकारे प्रेषितांनी एका श्रद्धावंतानं ज्याचं पालन केलं पाहिजे अशा आध्यात्मिक सामाजिक सभ्यतेवर भर दिला. फक्त अनिवार्य कर्मकांड आचरणात आणण्यानं सामाजिक मूल्यांकडं दुर्लक्ष केल्याची भरपाई होऊ शकत नाही. कारण त्यांचा संबंध मानवामानवांतील संबंधांच्या संवर्धनाशी आहे. त्यांनी आपल्या अनुयायांच्या टीकात्मक जाणिवांना उत्तेजन दिलं आणि अंधानुकरण करण्याची मनाई केली. यामुळं त्यांच्या अनुयायांमध्ये सामाजिक वर्तनात दक्ष राहण्याच्या तीव्र भावना निर्माण झाल्या, जेणेकरून आपल्या सहवाशांच्या अधिकारांचं जतन व्हावं.

# नैतिक अस्तित्व

इस्लाम माणसाला एक नैतिक अस्तित्वाच्या रूपानं पाहतो. ज्याला विचार करण्याचं आणि स्वत:विषयी चिंतन मनन करण्याच्या सामर्थ्याची देणगी दिलेली आहे. नैतिक अस्तित्व असल्यानं सदाचार, बंधुत्व, सहयोग आणि एकोपा साधण्यासाठी वातावरण निर्माण करून त्याला जोपासण्याची जबाबदारी त्याची आहे. ज्याद्वारे दुष्टता, अत्याचार आणि दुर्गुणांशी लढता यावे. दुर्लक्ष करणं किंवा उदासीनता बाळगण्याची वृत्ती समाजात अनैतिकतेला प्रोत्साहन देते आणि आपण ज्या मूल्यांना जपलंय त्यांच्या मूलाधाराला कमजोर करतात.

> प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या वचन आहे : ''काही दुष्ट घटना घडत असताना तुमच्यापैकी कुणी पाहत असेल तर त्याला बळानं रोखा, जर तसे सामर्थ्य नसेल तर त्याचा विरोध दर्शवून त्याचा प्रतिकार करा, जर हेही आपल्या आवाक्यात नसेल तर मनोमन त्याची निंदा करा आणि ही शक्तीहीन श्रद्धा आहे.''

## स्वत:चं बलिदान

इस्लाम मानवांमध्ये नैतिक जबाबदारी निर्माण करण्यावर भर देतो, ज्याद्वारे मानवी हक्काधिकारांचं जतन करण्याच्या जबाबदारीची जागृती माणसांमध्ये निर्माण व्हावी. मानवी हक्काधिकारांबाबत प्रवचन देणं आणि त्यांचा प्रचार करणं सोपं आहे, पण त्यावर स्वत: आचरण करणं हे अशक्य नसलं तरी फार अवघड गोष्ट आहे. याचा अर्थ इतरांच्या आवडीनिवडीबाबत

संवेदनशील असणं यासाठी मोठ्या प्रमाणात निस्वार्थीपणा, प्रांजळपणा आणि दयावन्त असायला हवं.

> प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले, ''कुणी खऱ्या अर्थानं मुस्लिम होऊ शकत नाही जोवर तो स्वत:ला जे आवडते त्याचीच इतरांसाठीही निवड करत नाही.''

## स्मितहास्य - दानासारखं

> प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले, ''आदम यांच्या वंशजांना जसे सूर्य दररोज उगवतो तसे दानधर्म करण्यास सांगितलंय.'' त्यांना विचारलं गेलं, ''आम्ही दररोज काय दानधर्म करावा?'' प्रेषित मुहम्मद यांनी उत्तर दिलं, ''भलाई करण्याचे अनेक मार्ग आहेत. चांगलं काम करण्यास सांगणं, दुष्टतेचं निर्मूलन करणं, रस्त्यातील इजा पोचवणाऱ्या वस्तूंना बाजुला सारणं, बधीर माणसाचं एकणं, अंध माणसाला वाट दाखवणं, एखाद्याला कशाची गरज असेल तर ती पूर्ण करणं आणि कुणी कष्टात सापडल्यास त्याच्या मदतीस धावून जाणं, आपल्या बाहुंनी अशक्तांना आधार देणं ही सर्व कामं दानधर्मच आहेत.''
>
> प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले, ''प्रेमळ उच्चार करणं आणि तुम्ही आपल्या भाऊ-बहिणींचं स्मितहास्यानं स्वागत करणं हेदेखील दानधर्म करण्यासारखंच आहे.''

## सामाजिक न्याय

इस्लामी कायद्यानुसार समस्त साधनं ईश्वरानं मानवांसाठी निर्माण केली आहेत. (पाहा- कुरआन, ३१:२०, ५७:७) ही साधनं सर्व

मानवजातींच्या उपयोगासाठी आहेत. काही व्यक्ती, परिवार किंवा समूहांसाठीच फक्त नाहीत. (पाहा- कुरआन, २:२९) आणि म्हणून माणसांनी ईश्वरानं दिलेल्या साधनांचा उपयोग घ्यावा. (पाहा- कुरआन, ७:३२, २८:७७) उपजीविकेला कुरआनात ईश्वराचं वरदान म्हटलंय. (पाहा- कुरआन, २:१९८, ५:४, १७:६६, २८:२, ६२:१०)

> प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले, ''आपल्या कुटुंबासाठी वैध मार्गांनी उपजीविका मिळवणं, हेही ईश्वरास्तव जिहाद आहे.''

## दानधर्म आणि मानवतावाद

इस्लामी परंपरेनुसार, अनुकंपा, परस्परांच्या हितांचं रक्षण आणि बलिदान यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कुरआन गरीब आणि गरजवंतांसाठी दानधर्म करण्यास उद्युक्त करतो. (पाहा- कुरआन, २:१९५, २१९, २५४, २६७, २७४, १४:३१, ५७:१०-११, ७६:८-९)

> प्रेषितांनी आणखीन हेही सांगितलं, ''विधवा आणि गरीबांची अल्प प्रमाणातदेखील सेवा करणारा ईश्वराच्या मार्गात जिहाद करण्यात व्यस्त असल्यासारखं किंवा दिवसभर उपवास आणि रात्रभर प्रार्थना करण्यासारखं आहे.''

## भेटणं आणि अभिवादन करणं

> कुरआनचं म्हणणं आहे :
>
> ''आमच्या वचनांवर ज्यांनी श्रद्धा धारण केली ते तुमच्याकडं येतील तेव्हा त्यांना 'सलाम' (तुम्हाला शांतता लाभो) म्हणा.'' (कुरआन, ६:५४)

''कुणी जर तुम्हाला शुभकामना व्यक्त केल्या तर तुम्ही त्याला त्याहून चांगल्या किंवा तशाच शुभेच्छा व्यक्त करा. अल्लाह सर्व बाबींचा हिशेब घेणार आहे.''

(कुरआन, ४:८६)

''तुम्ही घरात प्रवेश करताना एकमेकास सलाम (अभिवादन) करा. अल्लाहकडून शुभेच्छा द्या.''

(कुरआन, २४:६१)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी जाहीरपणे विधान केलंय-

''धाकट्यांनी थोरल्यांना सलाम करावा, चालणाऱ्यानं बसलेल्यांना आणि संख्येनं जे कमी आहेत त्यांनी संख्येनं अधिक असलेल्यांना सलाम करावा. दोन माणसांच्या मध्ये त्या दोघांची परवानगी घेतल्याशिवाय बसू नका.''

## सभ्यपणा आणि शिष्टाचार

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले :

''लोकहो! ईश्वरानं तुमच्यासाठी इस्लाम धर्म निवडला. त्यास सभ्यतापूर्वक आणि शिष्टाचारानं अंमलात आणा.''

## विनयशीलता आणि श्रद्धा

प्रेषित मुहम्मद (स.) (त्यांना शांतता लाभो) यांनी जाहीर केलं :

''प्रत्येक धर्माचा विशिष्ट स्वभाव असतो आणि इस्लामचं स्वाभाविक वैशिष्ट्य विनयशीलता आहे.''

## ईश्वराला चांगुलपणा आवडतो

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी जाहीर केलं :

''शक्तिशाली ईश्वर शोभिवंत असून त्यास सुंदरता आवडते. तो विशुद्ध असून त्यास पवित्रता पसंत आहेत.''

''ईश्वर तुमच्या शरीरांना, तुमच्या देखाव्यांना पाहत नसतो. तो तुमच्या मनांना आणि कर्मांना पाहतो.''

## कृपा

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले :

''जो लोकांशी दयापूर्ण वागत नाही, अल्लाह त्यावर कृपा करत नाही.''

''जे लोक अल्लाहच्या निर्मितीवर कृपा करतात आणि त्यांची काळजी वाहतात, अल्लाह त्यांच्यावर आपला स्नेह आणि कृपावर्षाव करतो. धरतीवरील निर्मितींना दया दाखवा, अल्लाह तुमच्यावर कृपा करील.''

## खरं प्रेम

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी आपल्या एका अनुयायांस सांगितलं, ''जे लोकांना आवडते त्यापासून दूर राहा. (मत्सर करू नका) लोक तुमच्याशी प्रेम करतील.''

ईश्वरानं प्रेषितांना प्रेमाची वाट अनुसरण्यास सांगितलं :

''माझा सेवक मुक्तपणे मला समर्पित होऊन माझी जवळीक साधतो आणि त्यावर प्रेम करतो. मी जेव्हा त्याच्याशी प्रेम करतो ज्याद्वारे तो ऐकतो ते मी ज्याद्वारे तो पाहतो, ज्या

हातांनी तो धरतो आणि ज्या पायांवर तो चालतो, तो मीच.''

ईश्वराचं प्रेम त्याच्याशी जवळीक साधण्याची देणगी देतो. ईश्वराचं प्रेम कशावर अवलंबून नसते, तो मुक्ती आणि उंची प्राप्त करून देतो.

## सहयोग

कुरआन म्हणतो :

''नेकी आणि सदाचारांत एकमेकांची मदत करा, पण पाप आणि आकस यामध्ये तुम्ही मदत करू नका.''

(कुरआन, ५:२)

''तुम्ही सर्वांनी एकत्रितपणे अल्लाहच्या दोरीस (आधारास) भक्कमपणे धरून ठेवा, आपसात विभक्त होऊ नका.''

(कुरआन, ३:१०३)

## आभारप्रदर्शन

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले : ''जो लोकांचे आभार मानीत नाही तो अल्लाहचे आभार मानीत नाही.''

## वचन पाळणे

कुरआन म्हणतो :

''श्रद्धावंत लोकहो, करारांचे / वचनांचे पालन करा.''

(कुरआन, ५:१)

## प्रामाणिकपणा

कुरआन म्हणतो :

“माप आणि तोल न्याय्य रीतीनं करा. कोणत्याही जीवांवर आम्ही तिच्या (सहन) शक्तीपलीकडं ओझं टाकत नाही. बोलाल ते न्यायाचं असावं. कोणाशी जवळचं नातं असलं तरी.” (कुरआन, ६:१५२)

## सचोटी

कुरआनात अल्लाह म्हणतो :

‘‘ßeeeJebe ueeskeâebes; DeuueenÛeer Yeer yeeU i ee DeeefCe pes meÌUeJeeve Deensle l ÌUeebee meeLe Åee.’’ (keqjDeeve, 9:119)

‘‘nsDeuueenne meÌUeJeeve ueeskeâebe l ÌUeebÛe meÌUe esÛe ceesyeoue oSÌUeene'' er Deens DeeheuÌUe cepeeweegej oeeHYekeâebe l esseMe#e oSF&e.’’ (keqjDeeve, 33:24)

Øesfe e cegocceo (l ÌUebee Mebe e ueeYes) cnCeeues:

‘‘ceuee nene i ees eRer noeer Åee; ceer l egneuee mJei e&Ûb DeeÕeneve oSees yeesieue l esne meÌUe yeesie; DeeheuebJeÛeve heeU e peyeyeoej er hej he[ e; DeeheuÌUe heefÌSLeeÛeej #eCe keâj e; vepej e Keeueer Deent Åee; DelÌUeeÛeej ehenetve Deeheues nel e j eKee.’’

meÌUe e meoideCekeâ[ bves Deeef Ce meoideCe mJei ekeâ[ bvesel e.

## विश्वसनियता

कुरआनचं विधान आहे :

“मी प्रेषित आहे तुमच्यासाठी विश्वास करण्याजोगा, तेव्हा

अल्लाहशी भीतीनं वागा आणि माझं (आज्ञा)पालन करा.''
(कुरआन, २६:१०७-१०८)

''(तुमच्याकडील) ठेवी (ज्याची त्यांना) परत करा, ही अल्लाहची तुम्हास आज्ञा आहे.'' (कुरआन, ४:५८)

## सामाजिक बदल घडवून आणणं

कुरआन म्हणतो :

''कोणत्याही जनसमूहाच्या परिस्थितीत अल्लाह तोवर बदल करत नसतो जोवर ते स्वत:च बदल करत नसतात.''
(कुरआन, १३:११)

## सभ्यपणा

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणतात :

''अल्लाह सभ्य असून सभ्यपणा पसंत करतो.''

## सुसंस्कृत संभाषण

इस्लाममध्ये सभ्यतापूर्ण संभाषण धार्मिक सद्‌गुण आहे आणि उद्धटपणानं बोलणं पाप आहे. कुरआनचं फर्मान आहे,

''लोकांशी सभ्यतेनं बोला.'' (कुरआन, २:८३)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचं वचन :

''जो अल्लाह आणि अंतिम दिनावर विश्वास ठेवतो त्यानं चांगलं बोलाव अथवा शांत राहावं.''

## व्यापारिक व्यवहार

कुरआन व्यापाराचा व्यवसाय करण्यास चालना देतो :

''...भूतलावर विखरून जा आणि अल्लाहची विपूलता शोधा.'' (कुरआन, ६२:१०)

अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणतात : ''जो मनुष्य खरेदी-विक्री करताना आणि दिलेल्या कर्जाच्या परतफेडीची मागणी करताना सोप्या आणि दयापूर्ण पद्धती अंगीकारतो त्यावर अल्लाहची कृपा होवो.''

## इतरांच्या चुकांवर पडदा घालणं

''जे लोक इतरांच्या चुकांवर पडदा घालतात अल्लाह त्यांच्या चुकांवर पुनरुत्थानाच्या दिवशी पडदा घालील.''

''श्रद्धावंत लोकहो! आपल्या घरांशिवाय इतरांच्या घरांमध्ये त्यांची परवानगी न घेता आणि त्यामधील लोकांना अभिवादन केल्याशिवाय आत जाऊ नका. तुम्ही लक्ष दिलं तर हे तुमच्या भल्याचं आहे. जर त्या (घरांमध्ये) तुम्हांस कुणी आढळलं नाही तर तुम्हांस परवानगी मिळेपर्यंत घरांच्या आत जाऊ नका.'' (कुरआन, २४:२७-२८)

''माणसानं आपल्या पाहुण्यास निरोप देण्यासाठी दारापर्यंत जावे.'' (हदीस)

## स्वच्छता श्रद्धेचा अर्धा भाग आहे

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणतात :

''स्वच्छता श्रद्धेचा अर्धा भाग आहे.''

इस्लाम धर्माचा आधार स्वच्छतेवर आहे.

प्रेषित मुहम्मद आपलं शरीर आणि वस्त्रं स्वच्छ ठेवत असत. ते नियमितपणे स्नान करीत आणि अनुयायांना स्वच्छ राहण्याची ताकीद करीत.

प्रेषित मुहम्मद आपल्या अनुयायांना आपली घरं आणि बाजार स्वच्छ ठेवण्याचा आग्रह करीत.

## बंधुभाव

> ''तुमच्यातला प्रत्येक आपल्या भाऊबंधासाठी आरशाप्रमाणे आहे. तुम्हाला त्यात काही गैर आढळल्यास त्यापासून मुक्त होण्यास त्याला सांगावं. श्रद्धावंत आपसांत एक इमारतीच्या विविध भागांसारखे आहेत. प्रत्येक भाग दुसऱ्याला आधार देतो.'' (हदीस)

## अत्याचारपीडितांशी मैत्री ठेवा

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी मुस्लिमांना आग्रहानं सांगितलं की,

> ''अत्याचारपीडित आणि अत्याचारपीडित वर्गासाठी आवाज उठवा.''
>
> कुरआन म्हणतो,
>
> ''अत्याचारपीडितांचे वाली बना आणि जुलमी सत्ताधीशांच्या अत्याचारांना आणि त्याच्या उपद्रवी कृत्यांना रोखा.''
>
> पुढे कुरआनचे विधान असे :
>
> ''तुम्ही दीन-दलितांच्या (हितांसाठी) पुरुष व स्त्री आणि

त्यांच्या संततीसाठी, अल्लाहच्या मार्गात का लढत नाही, जे म्हणतायत, आमच्या विधाता! आम्हाला या वस्तीतून बाहेर काढ. येथील लोक अत्याचारी आहेत आणि आमच्यासाठी आमचं संरक्षक उभं कर आणि आम्हाला तुझ्या वतीनं मदतगार बनव.'' (कुरआन, ४:७५)

## शिक्षण आणि ज्ञान

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी जाहीर केलं :

''पाळण्यापासून कबरीपर्यंत ज्ञान संपादित करत राहा. स्वत:विषयी माहिती करून घ्या. ईश्वरानं बुद्धीपेक्षा अधिक कोणती वस्तू आणि बुद्धिमत्तेपेक्षा परिपूर्ण आणि सुंदर काहीच निर्माण केलं नाही.''

''एका तासाचं चिंतन मनन वर्षभर प्रार्थना करण्यापेक्षा अधिक उत्तम आहे. शिक्षण प्राप्त करण्यात अधिक वेळ घालवणं प्रार्थनेमध्ये अधिक व्यस्त असण्यापेक्षा उत्तम आहे. रात्रीच्या वेळी तासभर शिक्षण देणं सबंध रात्र प्रार्थना करण्यापेक्षा अधिक उत्तम आहे.''

# आचार आणि वर्तन

## प्रतिकार

कुरआन आणि हदीस (पैगंबरांची शिकवण) आचार आणि वर्तन यांना अत्यंत महत्त्व देतात. त्यातला काही भाग खालीलप्रमाणे :

> ''श्रद्धावंत लोकहो! फार शंका घेणं टाळा, काही शंका पाप ठरतात. तसंच एकमेकांविषयी हेरगिरी नका. आणि एकमेकांच्या पाठीमागं बोलत जाऊ नका, तुमच्यापैकी कुणास आपल्या मृत भावाचं मांस खाणं आवडंल? तुम्हांस ते मुळीच आवडणार नाही. अल्लाहशी भीत राहा. अल्लाह पश्चात्तापाचा स्वीकार करतो आणि दया दाखवतो.''
>
> (कुरआन, ४९:१२)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणतात :

> ''जर कुणी मला आपल्या जिभेवर नियंत्रण घालण्याची, आपलं पावित्र्य जपण्याची, इतरांबाबत काही वाईट न बोलण्याची, दुसऱ्यांची निंदानालस्ती आणि चहाडी न करण्याची, व्यभिचार आणि तत्सम कृत्यांपासून अलिप्त राहण्याची हमी देत असेल तर मी त्याला स्वर्गाचं आश्वासन देईन.''

## शंका आणि संशय

"शंका घेण्यापासून सावधानता बाळगा, कारण चुकीच्या माााहितीवर त्याचा आधार असू शकतो. इतरांची हेरगिरी करू नका, इतरांच्या गुप्त चुकांना उघड करू नका."

(हदीस)

## खोटं बोलणं

कुरआन म्हणतो :

"...मूर्तिपूजेच्या घाणीपासून दूर राहा आणि खोटं बोलणं टाळा." (कुरआन, २२:३०)

पुढं :

"जो खोटं बोलणाऱ्यांपैकी असेल त्यावर अल्लाहचा शाप आहे." (कुरआन, २४:७)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) उद्गारले :

"तुम्ही आपल्या भाऊ-बहिणींना खोटं बोलला आणि त्यांनी ते मान्य केलं असेल तर हा त्यांचा विश्वासघात असेल."

"लोकांना हसवण्यासाठी जे खोटं बोलतात त्यांचा धिक्कार असो, धिक्कार असो, धिक्कार असो!" (हदीस)

## चुकीच्या कल्पना पाप आहेत

इतर लोकांबाबत चुकीच्या कल्पना बाळगणं किंवा काही कारण नसताना त्यांच्याबाबत वाईट बोलणं वर्ज्य आहे. श्रद्धावंत चुकीच्या कल्पना करणं टाळत असतात. काही गृहित धरलेल्या कल्पना पाप असतात. एकमेकांची हेरगिरी करू नका. परस्परांची चहाडी करू नका. ऐकिव गोष्टींचा विश्वास करू नये किंवा अफवांवर विश्वास ठेवू नका. बऱ्याच वेळा अशा

अफवा अर्ध्वसत्य किंवा सरळसरळ खोट्या गोष्टींवर आधारलेल्या असतात. इतर माणसांवर वा घटनांवर भाष्य करण्यापूर्वी श्रद्धावंतानं तथ्य पडताळून घेतलं पाहिजे आणि त्यांच्या बाबतीत आपलं मत व्यक्त करण्याआधी अत्यंत काळजी घेतली पाहिजे.

कुरआनचं म्हणणं आहे :

''श्रद्धावंत लोकहो! फार शंका घेणं टाळा, काही शंका पाप ठरतात.'' (कुरआन, ४९:१२)

''श्रद्धावंत लोकहो! एखाद्या दुष्ट प्रवृत्तीच्या माणसानं तुमच्याकडं एखादी बातमी आणली असता तिची चौकशी करून घ्या, नाहीतर नकळत तुम्ही लोकांना अडचणीत टाकाल आणि नंतर आपल्याकडून जे घडून गेलं त्यावर पश्चात्ताप करणं भाग पडेल.'' (कुरआन, ४९:६)

कुरआन म्हणतो :

''पवित्र वचनं (शब्द) एका पवित्र (चांगल्या) वृक्षासमान आहे. त्याची मुळं घट्ट असतात आणि फांद्या आकाशाला भिडलेल्या असतात.'' (कुरआन, १४:२४)

पुढच्या आयतीत म्हटलं गेलंय :

''वाईट शब्द वाईट वृक्षासमान असतात, ज्यांना जमिनीवरूनच उपटलं गेलं असेल. त्यास स्थैर्य नसते.'' (कुरआन, १४:२६)

पुढं कुरआनचं म्हणणं आहे :

''श्रद्धावंत लोकहो! आपसात एकमेकांची टिंगल-टवाळी करू नका, तुमच्यापेक्षा अधिक चांगले असतील तर त्यात नवल नाही. तसंच स्त्रियांनीही इतर स्त्रियांचं हसं करू नये, त्या त्यांच्यापेक्षा अधिक भल्या असतील. तसंच एकमेकांना बदनाम करू नका की एकमेकांना वाईट नावानं हाक मारू नका.'' (कुरआन, ४९:११)

## उघड-उघड गुन्हा

कुरआनात शक्तिशाली अल्लाह म्हणतो :

“कुणी चूक अगर पाप करून त्याचा आरोप इतर कोणा निरपराधावर ठेवत असेल तर अशा कुभांड आणि पापांचा बोजा त्याला उचलावा लागेल. हा तर उघड अपराध आहे.”
(कुरआन, ४:११२)

## उधळपट्टी

कुरआनात म्हटलंय :

“...अंदाधुंदीनं उधळपट्टी करू नका. निश्चितच वायफळ खर्च करणारे सैतानाचे भाऊबंद असतात. आणि सैतान आपल्या विधात्याशी कृतघ्न आहे.”
(कुरआन, १७:२६-२७)

## उद्धटपणा

कुरआनचं म्हणणं आहे :

“पृथ्वीवर उद्दामपणे संचार करू नकोस, तू धरतीला दुभंगूही शकणार नाही की पर्वताएवढी उंची गाठू शकणार नाही.”
(कुरआन, १७:३७)

“...घमेंडी करणारे आणि ऐट मिरवणारे अल्लाहस आवडत नाहीत.” (कुरआन, ५७:२३)

## आकांक्षा

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले :

''तुमच्या दारिद्र्याची मला भीती नाही वाटत, पण जेव्हा तुम्ही जगाच्या इच्छा-आकांक्षांच्या आहारी जाल जसं तुमच्यापूर्वी लोक आकांक्षांच्या आहारी गेले होते तेव्हा तुमचा नाश होईल, जसा यामुळं त्यांचा नाश झाला.''

## मत्सर

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) उद्गारले :

''मत्सरापासून दूर राहा, कारण जसं अग्नी लाकूड जाळून टाकतो तसेच मत्सर सद्वर्तनाला जाळून टाकतो.''

''एका मुस्लिमाच्या नावलौकिकास अन्यायानं हानी पोचविण्यापेक्षा दुसरं कोणतं भयानक कृत्य नाही.''

## टोमणा देणं

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले :

''इतरांच्या दुरवस्थेवर आनंद साजरा करू नका. कारण अल्लाह त्याला अडचणीतून मुक्त करून त्या जागी तुम्हाला ठेवील.''

## आवश्यक वस्तूंची साठेबाजी

कुरआनचं म्हणणं आहे :

''अल्लाहनं आपल्या औदार्यातून ज्या लोकांना दिलंय

त्याला लोभानं दाबून ठेवणं त्यांच्या हितात आहे अशा भ्रमात त्यांनी राहू नये. ते तर त्यांच्यासाठी (अतिशय) वाईट आहे. जे काही लोभानं ते रोखून ठेवतील ते लवकरच निर्णयाच्या दिवशी त्यांच्या गळ्यात अडकवले जाईल.''

(कुरआन, ३:१८०)

''जे लोक सोनं आणि चांदी साठवून ठेवतात आणि अल्लाहच्या कार्यात ती उपयोगी आणत नाहीत, त्यांना खूशखबर द्या यातनादायक शिक्षेची.''(कुरआन, ९:३४)

## वाममार्गानं कमवलेली धनसंपत्ती

जो कुणी अयोग्य मार्गांनी धनसंपत्ती आणि मालमत्ता मिळवतो आणि त्याला उपयोगात आणतो, आपल्या गरजांवर त्यातून खर्च करतो, स्वत:ला मोठी हानी पोचवतो. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी सावधान केल्यानुसार,

''अल्लाह त्याच्या प्रार्थना स्वीकारणार नाही, त्याच्या भक्तीभावाला प्रतिसाद मिळणार नाही, त्याच्या विनवण्या स्वीकारल्या जाणार नाहीत, त्यानं जरी चांगली कर्मं केली तरी त्यापासून त्याला काहीएक मिळणार नाही, परलोकात त्याच्यावर विधात्याची कृपा होणार नाही.''

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले :

''जर कुणी व्यक्ती अप्रमाणिक साधनांनी काही कमवतो आणि त्यातून काही भाग दानधर्म करतो, त्याचे हे दान देण्याचं कृत्य स्वीकारलं जाणार नाही. तो जर या संपत्तीतून आपल्या गरजा पूर्ण करण्यास खर्च करतो त्यामध्ये वास्तविक काही उत्कर्ष घडणार नाही आणि जर त्यानं आपल्या मृत्यूनंतर आपल्या वंशजांसाठी मागं ठेवलं तर

त्यापासून त्याला नरकाग्नीची तरतूद होईल. विश्वास करा, अल्लाह दुष्टतेपासून दुष्टता पुसून टाकत नाही. (म्हणजे वाममार्गानं कमवलेल्या संपत्तीतून दानधर्म केल्यानं मोक्षप्राप्ती होणार नाही) एका अशुद्धतेनं दुसरं अशुद्ध दूर होत नाही, ती त्यांना शुद्धता देत नसते.''

ते पुढं म्हणाले :

''अल्लाह विशुद्ध आहे आणि तो विशुद्धतेचाच स्वीकार करतो.''

## फसवणूक आणि लबाडी

कुरआनचं म्हणणं आहे :

''देण्या-घेण्यात तफावत करणाऱ्यांचा धिक्कार असो लोक इतरांकडून (काही) घेतात तेव्हा मापानं भरभरून घेतात पण जेव्हा दुसऱ्यांना मापून वजन करून देतात तेव्हा प्रमाणापेक्षा कमी देतात.'' (कुरआन, ८३:१-३)

प्रेषित व्यापाऱ्यांना अचानक भेट देत असत. एकदा एका व्यापाऱ्यानं ओल्या धान्यावर सुकलेलं धान्य विखरून ठेवल्याचं त्यांच्या लक्षात आलं. प्रेषितांनी त्या धान्याच्या ढिगाऱ्यात हात घातला भेसळ पाहण्यासाठी, तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की त्या व्यापाऱ्यानं लोकांना फसवण्यासाठी हे केलंय. त्यांनी त्या व्यापाऱ्यास विचारलं,

''तू हे का केलंस?''

व्यापारी म्हणाला, ''पावसामुळं.''

प्रेषित म्हणाले,

''जो दुसऱ्याची फसवणूक करतो तो आमच्यापैकी नाही.''

# कुकृत्ये आणि भ्रष्टाचार

कुरआनचं म्हणणं आहे :

''...खा प्या पण धरतीवर अनाचार माजवत हिंदू नका.''
(कुरआन, २:६०)

## लोभ

संतुष्टता ही यश आणि आनंदाची किल्ली आहे आणि लोभ अगदी याउलट आहे.

आमच्यापैकी अनेकांचा विश्वास आहे की धनसंपत्ती आम्हाला आनंद मिळवून देईल. पण आनंद मिळणार नाही. तो आमच्या स्वभावाचा आंतरिक भाग आहे. पण भौतिक संपत्तीच्या मागं लागून त्याची पूर्तता होणार नाही. खरं पाहता फक्त समाधानानं आम्हाला आनंद मिळू शकते, ज्यामुळं शरीर आणि आत्मा लोभाच्या बंधनातून मुक्त होतात. लोभाचा शेवट नसतो, तो प्रेषितांच्या परंपरेतील खालील मजकूर मानवांच्या स्वाभाविक प्रवृत्तीवर बराच प्रकाश चाकतो.

> ''आदमच्या संततीला खोरं भरून जरी सोनं देऊ केलं तरी तो दोन खोरी भरून सोनं मिळवण्याची इच्छा बोलून दाखवील. मातीशिवाय त्याचं तोंड कशानंही भरलं जाऊ शकत नाही. जो पश्चात्ताप व्यक्त करतो, त्यास ईश्वर क्षमा करतो.''

माणूस सदैव संपत्ती आणि ऐहिक सुखांच्या मागं लागलेला असतो. अधिकासाठी झटत राहणं त्याचा स्वभावधर्म आहे. त्याचा डोळा नेहमी श्रीमंत होण्याच्या संधी, नवनवीन गाड्यांचं स्वप्न निसर्गरम्य ठिकाणी, वैभवशाली महालांवर असतो. आपल्या आशा-आकांक्षा आणि स्वप्ने साकारण्यासाठी तो कोणता अडथळा वाटेत येऊ देत नाही. ऐहिक साधनांच्या मागं लागून अनेक

वेळा आम्हाला नैतिक मूल्यांचा विसर पडतो. या जगाच्या प्रेमात आणि मनोरंजनामध्ये अडकून आम्ही परलोकाबाबत विचारही करत नाही. आम्हाला कधीही याचा विसर पडायला नको आहे की आमचा प्रमुख उद्देश ईश्वराची उपासना करणं आहे.

आमचा विधाता आम्हाला आंधळेपणानं जगाच्या सुखसुविधांच्या मागं लागू नये यासाठी परावृत्त करतो आणि या जगातल्या वैभवांना क्षणिक देखावा म्हणून त्यांची अवहेलना करतो जे आम्हाला आमचा प्रमुख उद्देश, ईश्वराचं स्मरण करण्यापासून दुसरीकडं वळवतात. कुरआनची आयत :

''तुमच्या संतती आणि श्रीमंतीमुळं तुम्हांस आमच्या निकटचे स्थान मिळत नाही. पण जे श्रद्धा ठेवतात आणि सत्कर्मं करतात त्यांच्यासाठी दुप्पट मोबदला असेल. त्यांच्या (सत्) कर्मांमुळं ते उत्तुंग महालांमध्ये समाधानाने राहतील.'' (कुरआन, ३४:३७)

## भ्रष्टाचार

आपण आता लोभाच्या तळाशी पोचलो असताना आपण असं म्हणू या, हा भौतिक लोभच आम्हाला इतरांची आर्थिक साधनं हिसकावून घेण्यासाठी कारणीभूत ठरतो. अवैध मार्गांनी भौतिक आकांक्षांची पूर्तता करण्यासाठी कोणत्याही प्रयत्नांमुळं समाज न्याय आणि समतेशी वंचित राहतो. साधारण या शब्दांत याला लूट म्हणतात, जी आमच्या समाजामध्ये विस्तारलेली आहे.

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी आपल्या अनुयायांना अवैध मार्गानं श्रीमंती मिळवण्यापासून सावध केलंय. एकवेळ एक कारकून लोकांकडून कर गोळा करून प्रेषितांकडं आला आणि कर रूपात ज्या काही वस्तू त्यास दिल्या होत्या त्या त्यानं प्रेषितांसमोर ठेवल्या आणि म्हणाला, ''हा शासनाला दिलेला कर आहे आणि या वस्तू मला भेट म्हणून दिल्या आहेत.'' त्यांच्याकडील काही वस्तू टॅक्स (जकात) म्हणून दिलेल्या होत्या तर काही वस्तू त्याला भेट म्हणून मिळाल्या होत्या.

प्रेषितांना हा भ्रष्टाचार असल्याचं समजलं. ते तिथं जमलेल्या अनुयायांना लगेच संबोधून म्हणाले,

> ''या करवसुली करणाऱ्याकडं पाहा, तो म्हणतो हा जकातचा भाग आहे आणि या मला दिलेल्या भेटवस्तू आहेत. आता त्याला घरी बसू दे आणि पाहू दे कोण लोक त्याच्यासाठी भेटी आणून देतात.''

## मद्यपान आणि जुगार

मद्यपान आणि जुगार निषिद्ध केल्याचा आदेश कुरआनात पाचव्या अध्यायातील क्रमांक ९० व्या आयतीत आला आहे.

> ''श्रद्धावंत लोकहो, मद्य, जुगार, वेदी आणि बाणांचा शकुन वास्तवात वाईट असून ती सैतानी कृत्यं आहेत. तुम्हास यशस्वी व्हायचं असल्यास या गोष्टींपासून दूरच राहा.''
>
> (कुरआन, ५:९०)

मद्य सेवन आणि जुगाराची सवय समाजासाठी धोकादायक असून दुष्ट परिणामांचं कारण असते. हे लोकांना विधायक कार्यापासून दूर करून त्यांना अवैध मार्गानं श्रीमंती लाटण्याकडं वळते. अनेक प्रकरणांमध्ये यामुळं कुटुंबाची आर्थिक स्थिती नष्ट होते, कर्जबाजारी होऊन शेवटी ते कंगाल होऊन जातात. याशिवाय यामुळं समाजाची नैतिक बांधणी क्षीण होते.

प्रख्यात ब्रिटीश साहित्यिक ऑरनल्ड जे टॉयनबी यांनी एकदा हे निदर्शनास आणलं होतं की मानवजातीला इस्लामच्या सर्वात मौल्यवान आणि स्थायी देणग्यांमध्ये जुगार आणि दारूबंदीचा समावेश आहे.

# रिबा म्हणजेच व्याज अथवा व्याजाची पद्धत

इस्लामी अर्थव्यवस्थेमध्ये व्याजावर आधारित सर्व व्यवहार - व्यवसाय प्रतिबंधित आहेत. इस्लाममध्ये सव्याज आणि भरमसाठ व्याजपद्धतीमध्ये कोणताही भेद नाही. इस्लाममध्ये व्याजाला मुळीच स्थान नाही. कोणतेही नाव द्या, व्याज किंवा सावकारी इस्लामनं निषिद्ध केलंय.

व्याज एखादा व्यापार नाही की होणारा नफा नाही, पिळवणूक करून संपत्ती एकवटण्याचं ते माध्यम आहे.

कुरआनचं म्हणणं आहे :

''ते व्याजाची तुलना व्यापाराशी करतात. पण अल्लाहनं व्यापार वैध केला असून व्याजबट्टा निषिद्ध केलाय.''
(कुरआन, २:२७५)

''तुम्ही लोकांच्या संपत्तीत वाढ होण्यास व्याज म्हणून जे देता अल्लाहजवळ त्याचा लाभ होणार नाही.''
(कुरआन, ३०:३९)

''श्रद्धावंत लोकहो, दुप्पट-चौपट (दरानं) चक्रवाढीनं व्याज खाऊ नका. अल्लाहचं भय बाळगा, मगच तुमचा उत्कर्ष घडेल.'' (कुरआन, ३:१३०)

''श्रद्धावंत लोकहो, जर तुमची निष्ठा असेल तर अल्लाहला भिऊन वागा आणि व्याजातून जे काही बाकी (घेणे) असेल ते सोडून द्या. पण जर तुम्ही तसं केलं नाही तर मग अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताशी युद्धास सामोरं जाण्याची तयारी ठेवा.जर तुम्ही परावृत्त झाला तर मूळ रक्कम तुमचीच आहे. तुम्ही इतरांशी अन्यायी वर्तणूक करू नका तुमच्यावरही अन्याय होणार नाही.'' (कुरआन, २:२७८-२७९)

व्याज आधुनिक मुक्त बाजारव्यवस्थेचं एक अंग आहे. जकातद्वारे

श्रीमंतांकडची संपत्ती गरीबांना दिली जाते. याउलट व्याजाद्वारे गरीबांची कमाई श्रीमंतांकडं वळवली जाते. आधुनिक अर्थव्यवस्थेची मदार व्याजावर आहे. त्याच्याशिवाय जगणं कठीण असल्याचं गृहित धरलंय. याला इस्लामनं आव्हान दिलंय. जगात सर्वत्र व्याजरहित इस्लामी बँका आणि गुंतवणूक संस्था यशस्वीपणे कार्यरत आहेत.

# दारिद्र्याचं भय आणि गर्भपात

कुरआन म्हणतो :

> ''एखाद्याला मुली (झाल्याची) खूशखबर दिली की त्याचा चेहरा काळा पडतो आणि तो रागावून जातो.''
>
> (कुरआन, १६:५८)

इस्लामपूर्व सातव्या शतकातील अरबस्थानात मुलींना मारून टाकण्याची कुप्रथा सर्वसाधारण बाब होती. ते मुलांना तीन कारणांनी मारून टाकायचे आणि कुरआननं या तिन्हींचा उल्लेख केलाय. पहिलं कारण ते मुलांना आपल्या देवतांसाठी नरबळी द्यायचे, त्यांना खूश करण्यासाठी. (पाहा- कुरआन, ६:३७ आणि ६:१४०)

दुसरं असं की ते आपल्या मुलांना दारिद्र्याच्या भीतीनं मारून टाकायचे. कुरआननं याविरूद्ध त्यांना इशारा दिला आणि आपल्या मुलींना मारून टाकणे पूर्णपणे अवैध ठरवलं.

> ''दारिद्र्याच्या भीतीनं आपल्या मुलाबाळांना ठार करू नका, आम्ही त्यांनाही उपजीविका देतो आणि तुम्हांसदेखील. त्यांची हत्या करणे निश्चितच मोठा अपराध आहे.'' (कुरआन, १७:३१)

ही आयत कुटुंब नियोजनाच्या मुळावर आघात करते, जो प्राचीन काळापासून सांप्रत काळापर्यंत चालत आलाय. लोक आपल्या मुलांना कमतरतेच्या भीतीनं ठार करीत अथवा गर्भपात करून टाकत. आपल्या काळात आणखीन एका तऱ्हेची भर घातली गेली, म्हणजे कृत्रिमपणे गर्भधारण रोखणं आणि जन्मापूर्वी सोनोग्राफी करणं.

जन्माला आलेली मुलगी आर्थिक अडचणीत टाकण्याचं तसेच काही दोषीपणा असल्याचं कारण समजलं जायचं आणि त्यापासून मुक्त होण्यासाठी तिला जीवंत गाडून टाकलं जायचं. दहामधून एक कुटुंब याचे दोषी होते. पुरुषच नव्हे तर स्त्रियादेखील यात सहभागी होत असत. माता आपल्या मुलीस

गाडून टाकण्यासाठी तिच्या पित्याच्या हवाली करायच्या. ही पद्धत भ्रूणहत्येच्या रूपानं आजदेखील आधुनिक जगात सर्रास चालत आलीय. युनिसेफनं (UNICEF) तयार केलेल्या जागतिक अहवालानुसार भारतात मुलींपेक्षा मुलांची संख्या जास्त आहे. हे प्रमाण ९८० मुली आणि १००० मुले असं आहे. जागतिक स्तरावर हे प्रमाण ९५४ मुली १००० मुले असं आहे. मुलांच्या जन्मातही घसरण भ्रूणहत्येमुळं झालीय.

एका अंदाजानुसार दरवर्षी ७,००,००० मुलींचा त्यांच्या जन्मापूर्वीच नाश केला जातो. या भयंकर आकडेवारीनं तमाम मानवजातीला लाज वाटायला हवी आणि त्यांच्या विवेकबुद्धीला वरून खालपर्यंत हेलावून टाकलं पाहिजे. तरीदेखील आम्हाला बळजबरीनं असा विश्वास करण्यास भाग पाडलं जातं की आम्ही मानवजातीसाठी काळजी बाळगणाऱ्या सभ्यतेत नांदत आहोत.

दृढ सांस्कृतिक कारणांनी पुत्रासाठी असलेली आवड आणि जन्मापूर्वी सोनोग्राफी प्रक्रियेमुळं मुलगीची गर्भधारणा निश्चित करणं सोपं झाल्यानं गर्भपात केले जातात. आपल्या अनुमतीनुसार मुलांचा जन्म होवो याचं नियोजन केले जाते.

निवाड्याच्या दिवशी जबाबदारीच्या संबंधानं कुरआन याचा उल्लेख करतो मुलीच्या हत्याऱ्याला विचारलं जाईल की त्यानं आपल्या मुलीस का ठार केलं.

> "जेव्हा जमिनीत जीवंत गाडलेल्या मुलीला विचारलं जाईल
> कोणत्या अपराधापायी तुला ठार केलं?"
>
> (कुरआन, ८१:८-९)

प्रेषित मुहम्मद यांनी हे स्पष्टपणे मांडलं आहे की मुलीचा जन्म ही कुटुंबासाठी तिरस्काराची गोष्ट नव्हे, तर ती गर्वाची गोष्ट आहे. जो मनुष्य आपल्या मुलीचं योग्य संगोपन करतो, त्याचा समावेश अशा आदरणीय लोकांमध्ये होईल ज्यांना प्रेषितांच्या सान्निध्यात राहण्याचा सन्मान मिळेल.

# वंशवाद

"सदाचार आणि ईश्वरास समर्पण हीच प्रतिष्ठा."
(कुरआन, ४९:१३)

इस्लामनं वंश आणि रंगभेदांना नेस्तनाबूद केलं. इस्लामपूर्व सातव्या शतकातील अरबस्थानात कबिले-टोळयांच्या रूपात मक्केत वंशवाद सर्वत्र प्रचलित होता. मक्केचे कुरैश लोक अरबांना आणि विशेषकरून स्वत:ला सर्व लोकांपेक्षा प्रतिष्ठित समजत होते. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी एक दैवी संदेश आणला आणि जाहीर केलं :

> "कोणा अरबाला अरबेतरावर प्रतिष्ठा नाही आणि गोऱ्या व्यक्तीला काळया व्यक्तीवर प्रतिष्ठा नाही."
>
> "एखादा काळा हबशी जरी मुस्लिमांवर सत्ताधारी झाला तर त्याचं पालन केलं जावं."

आपणास माहीत आहे की आजदेखील काळ्या निग्रो लोकांशी आणि मागासवर्गीयांशी सभ्य गोरे लोक आणि उच्चवर्णिय कसा व्यवहार करत आहेत. जवळपास १५०० वर्षांपूर्वी इस्लामच्या प्रेषितांच्या काळात बिलाल यांच्या स्थितीकडं पाहा. इस्लामच्या प्रारंभीच्या काळात लोकांना नमाजकडं बोलविणं सन्मानाचं समजलं जात होतं आणि हा सन्मान त्या एका निग्रो गुलाम - बिलाल यांना बहाल केला होता. मक्का विजयानंतर प्रेषितांनी त्यांना प्रार्थनेसाठी हाक (अजान) देण्याचा आदेश दिला आणि हे निग्रो गुलाम सर्वांत ऐतिहासिक आणि आदरणीय पवित्र स्थळ काबागृहाच्या छतावर जाऊन उभे राहिले.

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी जाहीर केलं की जर एक काळा हबशी मुस्लिमांवर सत्ताधारी झाला तरी त्याचं पालन करावं. प्रेषितांनी वंश आणि रंगभेदांना इतक्या यशस्वीपणे उपटून काढलं की उदाहरणादाखल:

- इतिहासात ज्यांना उमरच्या नावानं ओळखलं जातं ते इस्लामी राज्याचे दुसरे खलीफा बिलाल, निग्रो गुलाम यांना पाहताच सन्मानार्थ उठून उभं

राहायचे आणि त्यांचं स्वागत अशा शब्दांनी करायचे,

"हे येत आहेत आमचे मालक, आमचे स्वामी."

अरबांमध्ये कुरआन आणि प्रेषित मुहम्मद यांनी कसा बदल घडवून आणला?

- झैद बिन हारिस गुलाम होते. प्रेषित मुहम्मद यांनी मुस्लिम सैन्याच्या सेनापतीपदावर त्यांची नियुक्ती केली आणि त्यांना बायझेन्टाइन (रोमन) साम्राज्याविरूद्ध पाठवलं.
- उसामा गुलाम होते. प्रेषितांनी त्यांची नियुक्ती मुस्लिम सैन्याचा प्रमुख सेनापती म्हणून केली.
- एके दिवशी अबु झर गिफ्फारी एका काळ्या मुस्लिमाच्या शेजारी बसले. अबु झर यांनी त्यांना 'काळा माणूस' या नावानं संबोधलं. हे ऐकल्यावर प्रेषित मुहम्मद कमालीचे अस्वस्थ झाले आणि त्यांनी अबु झर यांना सुधरण्यास सांगितलं. ते म्हणाले,

  "काळ्यांवर गोऱ्यांना प्राधान्य नाही."

  प्रेषितांनी त्यांना समज देताच अबु झर यांना झालेली चूक कळली. खेद व्यक्त करण्यासाठी त्यांनी स्वत:ला जमिनीवर लोटून दिलं आणि ज्या व्यक्तीस त्यांनी दुखावलं होतं त्याला म्हणाले, "माझ्या चेहऱ्यावर उभं राहून आपल्या पायांनी माझा चेहरा घासा."
- एकदा एका श्रीमंत व्यक्तीस आपल्या बाजूस बसलेल्या मुस्लिमांपासून आपली वस्त्रं आवरून घेताना पाहून प्रेषितांनी टीका करताना म्हटलं,

  "त्याची गरीबी तुम्हाला चिकटेल याची तुम्हाला भीती वाटते?"
- प्रेषितांनी अशा प्रकारे इतका विलक्षण बदल घडवून आणला की अरबांमधील सर्वांत सभ्य आणि पवित्र लोकांनी निग्रो गुलामांना विवाहबंधनांत सामावून घेतलं.

याच कारणांमुळं जर्मनीचा महान कवी गोएटे ने कुरआनसंबंधी विचार व्यक्त करताना घोषणा केली की,

"हा ग्रंथ सर्व काळांमध्ये शक्तिशाली प्रभाव टाकत राहील."

तसेच बेर्नार्ड शॉ च्या वक्तव्याचं कारणही हेच. पुढच्या १०० वर्षांत इंग्लंडवर नव्हे तर यूरोपात सत्ता गाजवण्याची कुठल्या धर्माला संधी मिळेल तर तो इस्लाम धर्म आहे.

# दहशतवाद

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले :

"ईश्वर सभ्यपणासाठी मोबदला देतो, जसं हिंसा किंवा दुसऱ्या कशाचाही मोबदला देत नाही."

प्रेषित मुहम्मद म्हणाले :

"कयामत जवळ येत असताना अगणित हत्या होत राहणं सहज शक्य असेल. हत्यारा ठार व्यक्तीला ओळखणार नाही आणि ठार झालेल्यास त्याला कुणी ठार केलं आणि कशासाठी हे माहीत नसेल."

आम्ही तोंड देत असलेल्या शोकांतिकेचं भाकित प्रेषितांनी साडेचौदाशे वर्षांपूर्वी केलं होतं. दहशतवादी घटनांमध्ये लक्षावधी लोक मारले जात आहेत. तसेच सैनिकी हल्ल्यांमध्ये, निर्बंधनं, विविध देशांवरील बंदी आणि पोलिसांकडून अनेक लोक मारले जातात की आपल्याच नागरिकांविरूद्ध सैन्यांकडून कारवाईमुळं ठार होतात.

विस्थापित लोकांना ठार केलं जातं. त्यांना कुणी ठार केलं आणि का? हे त्यांना माहीत नसतं. मारेकऱ्यांनाही त्यांनी कुणाला ठार केलं हे माहीत नाही. जी माणसं मारली जातात त्यांना मारेकऱ्यांशी कोणतं व्यक्तिगत शत्रुत्व नसते.

# १२

# जीवनाचे काही ठळक पैलू

## अन्न-पाणी

अन्न-पाणी आपल्या आरोग्यावर, वाढीवर आणि मानसिक स्थितीवर प्रभाव टाकतात. इस्लामनं अन्न-पाण्याचे नियम दिले आहेत. इस्लामचा उद्देश एक निरोगी आणि नैतिक समाज उभारण्याचा आहे. तो सर्व पवित्र आणि आरोग्यदायक वस्तूंचं अन्न म्हणून सेवन करण्याची अनुमती देतो.

कुरआनात म्हटलंय :

''हे लोकहो, पृथ्वीतील वैध व पवित्र वस्तू खा. सैतानाच्या वाटेला जाऊ नका, तो तुमचा उघड शत्रू आहे.''

(कुरआन, २:१६८)

मुस्लिमांनी जेवणाची सुरूवात 'बिस्मिल्लाहिर्रमानिर्रहीम' (असीम दयावंत आणि परम कृपावंत अल्लाहच्या नावानं) म्हणत करावी आणि ईशप्रार्थनेनं जेवण संपवताना म्हणायचं, ''सर्व स्तुती अल्लाहसाठी ज्यांन आम्हाला खावयास आणि पिण्यासाठी दिलं आणि आम्हाला मुस्लिम बनवलं.''

प्रेषितांनी आम्हाला जेवणापूर्वी आणि नंतर हात धुवायचं आणि उजव्या हातानं जेवायला शिकवलं. पोट भरून जेवणं उचित नाही. प्रेषितांनी आम्हाला पाणी आणि इतर पेय एकाच श्वासात पिण्यास मनाई केलीय. पिताना

थोडं थांबायचं। तीन वेळा थांबणं चांगलं आहे.

जे काही अशुद्ध आणि हानिकारक आहे ते खाण्यास इस्लामनं निषिद्ध केलंय.

इस्लामी कायद्याप्रमाणं वैध वस्तूंना (गोष्टींना) 'हलाल' म्हणतात आणि निषिद्ध वस्तूंना (गोष्टींना) 'हराम' म्हणतात.

खालील मांस प्रकारांना खाणअयास इस्लामनं निषिद्ध केलंय.

**अ.** मृत पशु-पक्षी (जे स्वाभाविकरित्या मरण पावले).

**ब.** अल्लाहचं नाव न घेता कापलेल्या पशु-पक्ष्याचं मांस.

**क.** गुदमरून मरून पडलेले पशु-पक्षी.

**ड.** डुकराचं मांस.

**ई.** मांस खाणारे पशु-पक्षी.

**फ.** ज्या पशु-पक्ष्यांना जंगली जनावरांना खाल्लेलं असेल.

पशु-पक्ष्यांच्या रक्ताचं सेवन करणंही इस्लामनं निषिद्ध केलंय. (२:१७३, ५:३, ६:१४५, १६:११५) इस्लाम पशु-पक्ष्यांच्या जीवांचा आदर करण्या आणि त्यांची काळजी घेण्याची शिकवण देतो. ईश्वरानं अनंत कृपेनं आमच्या खाण्यासाठी वनस्पती खाणारे पशु-पक्षी निर्माण केले आहेत. पण त्यांना आम्ही ईश्वराच्या आदेशाप्रमाणं कापलं पाहिजे. कापण्यापूर्वी ईश्वराचं नाव घेणं आवश्यक आहे. अशा रितीनं ज्या पशु-पक्ष्यांना कापलं गेलं नसेल त्यांचं मांस आणि इतर उत्पादनं अवैध (हराम) आहेत.

## मद्यार्कयुक्त पेय हराम आहेत

सर्व प्रकारचे मादक पदार्थ, पेय, बीयर, वाइन आणि स्पिरीट्स निषिद्ध आहेत. मद्यार्कयुक्त पेय एका निरोगी समाजास योग्य नाहीत.

कुरआनचं म्हणणं आहे :

''श्रद्धावंत लोकहो, मद्य, जुगार, वेदी आणि बाणांचा शकुन

> वास्तवात वाईट असून ती सैतानी कृत्यं आहेत. तुम्हास यशस्वी व्हायचं असल्यास या गोष्टींपासून दूरच राहा. तुमच्यात दारू आणि जुगार यांच्या कारणी तुमच्यामध्ये वैमनस्य भडकावणं ही सैतानाची योजना आहे. तसेच अल्लाहची आठवण आणि त्याच्या प्रार्थने (नमाज) पासून तुमचा अटकाव करण्याची (सुद्धा). तर मग तुम्ही त्यांच्यापासून दूर होणार नाहीत?''(कुरआन,५:९०-९१)

मद्यपान करण्यानं समाजासमोर गंभीर समस्या उभ्या ठाकतात. यामुळं अनेक दुष्ट गोष्टी आणि पाप घडतात. इस्लामचा उद्देश सर्व दुष्ट गोष्टींना समूळ नष्ट करण्याचा आहे, जेणेकरून समाज निरोगी आणि शांततापूर्ण असेल. इस्लामी जीवनप्रणालीमध्ये अनेक फायदेशीर नियम आहेत. आपण शक्यतो या नियमांचं पालन करावं. इस्लामी कायदे आणि नियमांना दूर करण्यासाठी आपण निमित्त शोधू नयेत तर आपण गांभीर्यपूर्वक प्रयत्नांनी ईश्वराच्या आदेशांचं पालन करावं.

# वस्त्र-पोषाख

शक्तिशाली ईश्वरानं मानवाला सर्वोत्तम आकारात साकारलंय. त्याच्या सेवकांनी साजेसा आणि छान असा पोषाख परिधान करावा ही त्याची इच्छा आहे. आपण सर्वोत्तम निर्मिती आहोत हे आम्ही ध्यानी ठेवायला हवं. आपली वस्त्रं हे दाखवून द्यायला हवीत. योग्य पोषाख घालण्यानं असभ्यपणा, अनैतिक वर्तन यावर बंधने येतात आणि आपल्या व्यक्तिमत्त्वास सौंदर्य प्राप्त होतं.

कुरआनचं म्हणणं आहे :

''हे आदमची संतती! आम्ही तुमच्याकरिता वस्त्रं अवतरली आपली गुप्त अंगं झाकण्यासाठी तसेच सौंदर्यासाठी, पण ईश्वराशी निष्ठेची वस्त्रं सर्वोत्तम असतात.''

(कुरआन, ७:२६)

इस्लाम साधेपणा आणि विनयशीलतेला उत्तेजन देतो. ज्या वस्त्रांनी अहंकाराचा देखावा व्यक्त होतो त्यांचा तिरस्कार करावा. वस्त्रशैली स्थानिक परंपरा आणि हवामानावर अवलंबून असते.

अब्दुल्लाह बिन उमर म्हणतात की मी अल्लाहच्या प्रेषितांना समर्पण केले, ''हे अल्लाहचे पैगंबर! मी जर उत्तम प्रकारची छान वस्त्रं घातली तर मी अहंकार आणि उद्धटपणाचा दोषी ठरणार?'' प्रेषित म्हणाले, ''उत्कृष्ठ वस्त्रं परिधान करणं चांगली गोष्ट आहे. अल्लाहला सुसंस्कृत असणं आवडतं.'' ते पुढं म्हणाले, ''नमाजच्या वेळी उत्तम कपडे परिधान करत जा. (परिपूर्ण पोषाख परिधान करा.) माणसानं उत्तम पोषाख नेसून कुणा दुसऱ्यासमोर जाण्यापेक्षा अल्लाहसमोर हजर असणं ही उत्तम गोष्ट आहे.''

दुसऱ्या शब्दांत, सुसंस्कृत वस्त्रं घालण्याचा अर्थ अहंकार बाळगणं नाही. इतरांच्या अधिकारांकडं दुर्लक्ष करणं त्यांना, तुच्छ समजणं अहंकार आहे.

# सण-त्योहार

इस्लाममध्ये सण साजरे करणं म्हणजे अभीष्टचिंतन, हर्षोल्हास आणि आनंद. इस्लामचे वर्षातून दोन मुख्य सण आहेत- 'ईदुल फित्र' आणि 'ईदुल-अजहा'. हे सण ईश्वराच्या प्रसन्नतेसाठी त्यास समर्पित होणे असून केवळ आनंद लुटण्यासाठी नाहीत.

## ईदुल-फित्र

ईदुल-फित्र हा सण शव्वाल महिन्याच्या पहिल्या तारखेस (इस्लामी वर्षाचा दहावा महिना), रमजान महिना संपताच पहिल्या दिवशी साजरा केला जातो. महिनाभर उपवास केल्यानंतर या दिवशी मुस्लिम लोक खुल्या मैदानात किंवा मशिदींमध्ये सार्वजनिक प्रार्थना करून आनंद व्यक्त करतात. महिनाभर उपवास करण्याचे भाग्य त्यांना लाभले यासाठी ते ईश्वराचे आभार मानतात. या दिवशी विशिष्ट पक्वान्न केले जातात आणि एकमेकांच्या घरी भेट देम्याची परंपरा जपतात. बालकांना भेटवस्तू देतात. मुस्लिम लोक या दिवशी उत्तम प्रकारची वस्त्रं आवर्जून परिधान करतात.

## ईदुल-अजहा

हा सण १० जिलहज्जा (इस्लामी वर्षाचा बारावा महिना) या दिवशी साजरा केला जातो. ईश्वराच्या आदेशानं प्रेषित इब्राहीम (Abraham) यांनी आपले पुत्र इस्माईल (Ishmael) यांचं बलिदान देण्याची तयारी दर्शविली होती. त्याच्या स्मरणार्थ हा सण साजरा होतो. शक्तिशाली ईश्वरानं इब्राहीम यांची ईशनिष्ठा आणि त्याच्या आदेशाचं पालन करून इस्माईल यांच्या जागी एका मेंढ्याचा बळी देण्यास सांगितलं. महानतम महत्त्वाचा हा प्रसंग हज्जच्या दिवसांमध्ये (मक्का यात्रा) दरवर्षी येतो आणि सार्वत्रिक नमाजद्वारे साजरा केला जातो, ईदुल-फित्रसारखाच. ज्या मुस्लिमांची आर्थिक स्थिती बरी असेल त्यानुसार ते मेंढी-शेळी, उंट व इतर पशुंचा बळी देतात. बळी दिलेल्या पशुचं मांस स्वत: खातात, नातेवाईकांना, शेजाऱ्यांना आणि गरीबांनाही खाण्यास देतात. या बलिदानामुळं मुस्लिमांच्या आंतरिक भावना व्यक्त होतात आणि आवश्यक असल्यास ते आपल्या मालकीतल्या मौल्यवान देणग्या अल्लाहसाठी बळी देण्याची तयारी ठेवतात. याचं हा सण द्योतक आहे. या बलिदानाचा हा धडा आहे. (पाहा- कुरआन, २२:३७)

# सलातल जुमा

## (शुक्रवारची नमाज)

'सलातल जुमा' म्हणजे जुमाची नमाज सामूहिकरित्या अदा केली जाते. सर्व मुस्लिम सज्ञान माणसांनी यात सहभाग घेतला पाहिजे. स्त्रियांसाठी ही नमाज आवश्यक नसली तरी घरकामातून वेळ काढून इच्छा असल्यास त्याही सहभागी होऊ शकतात.

या नमाजसाठी दुपारची वेळ होताच लेक जमतात. मस्जिदीत प्रवेश केल्यानंतर चार रकाह सुन्नत नमाज अदा करतात आणि मग इमाम (नमाजचं नेतृत्व करणारा) प्रवचन (खुतबा) देतो. प्रवचनानंतर इमामच्या नेतृत्वात अनिवार्य असलेल्या दोन रकाह नमाज सामूहिकपणे अदा केली जाते. या दोन अनिवार्य रकाहनंतर आणखीन सहा रकाह सुन्नह आणि नफ्ल नमाज सर्व लोक व्यक्तिगत अदा करतात. मुस्लिम लोक एक समुदाय आहे आणि जुमाची नमाज ही सामुदायिक प्रार्थना आहे. शुक्रवाच्या दिवशी प्रत्येक आठवड्यात एका वस्तीत राहणारे मुस्लिम लोक या नमाजसाठी एकत्र येतात. हा दिवस मुस्लिमांसाठी दर आठवड्यात एक सण असल्यासारखा आहे.

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या काळात सर्व इस्लामी कार्यक्रमांचं एक केंद्र होतं, पण आता तसं नाही. जुमाची नमाज एका वस्तीत राहणाऱ्या मुस्लिमांसाठी एकत्र येण्याचा प्रसंग आहे. यामुळं त्यांना एकमेकांशी आपल्या अडीअडचणी सांगणं आणि समस्यांचं समाधान करण्याची संधी प्राप्त होते. याद्वारे त्यांच्यात एकता, सहयोग आणि समज उत्पन्न होतात. इस्लामी राजवटीत राज्याच्या प्रमुखानं किंवा त्याच्या प्रतिनिधी अथवा स्थानिक नेत्यानं दररोज पाच वेळच्या नमाजांचं नेतृत्व करणं गृहित आहे. त्याचबरोबर वस्तीच्या केंद्रस्थानी असलेल्या मस्जिदीत जुमाच्या नमाजचं नेतृत्व करावं. प्रेषित मुहम्मद मदीनेतील सर्वपब्रथम इस्लामी राज्यांचे प्रमुख या नात्यानं मस्जिदे नबवी (प्रेषितांची मस्जिद) मध्ये सर्व नमाजांचं नेतृत्व करीत होते.

# मुस्लिम जगत

जिथं कुठं मुस्लिम आहेत, ते एकाच समुदायाशी- राष्ट्राशी (उम्माह) संबंधित आहेत. इस्लाममध्ये लोकांना एकत्र बांधून ठेवणारी 'श्रद्धा' आहे. भूगोल, विशिष्ट भूभाग, देश, वंश, भाषा यांचा मुळीच संबंध नाही. इस्लामी राज्याचं नागरिकत्व भौगोलिक मर्यादेनुसार निश्चित केलं जातं.

लोकसंख्येच्या आधारावर जगात ५७ मुस्लिम देश आहेत. जगातली एकूण मुस्लिम लोकसंख्या १.७ बिलियन (एक अब्ज ७० कोटी) तिकी आहे आणि ही प्रभावी मानवी शक्ती आहे.

इ. सनाच्या ४० आणि ५०च्या दशकात अनेक मुस्लिम देशांनी स्वातंत्र्य मिळवलं. समकालीन मुस्लिम जगत सेनेगल आणि मोरोक्को समुद्रकिनाऱ्यापासून प्रशांत महासागरापर्यंत आणि इंडोनेशियापर्यंत आहे आणि तुर्कीच्या मेडेटेरेनियन समुद्रकिनाऱ्यापासून ते सोमालियाच्या उत्तर-दक्षिण भागात जगातल्या मध्यभागातील पट्ट्यामध्ये दोन्ही बाजूंनी पसरलेला आहे. मुस्लिम जगात ५७ सार्वभौम देशांचा समावेश असून ते प्रगतीच्या विविध टप्प्यांमध्ये आहेत. साठपेक्षा अधिक भाषा त्या देशांमध्ये आहेत. यामध्ये मानवजातीचे विविध वंश, अरब, भारतीय, तुर्की, पठाण, चायनीज आणि मलाया, उजबेक आणि हुसा वंशाचे लोक वास्तव्य करीत आहेत.

शीतयुद्धाच्या समाप्तीनं मध्य आशियात सहा नवी मुस्लिम राष्ट्रे उदयास आली. पुढीलप्रमाणे- उजबेकिस्थान, कजाकिस्थान, तुर्कमेनिस्थान, ताजिकिस्थान आणि अजरबैजान. यूरोपमध्ये अल्बानियानं स्टॅलिनिष्ठ ओळख टाकून दिली आणि पूर्वाश्रमीच्या युगोस्लाव्हियापासून बोस्निया-हर्जेगोविना विभक्त झाले, त्यांच्यावर सर्बियन लोकांनी आक्रमण केलं.

## अल्पसंख्य मुस्लिम

जागतिक मुस्लिम समुदाय म्हणजे उम्मह मुस्लिम जगतापेक्षाही फार अधिक आहे. हे सर्व राष्ट्रांचे घटक असून त्यांचा धर्म, संस्कृती आणि इतिहास तसेच एकमेकांशी संबंधित असल्याच्या जाणिवा एकसारख्या आहेत. मुस्लिमेतर देशांमध्ये एकतृतियांश मुस्लिम अल्पसंख्याक म्हणून राहतात.

भारतीय मुस्लिम, २० कोटी, जगातले सर्वाधिक अल्पसंख्यक मुस्लिम आहेत. चायनामध्ये ८ कोटींपेक्षा अधिक मुस्लिम राहतात. फिलिपिन्स, बर्मा, थायलंड आणि श्रीलंकेत मोठ्या संख्येनं मुस्लिम आहेत.

## परदेशांत स्थलांतर

अनेक मुस्लिम देशांच्या स्वातंत्र्यानंतर ५०व्या दशकापासून मुस्लिम पाश्चात्य देशांकडं स्थलांतर करत आहेत. यूरोपमध्ये हे स्थलांतर चांगल्या पद्धतीनं झालं. सर्व मुस्लिम देशांमधील कुटुंबांनी पूर्वी ते ज्या देशांच्या वसाहतखाली होते तिथं आपला संसार मांडला. अशाप्रकारे भारत, पाकिस्तान आणि बांगलादेशचे मुस्लिम ब्रिटन आणि संयुक्त अमेरिका राष्ट्रात गेले. अल्जेरियन, मोरोक्कन आणि ट्युनिशियाचे लोक फ्रान्सला गेले. इंडोनेशियन आणि सुरिनम (दक्षिण अमेरिकेतला देश) चे लोक हॉलंडला गेले. युद्धामधील जर्मनी आणि तुर्कीच्या संबंधामुळं जर्मनीमध्ये तुर्क समुदाय मोठ्या प्रमाणात आहे. सध्या यूरोपियन देशांमध्ये अंदाजे २० दशलक्ष (दोन कोटी) मुस्लिम लोक वस्ती करून आहेत.

## साधनसंपत्ती

सर्व मुस्लिम देश मिळून जगातलं दोन-तृतियांश तेल, ७० टक्के रबर, ७५ टक्के ज्यूट, ६७ टक्के मसाले, २/३ पामतेल, ५० टक्के फॉस्फेट आणि चाळीस टक्के टिनचे उत्पादन करतात. जगातल्या कापूस, चहा, कॉफी, वूलन, युरेनियम, मँगॅनिज, कोबाल्ट आमि इतर अनेक वस्तूंच्या उत्पादनामध्ये त्यांचा भलामोठा वाटा आहे. मुस्लिम जगामध्ये नैसर्गिक गॅसचा प्रचंड साठा आहे.

आपण जर मुस्लिम जगताचा नकाशा पाहिला तर मुस्लिम देश जगात सैनिकी दृष्टीनं महत्त्वाच्या ठिकाणी आहेत. मेडिटेरेयिन समुद्राचा ६० टक्के भाग मुस्लिम देशांनी वेढलेला आहे. तांबडा समुद्र (Red Sea) आणि खाडी (Gulf) पूर्णपणे मुस्लिम भूप्रदेशात आहे. इतिहासाच्या ओघात मुस्लिमांनी त्यांचं ऐक्य हरवलं. मानवजातीच्या भल्यासाठी ते ऐक्य पुन्हा स्थापित केलं पाहिजे.

एकेकाळी मुस्लिमांनी विज्ञान, सभ्यता आणि तंत्रज्ञानामध्ये मोलाचं योगदान दिलंय. जर ते इस्लामच्या आधारावर एकत्र आले तर पुन्हा तसं योगदान देऊ शकतात. इस्लामी शिकवणींचं निष्ठापूर्वक पालन केलं तर मानवाची खरी उन्नती होऊ शकते. इस्लामचं वैभव परत मिळवण्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत आणि आज समस्यांनी ग्रासलेल्या जगाला शांततेचं आणि आनंददायी ठिकाण बनवू शकतो. सांप्रत काळाला भूतकाळातल्या अनुभवांच्या प्राकाशात साकार केलं तर भूतकाळाविषयीच्या गर्वाला अर्थपूर्ण केलं जाऊ शकते आणि भविष्यासाठी वचन दिलं जाऊ शकते. यासाठी आवश्यक आहे ते म्हणजे इस्लामी शिकवणींचं आस्थापूर्वक पालन करणं.

# समारोप

मुस्लिमांकडून अशी अपेक्षा आहे की ते सैतानाला विरोध करून नम्रतापूर्वक पश्चात्ताप करत अल्लाहकडं वळतील. म्हणजे ते खऱ्या अर्थानं या सत्य धर्माला पाहिजे त्यानुसार त्याचं प्रतिनिधी बनतील आणि दया, दान-धर्म, सहिष्णुता आणि सदाचाराची जी उदाहरणं या धर्मानं प्रस्तुत केली आहेत त्याची पुनरावृत्ती करतील. सर्व लोकांना यश आणि अल्लाहच्या उपासनेच्या प्रकाशाकडं निमंत्रण देतील.

ज्या लोकांनी आतापर्यंत सत्याला स्वीकारलं नाही त्यांनी या पुस्तकात दिलेल्या पुराव्यांवर आणि चर्चेवर सखोल विचार करावा. हे जीवन नक्कीच एक देणगी आणि संधी आहे. ज्यास वाया जाऊ देता कामा नये, हे त्यांनी विसरू नये. आपलं उंभ जीवन तुम्ही आपल्या आकांक्षांची पूर्तता करण्यात घालवलं त्याच्या आराधनेसाठी तुम्ही माथा टेकला नाही, आपल्या आवडीनिवडीनुसारच अपवाद वगळता आता या जीवनात तुमचा वेळ संपलेला असताना तुम्ही आपल्या विधात्याशी कसं भेटणार? वेळ निघून जाण्यापूर्वी कृती करा, नसता तुम्ही अनंतकाळ आपल्या निष्क्रियतेच्या दुःखातच लोटत राहणार.

# आभार

अनेक लोकांकडून मला रास्त मिळालेल्या मदतीकरिता आणि याच्या हस्तलिखितावर त्यांनी जे भाष्य केलं यासाठी मी त्यांचं आभार व्यक्त करतो. या पुस्तकाचं लेखन / संकलनासाठी ज्या मान्यवर साहित्यिकांच्या ग्रंथांचा मी लाभ घेतला त्यासाठी त्यांचे अनेक धन्यवाद!

अल्लाह त्या सर्वांना उपकृत करो. त्यांच्या प्रयत्नांचा स्वीकार करो.

मुहम्मद नुमान खान यांनी हे पुस्तक साकारण्यात ज्या उत्साहानं, निष्ठेनं आणि नम्र भावनेनं माझी मदत केली त्यासाठी मी त्यांचा आभारी आहे.

अल्लाहच्या अमर्याद कृपेनं मला हा धाडसी उपक्रम स्वीकारण्यास आवश्यक संसाधने, ज्ञान आणि उत्साहाची तरतूद केली. त्याच्या उपकाराशिवाय हा उपक्रम पूर्ण झाला नसता आणि फलदायी ठरलं नसतं. तमाम मानवजातीला शांततेचा संदेश आणि प्रेम पोचतं करण्यासाठी मी जो मार्ग अवलंबिला आहे त्याचं मला मार्गदर्शन करावं, अशी मी प्राथ७ना करतो. आमीन.

डिसेंबर २०१४

**सय्यद हामिद मोहसिन**

चेअरमन, सलाम सेंटर

# संदर्भ ग्रंथ सूची

| | | |
|---|---|---|
| १. | मुहम्मद<br>इन्सायक्लोपीडिया ऑफ सीरह | अफजलुर्रहमान |
| २. | द इमर्जन्स ऑफ इस्लाम | डॉ. मुहम्मद हमीदुल्लाह |
| ३. | इन्ट्रॉड्युसिंग इस्लाम | जियाऊद्दीन सरदार |
| ४. | इस्लाम इन फोकस | हम्मुदाह अब्दालाती |
| ५. | मुहम्मद | कॅरेन आर्मस्ट्रॉंग |
| ६. | ला वि द महोमेट | कॉन्स्टनटाईन व्हर्जिल घेओर्घिह |
| ७. | द फ्युचर ऑफ इस्लाम | तारिक रमजान |
| ८. | धिस इज इस्लाम | डॉ. के. के. उस्मान |
| ९. | द होली कुरआन | अब्दुल्लाह यूसुफ अली |
| १०. | द कुरआन | डॉ. नझीर अहमद |

This document was created with the Win2PDF "Print to PDF" printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/